मू-प्रकाश
0845

# अमेरिका

अनिल अवचट

m

# e

# अमेरिका

अनिल अवचट

मॅजेस्टिक प्रकाशन

प्रकाशक - मुद्रक :
अशोक केशव कोठावळे
मॅजेस्टिक प्रकाशन
३१६ प्रसाद, प्रसाद चेंबर्स
गिरगाव, मुंबई - ४०० ००४

आवृत्ती पहिली :
ऑगस्ट १९९२

© अनिल अवचट

मुद्रणस्थळ :
स्मिता प्रिंटर्स
प्रमोद वि. बापट
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ, पुणे ३०.

मुखपृष्ठ व आतील मांडणी :
सुभाष अवचट

मूल्य : ६५ रुपये

i

नशीब काढायला
अमेरिकेत
जाऊ इच्छिणाऱ्या
भारतातल्या
(तरुण)
भाग्यविधात्यांना

काळजीपूर्वक

# C

## अनुक्रम


सुरुवात / ७
वातावरण / ९
शॉपिंग / २५
कचरा / ३६
वकील / ४४
टी.व्ही. / ४८
व्यसनं / ५८
कौटुंबिक / ७०
आयोवा प्रोग्रॅम / ८३
आयोवा मुक्काम / ९८
पोर्टलॅंड / ११७
रेडवूड, ग्रँड कॅनियन / १२७
लास व्हेगस / १३७
सँड्रा / १४३
मेक्सिको / १४९
रेड इंडियन्स / १५४
भारतीय / १६२
स्थलांतरित / १७७
मेल्टिंग पॉट / १८६
चार शब्द... / २००

प्रवास
६७५
२६६५०

# a

## सुरुवात

पहिल्यापासूनच अमेरिका, इंग्लंडसारख्या संपन्न देशात जावं, असं माझ्या मनोराज्यातही कधी येऊन गेलं नव्हतं. वाटायचं, काय बघायच्यात त्या इमारती, रस्ते ? ते तर सिनेमात बघतोच आपण. फक्त आवडत्या कलाकारांची मूळ चित्रं, शिल्पं पाहायला पॅरिसला जावं. हेलिकॉप्टरने आपल्याला त्या म्युझियमच्या डोक्यावर नेऊन सोडावं आणि चित्रं पाहून झाली की त्याच हेलिकॉप्टरने परत यावं. भारतच इतका बघायचा राहिलाय, जो काही पैसा, वेळ असेल तो त्यात घालवू. त्यावर निदान लिहिता तरी येईल. बहीण प्रविणा कॅनडात असते ती बोलवायची, पण जावंसं वाटलं नाही.

पुढं आयोवा इंटरनॅशनल रायटर्स प्रोग्रॅमचं अचानक बोलावणं आलं, तिकीट, व्हिसा, साडेतीन महिन्यांचा प्रोग्रॅम सगळं अलगद आणि सन्मानाने हातात पडलं, म्हणून जाऊन

आलो. जाताना मित्र म्हणाला, "तू जाऊन ये, पण जर का अमेरिकेवर प्रवासवर्णन लिहिलंस तर याद राख. आम्ही त्याला अगदी कंटाळलोय." त्यामुळे तर आणखीनच भार उतरला. नुसतं जायचं आणि यायचं. कसली जबाबदारी नाही. फक्त जमलं तर मेक्सिकन स्थलांतरित मजुरांची माहिती घेऊ, म्हणजे इथल्या ऊस तोडणी कामगारांवर आपल्याला लिहिताना त्याचा उपयोग होईल. जाताजाता ड्रग डिॲडिक्शन सेंटर्स बघून त्याचा इथल्या, मी सध्या सहभागी असलेल्या मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्रासाठी फायदा होईल, तेवढं फक्त ठरवून गेलो. परत आल्यावर वर्षभर इतर नेहमीच्या व्यापात गुंतूनही गेलो. कुणी विचारायचं, काय लिहिलं नाही तू अमेरिकेवर ? मी म्हणायचो, "काय लिहायचं ? इथल्या लोकांना अमेरिकेची एवढी माहिती आहे की तेवढी तिथल्या लोकांनाही नसेल."

पुण्यातल्या टिंबर मार्केटमध्ये म. फुले प्रतिष्ठानची आठवड्यातून एकदा मिटींग असते. बाबा आढाव एकदा म्हणाले, "तू सांग, अमेरिकेत काय पाहिलंस ते." त्या पाचपंचवीस मित्रांसमोर बोललो. ते अपुरं पडलं म्हणून परत एकदा नुसता प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम झाला. बोलताना मला वाटू लागलं, अरे आहे की आपल्याकडे लिहिण्यासारखं. मग अधुनमधून जसं आठवलं तसं लिहीत गेलो. आणि त्यातनं हे एवढं लिहून झालंय. यातलं खरोखर लोकांना किती आधी माहीत असलेलं आहे किंवा किती नवीन वाटेल, याचा काहीच अंदाज मला लागत नाही. अमेरिकेतला प्रमोद काळे हा मित्र गोव्यात अभ्यासासाठी वारंवार येत असतो, त्याला वाचायला दिलं. तो 'छाप' म्हणाला. इथल्या एका-दोन जणांनीही वाचून छापायला हरकत नाही असं सांगितलं. (फक्त ज्याने लिहू नकोस म्हणून बजावलं होतं, त्याला मात्र वाचायला द्यायचं धाडस झालं नाही.)

# वातावरण

अमेरिकन लोक जगभर टूरिस्ट म्हणून भटकत असतात असं ऐकलं होतं. पण त्यांच्या देशात गेल्यावर दिसलं की, ते स्वतःच्या देशातही टूरिस्ट म्हणून बरेच भटकत असतात. त्या अवाढव्य देशात वाळवंटापासून तो बर्फाच्छादित प्रदेशापर्यंत सर्व तऱ्हेचा निसर्ग आहे. त्यामुळे उत्तरेकडचे लोक उन्हाळ्यात टॅनिंगसाठी दक्षिणेत येतात. आपल्याला गोरेपणाचं अप्रूप. पण तिकडे सुटीत एखादी बाई साऊथकडे जाऊन आली की, 'काय छान टॅन झाली आहेस,' असं म्हटलं की ती खूष होते. वर्ष-दोन वर्षं सेव्हिंग करायचं आणि सुटी काढून भटकून यायचं, हा तिथला आवडता उद्योग. पांढऱ्या हाफ पँटीवर रंगीबेरंगी टीशर्ट, चेकचा शर्ट किंवा साधी बनियन घालतात. हा टुरिस्टांचा जसा काही युनिफॉर्मच. गळ्यात कॅमेरा, खांद्यावर व्हिडिओ कॅमेरा ठेवून ते भटकत राहतात. त्यातही म्हाताऱ्या लोकांची संख्या जास्त. ही 'सिनियर सिटीझन' मंडळी मजा करीत असतात. सेव्हिंग भरपूर करून ठेवलेलं असतं. प्रवासासाठी सरकारच्या सवलती असतात. (मी तिथं असताना जेवढे नाटक-सिनेमा पाहिले, तिथेही जास्त संख्या या सिनियर सिटीझन्सची असायची) आयोवा प्रांतात बर्फाच्छादित हिवाळा असतो. आयोवातली म्हातारी मंडळी हिवाळ्याच्या आधी टेक्सास या उष्ण प्रांतात राहायला जातात. म्हणून तिकडले लोक अशा म्हाताऱ्यांना 'स्नो-बर्ड्स' म्हणतात. आम्हाला एका अमेरिकेन बाईने अमेरिकन संस्कृतीवर लेक्चर दिलं होतं. त्यात ती म्हणाली होती, "अमेरिकन माणसं सतत इकडून तिकडे जात असतात. लॉस एंजलिसला राहणाऱ्या माणसाला वाटतं, चला, बरेच दिवस झाले इथं जॉब करून. न्यूयॉर्कला जावं. असं सारखं जॉब, ठिकाणं, राहायच्या जागा बदलत राहतात. कशासाठी, हे त्याला सांगता येणार नाही. पण धावत राहणं हे या संस्कृतीचं मर्म आहे."

या टुरिस्टांच्यासाठी इतक्या सोयी आहेत की बस्स. अडाण्याला सुद्धा बिनबोभाट भटकता येईल. अंजू कोष्टी (शेळके) हिने माझ्यासाठी ग्रँड कॅनियनला जायचा प्रोग्रॅम ठरवला होता. तेरा तास ड्रायव्हिंग करणार होतो. दोन दिवस तिथं राहून येताना लास व्हेगसला रात्र काढून लॉस एंजेलिसला परतणार होतो. तिनं घरबसल्या फोन करून

सगळीकडची हॉटेल-मोटेलची रिझर्वेशन्स करून टाकली होती. हिवाळ्यात ग्रँड कॅनियनच्या कुठल्या भागात जाता येतं, टूर बस चालू असते का. . . वगैरे सगळी माहिती तिथल्या टूरिस्ट सेंटरवरून काढून ठेवली होती.

आपण जायचं ठरवलं तर अमेरिकेच्या एका टोकाला बसून दुसऱ्या टोकावरच्या ठिकाणची सर्व व्यवस्था फोनवर बिनबोभाट करू शकतो. विमानाचं, ग्रे-हाऊंड बसेसचं महिनोन्‌महिने आधी आणि तेही पैसे न देता रिझर्वेशन करता येतं. कुठं जंगलात जरी गेलात तरी तिथं 'शेल्टर्स' असतात. वरती मोठं, उतरतं छप्पर असलेला पक्का मंडपच तो. आत बाकं-टेबलं असतात. जिकडे-तिकडे पैसे टाकून कोक, बियर, वेफर्स व इतर खाद्यपदार्थांची पाकिटं मिळणारी 'व्हेंडिंग मशिन्स'. स्लॉटमध्ये नाणं सरकवायचं, काचेमागे दिसणाऱ्या वस्तूपुढचं बटन दाबायचं की खालच्या कप्प्यात आलीच ती वस्तू गडगडत खाली. पावलापावलावर गार्बेज कॅन्स, रेस्ट रूम्स. नॅशनल पार्क ही तिथली मैलोन्‌मैल पसरलेली जंगलं. त्यातही छोटे रस्ते. त्याला लाकडी छोट्या कठड्यांच्या बॉर्डर्स. आत जायच्या पायवाटाही तयार केलेल्या, कडा असलेल्या. त्या ओलांडून जाऊ नये अशा सूचना. त्यामुळे तिथं निसर्गाची भीती अशी वाटतच नाही. अगदी नेभळट निसर्ग. प्रत्येक जागेला माणसाने टूरिस्ट संस्कृतीची झालर लावलेली. ती तुम्हाला टाळताच येत नाही. त्यामुळे आपल्याकडे निसर्गाची अक्षम्य हेळसांड झालेली असली, तरी तो जंगली वाटल्यानं बरं वाटतं.

टोरांटोला माझी बहीण प्रविणा असते. तिच्या नवऱ्याने म्हणजे प्रमोदने नायगरा बघायला नेलं. (त्याचा खरा उच्चार नायाग्रा असा आहे हे तिथं गेल्यावर समजलं.) निसर्गाचं भव्य आणि रौद्र स्वरूप पाहायला मिळणार म्हणून उत्सुकतेने गेलो. पण गेल्या गेल्या त्या भागात गाड्यांची इतकी गर्दी की, पार्किंगसाठी आम्ही चार-सहा मैलांच्या दोन-चार तरी चकरा मारल्या असतील. सगळीकडे गिफ्ट शॉप्स. गिफ्ट शॉप हा अमेरिकन लोकांचा आवडता पण मला बोअर वाटलेला प्रकार. देशभर कुठेही जा, गिफ्ट शॉपमधला फॉर्म्युला तोच. गेल्या गेल्या टोप्या दिसणार, त्यांवर त्या त्या ठिकाणचं नाव किंवा चित्र (उदा. नायाग्रा, ग्रँड कॅनियन इ.) भरतकाम करून म्हणा किंवा छापून म्हणा उमटवलेलं. मग की-चेन्स. त्यावर तेच नाव. पिक्चर पोस्ट कार्डस्. त्यात त्या ठिकाणाला अनेक अँगल्समधून बुचकळून काढलेलं. नंतर क्रोकरी. त्यावरही ते किंवा तत्सम डिझाईन्स उमटवलेली. टी शर्टस्– त्यावरही तसेच. तिथं हिंडणारं पब्लिकही तसेच टीशर्ट, टोप्या घालून 'आऊट टु एन्जॉय' मूडमध्ये फिरताना दिसतात. (आपल्याकडेही शिर्डीला गेलं की तिथल्या दुकानात साईबाबांच्या अंगठ्या, लॉकेट, फोटो. . . किंवा दगडूशेट गणपतीजवळ त्या गणपतीचे अनेक आकारांचे फोटो मिळतात, तसेच.) गिफ्ट शॉपच्या संख्येएवढी किंवा जास्तच संख्येने रेस्टॉरंटस् असतात. त्यावर चायनीज फूड, मेक्सिकन फूड किंवा पिझ्झाच्या मोठमोठ्या पाट्या दिसायच्या. अशी गावं इतकी रेस्टॉरंटमय की जसं लोक त्या गावात फक्त खायलाच येत असावेत.

नायाग्राच्या शेजारी एक कॉंक्रीटचा उंचच उंच टॉवर बांधला आहे. त्याच्या चोहोबाजूने, पिवळ्या रंगाचे ढब्बू किडे चढावेत तशा लिफ्ट वर-खाली करीत असतात. सगळ्यात वरती प्रेक्षकांसाठी तबकडीच्या आकाराची गॅलरी केली आहे. उंच काठी आणि त्यावर एक तबकडी हें नायाग्राच्या इतक्या भव्य दृश्याशेजारी इतके विसंगत आणि बेढब स्ट्रक्चर उभे केले आहे! कशासाठी, तर वरनं नायाग्रा पाहता यावा म्हणून. शिवाय हेलिकॉप्टरने वरून 'राईड्स' आहेतच. धबधब्यामागून बोगदा खणून तिथं प्रेक्षकांची गॅलरी केली आहे. तिथं दिसतं काय तर एका चौकटीतून वरनं पडणारं पांढरं पाणी. पाणीही दिसत नाही, तर तो नुसता दुधी काचेसारखा रंगच दिसतो. या सगळ्यामुळे तो धबधबा अगदी केविलवाणा दिसू लागतो. फक्त एकच सोय मला तिथं आवडली– बोटीनं पाण्यातून धबधब्यापर्यंत जाता येतं. रेनकोटस् घालायला दिले. मला वाटलं, आता धबधबा जवळ आला, खडकाळ भाग लागेल, आता बोट परत फिरणार. पण बोट पुढेच जात राहिली ती थेट धबधब्यापर्यंत गेली. पाण्याच्या तुषारांचा अक्षरशः धूर उडत होता. पांढऱ्या-ग्रे रंगाच्या वातावरणात अंधुकपणे वरनं पडणाऱ्या पाण्याच्या सीमारेषा दिसत होत्या. तिथं एकदाच मला त्या धबधब्याची रौद्रता आणि भव्यता जाणवली. पण एरवी म्हणजे एवढ्या जगातल्या आश्चर्याचे त्या लोकांनी एखाद्या पिक्चर पोस्टकार्डात रूपांतर करून टाकलेले.

प्रत्येक शहरात आमचा रायटर्स प्रोग्रॅमचा ग्रूप गेला की मुख्य कार्यक्रम सुरू व्हायच्या आदल्या दिवशी त्या शहराच्या दर्शनाची टूर असायची. बसेस अगदी श्रीमंती थाटाच्या. विमानासारख्या सीटस्. मखमलीची मऊ कव्हर्स. बाहेरचं बघायला भल्या मोठ्या काचांच्या खिडक्या, एअर कंडिशनिंग, इत्यादी. ड्रायव्हर हाच बहुदा गाइड असायचा. त्याच्या सीटच्या समोर वरून आलेला माईक असायचा, आणि तो ड्रायव्हिंग करता करता त्या त्या स्थळांची माहिती द्यायचा.

या सगळ्या टूरिस्ट गाइडस्ची जगभरची अशी खास शैली तयार झाली आहे. अनेक गमतीदार तपशील ते पुरवत असतात. पण नंतर वाटायला लागतं, याचा काय उपयोग आहे आपल्याला? सान्फ्रान्सिस्को पाहत असताना आमची बस गोल्डन गेट ब्रिजवरून जात असताना हा 'लॉंगेस्ट सस्पेन्शन ब्रिज इन द वर्ल्ड' सांगितल्यावर तो म्हणाला, "ह्याला इतके लाख रंगाचे डबे रंगवायला लागतात. शंभर माणसांनी एका टोकापासून रंगवायला सुरुवात केली तर दुसऱ्या टोकाला त्यांना रंगवत जायला दोन वर्षे लागतात. पण तोपर्यंत या टोकाचा रंग जुना झालेला असतो, म्हणून परत या टोकापासून सुरुवात करतात." किंवा "या ब्रिजवरून आत्महत्या करायला खूप लोकांना आवडते. दरवर्षी अमुक एक इतके लोक इथून उडी मारून आत्महत्या करतात. पण अजून हे मला काय कोणालाच कोडं सुटलेलं नाही की, ते पुलाच्या उजव्या बाजूनेच उडी मारून का आत्महत्या करतात?" ह्या वाक्याने माणसं उगाचच दहा-वीस मिनिटे तरी त्यावर विचार करीत बसतात. सानफ्रान्सिस्को रेस्टॉरंट्स्साठी प्रसिद्ध आहे असं सांगताना तो म्हणाला, "इथे इतकी रेस्टॉरंटस् आहेत की

तुम्ही जर असं ठरवलंत की एकदा जिथं जेवलो तिथं परत जेवायचं नाही, तरी तुम्ही अशा रीतीनं दोन वर्षं या शहरात जगू शकाल." मी हिशोब केला– म्हणजे चौदाशे रेस्टॉरंटस् इथं आहेत. नुसती तेवढीच संख्या सांगितली असती तर काहीच वाटलं नसतं, पण अशा रीतीनं सांगताच ती माहिती गमतीदार वाटली. पण ती त्या क्षणांपुरतीच. पुढं तिचा उपयोग काही नाही.

टोरांटोचा सिएन टॉवर बघायला गेलो. तिथल्या लिफ्टमध्ये तरुण, सोनेरी केसांची मुलगी होती. लिफ्टचं दार बंद झालं. आत आम्ही पंचवीस-तीस माणसं असू. ती एकदम किंचाळल्यासारखी 'हाय' म्हणाली. आणि मग सिएन टॉवर जगातला टॉलेस्ट टॉवर वुइथ वॉचिंग गॅलरी आहे, त्याची उंची किती आहे, तो कसा बांधला, या लिफ्टचा वेग किती आहे. . . असं बोलताना शेवटचा स्टॉप आला. दार उघडताना ती म्हणाली, "एन्जॉय, अँड हॅव अ गुड टाइम." सगळं ठरलेलं, यांत्रिक.

टोरांटोचा सीएन टॉवर जगातला उंच टॉवर असं ते म्हणतात, तर शिकागोत गेल्यावर तिथला सीअर्स टॉवरही तोच दावा करतो. शिकागोतल्या माणसाला हे सांगताच तो म्हणाला, "सीएन टॉवर हा नुसता टॉवर आहे. आमचा सीअर्स टॉवर ही इमारत आहे. तिथं शेवटच्या मजल्यापर्यंत ऑफिसेस आहेत." न्यूयॉर्कमधल्या वर्ल्ड ट्रेड सेंटरचाही तोच दावा आहे. या तिन्ही इमारती किंवा टॉवर्स मला तर दिसायला अनाकर्षक, बेढब वाटले. सिअर्स टॉवर म्हणजे एक डब्यासारखी इमारत आणि त्यावर दोन शिंगं फुटल्यासारखे टॉवर्स. वर्ल्ड ट्रेड सेंटर म्हणजे नुसते दोन ठोकळे. त्या सगळ्यात न्यूयॉर्कची आता उंचीमध्ये खालच्या नंबरावर ढकलली गेलेली स्टेट एम्पायर बिल्डिंग देखणी व व्यक्तिमत्त्व असलेली वाटली. आमच्या शहरात जगातली उंच इमारत आहे, असं सांगण्यासाठी त्यांच्यात स्पर्धा असते. लोक सांगतात, "आता आमच्या शहरात अमुक एका इमारतीचं बांधकाम चालू आहे. दोन वर्षांनी ते पुरं होईल. दॅट वुईल बी टॉलेस्ट बिल्डिंग इन द वर्ल्ड. मग तमक्या बिल्डिंगचा भाव ख़लास होईल." या टॉवरवर जाऊन पाहिलं तर खालचं दृश्य बहुधा एकसारखंच दिसतं. कारण असे टॉवर्स शहराच्या 'डाऊन टाऊन' मध्ये असतात. तिथे सगळीकडे गगनचुंबी इमारती असतात. ऑफिसेस, बँका. . . इत्यादी. त्यांची डिझाइन्स, रंग हे बारकाईने पाहिले तर वेगवेगळे असले तरी सगळ्याचा ढाचा एकच. उंच, चपटी इमारत आणि खिडक्या खिडक्या. त्यामुळे शिकागो पहा, नाहीतर टोरांटो पहा किंवा न्यूयॉर्क पहा. . . जवळपास दृश्य सारखंच. टूरिस्ट लोक एकमेकांना बोट दाखवून सांगतात, "ती इमारत पॅनामची, हा क्रिसलर टॉवर, ती अमक्या बँकेची बिल्डिंग. . ." सगळीकडे नाणं टाकून लांबचं पहायला टेलिस्कोप ठेवलेले, त्याच्याखाली समोरच्या दृश्याचा नावांनिशी नकाशा लावलेला. सगळं ठरलेलं.

या टॉवरवरचा एकच क्षण असा होता की मी तो जगलो असं वाटलं. वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या गच्चीवर गेलो. समोरच्या पाण्यातला प्रचंड उंचीचा स्वातंत्र्यदेवीचा पुतळा

अंगठ्याहून लहान दिसत होता. आणि सूर्य मावळत होता. सूर्याभोवतीचे ढग वेगवेगळ्या रंगांनी उजळले होते. सूर्य मावळल्यावर न्यूयॉर्कच्या मॅनहॅटन या डाऊनटाऊनमधले दिवे हळूहळू लागत होते. चित्रकाराने रुंद ब्रश घेऊन एखाद्या पेंटिंगमध्ये उजळ रंगाचे पॅचेस द्यायला सुरुवात करावी तसं वाटलं. त्या इमारतींच्या तळातनं रस्ते वाहत होते. रस्त्यावरचे गुलाबीसर दिवे सरासर लागत होते. फिफ्थ अॅव्हेन्यू हा तिथला सर्वांत लांब रस्ता एक दिशा मार्ग आहे आणि दुसरा शेजारचा समांतर रस्ता उलट्या दिशेने एक दिशा मार्ग आहे. त्यामुळे एका रस्त्यावर गाड्यांच्या हेड लाईट्स्च्या पांढऱ्या दिव्यांचा प्रवाह वाहत होता, तर दुसऱ्यावर टेललँपच्या लाल दिव्यांचा. मानवनिर्मित दरीतून वाहणारी दिव्यांची एखादी नदीच पाहतोय असं वाटलं.

वॉशिंग्टन दाखवणारी टूरिस्ट गाईड एक शिडशिडीत, बारकुडी, गोरी बाई होती. स्मार्ट बोलायची. वॉशिंग्टनची चारपाच मजली, जुन्या वळणाची, नक्षीची दगडी, स्टेट कॅपिटल ही राजधानीची इमारत दाखवताना म्हणाली, "या इमारतीपेक्षा उंच इमारत इथं बांधायची नाही, असा या शहरातला नियम आहे." तरीच अमेरिकेत आल्या आल्या गगनचुंबी इमारती दिसतील अशी अपेक्षा होती, पण इथे वॉशिंग्टनमध्ये तर सगळ्या जुन्या वळणाच्या (मुंबईच्या फोर्टमध्ये दिसतात तशा) इमारती होत्या. वाटेने 'आता डाव्या बाजूला बघा... अमकी इमारत... उजवीकडे बघा... लायब्ररी ऑफ काँग्रेस... तिकडे लाल दगडातली टॉवरची इमारत स्मिथ्सोनियन म्युझियम...' असे सांगत होती. एका ठिकाणी आधीची इमारत पाडली होती आणि नव्याने बांधकाम सुरू व्हायचे होते. आमच्या ग्रूपमधल्या एकाने विचारलं, "इथं कोणती इमारत होती ?" ती बाई जरा वैतागली. पण लगेच म्हणाली, "हो, तेही मला माहिती पाहिजे. आत्तापर्यंत टूरिस्टना इथं काय आहे याची माहिती द्यायचं माझं काम आहे, अशी माझी कल्पना होती. इथून पुढे, काय आहे याबरोबर इथं काय होतं, याचीही माहिती करून घेऊन ती देत जाईन." एका इमारतीकडे बोट दाखवून म्हणाली, "हा डॉलर छापायचा कारखाना. तुम्हाला माहीत आहे, एक डॉलरची नोट किती दिवसांनी बाद होते ? तेरा महिन्यांनी. आणि वीस डॉलरची नोट ? तीन वर्षांनी. शंभर डॉलरची नोट ?" आमच्यातले लोक तर्क करू लागले, 'पाच वर्षं... आठ वर्षं...' ती म्हणाली, ''तेवीस वर्षं." पुढे म्हणाली, "हा नोटांचा कारखाना आपल्याला आतून बघायला मिळतो. फक्त व्हिजिटर्सना ते फ्री सँपल्स मात्र देत नाहीत.' आम्ही हसू लागलो. पण पुढे लक्षात आलं की हा इथला ठरलेला जोक आहे. आयोवातल्या फ्रीजच्या फॅक्टरीविषयी माहिती सांगताना तिथली बाईही हेच म्हणाली, "दे डोन्ट गिव्ह फ्री सँपल्स."

या निमित्ताने अॅम्स्टरडॅममधला गाईडही आठवला. अॅम्स्टरडॅम हे कालव्यांचे शहर. तिथं बोटीत बसून टूर होती. एका ठिकाणी बोट येताच बाजूच्या रस्त्याकडे बोट दाखवून तो म्हणाला, "इथं जुन्या वस्तू विकत मिळायचं मार्केट आहे. अॅम्स्टरडॅम हे सायकलींचं शहर आहे. इथं सायकली बऱ्याचदा चोरीला जातात. ड्रग अॅडिक्टस् बहुदा त्या चोरतात. इथले

लोक आपली सायकल चोरीला गेली की या मार्केटमध्ये येतात. बऱ्याचदा त्यांना स्वतःची सायकलसुद्धा इथं सापडू शकते. मग ती ते विकत घेतात आणि वापरू लागतात. दॅटस् व्हाय द होल थिंग इज कॉल्ड रिसायकलिंग."

अमेरिकेत कशाचाही टूरिस्ट स्पॉट बनला जाऊ शकतो. हेन्री डेव्हिड थोरो हा तिथला गेल्या शतकातला मोठा विचारवंत. शोषणावर आधारलेल्या मानवी संस्कृतीचा उबग येऊन, त्याकडे पाठ फिरवून तो वॉल्डन तळ्याकाठी जंगलात जाऊन राहिला. तिथलं खोपटं त्याने स्वतः तयार केलं. स्वतःच्या गरजेपुरतं धान्य पिकवून राहू लागला. या समाजव्यवस्थेचा भाग व्हायचं नाकारण्यासाठी त्याने कर भरायला नकार दिल्याने त्याला तुरुंगातही जावे लागले. दुर्गा भागवतांनी भाषांतर केलेले त्याचे 'वॉल्डन' वाचले होते. त्याची इतरही पुस्तके मी नंतर वाचली, आणि त्याचा चाहता बनलो. अमेरिकेत आल्यावर त्या वॉल्डनची चौकशी केली. आमच्याबरोबर एक प्रोग्रॅम ऑफिसर बाई होती. तिच्या-माझ्या यावर गप्पाही झाल्या होत्या. तिला मी "वॉल्डन बघायला जाता येईल का ?" असं विचारलं. ती म्हणाली, "तू तिथं जाऊ नकोस. तुला ते आवडणार नाही. कारण त्याचा आता टूरिस्ट स्पॉट झाला आहे." माझ्या डोळ्यासमोर गिफ्ट शॉपपासून तो पिझ्झा हाऊसपर्यंत सगळं तरळून गेलं की ज्याला थोरोनं आयुष्यभर विरोधच केलेला होता.

या देशाला जुना इतिहास नाही, जे काही आहे ते शे-दीडशे वर्षांतले. पण इतिहास जतन करून त्याचे टूरिस्ट अॅट्रॅक्शन करायची त्यांना मोठी हौस. अमान मोमीन या मित्राकडे न्यूजर्सीतल्या पार्सी पेनी गावी गेलो होतो. फिरायला जवळच्या भागात गेलो. तिथं ज्या गावी जॉर्ज वॉशिंग्टन एक रात्र (किंवा काही दिवसही असेल) मुक्कामाला होता, ती इमारत आता जतन केली आहे. त्या इमारतीत शिरताना एक गोरा उंच माणूस अगदी विचित्र पोशाखात बाहेर आला. गुडघ्यापर्यंतची घट्ट काळी पँट, त्याखाली पांढरे स्टॉकिंग, वर झालरीची टोपी...एकदम लक्षात आलं की जॉर्ज वॉशिंग्टनच्या काळातला पोशाख. आतही तिथले कर्मचारी स्त्री-पुरुष अठराशे सालातल्या पोशाखात वावरत होते. जॉर्ज वॉशिंग्टन कुठं झोपला, कुठल्या टेबलाशी बसला. . . इ. अशी जतन केलेली घरं अनेक ठिकाणी पहायला मिळाली. आमचा ग्रूप लेखकांचा असल्यामुळे अमेरिकेन सरकारने आमच्यासाठी खास टूरिस्ट स्पॉट निवडले होते. पूर्वीच्या लेखकांची घरे जतन केली आहेत त्याचे. कॅलिफोर्नियातल्या कॅरमेल गावाजवळ एका कवीचे घर आहे. ते त्याने स्वतःच्या हातांनी बांधले आहे. तिथं गेल्यावर आधी त्या कवीची जन्मापासूनची माहिती. घरासाठी दगड कसे जमवले, आधी कुठला भाग होता, नंतर कुठला वाढवला, बायकोसह तो जेवायला कुठं बसायचा, पाहुणे आल्यावर ते कुठल्या खोलीत जेवण घ्यायचे, पहिल्या बायकोशी घटस्फोट कधी झाला...मी अगदी कंटाळून जायचो. काय माझा या गोष्टीशी संबंध होता ? पुढे पुढे तर मी दांड्याच मारू लागलो. त्याऐवजी मी एकटा भटकायचो. थॉमस जेफर्सन या राष्ट्रपुरुषाचे शार्लेटव्हिलमधले घर पाहिले. नंतर कधीतरी लिंकनच्या जन्मगावी आम्हाला

नेणार होते. मी जायचं नाही ठरवलं. ग्रूपमधल्या लेखक मित्राने कारण विचारले तेव्हा म्हणालो, "लिंकनविषयी आदर आहेच मला. पण तिथं काय काय असणार हे इथं बसून मी सांगू शकतो." म्हणून मी माझा तर्क सांगितला. मित्र जाऊन आल्यावर विचारले तर बहुतेक तर्क खरा ठरला होता.

आयोवाच्या जवळ अमाना कॉलनीज नावाचे एक 'टूरिस्ट अ‍ॅट्रेक्शन' आहे. अमेरिकेत शंभरेक वर्षांपूर्वी युरोपातून अनेक गट येऊन दाखल झाले. त्यातनं जर्मनीतून आलेला एक गट तिथे येऊन स्थायिक झाला. त्यांनी शेती बरी आणि आपण बरे, अशा वृत्तीने इतरांशी काही संबंध ठेवला नाही. त्यामुळे इतर अमेरिका झपाट्याने बदलत गेली. पण अमानातली ही चार-सहा गावे तशीच मागासलेली राहिली. ते एकमेकांत लग्न करायचे, जर्मन बोलायचे, शेतीची अवजारे, ते आले त्या जुन्या काळातली वापरायचे. परवापरवापर्यंत हे चालले होते. पण कुणाच्यातरी लक्षात आले की यात 'टूरिस्ट पोटेन्शिअल' आहे. मग त्यांनी तो टूरिस्ट स्पॉट बनवला. झुंडीच्या झुंडी तिकडे येऊ लागल्या. मग अमानातल्या लोकांचीही जीवन पद्धती विस्कटून गेली. मग त्यांनीही टूरिस्ट इंडस्ट्रीचा फायदा घ्यायचे ठरवले. मी बघायला गेलो तेव्हा ते जुन्या काळची अवजारे मांडून बसलेलेच होते. वेषही नाटकातल्या पात्रांसारखे. एक जण लाकूड फोडून दाखवत होता. दुसरा मक्याच्या कणसाचे दाणे कांडून काढून दाखवत होता. बायका आपल्याकडे मुलांना टोपडी घालतात तशा टोप्या व पायाच्या घोट्यापर्यंत लांब फ्रॉक घालून गोधड्या शिवत बसलेल्या होत्या. पहायला आलेली टूरिस्ट मंडळी फटाफटा त्यांचे फोटो काढत होती. प्रत्येक गोष्ट पाहताना एक्साईट होऊन किंचाळत उद्गार काढीत होती.

कालोना येथे तर जुने गावच्या गाव जतन केले आहे. तिथले रेल्वे स्टेशन, सिग्नल रूम, त्यात हाताने ओढायच्या लीव्हर्सचे दांडे. वरती स्टेशन मास्तरची क्वार्टर, त्यात त्या वेळच्या सगळ्या वस्तू, भांडी... पाहताना मी अमेरिकन मित्राला म्हणालो, "तुम्ही जे म्युझियममध्ये ठेवता अशी रेल्वे स्टेशन्स, असे सिग्नल्स आमच्या देशात आजही आहेत." तो आश्चर्याने म्हणाला, "असं हँड ऑपरेटेड सगळं? आणि वाफेचं इंजिन?" मी हो म्हणताच तो म्हणाला, "तुम्ही इलेक्ट्रिसिटी का नाही वापरत? ऑटोमॅटिक सिस्टिम का बसवत नाही?" मी म्हटलं, "तेही आहे आमच्याकडे. एकीकडे कॉम्प्युटराइज्ड यंत्रणा आहे आणि त्याच वेळी हे जुनंही चालू आहे. अठराशे सालातली छपाईची ट्रेडल यंत्रंही आहेत, फुल ऑटोमॅटिक ऑफसेट, फोटोटाइपसेटिंगही आहे."

या सगळ्या टूरिस्ट संस्कृतीच्या जोरदार प्रवाहातनं कधीतरी एखाद्या फटीतनं खरं अमेरिकन जीवन समोर यायचं. वॉशिंग्टन टूरच्या वेळी लिंकन मेमोरिअलच्या समोर आमच्या गाईड बाईने आम्हाला सोडलं आणि 'अर्ध्या तासाने बसपाशी परत या' असं सांगितलं. जाताना उजवीकडे बोट दाखवून ती म्हणाली, "तिकडे व्हिएटनाम व्हेटरन्सचं मेमोरिअल आहे तेही हवं असल्यास बघून या." मी या व्हिएटनाम मेमोरिअलविषयी वाचलं

होतं, ते आठवलं. हजारो अमेरिकन तरुण मुलं व्हिएटनाममध्ये मेली. कित्येकांची प्रेतंही मिळाली नाहीत, त्यांचं दफनही झालं नाही. कुणाच्यातरी मनात कल्पना आली आणि त्याने पैसे उभे केले. सरकारकडून ही जागा मिळवली आणि ही भिंत बांधली. जेवढे लोक मेले त्यांची क्रमवार नावं त्यावर कोरली. त्याच्या उद्घाटनाच्या प्रसंगी लाखो लोक उत्स्फूर्तपणे जमले. त्यांतल्या, युद्धातून जिवंत परत आलेल्या लोकांनी त्या वेळचे गणवेष, बिल्ले लावलेले होते.

हे स्मारक म्हणजे वरून फक्त हिरवळ दिसते. जवळ जावे तशी त्यात पुरुषभर उंचीची चकचकीत काळ्या ग्रॅनाइटची भिंत दिसू लागते. त्यावर असंख्य नावांच्या याद्या कोरलेल्या आहेत. त्या अक्षरांना सोनेरी रंग दिलेला आहे. मी तिकडे जाऊ लागलो. काही जण भिंतीवरच्या अक्षरांवर कागद धरून वर पेन्सिल घासत होते. आम्ही लहानपणी अशा पद्धतीने नाण्यावरचे डिझाईन कागदावर उमटवायचो त्याची आठवण झाली. हात तुटलेला, युनिफॉर्ममधला, बिल्ले लावलेला एक व्हेटेरन दुसऱ्याला एका यादीतली नावे दाखवत होता. बहुदा तो सैन्यातल्या त्या कंपनीत असावा किंवा त्याच्या मित्राचे नाव तिथे असावे. काही ठिकाणी चार-सहा स्त्री-पुरुषांचे घोळके जमले होते. भिंतीलगत फुलाचे चक्र ठेवले होते. काही ठिकाणी मेणबत्या लावलेल्या असायच्या. एका ठिकाणी पुठ्ठ्यावर मार्करने 'वुई मिस् यू डॅड' असे लिहून जमिनीलगत भिंतीला तो टेकवून ठेवलेला होता. प्रत्येक ठिकाणी वातावरण गंभीर होते. काही ठिकाणी हुंदके देताना स्त्री-पुरुष दिसायचे. परत येऊन मी आमच्या टूरिस्ट घोळक्यात आलो तेव्हा मनातून हादरून गेलो होतो.

अमेरिकेतल्या पुढच्या मुक्कामात मी व्हिएटनामविषयी लोकांना विचारायचो. मिनिता नावाच्या मेक्सिकन मैत्रिणीने मला सांगितले, "तू हा विषय सहसा कुठल्याही अमेरिकन माणसापुढे काढत जाऊ नकोस. ते या इश्यूच्या बाबतीत अतिशय टची आहेत." लाखो अमेरिकन तरुण मुलं त्या काळात घराघरांतून बाहेर काढली गेली आणि कसलाही संबंध नसलेल्या जगाच्या दुसऱ्या टोकाच्या एका छोट्या देशात ओतली गेली. कशासाठी ते लढत होते, तिथल्या लोकांना मारत होते, स्वतः मरत होते, जंगलं भस्मसात करत होते, हे त्यांचं त्यांनाच कळत नव्हतं. पण हे युद्ध अमेरिकन जीवनात देशप्रेमाचं, त्यागाचं प्रतीकही मानलं जातं. मागच्या बुश-डुकासिस निवडणुकीच्या वेळी उपाध्यक्ष पदाचा उमेदवार क्वायल याचा इतिहास पत्रकारांनी उकरून काढला होता. त्याने घरच्या श्रीमंतीचा व वरच्या स्तरातील संबंधांचा उपयोग करून सैन्यात दाखल होऊन व्हिएटनामला जाण्यातून सुटका करून घेतली होती. ह्या माहितीमुळे त्याची त्या समाजात खूपच छीः थूः झाली होती. देशप्रेम, त्याग या भावनेची दुसरी बाजू अपराधीपणाची बोच ही आहे. तिथल्या मुक्कामात 'प्लॅटून' नावाचा सिनेमा पाहिला. तो खूप धाडसाने काढला आहे. त्यात अमेरिकन सैनिकांनी स्थानिक लोकांवर केलेले भीषण अत्याचार दाखवले आहेत. हे पाहून जखमी होऊन, भ्रमनिरास होऊन परत जाणारा नायक त्यात दाखवला आहे. तो सिनेमा प्रदर्शित

झाल्यावर त्या समाजात खूपच खळबळ झाल्याचे कुणीतरी सांगितले.

तिथं असताना टी. व्ही. वर एक प्रोग्रॅम दाखवला होता. अमेरिकन सैनिक तिकडे असताना व्हिएटनामी स्त्रियांना त्यांच्यापासून झालेल्या मुलांवर तो प्रोग्रॅम होता. तिकडे हजारो मुलं अशी अनौरस आहेत. त्यांच्या मुलाखती दाखवल्या होत्या. गोरी, सोनेरी केसांची, पण चेहरे व्हिएटनामी मंगोलवंशीय असलेली. एक सांगत होता, "आम्ही वेगळे दिसत असल्याने आम्हाला वाळीतले जीवन जगावे लागते." त्यांतले काही तर ब्लॅक अमेरिकन्सपासून झालेले निग्रोवंशीय चेहऱ्याचे होते. ती मुले म्हणत होती, "एक वेळ ही गोरी मुलं स्वीकारली जातील, पण आम्हाला तर कुणीच जवळ करत नाहीत." ती मुलं जगण्यासाठी अमेरिकेकडे येऊ लागली. नागरिकत्वासाठी अर्ज करू लागली. सरकार व समाज या बाबतीत हळवा व अपराधी असल्याने त्या सर्वांना प्रवेश देऊ करण्यात आला. ती मुलं आपल्या अमेरिकन बापाच्या सैन्यातल्या आयडेंटिटी कार्डसूच्या झेरॉक्सप्रती किंवा नावं घेऊन आली होती. त्यांनी आपले बाप शोधायचा प्रयत्न केला. पण तो बहुधा यशस्वी झाला नाही. ती माणसं सापडू शकली नाहीत किंवा सापडली तरी त्यांनी पालकत्व नाकारलं. काही अनुभव मात्र वेगळे आले. पन्नाशीचा एक अमेरिकन माणूस त्याच्या चौदा-पंधरा वर्षांच्या अनौरस व्हिएटनामी मुलीच्या गळयात पडून ओक्साबोक्शी रडत असल्याचं दृश्य टी. व्ही. वर दाखवलं. निवेदक म्हणत होता, सुमारे दहा टक्के मुलं त्यांच्या बापांकडून स्वीकारली गेली. पण उरलेल्या नव्वद टक्के मुलांना इंग्लिश भाषा येत नाही. काहीही शिक्षण झालेले नाही. त्यांचे चेहरे इथल्याही लोकांपेक्षा वेगळे असल्याने तोही प्रश्न येतो. आज 'होमलेस' आणि बेकार अवस्थेत ते जीवन जगतात. त्यातले बरेचसे ड्रग ॲडिक्ट झाले आहेत, इत्यादी.

अनेक अमेरिकन सैनिकांना व्हिएटनाममध्ये ड्रगचं व्यसन लागलं. ते परत आल्यापासून तो एक मोठाच प्रश्न बनला. त्या काळात अनेकांचं शिक्षण-नोकरी याचं गणित बिघडल्यामुळे त्यांना विपन्नावस्था आली. मोठ्या अमेरिकेत शहरांमध्ये पुढं जे भिकारी पाहिले त्यांत बरेचजण जुने युनिफॉर्म घालून बसलेले, शेजारी 'आय ॲम अ व्हिएटनाम व्हेटरन' असा बोर्ड लावलेले.

एरवी भिंत म्हणजे अडथळा असं समीकरण. पण त्या दिवशी वॉशिंग्टनमधल्या त्या भिंतीने उलट मला प्रवेश देऊन त्या समाजाचा एक हळवा कोपरा दाखवला.

प्रविणाच्या तिकडे असलेल्या मित्राचे वडील अधूनमधून टोरांटोला जाऊन परत भारतात येत. प्रविणा त्यांच्याबरोबर आम्हाला काहीतरी पाठवीत असे. ती आणायला आम्ही त्यांच्या पुण्यातल्या घरी जात असू. दरवेळी ते म्हणत, "काय तिकडचे रस्ते आहेत हो. इतके प्रशस्त. स्वच्छ तर इतके की आपण बोट लावून पाहिलं तर आपल्या बोटाची धूळ त्या

रस्त्याला लागेल, पण त्याची आपल्याला लागणार नाही." परत प्रविणाचं पत्र आलं आणि त्यांच्याकडे जायची वेळ आली की मी सुनंदाला म्हणायचो, "चला, धुळीबद्दल ऐकायला मिळणार परत."

हे रस्ते अनेकदा सिनेमातनं पाहिले होते. पण तरीही प्रत्यक्ष ते रस्ते आणि त्यानिमित्त उभी राहिलेली संस्कृती पाहून आश्चर्य वाटलेच. विमानतळावरून प्रविणाच्या घराकडे येताना पाहिलं, रस्त्यांवर कमानी उभारून वर रस्ताभर रुंदीच्या, हिरव्या रिफ्लेक्ट होणाऱ्या रंगावर पांढरी ठसठशीत अक्षरे लिहिलेल्या पाट्या होत्या. आणि त्या इतक्या जवळजवळ होत्या की, अर्ध्या एक मिनिटात तीन-चार कमानीखालून गाडी जायचीच. 'अमुक गाव इतके मैल.' 'अमुक गावाचा एक्झिट अजून पाच मैलांवर.' आणखी काही अंतर गेल्यावर तो एक्झिट एका मैलावर, आता एक चतुर्थांश मैलावर. मग रस्त्याची एक लेन हळूहळू सेपरेट व्हायला लागायची आणि तो एक्झिट यायचा. कुठेही रस्ते एकमेकांना क्रॉस होत नव्हते, सिग्नल नव्हते. चौकात वळायचे असले तर रस्ते एक्झिट घेऊन मूळ रस्त्याच्या खालून ते क्रॉस करून काटकोनातील दुसऱ्या रस्त्याला मिळायचे. प्रत्येक क्रॉसिंग म्हणजे पूल आणि त्याभोवती वेटोळी घातलेल्या एक्झिट्सच्या रस्त्यांचं जाळंच असायचं. मी मनात म्हटलं, श्रीमंत देशाची श्रीमंती अगदी रस्त्यापासून दिसते. पुढे अमेरिकेत मित्रांच्या गाड्यांमधून बराच प्रवास केला. रस्तासंस्कृतीची प्रगल्भता जास्तच जाणवत गेली. आंतरराज्य (Interstate) हायवे ची खूण म्हणून निळ्या रंगावर बक्षिसाच्या ढालीच्या आकाराच्या पोटात हायवेचा नंबर लिहिलेला असायचा. प्रवास करणारांना हे नंबर अगदी पाठ असायचे. एखाद्याकडे जायचे असले की माझा यजमान मित्र त्या माणसाला फोनवर पत्ता विचारायचा. त्यांच्या भाषेत म्हणजे 'डिरेक्शन्स घ्यायचा'. अमक्या नंबरच्या हायवेला लागायचे. इतक्या मैलानंतर अमुक एक्झिट घेऊन तमक्या हायवेला यायचे. असं इतकं इतकं चालायचं की वस्स. पण यजमान ते सगळं लिहून घेत असायचा. असला गुंतागुंतीचा पत्ता सापडणार कसा, याची काळजीच वाटायची. पण यजमान मित्र तो डिरेक्शनचा कागद त्याच्या गाडीच्या डॅश बोर्डवर ठेवायचा. पुढच्या दोन सीटच्या मधल्या कप्प्यात नकाशांच्या घड्या ठेवलेल्या असायच्या. तो मित्र त्या डिरेक्शनप्रमाणे कार हाकू लागायचा की, ते ते स्पॉटस् अगदी जादूसारखे ठरल्या वेळी आणि ठरल्या ठिकाणी दिसू लागायचे आणि आम्ही त्या घरासमोर उभे राहिलेलोच असायचो. एखाद्या कपलबरोबर कधी गेलो की, नवरा म्हणायचा, 'मी ड्राइव्ह करतो, तू 'नॅव्हिगेट' कर.' मला त्या शब्दाची गंमत वाटली. बोटीत किंवा विमानात तो शब्द एरवी वापरला जातो. मग बायको इन्स्ट्रक्शनचा कागद समोर ठेवायची. नकाशा उलगडून हातात धरायची. एकदा मी विचारलं, "दोघं दोघं कशाला लागतात या कामाला?" तो म्हणाला, "अरे, इतके एक्झिटस् असतात की एखादा मिस झाला तर वीस वीस-तीस तीस मैलांचा वळसा पडू शकतो."

मधनं मधनं 'रेस्ट एरिया' लागायचे. म्हणजे बाजूला एक मोकळी जागा राखीव

असायची. तिथं रेस्ट रूम्स, पाण्याची सोय, कोक वगैरेची व्हेंडिंग मशिन्स, टेलिफोन बूथ्स असं असायचं. आपल्याकडे जसं लोक एस.टी.च्या किंवा टॅक्सीच्या ड्रायव्हरला सांगतात, 'जरा घ्या हो गाडी बाजूला' आणि ड्रायव्हरही ते ओळखतो. बाजूला गाडी घेतल्यावर लोक लघवीला उतरतात. इथं तसला प्रकारच नाही. पेट्रोल पंप यायच्या काही मैल आधी सूचना यायला लागतात. पेट्रोलला तिकडे गॅस म्हणतात, हे आता इकडेही सगळ्यांना माहीत झालं आहे. आपल्याकडेही अमेरिकनाइज्ड तरुणतरुणी एकमेकांत बोलताना पेट्रोलला गॅस म्हणू लागली आहेत. पण अमेरिकेत मी एकाला विचारलं की, "पेट्रोल हाही इंग्लिशच शब्द आहे. पेट्रोलियमपासून आलेला. मग तो तुम्हाला का समजत नाही ?" तो म्हणाला, "आम्हाला पेट्रोल म्हटल्यावर गस्त असाच अर्थ मनात येतो." तर अशी गॅसस्टेशन्स जागोजाग असतात. त्यावर आजचा गॅसचा भाव लावलेला असतो. कंपन्याकंपन्यांचे भाव वेगळे, आणि तेही रोज बदलते. आपण स्वतः पेट्रोल भरून घेणार असलो तर आणखीन स्वस्त. (एवढा आधुनिक देश पण अजूनही दशांश पद्धत त्यांनी व्यवहारात आणली नाही. वजन : पौंडात, पेट्रोल : गॅलनमध्ये. अंतर : मैलात आणि तपमान : फॅरेनहाइटमध्ये. जगात सगळीकडे दशमान पद्धत आली. अगदी मागास देशांमध्येही. पण अमेरिका मात्र हट्टाने जुन्या पद्धतीशी चिकटून आहे. ही संपन्नपणाचीच एक ऐट.) पेट्रोल खूप स्वस्त. मी तिथं असताना डॉलरला गॅलन म्हणजे जवळपास अडीच लीटर भाव होता. तिकडे डॉलर म्हणजे तिथल्या लोकांना रुपयासारखा. म्हणजे रुपयाला अडीच लीटर भाव.

तिकडे पोस्टमन, शिपाईसुद्धा स्वतःच्या गाडीने कामावर येतो असं ऐकलं तेव्हा आश्चर्य वाटलं होतं. ज्याच्यापाशी गाडी ठेवायची ऐपत आहे, तो हलकी कामे कशाला करील ? पण इथं आल्यावर समजलं, गाडी घेणं ही अजिबात अवघड गोष्ट नाही. आयोवातला माझा मित्र शाम आसोलेकर म्हणाला, "माझे वडील औरंगाबादला प्राध्यापक आहेत. आयुष्यभर प्रामाणिकपणे कष्ट करूनही त्यांना गाडी घेता आली नाही. पण मी इथे विद्यार्थी असून गाडी घेऊ शकलो. गाडी जुनी आहे, पण ती चालू आहे." तिथे सतत नवी मॉडेल्स बाजारात येतात. वर्ष-सहा महिने वापरलेल्या गाड्या सेकंड हँड मार्केटला येतात. ही मार्केटस् अशा गाड्यांनी इतकी भरलेली आहेत की त्यांच्या सारख्या टी. व्ही. वर जाहिराती येतात. 'पन्नास डॉलर भरा, पुढे पन्नास डॉलरच्या हप्त्याने गाडी घ्या.' 'सुरुवातीला काही भरूच नका, वीस डॉलरचा हप्ता भरा.' सेकंड हँड, अगदी जुनी गाडी असेल तर ती मोडीत टाकणे जास्त खर्चाचे असते म्हणून अक्षरशः ते 'थ्रो अवे प्राइस' ला विकतात. त्यामुळे अशा गाड्या कुणालाही परवडू शकतात.

कॅलिफोर्नियात रस्त्यांचं सुख अधिक आहे. अनेक पदरी रस्ते. रस्त्याला मध्याच्या एका बाजूला चार चार, कधीतर सहा सहा लेन्स आणि दुसऱ्या बाजूला तेवढ्याच लेन्स. म्हणजे रस्ता हा केवढा भव्य प्रकार होत असेल, याची कल्पनाच करावी. प्रत्येक लेनचा स्पीड ठरलेला. कडेला लो स्पीड आणि मध्याकडे येताना हाय स्पीड. पासष्ट मैल किंवा शंभरेक

किलोमीटर हा नेहमीचा वेग पडतोच. कुठेही जायचं असलं की आम्ही हिशोब करायचो. जितके मैल तितकी मिनिटं लागणार. आणि तो बहुधा बरोबर यायचा. स्पीडिंग केलं (जास्त वेगानं मोटार चालविली) की पोलिसकार जवळ येऊन त्यांच्या टपावरच्या आडव्या दिव्यांची उघडझाप करणार की मग तुम्हाला कडेच्या लेनमध्ये गाडी घेऊन थांबवावी लागते. या गोष्टीला तिथले लोक घाबरतात. ट्रॅफिकचे गुन्हे केले की इन्शुरन्सचे हप्ते वाढतात. काही गुन्ह्यानंतर तर लायसेन्स सस्पेंड केले जाते. तिकडे लायसेन्स नसले तर तुमचे दैनंदिन जीवनच अशक्य होऊन जाते. तरीही हे सर्व नियम मोडणारे महाभाग निघतातच. कुणी स्पीडिंग करीत असला तर त्या भागातल्या पेट्रोलिंग कारला ते लागलीच कळतं. कारण त्या कारला रडार बसवलेलं असतं. ते अशी कार ताबडतोब ओळखतं. पण त्यावरही तिथल्या लोकांनी मात केली आहे. बाजारात अगदी जाहिरात करून 'रडार डिटेक्टर' नावाची वस्तू मिळते. ती आपल्या कारला बसवून घेतली की वीस-पंचवीस (की पन्नास) मैलांच्या परिसरात रडार असले तर यांना कळतं. मग ते स्पीड कमी करून नॉर्मल वेगात साळसूदपणे गाडी हाकू लागतात. तिथं मुक्त अर्थव्यवस्था असल्याने अशा उत्पादनाला सरकार बंदी करू शकलेलं नाही.

सानफ्रान्सिस्कोला निमा गुजरकडे उतरलो होतो. ती रोज सकाळी सात वाजता तिच्या कारने डाऊन टाऊनमधल्या ऑफिसला जायची. मी तिच्याबरोबर बाहेर पडायचो आणि एकटा शहरात किंवा आसपास भटकायचो आणि येताना तिच्याच कारने परत यायचो. पहिल्या दिवशी आम्ही घरातून बाहेर पडल्यावर जवळच्या बसस्टॉपपाशी तिनं गाडी नेऊन उभी केली. तिथं उभी असलेली दोन माणसं गाडीच्या मागच्या भागात येऊन बसली आणि गाडी सुरू झाली. मी निमाला विचारलं, "ही तुझ्या ऑफिसमधली माणसं का?" ती म्हणाली, "नाही, ही माझ्या माहितीचीही नाहीत. पण इथं एक 'कार-पूल' सिस्टिम आहे. तुमच्या गाडीत दोनापेक्षा जास्त माणसं घेतली, तर तुम्ही कारपूललेनमधनं जाऊ शकता." आमची गाडी वेगाने सानफ्रान्सिस्कोच्या दिशेने चालली होती. निमा म्हणाली, "शेजारच्या लेनमध्ये बघा किती स्लो ट्रॅफिक आहे. आपली लेन कारपूलची लेन असल्याने ट्रॅफिक कमी, त्यामुळे लवकर जाऊ शकतो. हे एक प्रकारचं इन्सेन्टिव्ह आहे. एका गाडीतून एकच माणूस जाणं हे किती रिडिक्यूलस आहे. त्या लेनमध्ये पहा, प्रत्येक गाडीत एकेकच माणूस आहे."

"बसस्टॉपवरच्या मंडळींना अशी लिफ्ट मिळणं अपेक्षितच असतं का?"

"हो. काही वेळा बसस्टॉपवर माणसं नसतात. तिथं कधी कधी दोन-चार गाड्या रांग लावून माणसांची वाटही पाहत असतात. तिथं पाच मिनिटं गेली तरी परवडतं, कारण इकडं वीसेक मिनिटं तरी वेळ वाचतो."

(परवा मुंबईला हा फास्टलेनचा प्रयोग केल्याचे आणि तो फसल्याचे वाचले.)

डाऊनटाऊनपासून वीसपंचवीस काय, चाळीस-पन्नास मैलांवर लोक राहतात आणि रोज ऑफिसला कारने येतात-जातात. दोन्ही वेळा शहराजवळच्या भागात रस्त्यांवर कार्सची

तुडुंब गर्दी असते. त्यांच्या भाषेत म्हणजे 'बंपर टु बंपर' ट्रॅफिक असतो. समोरच्या स्टिअरिंग व्हीलच्या मधल्या फायबर, ग्लासच्या तबकडीवर अस्वस्थ होऊन बोटं बडवत राहणं हे तिथलं बऱ्यांच जणांचं न्यूरॉटिक वर्तन आहे. चुइंगगम खाणं हे त्यातनंच आलेलं. गाड्यांमध्ये आत सोयी मात्र भरपूर दिसल्या. एकतर ड्राइव्ह नावाचा गियर टाकून दिला की ॲटोमॅटिक गियर पडत राहतात. क्लच नाही. फक्त ॲक्सिलरेटर आणि ब्रेक. एकदा शहराबाहेर पडलं आणि हायवेला लागलं की काही कामच नाही. दोन बोटं स्टिअरिंगला खाली टेकवून ठेवतात. मुठींनी बाजूंना धरण्याचीसुद्धा गरज नाही. साईडला रेडिओ असतो त्यात चोवीस तास चालणारी अनेक स्टेशन्स असतात. निरनिराळ्या तऱ्हेच्या म्युझिकची निरनिराळी स्टेशने, सतत चालणाऱ्या बातम्यांची स्टेशने, हवामान सांगणारी स्टेशने असतात. (काहीजणांना तर गाडी चालवताना सतत फटाफट स्टेशन्स बदलण्याची सवय असते. हाही एक न्यूरोसिस.)

मी एका गाडीत बसलो, उतरताना सवयीप्रमाणे काचा वर करून लॉक करायला हँडल शोधू लागलो. मैत्रिणीने सांगितले, "तशी जरूर नाही. इथे सगळ्याची बटनं माझ्या हाताशी आहेत," म्हणून एक बटन दाबल्यावर सगळ्या काचा वर जाऊन खिडक्या बंद झाल्या. दुसरे बटन दाबल्यावर सगळी दारं आपोआप लॉक झाली. तिने एक बटन दाबून मागची डिकी आपोआप कशी उघडते हेही दाखवलं. गॅरेजमध्ये गाडी ठेवताना खाली उतरून दार उघडावे लागत नाही. रिमोट कंट्रोलचं युनिट कारमध्ये असतं. बटन दाबलं की दार आपोआप वर जातं. मी एकदा गाडी काढायच्या वेळी गॅरेजच्या दारात होतो. मी म्हटलं, "पण हे बंद होताना दुसऱ्या कुणाच्या डोक्याला चुकून लागलं तर?" मैत्रीण हसून म्हणाली, "तसं ते शहाणं आहे. आपोआप बंद होताना कुणाचं डोकं मधे आलं तर ते तिथंच थांबतं." असं म्हणून तोही प्रयोग तिने करून दाखवला.

भारी कारचा डॅशबोर्ड हा मला नेहमी कुतुहल वाटण्याचा विषय असायचा. दरवेळी काहीतरी नवीन सोयी लक्षात यायच्या. डिजिटल वॉचमध्ये दिसतात तसे चौकोनी, बदलणारे आकडे. सध्या वेग किती आहे हे कळण्यासाठी एक स्क्रीन होता. त्यावर मैलातला वेग कळायचाच, पण बटन दाबले की किलोमीटरमधला वेगाचा आकडा समोर यायचा. समजा, आपल्याला चाळीस मैल जायचं आहे, तर तो आकडा सेट करायचा. जसजसे मैल अंतर कापू लागतं तसतसा आकडा कमी होत जायचा. त्याला वेळेचीही जोड देता यायची. चाळीस मैल अंतर आपल्याला अर्ध्या तासात कापायचे असेल तर वेळोवेळी आपण काळाच्या दृष्टीने किती मिनिटे पुढे अगर मागे आहोत ते कळायचे, म्हणजे त्या दृष्टीने वेग ॲडजस्ट करून तो वेळ मेकअप करता यायचा. रस्ता मोकळा आहे, निवांतपणे गाडी चालवायची आहे. तर वेगाचा आकडा सेट करायचा. आणि सरळ ॲक्सिलरेटरवरचा पाय काढून घ्यायचा. गाडी त्या ठराविक वेगाने जात राहते. मधून वेग कमी करायचा झाल्यास ब्रेक दाबल्यास ॲक्सिलरेटर आपोआप कमी होतो.

तिकडे सीट बेल्ट घालणे सक्तीचे आहे. सीटच्या मागे कुठेतरी त्या पट्ट्याची जागा असते. तिथून दरवेळी तो हुडकून पुढे ओढून सीटच्या दुसऱ्या बाजूला खाली अडकवावा लागतो. काही गाड्यांमध्ये त्याचीही ॲटोमॅटिक सोय केलेली आहे. दार आपण बाहेरनं उघडलं की बेल्ट छतालगतच्या एका दांडीवरून पुढे घसरत जातो. आपण आत बसल्यावर दार लावलं की तसाच घसरत आपल्याभोवती वेढा घेऊन मूळ स्थितीत जातो. अशा एक ना अनेक सोयी.

टी. व्ही. वर गाड्यांच्या जाहिराती भरपूर. जितक्या लक्झरीज् जास्त तितकी त्या गाडीची क्रेझ निर्माण होते. मग कमी सोयी असलेल्या गाड्या आपोआप मागे पडतात. गाडीत जितक्या सोयी तितकं तिला पेट्रोलही जास्त लागतं. लांबलचक 'लिमोझिन' कार म्हणजे तर लक्झरीचे आगरच. माझा छोटा भाचा नील, अशी गाडी दिसली की ओरडून मला सांगायचा, "अनिलमामा, ती बघ 'बिग शॉट'कार." कारच्या डिकीवर मागे एक अर्धचंद्राकृती धातूची पट्टी बसवलेली दिसली की गाडीत टी. व्ही. असतो. ती पट्टी म्हणजे टी. व्ही.ची ॲंटेना असते. अशी त्या पाच वर्षांच्या भाच्याने भारतातून आलेल्या पंचेचाळीशीतल्या मामाला माहिती पुरवली. लिमोझिन्स मध्ये टी. व्ही. असतो. छोटा बार असतो. फोल्डिंग टीपॉय वर सगळा सरंजाम ठेवून पीत बसता येतं.

रस्त्यावर तऱ्हतऱ्हेची वाहनं दिसायची. ट्रक्स पाहिले तेव्हा चकितच झालो. ट्रेलर-ट्रक असायचे. पुढच्या ड्रायव्हरच्या छोट्या युनिटला मागे भला मोठा बॉक्ससारखा चौकोनी, पांढऱ्या रंगाचा ट्रक जोडलेला असायचा. किती टायर आहेत ते मी मोजायचो. चोवीस, अठ्ठावीस इतके टायर्स एकेका ट्रकला असायचे. ड्रायव्हरच्या केबिनमधनं स्टीलचे चकचकीत धुराडे वर येऊन मागे वळलेले असायचे. ट्रक नेहमी मध्यम वेगाच्या लेनमधनं चाललेले असायचे. मित्राच्या कारमधनं चाललो असता त्याने एक वेगनियंत्रणाची सोय दाखविली. एवढ्या प्रचंड ट्रकचे समजा ब्रेक फेल झाले तर रस्त्यावर अनर्थ होईल म्हणून मधनं मधनं रस्त्याला एक फाटा काढून तो मुख्य रस्त्यापासून थोडा दूर नेलेला असतो. (आपल्याकडे रेल्वेच्या बाबतीत खंडाळ्याच्या घाटात मंकीहिल स्टेशनजवळ अशीच सोय आहे.) तो रस्ता उंचावर नेलेला असतो. त्याला शेवटी थोडा उतार देऊन चमच्यासारखा परत चढ दिलेला असतो. गाडीचे ब्रेक फेल झाले तर ड्रायव्हरने गाडी त्याच्या लेनमधून या लेनमध्ये आणायची. चढांमुळे वेग कमी होऊन जवळपास गाडी थांबत येते. पण ती उलट्या दिशेने उतारावरून परत रस्त्यावर जाऊ नये, म्हणून रस्त्यावर चमच्याच्या आकाराच्या भागात ती परत येऊन थांबते. शेवटी शेवटी रस्ता पक्का नसतो, तर मऊ वाळूचा मोठा थर पसरलेला असतो.

कार कितीही आतून आरामशीर असली, कमीत कमी आवाज करणारी असली तरी तिचा वेगच इतका जास्त असतो की ती जवळनं जाताना 'भोंऽऽऽग' असा जोरात आवाज येतो. पहिल्यांदा कुणाच्यातरी कारमध्ये बसलो आणि नेहमीप्रमाणे काचा उघडू लागलो.

मित्र म्हणाला, "अरे, उघडतोस कशाला ? मग गप्पा मारता यायच्या नाहीत." मी म्हटले, "मला उघड्या खिडक्यांची सवय आहे." पाच मिनिटांतच लक्षात आलं की बाजूने सुसाटत जाणाऱ्या गाड्यांच्या आवाजाने आम्ही शेजारी बसलो असून बोलणं अशक्य झालं होतं. मित्र म्हणाला, "काचा आम्ही आणखीही एका कारणासाठी बंद ठेवतो– सिक्युरिटीसाठी. शेजारून जाणाऱ्या कारमधल्या कुणी सहज म्हणून गन काढून फायर केली तर घ्या काय ? इथे तसे प्रकार झालेले आहेत."

तिकडे मोठ्या शहरातली डाऊन टाऊन सोडली, तर रस्त्यांवर माणसंच दिसत नाहीत. पण गाड्या मात्र भरपूर. मी आयोवातल्या मेफ्लॉवर रेसिडेन्स हॉलच्या आठव्या मजल्यावर राहत होतो. गॅलरीतून खालचा रस्ता निवांत पाहत बसायचो. तो हायवे नव्हता, पण तरीही गाड्यांना रात्रंदिवस कधी खंड पडायचा नाही. मला नेहमी आश्चर्य वाटायचं की इतके लोक कुठून कुठं आणि कशाला जात असतील ? इतक्या गाड्या असल्यामुळे पार्किंग हा मोठाच प्रॉब्लेम. शॉपिंग सेंटर्सच्या बाहेर पार्किंगचे सागरच्या सागर पसरलेले असतात. ठिकठिकाणी अनेक मजली इमारती पार्किंगसाठी केलेल्या आहेत. या इमारती मला बाहेरनंही ओळखू येऊ लागल्या. त्यांना फक्त आडव्या गॅलरी असतात. खिडक्या, काचा असलं काही नसतं. कारने आम्ही आत जायचो. मजलेच्या मजले गरागरा फिरायचो, जागा दिसतेय का, या आशेने. पार्किंगला स्पेस मिळाली की तिथल्या लोकांना जो परमानंद होतो त्याची तुलना फक्त चुकलेले मूल सापडल्यावर आईला जो आनंद होतो, त्याच्याशीच होऊ शकेल. शहरातल्या रस्त्यांवरही कडेला पार्किंगची घड्याळे असतात. त्यासमोर गाडी लावायची, नाणे आत टाकायचे, घड्याळ फिरवून ठेवायचे. तास, अर्धातास, त्याची लिमिट झाली की त्यावर लाल पट्टी दिसू लागते. त्याकडे पोलिसाचं लक्ष गेलं की तो गाडीला दंडाच्या रकमेचं तिकीट चिकटवतो. 'तिकीट मिळणे' या जिव्हाळ्याच्या विषयावर तिथली माणसे पार्टी किंवा तत्सम जागी भेटल्यावर तास न् तास बोलत राहतात.

रस्त्यानं कारमधनं वेगात जाणारा माणूस पाहताना वाटायचं, या माणसाने आपल्या भोवती ही स्टील आणि काचेची बंद कॅप्सूलच तयार करून घेतलेली आहे. आपल्याकडे आपण रेल्वेनं, बसनं प्रवास करतो. सहप्रवाशांशी बोलतो. एकमेकांचे पेपर, मासिकं वाचायला घेतो, देतो. (मुंबईच्या लोकलमध्ये तर संपर्काचा अतिरेकही होतो. लोकं भजनाचे ताफे बनवून इतरांना भरपूर कटकटही करतात.) तिकडे बंद गाड्यांमुळे हे काहीच होत नाही. ही कॅप्सूल वेगाने धावते, आतून आरामशीर आहे, पण शेवटी ती कॅप्सूलच. कारखान्यातल्यासारख्या, रस्तानामक कन्व्हेअर बेल्टवरून इकडून तिकडे कार्यक्षमतेने जाणारी.

भारतात परत आलो तेव्हा मित्र त्याच्या गाडीने मला मुंबईला न्यायला आला होता. सकाळी पार्ल्याहून कुर्ल्याच्या ट्रॅफिकमधून आमची गाडी चालली होती. वाहनं समोरनं येऊन आदळणार असं वाटत होतं. हा असा कसा गेला रॉंग साइडनं, याने कशी गाडी पार्क

केलीय... अशा गोष्टी क्षणोक्षणी खटकत होत्या. केवळ चारच महिने तिकडं होतो, त्यानेही ती सवय झाली होती.

पुण्यात आल्यावर स्कूटरवर फिरणं सुरू झालं. एक-दोन दिवसांत पुण्यातला टिपिकल स्कूटरस्वार होऊन गेलो. कुठूनही कशीही स्कूटर पुढे काढू लागलो. मी विचार करू लागलो, इतकी वाहनं आणि इतके छोटे, अरुंद रस्ते. काय करणार आपण ? बरं, रस्ते रुंद करायला (तितकी जागा विकत घ्यायला) डांबरीकरण करायला, त्यावर लेनच्या पट्ट्या ओढायला किंवा इन्स्ट्रक्शन्स लिहायला पैसे लागतात. ते आपल्या देशाकडे आहेत कुठं ? मग शेवटी लोक आपली सोय पाहतात. आणि वाहनं दिसेल तेवढ्या सापटीतून पुढे काढत राहतात. आणि त्यामानाने ॲक्सिडेंट काही फारसे होत नाहीत. या केऑसमध्ये खरं तर पावलापावलाला अपघात झाले असते. पुणे शहर पोलिसच्या ट्रॅफिकचे मुख्य अधिकारी मला म्हणाले, "पुण्यात लाख वाहनं आणि आमच्याकडे सर्व मिळून दीडशे पोलिस. काय करणार आम्ही ? त्यातल्या त्यात थोडीफार शिस्त लावायचा आम्ही प्रयत्न करतो, इतकंच."

★★★★★

# शॉपिंग

कॅनडात गेल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळी सहालाच प्रविणा कुठेतरी निघाली होती. मी "कुठं जाते आहेस" विचारलं, तेव्हा म्हणाली, "ग्रोसरी आणायला." "इतक्या सकाळी उघडं असतं दुकान ?" "अरे, ते चोवीस तास उघडं असतं." मीही तिच्याबरोबर निघालो. मुंबईला डिपार्टमेंटल स्टोअर्स पाहिली होती. पण हे तिच्या घरासमोरचं उपनगरातलं स्टोअर आपल्यापेक्षा केवढंतरी प्रचंड होतं. एक मजली सपाट पेटीसारखी ती इमारत होती. त्याच्या पुढची कार पार्किंगची जागा एखाद्या मैदानासारखी होती. आत भरपूर प्रकाश होता. वस्तूंनी गच्च भरलेल्या कपाटांच्या रांगाच्या रांगा होत्या. बाजूला स्टीलच्या तारांनी बनवलेली अगदी डिसेंट ढकलगाड्यांची, मोठी, एकमेकांत गुंतवलेली रांग होती. प्रविणाने त्यातली एक गाडी सोडवली आणि ढकलत आम्ही आत निघालो. स्टोअरमध्ये युनिफॉर्म घातलेल्या स्त्रिया कॅश काउंटरवर बसलेल्या होत्या. आत तसेच युनिफॉर्म घातलेले काहीजण आधीचा माल कप्प्यांमधून उतरवत होते, नवा माल चढवीत होते. इतक्या पहाटे पहाटेही बाहेर अगदी शांत, निर्मनुष्य असले तरी आत मात्र चांगलीच धावपळ चाललेली होती.

एकेक कप्पे बघत चाललो. प्रत्येक वस्तूंचे कितीतरी प्रकार. वेफर्स घ्या, भाजलेले दाणे घ्या– पंधरावीस प्रकार. साधे भाजलेले, खारावलेले, मध घालून भाजलेले, स्वीट अँड सोअर. . . असे कितीतरी. ब्रेडचे अनेक प्रकार. अमुक घालून ब्रेड, तमुक घालून ब्रेड, परत कंपन्या वेगवेगळ्या. दुधात भिजवून खायचे कॉर्न फ्लेक्स तेवढे मला माहिती होते, पण अनेक धान्यांपासून बनवलेले फ्लेक्स, त्यात तर रंगीबेरंगी रिंगच्या व विविध आकारांचे. पुढं दूध आणि त्यापासून बनवलेल्या पदार्थांचा विभाग. तिथं प्लॅस्टिकच्या, हँडल असलेल्या बरण्या. त्यांत फॅटच्या परसेंटेजप्रमाणे अनेक प्रकार. प्रविणा म्हणाली, "हे होमो मिल्क तू घेत जा. साधारणपणे आपल्याकडच्या दुधासारखं असतं." पुढे 'योगट'चा विभाग. दह्यासारखा हा प्रकार, प्लॅस्टिकच्या गोल बरण्यांमधून पॅक केलेला. साधे योगट. फळांचे तुकडे घातलेला प्रकार, अनेक फ्लेवर्स घातलेले अनेक प्रकार. पुढं चीज. आपल्याकडचा 'अमूल'चा इंचभर आकाराचा चीजचा तुकडा घेताना तो महाग म्हणून घ्यायचं जीवावर येतं.

इथं मोठमोठे गोळे. ब्रेडवर पसरायला त्रास पडू नये म्हणून ब्रेडच्या स्लाईसच्याच आकाराच्या चीजच्या स्लाइस करून पॅक केलेल्या. पुढं आइस्क्रीम्स. डीप फ्रीजरमध्ये ठेवलेले जवळपास पन्नास ते पंचाहत्तर प्रकार असावेत. नंतर मोठ्ठाच्या मोठ्ठा सेक्शन मांस-मटनाचा. एखाद्या शेंगेसारखा लांबट दिसणारा, चकाकता, डार्क ब्राऊन प्रकार परत परत दिसायचा. नंतर कळले की त्याला हॅम म्हणतात. गोमांसाच्या किंवा तत्सम दुसऱ्या प्राण्यांच्या मांसाच्या गोलाकार स्लाइस ठेवलेल्या. एका हिरवट पाण्याच्या पेटीत अनेक जिवंत लॉबस्टर्स वळवळ करीत होते. एका अशाच पेटीत दीड-दोन फूट लांबीचे जिवंत मासेही होते. पण त्यांच्या मानाने ती पेटी इतकी लहान होती की त्यांना त्यात हालचालही करता येत नव्हती. फाशी जाण्याआधी बराच काळपर्यंत त्या कैद्याला छोट्या कोठडीत ठेवतात, तसं वाटलं.

पुढे भाजीचा विभाग. कुठेही भाजीचं दुकान असो, मंडई असो, कचरा हा असणारच. पण इथं एक पान किंवा काडीही इकडं-तिकडं पडलेली नव्हती. पाच-सहा टोमॅटो एका पेपर डीशमध्ये ठेवून ती जिलेटिन कागदाने घट्ट पॅक केलेली. वर त्या कंपनीचे लेबल लावलेले. तसंच काकड्यांच्या व इतर भाज्यांच्या बाबतीत. जराही कुठे काळ्या न पडलेल्या, एकसारख्या आकाराच्या व हिरवट पिवळ्या रंगाच्या केळ्यांच्या फण्या मांडून ठेवल्या होत्या. आश्चर्य असं की प्रत्येक केळ्यावर त्या त्या कंपनीचं छोटं लेबल चिकटवलेलं. केळ्यांचं इतकं कौतुक झालेलं मी कुठंच पाहिलं नव्हतं. एवढंच काय दोन-दोन मिरच्यांनाही एका छोट्या कागदी, वर लेबल छापलेल्या पट्टीनं गुंडाळून चिकटवलेलं होतं. भाज्यांचे असले प्रकार आणि असे रंग-आकार मी कधी पाहिले नव्हते. नंतर कळलं की, या भाज्या आफ्रिका खंडातून, दक्षिण अमेरिका, युरोपमधनं अनेक देशांतनं विमानाने येतात. म्हणजे त्या केवढ्या महाग असणार. आणि इकडल्या माणसांची रुची आता किती महागडी झाली असेल. आपल्याकडची मंडई आठवली. कचरा, कुजलेला वास, मधूनमधून चरणारी उद्धट गुरं, चुकीचे तराजू, त्यातही वजनात मारणारे विक्रेते. त्याउलट इथं. पण इथं फारच, एखाद्या चर्चमध्ये असते तशी शांतता. मंडईत केवढा उत्साह असतो. कोथिंबीरीच्या गड्‌ड्या जेव्हा भरपूर येतात तेव्हा तिथली विक्रेती पोरं दोन्ही हातांत जुड्या धरून 'पाच पैसे... पाच पैसे...' करीत अंगात आल्यासारखे नाचतात. कधी तर त्या ढिगावरून कोलांटी उडीही मारून दाखवतात.

प्रविणाला मी म्हटलं, "तू तुझी खरेदी कर. मी इकडे-तिकडे नुसता हिंडतो." आणि एखादं प्रदर्शन पाहावं तसा मी हिंडू लागलो. सगळ्या अमेरिकन संस्कृतीचंच ते प्रदर्शन होतं. स्वतःचं वजन वाढतंय म्हणून काळजी घेणाऱ्यांना 'वेट वॉचर्स' असं नाव पडलंय. या वेट वॉचर्ससाठी अनंत प्रकार निघालेत. नेहमीच्या कोका कोला कंपनीने 'डाएट कोक' म्हणून व्हरायटी काढलीय. त्यात साखर कमी असते. कोलेस्टेरॉल या शब्दाला तर लोक फारच घाबरतात. अनेक गोष्टींची जाहिरात 'कोलेस्टेरॉल फ्री' किंवा 'फॅट फ्री' अशी केलेली. अंड्यात सर्वाधिक कोलेस्टेरॉल असतं, म्हणून कोंबड्यांवर अनेक रासायनिक प्रयोग करून

अंड्यातलं कोलेस्टेरॉल कमी करायचा प्रयत्न विविध कंपन्या करीत असतात. शेवटी कॅलिफोर्नियातल्या एका कंपनीने कोलेस्टेरॉल फ्री अंडी उत्पादन केल्याचा दावा केलाय, असं वाचलं होतं. ब्रेडला लावायचं जे लोणी असतं, त्यातली एक व्हरायटी 'फॅट-फ्री' असलेली पाहिली. मग या लोण्याला लोणी का म्हणावं, असा प्रश्न पडला.

प्रविणा जवळ आली आणि म्हणाली, "हे इथं, वर कुत्र्याचं चित्र असलेले फूड प्रॉडक्टस् आहेत ना, तर ते 'कुत्रा छाप' काहीतरी आहेत म्हणून घेऊ नकोस बरं का. ते कुत्र्यासाठीच आहेत." मी हसलो व पाहिलं, तर सगळा भला मोठा सेक्शनच कॅट अँड डॉग फूडचा. जितक्या माणसांसाठी व्हरायटीज जवळपास तेवढ्याच त्यांच्यासाठीही असाव्यात.

प्रविणाने त्या गाडीभर सामान घेतलं होतं. कॅश काऊंटरपाशी छोट्या बोळकांड्या केल्या होत्या. त्यात गाडी लावली. रांगेत पुढं दोन-तीन गाड्या होत्या. तिथं कॅश काऊंटरकडे सरकत जाणारा टेबलाचा पृष्ठभाग होता. त्यावर तिने सगळ्या वस्तू काढून ठेवल्या. शेजारच्या काही लेन्समध्ये गर्दी नव्हती. मी प्रविणाला विचारलं, "तिकडं गर्दी नाही. तिकडं का नाही लावलीस गाडी ?" ती म्हणाली, "ती फास्ट लेन आहे. म्हणजे ज्यांना दोन-चारच वस्तू घ्यायच्यात, त्यांना इतर रांगांमध्ये उगाचच जास्त वेळ थांबावं लागतं. त्यांची फास्ट लेनमधनं लवकर सुटका होते."

ती ढकलगाडी घेऊन बाहेर कारपर्यंत आलो. सामान डिकीत उतरवून ठेवलं. ती ढकलगाडी तिथं लावून ठेवायची जागा होती. सगळं कसं सुव्यवस्थित.

पुढे अमेरिकेच्या मुक्कामात अनेकदा सुपर मार्केटस्, शॉपिंग सेंटर्समध्ये जाण्याचा प्रसंग आला. प्रविणाबरोबर पाहिलेलं, त्या वेळी प्रचंड वाटलेलं एक छोटं ग्रोसरी स्टोअर होतं. पुढे टोरांटोतलंच इटन सेंटर, वुडबाईन शॉपिंग मॉल पाहिली. सरकते जिने, एकेका प्रकारच्या वस्तूंचे विभागच्या विभाग त्यात होते. किमती प्रचंड. न्यूयॉर्कच्या अशा सेंटरमध्ये दहा हजार डॉलर्स किमतीचे छोटे रिस्टवॉच होते. म्हणजे दीड लाख रुपयांचे. माझा मित्र म्हणाला याहूनही महाग असतात. स्त्रियांचे सुप्रसिद्ध मिंक कोटही अगदी हात लावून पाहिले, त्या कोटासाठी दुर्मिळ असे अनेक मिंक प्राणी मारले जातात, हेही आठवून गेले. सोफासेटच्या पाठींना आतून इलेक्ट्रिक हीटींगची व्यवस्था असायची. तऱ्हेतऱ्हेचे कॅमेरे, त्याच्या तऱ्हतऱ्हेच्या, चमत्कार वाटाव्यात अशा लेन्सेस. काचेची पैलू पाडलेली (कटग्लास) महागडी भांडी...

मला पहिल्या पहिल्यांदा या सगळ्यांचं खूप अप्रूप वाटायचं. पण नंतर वाटू लागलं की खरोखरच माणसाला इतक्या वस्तूंची गरज आहे का ? पण तिथल्या एका मित्राशी बोलताच तो म्हणाला, "मुळातच तुझं हे म्हणणं अन्अमेरिकन आहे. खरेदी जर त्याच्या जीवनातनं वजा केली तर तो उद्ध्वस्तच होईल."

अमेरिकन माणसांचं फिरायला जायचं ठिकाण म्हणजे शॉपिंग सेंटर्स आहे. इतरत्र कुठं ते एकमेकांना सहसा भेटणार नाहीत, पण तिथं त्यांच्या गाठीभेटी पडतात. मध्ये मोठमोठी कारंजी, फिरणारे मोठमोठे फुगे, आरशांच्या काहीतरी फॉर्मवर केलेले लायटिंग असं चौकात असतं. मुलांनाही तिथं जायला आवडतं. मधल्या चौकात एखादा विदूषक जादूचे प्रयोग किंवा चलाखीचे प्रयोग करून दाखवीत असतो. वुडबाईन सेंटरमध्ये तर मुलांसाठी मोठ्ठं 'अम्युजमेंट पार्क'च केले आहे. तिथं मधनं पाणी खेळवलं आहे. त्यात छोट्या बोटी आहेत. वरनं रिमोट कंट्रोलची बटनं दाबून त्या बोटी तिथल्या बोगद्यांमधून बाहेर काढता येतात. इकडून तिकडे धावणाऱ्या छोट्या छोट्या रेल्वे तिथं आहेत. तासाचे टोले पडताना आतून एकेक माणसाची मूर्ती बाहेर येऊन काहीतरी कृती करून जाते अशी मोठी घड्याळे आहेत. छोटे प्राणिसंग्रहालय आहे...काय नाही असे नाही. त्यामुळे मुलंच संध्याकाळी पालकांकडे हट्ट करतात, चला शॉपिंग मॉलकडे. मग पालकही पोरांना तिथं सोडतात आणि स्वतः शॉपिंग, नाहीतर कमीत कमी विंडो शॉपिंग करत बसतात. हातात गरम कॉफीचा थर्माकोलचा कप किंवा कोकचे अल्युमिनियम कॅन घेऊन दुकाने बघत पुढे जमेल तेव्हा काय घ्यायचं याचे बेत करीत ते हिंडत असतात. एक अमेरिकन मित्र सांगत होता, "आमच्याकडे दोघंजण जर भेटले (किंवा जास्त साहजिक म्हणजे दोघीजणी जर भेटल्या) तर तू काय वाचलंस किंवा तू काय पाहिलंस असं विचारण्याऐवजी तू काय 'घेतलंस' असंच विचारतात." घरात सगळं खचाखच भरलेलं असलं तरी नवीन फॅशनच्या वस्तू बाजारात येतात. त्याच्या जाहिराती टी. व्ही., मासिकांतून यायला लागल्या की आधीच्या वस्तू नकोशा वाटायला लागतात. जसं आपल्याकडेही आपण बघतो. रंगीत टी. व्ही. आल्यावर लोकांनी ते हौसेने घेतले; पण नंतर रिमोट कंट्रोल टी. व्ही. आल्यावर आपल्याकडे बसल्याजागी टी. व्ही. ऑपरेट करता येत नाही, याची लोकांना खंत वाटू लागली. तिकडे तर आपल्यापेक्षा कितीतरी वेगाने हे घडतंय. पण ज्यात टेक्नॉलॉजीचा प्रश्न नाही अशा टेबलखुर्च्या, क्रोकरी यांच्याही बाबतीत नवीन फॅशन्स येण्याची आणि जुन्याचा कंटाळा येण्याची प्रक्रिया तितक्याच जोरात. मुलांच्या खेळण्यांच्या बाबतीत तर काही विचारू नका. कुठल्याही घरातल्या छोट्या मुलाची खोली पाहिली तर तो जवळपास खेळण्यात डुंबतच असावा, अशी परिस्थिती. कालचं खेळणं त्याला आज नकोसं वाटतं. कुठल्या एका पुस्तकात वाचलं होतं की, 'पूर्वी, आजींची लहानपणीची लाकडी खेळणी ही नातवंडे खेळायची. आणि त्यामार्फत अनेक पिढ्यांचं त्या स्पर्शामार्फत सातत्य राहायचं.' आताच्या अचाट वेगाने ते दोन पिढ्यांचं सातत्य तर राहू द्याच, पण एका माणसाच्या दोन दिवसांचं सातत्य राहणंही कठीण होऊन बसलंय. या वेगाने काय साधतंय? माणूस जास्त सुखी होतोय की असमाधानी?

पण हे प्रश्न विचारायला तिथली उत्पादक मंडळी त्याला अवधीच देत नाहीत. टी. व्ही. या माध्यमाचा मारा जबरदस्त आहे. ऑर्वेलने '१९८४' मध्ये (कम्युनिस्ट राजवटीत)

घराघरात स्क्रीनवर येणारा 'बिगब्रदर' माणसाचे सर्व आयुष्य कसे नियंत्रित करणार असल्याचे चित्रण केले आहे. विरोधाभास असा की ते जगातल्या सर्वांत मोठ्या लोकशाही देशाला लागू आहे. त्यांनी या माध्यमामार्फत अमेरिकन नागरिकाचे रूपांतर फक्त एका ग्राहकात केले आहे.

अशा ग्राहकाला केंद्र मानून तिथल्या उत्पादक-विक्रेत्यांनी या शॉपिंग संस्कृतीची अगदी चोख रचना केलेली आहे. वस्तू घ्यायला तुमच्या खिशात पैसे नाहीत का? नो प्रॉब्लेम. आम्ही तुमच्या खिशात पैसे घालतो. तुम्ही वस्तू घ्या. नंतर पैसे परत करा. यातून 'क्रेडिट कार्ड'ची सिस्टिम तयार झाली. व्हिसा, मास्टरकार्ड, अमेरिकन एक्स्प्रेस या तिथल्या क्रेडिटकार्ड देणाऱ्या आघाडीच्या कंपन्या. तुमची कर्ज काढण्याची क्षमता त्या कार्डावरच्या छोट्या मॅग्नेटिक पट्टीवर नोंदलेली असते. अमेरिकेतल्या कुठल्याही दुकानात खिशात पैसाही न घेता गेलात तरी काही अडणार नाही. तिथल्या कॅशकाऊंटरवरच्या खाचेत ते कार्ड सरकवले की समोरच्या स्क्रीनवर तुमच्या कर्जक्षमतेचे हिरवे आकडे येतात. त्यातनं त्या वेळचं बिल वजा होतं. आणि व्यवहार संपतो. (विमानाची, बसची तिकिटंही या कार्डांवर काढता येतात. टेलिफोनची क्रेडिट कार्ड आहेत) हे कार्ड देताना ती कंपनी तुमच्या पगाराची, तुमच्या चारित्र्याची कसून चौकशी करते. या कंपन्यांकडे असलेली व्यक्तिगत माहिती जगातल्या कुठल्याही गुप्तहेर खात्यापेक्षाही अधिक असते. माझा भारतीय मित्र सांगत होता, "आपल्याकडे आपण मला एक पैचंही कर्ज नाही, असं अभिमानाने सांगतो. इथं उलटं आहे. क्रेडिट कार्ड काढायला गेलं तर विचारतात, तुम्हाला कर्ज नाही? म्हणजे तुमची पत नसली पाहिजे." एकदा तुम्हाला कार्ड मिळालं आणि तुम्ही ते घेतलेलं क्रेडिट वेळच्या वेळी, अठरा टक्के व्याजासह परत करत राहिलात की तुमची पत वाढते. मग कंपनी तुम्हाला त्यांचं 'गोल्डन कार्ड' ऑफर करते. म्हणजे अधिक रकमेइतकं क्रेडिट. त्यातही पत निर्माण झाली की, प्लॅटिनम कार्ड... एकूण काय, सतत काहीतरी खरेदी करीत बसा. कॅश काऊंटरवर कुणी पैशाचं पाकीट काढलं की डॉलरच्या नोटा दिसण्याऐवजी क्रेडिट कार्डांचा गठ्ठा दिसायचा. ज्याचं पाकीट क्रेडिट कार्डांनी फुगलेलं, तो जास्त प्रतिष्ठित.

शॉपिंग सेंटर्सची रचनाही ग्राहकांना कमीत कमी वेळात जास्तीत जास्त वस्तू कशा घेता येतील या दृष्टीने सोयिस्कर असते. त्यातूनच ही कॉम्प्युटराइज्ड कॅश मशिन्स, सरकते जिने, ढकलगाड्या, अम्युजमेंट पार्क इ. सर्व निर्माण झाले आहे. ठिकठिकाणी कॉफी शॉप्स, रेस्ट रूम्स (टॉयलेटस्), छोटी फ्लॉवर बेडस्, बागेत असतात तशी बसायला बाकं. . या सगळ्यामुळे गिऱ्हाइकाची कसली गैरसोय म्हणून होत नाही. मी एका स्टोअरमधून वूड कार्व्हिंगच्या हत्यारांचा सेट आणला. घरी आणल्यावर तो उपयोगाचा नाही असं कळलं. पण उघडलेला सेट परत कसा करायचा प्रश्न पडला. माझा मित्र हसला. तो म्हणाला, "तू परत घेऊन जा. ती बाई फक्त विचारेल, दुसरं काही घ्यायचंय की पैसे परत हवेत? बास एवढंच." आणि तसंच झालं. मित्र म्हणाला, "आपले भारतीय विद्यार्थी तर ट्रॉन्झिस्टर्स, कॅसेट

रेकॉर्डर्स आणतात. आठ दिवस वापरून काही कारण न देता परत करतात. असं अधून मधून वेगवेगळ्या स्टोअर्समधनं आणत राहतात."

लोकांनी वस्तू पाहत हिंडावं, त्या त्यांच्या मनात भरल्या की ते आपोआप घेतीलच, या दृष्टीने दुकानांची एखाद्या प्रदर्शनासारखी रचना असते. आपल्याकडे दुकानात गेल्यावर काही पाहू लागल्यास दुकानदार विचारतो, की काय हवंय ? तसं अमेरिकेत सहसा विचारत नाहीत. अगदीच कॅमेरे, टी. व्ही.च्या सेक्शनमध्ये तुम्हाला तांत्रिक माहिती करून द्यायला कुणीतरी सेल्समन उपस्थित असतो तेवढेच. तुम्ही विचारल्यावर तो तुम्हाला माहिती देतो. बाकी तुम्हाला कुणी कुठे हटकणार नाही. आपल्याला मूळ किमतीपेक्षा वस्तू स्वस्त मिळाली, याचं माणसाला फार आकर्षण असतं. म्हणून याचा फायदा तिथले उत्पादक-विक्रेते हरतऱ्हेने उठवीत असतात. मी आयोवात असताना रोज 'डेली आयोवन' नावाचं वर्तमानपत्र यायचं. त्यात रंगीत हँडबिलटाइप कागद यायचे. त्यावर चौकोनी आकाराची कूपन्स छापलेली असायची. हे कूपन घेऊन अमक्या पिझ्झा हाऊसमध्ये गेलात तर तुम्हाला साडेतीन डॉलरचा पिझ्झा तीन डॉलरला मिळेल, असं त्यावर छापलेलं असायचं. वर्तमानपत्रांची पानंच्या पानंभर अशी कूपन्स छापलेली असायची. शॉपिंग सेंटरमध्येही ही वर्तमानपत्रे ठेवलेली असायची. मी एकदा एक वस्तू घेत होतो. कॅश काऊंटरवरची मुलगी म्हणाली, "तुम्ही डिस्काउंट कूपन्स आणली नाहीत ? ती तिकडं वर्तमानपत्रं ठेवली आहेत, त्यात ती असतात. तुमचा फायदा होईल." अगदी मिलिऑनर माणसंही अनेकदा असली अर्धा एक किंवा दोनचार डॉलर्स वाचवणारी कूपन्स काळजीपूर्वक जमवताना दिसतात. 'सेल', 'बार्गेन ऑफर' किंवा 'बिग डील' हे तिथल्या शॉपिंग कल्चरमधले परवलीचे शब्द. नवीन फॅशन आली की जुन्या वस्तू ठेवायच्या कुठं ? त्या काढून टाकाव्याच लागतात. ख्रिसमसच्या आधी मोठा सेल लावून सगळा माल काढून टाकतात आणि नवीन माल भरून दुकानं सज्ज होतात. हा सेल लागणार त्या सकाळी प्रचंड रांगा शॉपिंग सेंटर्सपुढं लागलेल्या असतात. अगदी आदल्या रात्री ख्रिसमसआधीच्या थंडीत माणसं रांगा लावायला येतात. गरम कपडे घालून, स्पंजच्या मॅट्रेसेस घेऊन रांगेत बैठक ठोकतात, झोपतातही. आणि सकाळी सेंटर उघडले की, जितक्या स्वस्त वस्तू मिळवता येतील तेवढ्या मिळवायला त्यांची अशी काही झुंबड उडते की आपल्याला खरंच वाटणार नाही की हे अमेरिकेसारख्या संपन्न देशातलं दृश्य आहे !

बदलणाऱ्या सीझन्सचा, सणांचा भरपूर उपयोग ही सेंटर्स करून घेत असतात. मी तिथं गेलो तेव्हा 'बॅक टू स्कूल' सीझनच्या सगळीकडे पाट्या होत्या. मुलांच्या सुट्ट्या संपल्या, चला, शाळेची खरेदी करा. त्या वेळी शॉपिंग सेंटर्समध्ये मुलांचे कपडे, बूट, बॅगा, स्टेशनरी यांनी दुकानं तुडुंब भरलेली. उन्हाळा म्हणजे हायकिंगचा सीझन. मग उन्हाळी कपडे, तंबू, वगैरेंना प्राधान्य. हिवाळ्यात कोट, स्वेटर्स, ग्लोव्हज इ. गरम कपडे, बर्फावरच्या स्कीईंगचे सामान, तऱ्हेतऱ्हेचे हिवाळी, बर्फात चालू शकतील असे बूट, इ. सामान भरतात. मला

योगासनासाठी शॉर्ट पँट घ्यायची होती. कुठेच मिळेला. कारण तो हिवाळा होता. आणि शॉर्ट पँट हा उन्हाळी कपडा. किती हिंडलो, पण नम्रतापूर्वक नकार. आणि तसंच उन्हाळ्यात तुम्हाला स्वेटर मिळायची पंचाईत होणार. दिसायला स्टोअर्स प्रचंड, पण दुसऱ्या सीझनच्या वस्तूंचा मात्र दुष्काळ.

माझी इकडे राहून अशी कल्पना होती की, तिकडे सण म्हणजे फक्त नाताळचा असतो. पण तसे बरेच असतात. मी होतो त्या चार-साडेचार महिन्यांतही दोन-तीन मोठे सण येऊन गेले. 'थँक्स गिव्हिंग' चा एक होता. इंग्लिश लोकांनी रेड इंडियनांना हटवून तिथं वसाहती केल्या. नंतर इंग्लंडमधनं लोक तिथं गेले. त्यांनी स्थानिक लोकांशी जुळवून घेऊन त्यांचे आभार मानून पार्टी दिली. त्याची आठवण म्हणून हा राष्ट्रीय सण साजरा करतात. शनिवार-रविवारला जोडून तो सण घेतात. सण सोयिस्कर हलवायची तिकडे सोय आहेच. जवळपास आठवडाभर सुट्टी होती. नुसत्या शाळा-कॉलेजेसना नाही, तर बहुतेक ऑफिसेसनाही. त्यानिमित्त पार्टीसाठी टर्की नावाचा कोंबडीसारखा पण बराच मोठा पक्षी कापला जातो. (कारण लोकांनी इंडियनना दिलेल्या पार्टीत तो कापला होता.) आधीपासूनच पेपरात जाहिराती आल्या होत्या. डेली आयोवनमध्ये तर फोटो फीचर होते. किती टर्की उद्याच्या सणांसाठी कापून घ्यायची वाट पाहत आहेत, हे दाखवायला अनेक टर्कींचा फोटोही दाखवला होता. विक्रेती एक्स्पर्ट बाई सांगत होती की, एका टर्कीत किती लोकांची पार्टी होऊ शकेल, काय काय नव्या रेसिपीज तुम्ही करू शकाल, इत्यादी. 'हॅलोवीन' हा पितरांना श्रद्धांजली वाहण्याचा सण त्या दरम्यानच येऊन गेला. हॅलोवीनला पमकीनचं म्हणजे भोपळ्याचं फार महत्त्व. ते आतून कोरून, त्यांना नाक, डोळे, तोंड यांच्या खाचा पाडून आत मेणबत्ती लावतात. पण त्याहूनही वैशिष्ट्य म्हणजे मृतात्म्याप्रमाणे भीतिप्रद वेष करून एकमेकांकडे जाऊन घाबरवायचे. म्हणून त्या दिशेने मार्केट 'फ्लड' होतं. सगळीकडे काळ्या कापडावर हाडांचा सांगाडा काढलेले ड्रेस दिसू लागतात. रबरी भयानक मुखवटे तर आपल्याला पाहवणार नाहीत इतके भयानक असतात. ड्रॅक्युलासारखे दात असलेल्या कवळ्या, भयानक दाढी, मिशा इ. साहित्यही मिळतेच. या दिवशी अनोळखी माणसंही एकमेकांकडे जातात आणि घरातल्या मुलांना चॉकलेट, केक्स वगैरे खाऊ देतात. याच सुमारास या सणाबद्दल विचित्र बातम्या वर्तमानपत्रांत वाचल्या. आधीच्या वर्षी अशा कुणा अनोळखी माणसांनी काचांचा चुरा घातलेल्या गोळ्या व ब्लेडचे तुकडे घातलेले केक्स मुलांना वाटले आणि त्यातून त्यांना इजा झाली. म्हणून या लेखवजा बातमीत म्हटले होते की, 'आपल्या ओळखीच्याच माणसांकडून मुलांसाठी खाऊ घ्या.'

याशिवाय मदर्स डे, फादर्स डे असे सण असतातच. मदर्स डेला घरातल्या इतरांनी आईला प्रेझेंट्स् द्यायची. मग तसल्या वस्तूंनी मार्केट भरून गेलेले असते. ख्रिसमस हा तर सणांचा राजा. ख्रिसमस गिफ्टस् हा अमेरिकनांनी (सर्वच पाश्चात्त्य संपन्न देशांनी) स्वतःहून मागे लावून घेतलेला त्रास आणि खर्च आहे. आईने पोरांना गिफ्ट, पोरांनी आईला, आईने

बापाला, बापाने आईला... अशी सगळ्या कॉंबिनेशन्सनी एकमेकांना गिफ्टस् द्यायच्या असतात. मित्रमंडळींना, नातेवाइकांना, ऑफिसमधल्या बॉसला, सहकाऱ्यांना गिफ्टा द्याव्या लागतात. यातल्या उपयुक्त वस्तू फार थोड्या. छोट्या छोट्या डेकोरेटिव वस्तू. (एरवीही आपल्याला कुणी घरी बोलावले की काहीतरी बारीकसारीक गिफ्ट न्यावी अशी अपेक्षा असतेच. मी तिथं गेल्यावर बसल्या जागी चित्रं काढून किंवा ओरिगामी करून द्यायचो त्यामुळे मोठाच खर्च वाचत होता.) मग ख्रिसमस कार्डस्. ही एक मोठी इंडस्ट्रीच आहे.

ख्रिसमसनिमित्त सगळी शॉपिंग सेंटर्स आपली कात टाकतात. आणि नव्या लखलखत्या स्वरूपात उभी राहतात. आधीचा जराही खराब न झालेला रंग, ओरखडाही न उठलेले फर्निचर... इ. सारं बदललं जातं. नवी रचना, नवं इंटेरिअर. मधल्या चौकात भला मोठा ख्रिसमस ट्री उभारतात. त्यावर लायटिंग, आरशाचे गोल, गोल, अनेक रंगी गोळे, लाल फिती. लाल ड्रेस, पांढऱ्या दाढीतले ख्रिसमस बाबा मुलांचे मनोरंजन करीत फिरत असतात. न्यूयॉर्कमधल्या एका शॉपिंग सेंटरच्या संपूर्ण इमारतीला गिफ्ट पॅकला दहा वीस फूट रुंदीची लाल फीत गुंडाळून त्याला फुलाची गाठ मारतो तसा लाल पट्टा गुंडाळला होता, व त्याचा 'बो'ही बांधला होता.

•थँक्सगिव्हिंग साधारणपणे नाताळच्या आधी महिनाभर असतो. तेव्हापासून ख्रिसमस शॉपिंग सुरू होतं, असा संकेत आहे. शॉपिंग सेंटर्सच्या बाहेर पार्किंग लॉट गाड्यांनी इतके फुल होतात की पार्किंगसाठी लोक गाड्या घेऊन गोल गोल चकरा मारीत राहतात. सामान घेतल्यावर चेक आऊटसाठी मोठमोठ्या रांगा लागतात. वर्षभर केलेलं सेव्हिंग लोक अक्षरशः उधळत असतात. खरेदीचा कसा कैफ असतो ते ख्रिसमस शॉपिंग पाहिल्यावर समजलं. ख्रिसमसच्या आदल्या दिवशी मध्यरात्रीला दुकानं सगळी बंद होतात. लोक अगदी त्या अपरात्रीपर्यंत शॉपिंग करीत असतात. मला इथं येण्यापूर्वी ख्रिसमस म्हणजे प्रचंड गडबड असेल असं वाटलं होतं. पण तसं काही नाही. लोक एकमेकांना घरी बोलवतात, पार्टी करतात, एवढेच. रस्ते अगदी रिकामे असतात. तिथल्या शॉपिंग कल्चरने सगळ्या सांस्कृतिक सणांचे स्वरूपही शॉपिंगभोवतीच केंद्रित करून ठेवले आहे.

या शॉप्समध्ये अर्थातच दर्जे असतात. कुठेही, उपनगरात दिसणारी सुपरमार्केट्स् म्हणजे विविध संसारोपयोगी वस्तूंची दुकानं. त्या त्या शहराच्या डाऊन टाऊनमध्ये असणारी शॉपिंग सेंटर्स ही फॅशनेबल वस्तू, कपड्यांची महागडी दुकानं असतात. मेसी, गिंबल्स, ब्लूमिंग डेल, मार्शल फील्ड, सीयर्स, डेटन हडसन, अशी कितीतरी. महागड्या दुकानातलं पब्लिक वेगळं. स्वस्त दुकानात ब्लॅक्स, आपल्यासारखे इंडियन्स, मेक्सिकन चेहरे दिसतात. तिथं 'शॉप लिफ्टिंग'च्या चोऱ्यांचं प्रमाणही जास्त. महागड्या दुकानात ब्लॅक तरुण माणूस गेला की, शॉप डिटेक्टिव त्याच्या अगदी मागे मागे फिरून लक्ष ठेवतात. कधी कधी तर, इतक्या उघडपणे करतात की त्याने दुकान सोडून जावेच. शॉप लिफ्टिंगच्या विरुद्ध दुकानं वेगवेगळ्या यंत्रणा बसवीत असतात आणि चोर त्यावर मात करीत असतात.

प्रत्येक वस्तूवर छापलेल्या उभ्या काळ्या रेघांचं मॅग्नेटिक कोड असतं. वस्तू परस्पर नेल्यास बझर वाजू लागतो. चोरांनी त्यातलं मॅग्नेटिक कोड नाहीसं करणारं, छोटं, खिशात ठेवता येईल असं यंत्र शोधून काढलंय. किंवा पॅकिंगवर ते कोड छापलेलं असतं, ते तिथं काढून आतली वस्तू खिशात घालायची, अशी ही एक साधी युक्ती असते. क्लोजसर्किट टी. व्ही. च्या कॅमेऱ्यांवरून चोरांकडे लक्ष ठेवता येतं. पण त्यांना कसं फसवायचं, कसा आडोसा निर्माण करायचा, हे चोरांना अवगत असतं. हे होणारं नुकसान शॉपिंग सेंटरवाले आता गृहितच धरून त्याप्रमाणे भाव वाढवून लावतात. हा उंदीर-मांजरांचा खेळ आता तिथल्या संस्कृतीचा करमणुकीचा भाग झाला आहे.

शॉपिंग सेंटर्सच्या देशभर किंवा विभागवार साखळ्या तयार झाल्या आहेत. त्यांचा हा पसारा, प्रचंड खर्च पाहता छोटे दुकानदार यांच्यापुढे टिकणे शक्यच नाही. 'मॉम अँड पॉप' दुकानं म्हणजे नवराबायको दोघं चालवतात अशी दुकानं (बहुधा राहत्या घराच्या पुढच्या भागात ती असायची) आता नामशेष झाली आहेत. मोठे मासे छोट्यांना खातात तसे यांना मोठ्यांनी खाऊनच टाकले आहे. हे खाणंही पद्धतशीर असतं. समजा, एन्व्हलप्स आदी स्टेशनरी तयार करून विकणारं दुकान असलं की, शॉपिंग सेंटरवाले त्याला म्हणतात, "तुझा सगळाच्या सगळा माल आम्ही विकत घेतो, तुला दुकान चालवायची गरजच काय ?" ते अर्थातच भाव पाडून मागतात. याला ती ऑफर स्वीकारण्यावाचून गत्यंतरच नसते. कारण न स्वीकारावी तरी आपल्यापेक्षा हे स्वस्त माल विकून याचा धंदा मारणारच असतात. मग तो मोठ्यांना आपला माल सप्लाय करू लागतो. मग ते आणखी भाव पाडून मागतात. ते याला अशक्य होतं. मधल्या काळात याची गिऱ्हाईकं तुटलेली असतात. तेव्हा धंदा बंद करण्यावाचून गत्यंतर नसतं. कुठल्याही शहराच्या डाऊन टाऊनमध्ये अजूनही टिकून राहिलेली वैयक्तिक मालकीची थोडी दुकानं सोडली तर बहुतेक धंदा सुपर मार्केट, शॉपिंग सेंटर्सच्या चेन्सनी घशात घातला आहे. या मोठ्यांमधेही भरपूर स्पर्धा असते. गिऱ्हाइकांना प्रलोभनं दाखवण्यात जो यशस्वी ठरतो तो टिकतो. इतरांना आपल्या आपल्या भव्य, प्रचंड फर्निचर, डेकोरेशन, लायटिंग केलेल्या चेन्सच्या चेन्स बंदही कराव्या लागल्या आहेत. कंपन्यांनी एकमेकींना गिळणे हे तर आता अमेरिकन व्यवसायातले सर्रास चित्र झाले आहे.

ही सगळी संस्कृती आपल्याकडे झपाट्याने येत चाललीच आहे. पुण्याचा लक्ष्मी रोड आता पंचवीस वर्षांपूर्वीपेक्षा कितीतरी पटींनी अधिक झगमगू लागला आहे. तीन-तीन चार-चार मजली साड्यांची दुकाने झाली आहेत. एकाच इमारतीत स्त्रियांची, पुरुषांची, मुलांची तयार कपड्यांची दुकाने भरपूर इन्टेरिअर आणि एक्स्टेरियर डेकोरेशन्ससहित उभी आहेत. पुण्याच्या पेपरमध्ये साड्यांच्या दुकानांच्या मोठमोठ्या, दर सणाला वेगवेगळ्या कविता वापरून केलेल्या जाहिराती झळकत असतात. मोठ्या कंपन्या पूर्वी पेपर-मासिकांत जाहिराती देत. आता त्याच्या कितीतरी पटीने महाग अशा टी. व्ही. वर ते जाहिराती करतात, प्रोग्रॅम 'स्पॉन्सर' करतात. या सगळ्यांमुळे मुळातली वस्तू किती महाग होते याचा गिऱ्हाइके

विचार करीत नाहीत. कारण अशा झगमगत्या रस्त्यावर 'शॉपिंग' करीत फिरणं हा त्यांच्या जीवनातला महत्त्वाचा भाग झाला आहे. मुंबईत 'अकबरअली' सारख्या डिपार्टमेंटल स्टोअरच्या छोट्या का होईना पण साखळ्या तयार होऊ लागल्या आहेत. पुण्यातले उच्चभ्रू चंदन स्टोअर्स किंवा सुपर शॉपीमध्ये जाऊन प्लॅस्टिक पॅक केलेल्या धान्याच्या, मालाच्या पिशव्या बास्केटमध्ये टाकत टाकत एका वेगळ्या अमेरिकन आविर्भावात शॉपिंग करू लागले आहेत. तरीही इथे काही दुकानदार– ज्यांना पुणेरी म्हणून हिणवले जाते– या विस्तारशील विक्रेत्या संस्कृतीकडे पाठ फिरवून वेगळ्या व्यक्तिमत्त्वाची दुकानं, व्यवसाय चालवीत आहेत. मी अमेरिकेतल्या मित्रांना पुण्यातल्या काही दुकानदारांची उदाहरणं सांगायचो.

पुण्यातले 'वैद्य उपाहार गृह' नावाचे प्रसिद्ध मिसळ देणारे हॉटेल आहे. त्याचे मालक पोथी वाचत गल्ल्यावर बसलेले असतात. पैसे घेऊन सुटे परत करण्याशिवाय ते पोथीतून डोके वर काढीत नाहीत. फर्निचर शंभर वर्षे जुने. सकाळी दोन तास संध्याकाळी दोन तास हॉटेल उघडं. मुलं नीट काम करताहेत की नाही, कुणा गिऱ्हाइकांची ऑर्डर घेतली की नाही, यासाठी कधीही मालक डोकं वर काढत नाहीत. भजी संपली की धावपळ करून परत पीठ भिजवणार नाहीत की बाहेरनं आणणार नाहीत. मुलं पाटी लावतात 'भजी संपली.' मिसळीचं तसंच. चिवडा संपला की मिसळ संपलीची पाटी. मुलं कोकणातली. त्यांना शिमग्याला घरी जाता यावं म्हणून महिनाभर हॉटेल बंद ठेवतात. या हॉटेलसमोर उडप्याचं, लाखो रुपये खर्चून डेकोरेशन, लायटिंग केलेलं हॉटेल झालंय. पण या दुकानाची जुनी दोन फूट बाय एक फूटची, तीही दुकानाला काटकोन करून लावलेली जुनी पाटी तशीच आहे. तरीही या मिसळीसाठी परगावहूनही माणसं येतात.

पेणच्या देवधरांचे गणपती विकणारे माणिक स्टोअर्स हे दुकान आहे. त्यांची वर्षानुवर्षांची गिऱ्हाइकं ठरलेली. मालक आगाशे त्या गिऱ्हाइकांना दोनतीन महिने आधी जोडकार्ड पाठवतात. त्याचं उत्तर आलं की गणपतीच्या गळ्यात त्या नावाचं लेबल अडकवून टाकतात. आदल्या दिवशी लोक तो गणपती घेऊन साधेपणाने किंवा थोडं वाजत गाजत घरी जाणार. कुठं भाव करणं नाही, घासाघीस नाही, जाहिरातबाजी नाही. मी मागे आमच्या चिवडेवाल्याचं व्यक्तिचित्र लिहिलं होतं. ते घाटगे स्वतः व कुटुंबीय मिळून चिवडा तयार करतात व घरासमोर गाडी लावून त्यावर तो विकतात. मजूर लावले तर दर्जा बिघडेल म्हणून मजूर लावत नाहीत. मागणी असूनही पेलणार नाही म्हणून धंदा वाढवीत नाहीत. त्यांचा धंदा पिढीजात. त्यांच्या चिवड्याचा दर्जा पिढीजात आणि गिऱ्हाइकेही पिढीजात. ते श्रीमंत होऊ शकले नाहीत. पण त्यांचं पुरेसं भागतंही आहे. ही उदाहरणं अमेरिकन मित्रांना खरी वाटायची नाहीत. ते विचारायचे, "व्हाय अॅट ऑल डू दे डू बिझिनेस?" कमी खर्चात राहणं, साधेपणाने राहणं हे आपण एक मूल्य मानतो, ते त्यांना कसं सांगणार? 'वापरा आणि फेकून द्या' हे मूल्य त्या संस्कृतीने तिकडे रुजवलंय. माझा

एक मित्र परवा सांगत होता. मागे 'टाईम'मध्ये लेख आला होता. शर्टाचं बटन तुटल्यावर काय करायचं ? एक पर्याय म्हणजे बटन लावायचं. पण तो आता अमेरिकन माणसाला अवघड वाटतो. त्यापेक्षा शर्ट फेकून देणं हा सोपा पर्याय तो स्वीकारतो.

एक ओळखीच्या बाई सांगत होत्या. त्या त्यांच्या नातीशी खेळायला अमेरिकेला गेल्या होत्या. नात चित्रं काढायची, पण नुसती रेघ काढली, की तो चांगला, पांढरा, जाड कागद टर्रकन फाडून टाकून द्यायची. आजी म्हणायची, "अगं, याच्या मागच्या बाजूने काढ." पेन्सिलीला टोक करायच्या ऐवजी थोडी झिजली की फेकून द्यायची. आजी म्हणायची "मी तुझ्या पेन्सिलला टोक करून देते." हे नातीला आवडायचे नाही. ती तिच्या आईकडे तक्रार करायची की, आजी फार चिक्कू आहे, ती मला आवडत नाही. यावर मग आजीने बोलणंच सोडलं. लहान वयापासून अशी जीवनपद्धती मुलांमध्ये रुजली जात असल्याने तो पुढे ग्राहक संस्कृतीचा कट्टा समर्थक बनतो, यात नवल काय ? 'वापरा आणि फेकून द्या' हे रुजलेले तत्त्व फक्त वस्तूंच्या बाबतीत राहत नाही, तर माणसांच्या बाबतीत, जीवनातल्या सर्वच क्षेत्रांच्या बाबतीत वापरले जाणे हे साहजिकच आहे.

★★★★★

# कचरा

अमेरिका हा दिसायला अतिशय स्वच्छ देश असला तरी प्रचंड कचरा निर्माण करणारा देश आहे. ते लोक कचऱ्याची तत्परतेने विल्हेवाट लावतात, म्हणून हे लक्षात येत नाही. पेपर नॅपकिन हा तिथला जिव्हाळ्याचा विषय. विमानात पाऊल ठेवल्यापासून त्याचा महिमा दिसू लागतो. विमानातल्या टॉयलेटमध्ये बेसिनशेजारी, मागे पेपर नॅपकिनचे गठ्ठेच्च्या गठ्ठे आपण त्यांना कधी ओढून घेऊन, पावन करून फेकून देतोय याची वाट पाहत बसलेले. त्यात निरनिराळ्या कारणासाठी वापरायच्या पेपर नॅपकिन्सच्या कागदाची जाडी, टेक्श्चर यात निरनिराळे प्रकार. पुढे अमेरिकेत ठिकठिकाणी हे पेपर नॅपकिन्स अपरिहार्यपणे पुढे यायचेच. किचनमध्ये फूटभर रुंदीचा रोलच अडकवून ठेवलेला असे. एकदा ओढला की बरोबर चौरस आकाराचा जाड, मऊ तुकडा आपोआप हातात येणार.

असाच एक क्लीनेक्स नावाचा अगदी पातळ, तलम पेपरनॅपकीनचा प्रकार. तोही एका बॉक्समध्ये ठेवलेला. त्या बॉक्सच्या वरच्या बाजूला गोलाकार भोक, त्यातून अर्धवट डोकावणारा पेपर नॅपकीन. अशी बॉक्सेस हॉलमध्ये, कीचनमध्ये ठिकठिकाणी टी-पॉयवर ठेवलेली. नाक पुसायचे असो, तोंड पुसायचे असो, टेबलावर पडलेला चहा-दुधाचा थेंब पुसायचा असो, पटकन क्लीनेक्समध्ये हात घालून फर्ररकन नॅपकिन ओढला जातो. टॉयलेटमध्ये आपल्याकडेही काही ठिकाणी टॉयलेट पेपरचे रोल असतात पण ते किती जेवढ्यास तेवढे जपून वापरले जातात. पण तिकडे ! द्रौपदी वस्त्रहरण करणाऱ्या दुःशासनाच्या आविर्भावात लोक फराफर ते टॉयलेटपेपर पाचसात पाचसात फूट एकेका फटक्यात ओढत असतात.

आमच्या लेखकांच्या ग्रूपला ठिकाठिकाणी तिथल्या संस्थांतर्फे रिसेप्शन्स असायची. त्या वेळी एका बाजूला टेबलावर चहा-कॉफीचे उकळत ठेवलेले कॅन्स, घट्ट दूध भरलेली वरून बंद केलेली झाकणाएवढी छोटी कंटेनर्स, बिस्किटस्, केक्स इ. असायचं. पलीकडे थर्माकोलच्या ग्लासांची चळत. त्या पलीकडे साखरेच्या छोट्या पुड्या. निरनिराळ्या फ्लेवरच्या टी बॅग्जची बॉक्सेस. चहा-कॉफी ढवळायला प्लॅस्टिकचे चमचे. त्याला जोडून

असलेल्या दुसऱ्या टेबलावर मोठ्या आईसबॉक्समध्ये कोक, पेप्सी इ. पेयांचे ॲल्युमिनियमचे कॅन्स असायचे. लोक येऊन थर्मोकोलच्या ग्लासात चहा-कॉफी घेताना तो हाताला गरम लागू नये म्हणून पेपर नॅपकीन त्याभोवती गुंडाळून घ्यायचे. बशीतले बिस्कीट उचलताना पेपर नॅपकिन हातात घेऊन अंगठा आणि तर्जनी पुढे पेपर नॅपकीन ठेवून त्याच्या साहाय्याने ते उचलायचे. म्हणजे बोटाला बिस्किटचा स्पर्श नको. बिस्किट खाल्ले की तो कागद चुरगळून गार्बेज कॅनमध्ये टाकणार. ओठ पुसायला दुसरा नॅपकिन ओढणार. मी एकदा त्या टेबलांपाशी उभा असताना मनात आलं, यातल्या किती वस्तू ते फेकून देतात, ते बघू या. थर्मोकोल ग्लासेस, पेपर नॅपकिन्स, ढवळायचे चमचे, कोकचे कॅन्स, पेपर डिशेस. म्हणजे फक्त इलेक्ट्रिकवर चालणारे चहा-कॉफीचे बंब तेवढे फेकून देत नाहीत. बाकी सगळेच.

कोलंबियाचा लेखक सेल्सो आमच्या ग्रूपमध्ये होता. अमेझॉनचे मौल्यवान जंगल झपाट्याने तुटतेय असा विषय चालला होता. एक अमेरिकनच यावर कोलंबिया, ब्राझिल इ. देशांना दोष देत होता. सेल्सो म्हणाला, "पण हे जंगल तोडणाऱ्या स्थानिक कंपन्या या अमेरिकन कंपन्यांशी कोलॅबोरेशन असलेल्या कंपन्या आहेत. आणि हे सगळं टिंबर अमेरिकेसाठी वापरलं जातं. तुम्ही बांधता त्या लाकडाच्या इमारती, तुम्ही वापरता हे पेपर नॅपकिन्स, टॉयलेट पेपर्स ही चैन तिसऱ्या जगातल्या जंगलतोडीमुळे चालली आहे." त्यावर अमेरिकन लेखक जास्त बोलूच शकला नाही . कागदाची केवढी मुबलकता तिथे आहे ! आम्ही कुठलीही संस्था पाहायला गेलो तर अनेक फोल्डर्स, संबंधित लेख, पुस्तिका, काही ठिकाणी तर जाडजाड पुस्तकं... हे सगळं भेट मिळायचं. पहिल्या पहिल्यांदा मी हे सगळं ठेवायचो, पण नंतर जागेअभावी निर्दयपणे फेकून देऊ लागलो. पुढे पुढे तर अशा ठिकाणी मिळालेलं सगळं तिथल्या टेबलावर कुणाचं लक्ष नाही असं पाहून मुद्दाम विसरूनही येऊ लागलो. उत्तम कागद, उत्तम फोटोंची उत्तम छपाई... पण आपल्याला त्याचा काही उपयोग नाही.

ठिकठिकाणी टूरिस्ट इन्फर्मेशन सेंटर्स असायची, तिथं लाकडी स्टँडमध्ये अनेक फोल्डर्स उभी करून ठेवलेली असायची. त्यातलं एखादं दुसरं उपयोगी पडणारं असलं तरी लोक पद्धतीप्रमाणे दहावीस फोल्डर्स उचलून घ्यायचेच. मी आयोवात पोहोचल्या पोहोचल्या युनिव्हर्सिटीतर्फे अशा आगामी कचऱ्याचा गठ्ठाच येऊन पडला. निरनिराळी डिपार्टमेंटस्, त्यांचे उपक्रम, काम करणारी माणसं, त्यांचे फोन नंबर्स, आयोवाचे नकाशे तर दहावीस येऊन पडले. बस कंपनीची वेळापत्रकं, दुकानांच्या जाहिराती... बापरे ! आमच्या गरजेचं त्यातलं एखादा दुसरा टक्काच असेल. रोज लेटर बॉक्समध्ये अनेक जाहिराती, स्वस्त कूपन्स येऊन पडायचंच. मे फ्लॉवर या इमारतीच्या आठव्या मजल्यावर आम्ही राहत होतो. पॅसेजच्या कोपऱ्यात भिंतीत धातूच्या जाड पत्र्यात एक आपोआप बंद होणारी आडवी स्लीट् होती. तिथून कचरा टाकला की तळमजल्यावर जाऊन पडायचा. आतली ती पोकळी

सगळ्या मजल्यांना समान होती. *त्या स्लीटमधनं आम्ही हे कागद, ती पुस्तकं, स्वयंपाकातलं* खरकटं, बाटल्या, कॅन्स असं जे जे काही टाकायचं असेल ते टाकायचो. काही मजले उंच तो रोजचा कचरा होत असणार. आपल्याकडे कागदाचं रिसायक्लिंग करतात. तसं तिथं फारसं करीत नसल्याने ते डिस्पोज करण्याशिवाय गत्यंतरच नाही. आत्ता आत्ता रिसायक्लिंग तिथं येऊ लागलं आहे. बियर, कोकचे ॲल्युमिनियमचे कॅन्स खूप जमवून आपण विशिष्ट दुकानात दिले तर थोडे पैसे मिळतात. रस्त्यावर, लायब्ररीत काही ठिकाणी बोर्ड लावून गार्बेज कॅन्स ठेवलेले असतात. त्यात फक्त हे असले कॅन्स टाकायचे असतात. पण हे सगळं एकूण कचऱ्याच्या मानाने अगदीच तुरळक.

माझी आई मागे कॅनडातल्या माझ्या बहिणीकडे गेली होती. बहीण रोज धडाधड अनेक गोष्टी गार्बेजमध्ये टाकायची. उत्तम आकाराच्या बाटल्या, बॉक्सेस, क्रोकरी असं टाकताना पाहून आईचा जीव तुटायचा. ती त्यातल्या काही बाटल्या काढून ठेवायची आणि म्हणायची, "मी नेईन हे तिकडे" बहीण हसून म्हणायची, "ठराविक वजनच बॅगेतनं नेता येतं." आई या टाकून देण्यावरून रागावली की ती म्हणायची, "अग, टाकून नाही दिलं तर आठवड्याभरात छतापर्यंत घर भरून जाईल." आणि यात अतिशयोक्ती नव्हती. तिथं आठवड्यातून एकदा किंवा दोनदा कचऱ्याच्या गाड्या त्यांच्या समोरच्या रस्त्यावरून जातात. आपण आपल्या घरातला कचरा काळ्या रंगाच्या प्लॅस्टिकच्या मोठ्या पोत्यात भरून त्या रस्त्यालगतच्या विशिष्ट ठिकाणी ठेवायचा. कचऱ्याचा वार असेल त्या दिवशी त्या रस्त्यावर अशा काळ्या पोत्यांचे ढीगच्या ढीग लागलेले असतात.

अशा पोत्यात न मावणारेही गार्बेज असते त्याचे काय करावे, हा प्रश्न तिथल्या लोकांपुढे असतोच. सोफासेट टाकून द्यायचाय, काय करायचे, गाद्या बाद करून नवीन घ्यायच्यात, जुनं फर्निचर, मोडका टी. व्ही, फ्रीज हे असलं तिथल्या 'गराज सेल'मध्ये विकलं जातंच असं नाही. फेकून दिलं तरी चालत नाही. म्युनिसिपाल्टी तुमच्यावर गुन्हा दाखल करणार. बरं लांब जाऊन फेकून द्यायलाही ट्रान्सपोर्टचा खर्च येणार. बहिणीच्या घरासमोर पेट्रोलपंप आहे. तिथं एक मोठ्ठी बंद ट्रक येते. ते लोक असल्या वस्तू अर्थातच फुकट घेऊन त्या चॅरिटेबल संस्था किंवा गरिबांना वाटतात. ती ट्रक अधूनमधूनच येते. त्यामुळे ती ट्रक आली रे आली की, आपल्याकडे दुष्काळी भागात पाण्याच्या टँकरकडे जसे लोक धावतात तसे या अवजड वस्तू कशातरी उचलून तिथं धावपळ करीत पोहोचवतात. ट्रकमधली माणसंही फार खराब झालेल्या वस्तू घ्यायचं नाकारतात. मग त्या घेऊन ते बिचारे लोक आपापल्या घरी हताश होऊन परत येतात.

शॉपिंग सेंटर्स म्हणजे तर कचरा निर्माण करण्याची मोठीच केंद्रे. प्रत्येक गोष्ट पॅक करून मिळते. पॅकिंगचे एवढे प्रकार जन्मात पाहिले नव्हते. गिफ्ट देण्याच्या वस्तूंच्या बाबतीत तर वस्तूच्या दुप्पट चौपट आकाराचे पॅकिंग, बॉक्स, मग त्यात वस्तूच्या आकाराचा खड्डा असलेला, प्लॅस्टिकमध्ये मोल्ड केलेला, वरून वेलवेट लावलेला एक तुकडा असणार.

वरून गिफ्ट रॅप, त्यावर फीत, हे सगळे छोट्या पातळ पुठ्ठ्याच्या बॉक्समध्ये. ग्रीटिंग कार्डस्‌चा एक सेक्शनच प्रत्येक मोठ्या स्टोअरमध्ये असतो. ग्रीटिंग कार्ड म्हणजे अमेरिकन व्यावसायिकांनी पैसे मिळवून कचरानिर्मिती करण्याचे मोठे प्रकरणच निर्माण केले आहे. ते खूळ आता आपल्याकडेही आले आहे. मी एका मराठी मैत्रिणीकडे उतरलो होतो तेव्हा इकडची दिवाळी चालू होती. त्या दिवशी तिला भारतातून एकदम चार पत्रे आल्याची पाहून ती उड्याच मारू लागली. निवांतपणे वाचायला म्हणून काढली तर दिवाळी ग्रीटिंग. आतमध्ये फक्त पाठवणाऱ्यांच्या सह्या. ती वैतागून म्हणाली, "ह्या लोकांनी चारसहा ओळी लिहून पाठवल्या असत्या तर किती बरं वाटलं असतं मला. आम्ही तिकडलं समजावं म्हणून किती आसुसलेले असतो, हे यांना कसं कळत नाही ? एवढा खर्च करून ग्रीटिंग पाठवायची काही गरज होती का ? इकडे काय कमी आहेत ?" तिकडे खरोखरीच या ग्रीटिंगचं उदंड पीक आलेलं आहे. बापाच्या वाढदिवसाला पाठवायचं कार्ड वेगळं, आईच्या वेगळं. प्रत्येक वर्षाच्या व्यक्तीच्या वाढदिवसाचं, परीक्षेतल्या यशाबद्दलचं, लग्नाबद्दल, लग्नाच्या वाढदिवसाबद्दल, निरनिराळ्या सणांबद्दल प्रत्येक प्रकारची कार्डं वेगळी. आत भंपक काव्यमय ओळी, किंवा मचूळ विनोद असलं काय काय. प्रत्येकाच्या डायरीत नोंद असते. त्याप्रमाणे कार्ड विकत घ्यायचं, सही करून पोस्ट करायचं की संपली जबाबदारी. आपल्याकडे येणारी कार्डं दोनचार दिवस टेबलावर मांडून ठेवतात, किंवा कपडे वाळत घातल्यासारखी दोरीवर लोंबकळत ठेवून शेवटी ती गार्बेजची वाट चालू लागतात. कुठल्याही देवाला नमस्कार करा, शेवटी तो केशवाला पोहोचतो, या अर्थाचा श्लोक लहानपणी धड्यात होता. त्याप्रमाणे तिथली कुठलीही वस्तू असो, थोड्याच अवधीत ती गार्बेजपर्यंत पोहोचते. गार्बेज कॅन हा तिथल्या संस्कृतीचा मोठा महत्त्वाचा घटक आहे. रस्त्यावर पावलोपावली गार्बेज कॅन्स. अतिशय डिसेंट धातूचे किंवा फायबर ग्लासचे. ती काळी सुप्रसिद्ध गार्बेजची प्लॅस्टिकची पिशवी काठावर दुमडून आत सोडलेली असते. मध्ये गॅप ठेवून वरून झाकण केलेले असते. त्यामुळे वरून कचरा उघडाही पडत नाही. झाकण काढून ती पिशवी रोजच्या रोज उचलली जाणार. कुठे बाहेर कचऱ्याचा कणही सांडलेला नसणार. युनिव्हर्सिटीतल्या कुठल्याही वर्गात ऑफिसात, कॉरिडारमध्ये, विमानतळावर, अगदी दाट जंगलातल्या शेल्टरपाशीही जागोजागी हे कॅन्स असतात आणि ते स्वच्छ करायची यंत्रणाही राबत असते.

एका शॉपमध्ये मी खोडरबर घेतलं. काउंटरवरच्या बाईने फर्रकन दीड फूट बाय दोन फूट आकाराची प्लॅस्टिकची पिशवी ओढली आणि त्यात ते रबर टाकून दिलं आणि म्हणाली 'थँक्यू'. मी चकितच झालो. फळांच्या सेक्शनमध्ये प्रत्येक प्रकारची फळं मोठमोठ्या बॉक्सेसमध्ये मांडलेली होती. जवळ वरती प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा अखंड रोल लावलेला. लोक पिशवी ओढायचे, ती दीड फूट अंतरावर कापली जायची. त्यात दोन सफरचंद टाकायची आणि दुसऱ्या फळांकडे असं प्रत्येक प्रकारच्या फळांसाठी स्वतंत्र

पिशवी. त्या सगळ्या मिळून मोठी पिशवी. हे सगळं काउंटरवर आल्यावर तिथली बाई जाड ब्राऊन पेपरच्या मोठ्या पिशवीत सगळं भरायची.

आम्ही काही वेळा मित्रांच्या कुटुंबासह पिकनिकला जायचो. निघतानाच कारच्या डिकीमध्ये फळं, बिस्किटं, कोकचे कॅन्स, खायला सटरफटर, सँडविचेस घेऊन ते खाण्यासाठी प्लॅस्टिकच्या जाड प्लेट्स्, बाऊल्स, चमचे असेही घ्यायचो. वापरून झालं की लगेच सगळं गार्बेज कॅन्समध्ये टाकून द्यायचं. आपण अशा बशा-चमचे नक्कीच वर्षवर्ष वापरले असते. (म्हणून) कागदाचा कचरा एकवेळ परवडतो. कारण तो कुजून त्याची माती होऊ शकते. पण प्लॅस्टिकच्या बाबतीत तसं होत नाही. अमेरिकेची प्लॅस्टिकची ही प्रचंड गरज भागवण्यासाठी केमिकल इंडस्ट्रीज हवेत भरपूर प्रदूषण करतात आणि तयार झालेला माल लगेच कचरा होऊन कायमचा प्रश्न होऊन राहतो.

तिकडे आता महत्त्वाच्या पहिल्या दोन-तीन प्रश्नांपैकी पर्यावरणाचा प्रश्न लोकांना वाटतो. याचं कारण अमेरिकन जीवनच आज केमिकल इंडस्ट्रीवर पूर्णपणे अवलंबून आहे. त्यातून निर्माण होणारे प्रदूषण टाळताच येत नाही. ते टाळायचे म्हटले तर सगळी जीवनपद्धतीच बदलावी लागेल. त्याची जवळपास कुणाची तयारी नाही. केमिकल इंडस्ट्रीतील 'वेस्ट'– टाकाऊद्रव्ये– ही फारच मोठी डोकेदुखी झाली आहे. लव्ह कॅनॉल नावाचं प्रकरण झालंय. पूर्वी ही वेस्ट कशी डिस्पोज करायची याचे नियम नव्हते, ते जमिनीत खड्डा करून गाडून टाकायचे. ती घातक द्रव्ये झिरपत जाऊन एका ठिकाणाहून जमिनीबाहेर आली आणि त्याने पाण्यातील जीव मेले, जमिनीवरच्या जिवांना धोका निर्माण झाला. मग कायदे कडक झाले.

मी तेथे असताना एक प्रकरण झाले, ते टी. व्ही. वर बघायला मिळाले. ही घातक, टाकाऊ द्रव्ये घेऊन बोटीतून गरीब देशांमध्ये कुठेतरी टाकून देणारे कॉन्ट्रॅक्टर्स असल्याचे उघडकीला आले. एका पर्यावरणवादी संस्थेने त्या बोटींचा पाठलाग करून सुदानमध्ये एका घरात ती पिंपे ठेवली गेली असल्याचे जगासमोर आणले. ती पिंपे गंजून त्यांतील ती घातक द्रव्ये जमिनीत झिरपून पाण्यात मिसळली गेल्याने त्या परिसरातले कॅन्सरचे प्रमाण व मृत्यूचे प्रमाण कित्येक पटींनी वाढल्याचे त्यांनी सिद्ध केले. आणि या कॉन्ट्रॅक्टर्सकडे ही घातक द्रव्ये सोपवणाऱ्या कंपन्या अमेरिकेतील प्रतिष्ठित कंपन्या होत्या. त्या संस्थेने अशी भीती व्यक्त केली होती की, समुद्रातही अशी घातक द्रव्ये सोडली जातात आणि पाण्यातले प्राणिजीवन धोक्यात येते.

मी कॅनडात गेलो तेव्हा तिथल्या लोकांच्या बोलण्यात ॲसिड रेन हा मोठ्ठा प्रश्न होता. अमेरिकेच्या उत्तर भागात वीज निर्माण करणारी बरीच केंद्रे ही दगडी कोळशावर चालतात. त्यांच्या धुरातून सल्फर डायॉक्साईड वायू ढगातील पाण्याबरोबर मिसळून त्याचे सल्फ्युरिक ॲसिड तयार होते आणि ते ढगांबरोबर कॅनडात येते आणि तिथे चक्क सौम्य सल्फ्युरिक ॲसिडचा पाऊस पडतो. त्यामुळे त्या भागातली जंगलं धोक्यात आली आहेत.

पानं गळून पडतात. कॅनडा हा सरोवरांचा देश. आता ही सरोवरे, तिथलं सगळं प्राणिजीवन संपून मृत होऊ लागली आहेत, असे संशोधकांचे निष्कर्ष आहेत. त्या वेळच्या प्रेसिडेंट रेगनकडे कॅनडा सरकारने यावर उपाययोजना करायचे कळकळीचे आवाहन केले, पण रेगनने "प्रयोगशाळेत बसलेल्या चार पर्यावरणवाद्यांचे निष्कर्ष मी खरे मानणार नाही," असे उत्तर देऊन ते उडवूनही लावले.

भारतात येऊन गेलेल्या एका अमेरिकन माणसाला मी म्हटलं, "इथून तिथे गेल्यावर तुम्हाला तिथली घाण पाहून धक्काच बसला असेल." तो म्हणाला, "धक्का बसतो. पण तुमच्याकडची घाण फार बरी. घाण म्हणजे काय झोपडपट्ट्यांच्या भोवती पडलेली उघडी विष्ठाच ना, ती वाळून नष्ट होते, तिची माती होऊन जाते. ती उलट जमिनीला पोषक ठरते. आमच्याकडची घाण ही महाभयंकर घाण आहे. साधीसुधी नाही, तर ती आहे न्यूक्लीअर वेस्ट !" अमेरिकेतील बरीचशी वीजनिर्मिती केंद्रे ही अणुशक्तीवर चालतात. त्यातून रोज किरणोत्सर्गी कचरा निर्माण होतो. त्याचं काय करायचं ह्या प्रश्नाचं उत्तर शास्त्रज्ञांनाही सापडलेलं नाही. दक्षिणेतल्या ओसाड भागात जमिनीखाली शिशाच्या अवजड पेट्यांमध्ये ती न्यूक्लीअर वेस्ट सध्या साठवत आहेत. पण त्या पेट्यांमधून ते जमिनीत झिरपत नाहीत, अशी शास्त्रज्ञांना खात्री नाही.

रशियातल्या चर्नोबिल अणुभट्टीच्या स्फोटानंतर सबंध युरोपभर हाहाकार उडाला. अमेरिकेतील अणुभट्ट्या कितपत सुरक्षित आहेत याची पाहणी करण्यासाठी तिथल्या सिनेटर्सची एक कमिटी शास्त्रज्ञांच्या मुलाखती घेत होती. टी. व्ही.वर दाखवलेल्या दृश्यात बहुतेक सर्व शास्त्रज्ञ असे म्हणत होते की, "चर्नोबिलपेक्षा इथल्या भट्ट्यांची परिस्थिती काही वेगळी नाही. एखाद्या छोट्या अपघातानं किंवा एखाद्या माणसाच्या छोट्या चुकीमुळेही चर्नोबिलइतकाच अनर्थ इथेही ओढवू शकेल. अशी इथल्या सुरक्षिततेच्या उपायांबाबतची परिस्थिती आहे." अणुभट्ट्यांच्या आसपास राहणारे नागरिक संघटित होऊन खटले भरतात. निरुपाय होऊन शेवटी जागा खाली करून दुसरीकडे जातात. टी. व्ही. वरच्या बातम्यांमध्ये रेडॉन गॅसवर एक फीचर दाखवले होते. जमिनीतून झिरपत आलेला हा वायू बेसमेंटमधल्या भिंतींच्या चिरांमधून, लाकडांच्या फटींमधून घरात आलेला आढळला. त्या गॅसमुळे फुफ्फुसाचा कॅन्सर होतो. विशिष्ट गावांमध्ये ह्याचे अस्तित्व आढळले, तिथे कॅन्सरचे प्रमाणही इतर भागांपेक्षा जास्त आढळले. या गावांजवळ अणुभट्टी किंवा अणुकचरा साठवायची जागा नव्हती. पण कुठूनतरी झिरपत तो त्यांच्या घरापर्यंत पोहोचला होता. वार्ताहराने शास्त्रज्ञाला विचारलं, "याविषयी आम्ही नागरिकांनी कोणती दक्षता घ्यायची ?" त्यावर तो खांदे उडवून म्हणाला, "वेल, फार तर आपल्या बेसमेंटमध्ये रेडॉन आहे का याची वरचेवर तपासणी करावी. भेगा, चिरा बुजवाव्यात, पण खरं तर आपण याबाबत काहीच करू शकत नाही अशी परिस्थिती आहे."

एकूणच पर्यावरणाच्या प्रश्नाबद्दल अमेरिकन नागरिकांची हीच प्रतिक्रिया आहे.

श्याम आसोलेकर हा मित्र आयोवा विद्यापीठात एन्व्हरॉयनमेंट इंजिनियरिंग या विषयात पीएच. डी. करीत आहे. त्याच्याशी पर्यावरणावर बऱ्याचदा बोलणे व्हायचे. 'ग्रीन हाऊस इफेक्ट', 'ओझोन होल' असे काही शब्द नुसते ऐकत होतो. त्याबद्दल त्याला विचारलं. तो म्हणाला, "इकडे दाढीच्या साबणावर ब्रश घासून फेस करायला कुणाला वेळ नाही, म्हणून बाटलीच्या वरचे बटन प्रेस केले की आयता फेसच बाहेर येतो. पण हे करण्यासाठी जे केमिकल वापरले जाते त्यातून एक द्रव्य सुटे होऊन आकाशात जाते, तिथल्या ओझोनशी त्याचा संयोग होतो. इथल्या डिपार्टमेंट स्टोअर्समधून आइस्क्रीम्स, नॉनव्हेज, चीज, मिल्क साठवायला मोठमोठे काचेचे डीप फ्रीजर्स तू पाहतोस ना? त्यासाठी फ्रेऑन नावाचा गॅस तयार करावा लागतो, तोही वर जाऊन त्याचा ओझोनशी संयोग होतो. ओझोनच्या आवरणात दक्षिण ध्रुवानजीक भोक पडले आहे. सूर्याची उष्णता पृथ्वीवर येताना ओझोनमुळे गाळली जाते. आता यामुळे पॉईंट पाच डिग्री सेंटिग्रेडने पृथ्वीचे तपमान गेल्या काही वर्षांत वाढलं आहे." (आता तर ओझोनला उत्तर ध्रुवाजवळंही भोक पडलं आहे)

"पण पॉइंट पाचच्या फरकाने एवढा काय फरक पडतो? आपल्याकडे तर सीझनमध्ये पाच-दहा डिग्रीज्चा सहजच फरक पडतो."

"अरे, तो वेगळा. इथं अशा कायमच्या फरकाने ध्रुवांवरचा किंवा डोंगरांवरचा बर्फ वितळू लागेल, नद्यांना पूर येतील. समुद्राची पातळी वाढेल, किनाऱ्यावरचे जीवन धोक्यात येईल. . . असं कितीतरी. शिवाय ओझोनचा थर विरळ झाल्यावर सूर्यकिरणातले अल्ट्रा व्हायोलेट किरण न गाळता पृथ्वीवर आल्यावर लोकांमधलं कातडीचं कॅन्सरचं प्रमाण वाढेल."

"आणि ग्रीन हाऊस इफेक्ट म्हणजे?"

"आपल्या या संस्कृतीत आपण जी प्रचंड प्रमाणावर ऊर्जा वापरतो, त्यासाठी जी कारखानदारी उभी राहयलीय, या सगळ्यातून प्रचंड प्रमाणावर कार्बन डायॉक्साईड तयार होतोय. जंगलांचा संहार एकीकडे चालू असल्याने तो वायू आता वातावरणात ॲबसॉर्बही होत नाही. म्हणून त्याचा थर आता पृथ्वीभोवती तयार होतोय. त्यातून सूर्यकिरण आत येऊ शकतात. पण इथे आल्यावर जी उष्णता तयार होते, ती उष्ण हवा वर जाते, पण या कार्बन डायॉक्साईडच्या थरामुळे त्याबाहेर जाऊ शकत नाही. वनस्पती वाढवण्यासाठी काचेचे ग्रीनहाऊस करतात. तिथं असंच होतं. तिथं हवा खेळती राहण्यासाठी दुसरी व्यवस्था नसेल, तर तुम्हाला दोन मिनिटं थांबवणार नाही. तशी पृथ्वीची परिस्थिती हळूहळू होत चालली आहे."

मनात आलं, काय भयंकर मोडतोड चालवलीय आपण या वातावरणाची. अमेरिकेत आता लोकांना ही जाणीव व्हायला लागलीय. परवाच्या अध्यक्षीय निवडणुकीत हा मोठा प्रश्न बनला होता. आपल्याकडे राज्यकर्ते पर्यावरणवाद्यांचा 'पेडररोडला राहून आम्हाला

शहाणपण शिकवणारे' म्हणून उपहासही करतात. काही पर्यावरणवादी उथळ, फॅशनेबल आहेतही, पण प्रश्न तर खरेच आहेत. पण या राज्यकर्त्यांची भाषा आणि ॲसिड रेनवरचे ते उद्दाम उत्तर देणाऱ्या रेगनची भाषा यात किती साम्य आहे ! अमेरिकेत पर्यावरणाचा बोलबाला असला तरी तिथल्या कारखानदार लॉबीपुढे त्यांची लॉबी अगदी नगण्य आहे. कितीही ओरड करा, प्रसार माध्यमे वापरा, शेवटी कारखानदार राज्यकर्त्यांना 'व्यवहारी' निर्णय घ्यायला लावतातच.

●

★★★★★

# वकील

आपल्याकडे वकील या जमातीला वाईट दिवस आलेत. कलेक्टर कचेरीच्या दारात तर काळा कोट घातलेले वकील येणाऱ्या प्रत्येक माणसावर झडप घालून 'साहेब, काही काम आहे का? डोमेसाईल काढायचेच का?...' असं विचारून गिऱ्हाइकांची ओढाओढी करीत असतात. अमेरिकेत मात्र वकिली धंद्याला फार चांगले दिवस आहेत. अमेरिकन राजकारणावर तर वकील वर्गाचाच सर्वाधिक प्रभाव आहे. एखादा माणूस वकील आहे म्हटलं की तो श्रीमंत असणारच, हे तिथं गृहित धरतात. आपल्याकडे सर्वसामान्य माणूस कोर्टाची पायरी चढू नये अशा मताचा असतो. एकदा त्या लफड्यात सापडलं की वर्षानुवर्षे ते मागे लागणार, वेळ जाणार, पैसा जाणार...इत्यादी. पण अमेरिकेत याच्या उलट आहे. कोर्टाचे निकाल आपल्या मानाने खूपच झटपट. आपल्याकडे एखाद्यावर नुकसानभरपाईचा दावा करायचा असेल, तर दहा टक्के रक्कम आपल्यालाच स्टँप ड्यूटी म्हणून भरावी लागते. तिथे ती भानगडच नाही. वकीलच आपल्याला गाठतो, व आपल्याशी करार करतो. आपण फक्त सही करायची, तो बोलावेल तेव्हा कोर्टात साक्षीला जायचं. नुकसानभरपाई मिळाली तर साठ टक्के वकिलाला, चाळीस टक्के आपल्याला. किंवा उलटेही. केस किती स्ट्राँग आहे यावर ते अवलंबून. आपल्याला खटला भरण्यासाठी एक पैसाही खर्च करावा लागत नाही. वकील त्यात इन्व्हेस्ट करतो, धोका पत्करतो, फायदाही मिळवतो. त्यामुळे ऊठसूट कॉम्पेनसेशनचे दावे लावले जातात. खटला भरण्याला ते 'सू' (Sue) करणे म्हणतात.

माझा वर्गमित्र तिथे डॉक्टर आहे. खूप चांगली प्रॅक्टिस आहे. मोठा दुमजली आलिशान बंगला आहे. तीन गाड्या आहेत. पण तो म्हणाला, "आपल्याकडे प्रॅक्टिसमध्ये जशी मजा आहे, समाधान आहे तसं इकडं नाही. डॉक्टर-पेशंट नातं हे विरोधी नातं होऊन बसलंय. आमच्या मनात सतत धास्ती असते. हा पेशंट कधी आपल्याला सू करेल देव जाणे, 'तेव्हा सावध राहायला हवं. आम्ही पेशंटबरोबरचे इंटरव्ह्यू टेप करतो, शक्य असेल तेवढी इन्व्हेस्टिगेशन्स करायला सांगतो. सर्व रोग कव्हर होतील अशी ट्रीटमेंट देतो. कारण नंतर चार-सहा वर्षांनी पेशंट म्हणायला नको, की 'आत्ता मला अमुक रोगाचे निदान झालंय, चार

वर्षापूर्वी तुम्हाला डिटेक्ट का नाही झालं? त्यामुळे माझं नुकसान झालं.' इकडं नुकसानभरपाई ही मिलियन्स डॉलर्समध्येच मागतात. त्यामुळे आम्ही रिस्क घेतच नाही. त्यामुळेच ओव्हर इन्व्हेस्टिगेशन्स, ओव्हर मेडिकेशन हे प्रॉब्लेम निर्माण होतात. पण त्याला आम्ही काय करणार?"

"मग असं कुणी कोर्टात गेलं तर तुम्हाला ती केस फेस करावी लागत असणार. . त्यात बराच वेळही जात असेल."

तो हसला व म्हणाला, "आमची इन्शुरन्स कंपनी त्याची काळजी घेते. मी दर वर्षाला काही लाख डॉलर्सचा 'माल प्रॅक्टिस इन्शुरन्स' भरतो. माझ्या विरुद्ध कोणी केस केली तर ही इन्शुरन्स कंपनी परस्पर त्या पेशंटच्या वकिलाला गाठते. कोर्टकेस लढवायला किती खर्च येईल याचा अंदाज त्यांना असतोच. त्यानुसार ते त्या पार्टीशी कॉम्प्रमाइज करून त्यांना पैसेही देऊन टाकतात."

"समजा, तुझी काहीच चूक नसेल आणि केस खोटीच असेल तर?"

"मी कितीही ओरडून सांगितले तरी इन्शुरन्स कंपनी फक्त खर्चाचा विचार करते. त्या पार्टीला भरपाई देणं म्हणजे एक प्रकारे गुन्हा कबूल केल्यासारखंच आहे, पण त्याला आम्ही काहीच करू शकत नाही."

तिकडे काही वकील हे ॲक्सिडेंट हंटर्स म्हणून प्रसिद्ध आहेत. ॲक्सिडेंट झाला की, पोलिसांमागोमाग हेही धावतात. अपघातात सापडलेल्या पार्टीशी तिथल्या तिथे कॉन्ट्रॅक्ट करून पुढची केस नंतर लढवतात. काही वकील किंवा त्यांची माणसं ही हॉस्पिटल्समध्येही राऊंड घेतात. पेशंटकडनं माहिती घेऊन त्यांना कुठं 'केस' आढळली रे आढळली की लगेच कॉन्ट्रॅक्ट. पेशंटचं त्यात पैचंही नुकसान नसतं, झाला तर फायदाच, आणि तोही मिलियन्समध्ये.

मित्र आणि मी कारने चाललो होतो. तो सांगत होता, "आता मी ड्राइव्ह करतोय आणि आपला अपघात झाला तर तू लगेच माझ्यावर दावा लावू शकतोस. इथं मित्रांनी असे एकमेकांवर दावे केलेले आहेत." आमच्या मागून काही गाड्या येत होत्या. तो म्हणाला, "मागचा गाडीवाला पुढं जायला बघतोय." मी म्हटलं, "मग पुढं जायचा सिग्नल दे ना त्याला." तो म्हणाला, "मी कशाला देऊ? तो जाईल बाजूने पुढे. समजा मी सिग्नल दिला आणि पुढे जाऊन आदळला कशावर, तर हा सू करेल मला."

आमच्या मे फ्लॉवर रेसिडेन्स हॉलमध्ये एक बाई रोज फरशी पुसायची. आधी ती 'फरशी ओली आहे' अशी पाटीचा स्टॅंड लावायची आणि मग पुसायला सुरुवात. एखादा घसरून पडला आणि तिथं पाटी नसेल लावली की पडणारा चालला कोर्टात. सुरक्षिततेच्या सूचना प्रत्येक वस्तूवर छापलेल्या असतात त्या याच भयापायी. प्लॅस्टिकच्या पिशवीवर छापलेले असते, 'लहान मुलांना देऊ नये, ते गुदमरण्याचा धोका आहे.' साध्या लाकडी भिंगरीवर छापलेले की, 'तीन वर्षांच्या पुढच्या मुलांच्या उपयोगाकरिता.' (एका मिश्कील

खेळणीवाल्याने भिंगरीवर असे छापले होते की, 'तीन ते एकशेतेरा या वयोगटातील व्यक्तींसाठी') कुठल्याही खेळण्याचा रंग, हा पोटात गेल्यास अपाय होणार नाही, असाच असावा लागतो. ग्रोसरी शॉप्समधून आपण एखादा ब्रेड आणला आणि जर त्याला वास येतोय म्हणून परत करायला गेलो तर लगेच दिलगिरी व्यक्त करून, भरपूर आभार मानून तो बदलून देतात.

एकदा मी व मिनिता सकाळी लांब ट्रीपला जाणार होतो, म्हणून वाटेत खाण्यासाठी सँडविच आणायला गेलो. आमच्यादेखत ती बाई काचेच्या कप्प्यातले सँडविचचे गठ्ठे उचलून गार्बेज कॅनमध्ये टाकत होती. मी विचारले, "का हे फेकून देतेय ? चांगले तर आहेत हे." मिनिता म्हणाली, "हे तुला रिडिक्यूल वाटेल, पण तसे संकेतच आहेत इथं. दूध किंवा तत्सम पदार्थ काही तासांनी, तर सँडविचसारखा पदार्थ एकदोन तासांनी, एवढंच काय, काही गरम पदार्थ तर वीस वीस मिनिटांनी, गिऱ्हाईकच आले नाही, तर फेकून द्यावे लागतात. शिळा पदार्थ खाल्ल्यामुळे एखाद्याला काही त्रास झाला आणि त्याने सू केलं तर या दुकानदाराला त्याचं दुकान विकावं लागेल."

तिथल्या एका मराठी मित्राने सांगितलेली घटना अशी : त्याने त्याच्या अमेरिकन मित्राला जेवायला बोलावलं होतं. इतरही अनेक जण त्या प्रसंगी बोलावले होतेच. हा अमेरिकन त्याच्या आवारातून येताना बर्फावरून पाय घसरून पडला. थोडंफार खरचटलं, असेल नसेल इतपतच. त्याला या मित्राने आधार देऊन उठवून घरात आणलं. खरचटलं तिथं बँडएड, औषध लावून दिलं. परत परत दिलगिरी व्यक्त केली. पुढे तो जेवला. गप्पा मारल्या. नंतर एके दिवशी त्याला या अमेरिकन माणसाने वकिलामार्फत नोटीस पाठवून भरपाई म्हणून मोठ्या रकमेची मागणी केली. हा मराठी मित्र चाट पडला. तो सांगत होता, "हा अमेरिकन तिथं रागावला असता, बोलला असता, तसाच निघून गेला असता तरी समजू शकलो असतो. पण ते काही न करता एकदम नोटीसच."

"मग काय केलंस ?"

"कॉम्प्रमाइज करून दिली भरपाई. कारण इकडे स्वतःच्या घरासमोरचा बर्फ काढणं ही आपली जबाबदारी असते."

"पण तू अमेरिकन मित्राला याबाबत विचारलं का ?"

"विचारलं. पण तो खांदे उडवून म्हणाला, 'तुझा इन्शुरन्स नव्हता, हे मला काय माहीत ? यू पे फॉर युवर निग्लिजन्स !' "

तिथली नुकतीच घडून गेलेली एक गमतीशीर केस मला वाचायला मिळाली. एक घरमालक छप्परदुरुस्ती करीत असताना छपरास अर्धवट भगदाड राहिले. रात्री तिथून कुणी चोर येऊ नये म्हणून त्याने विजेच्या जिवंत तारा तिथे लावून टाकल्या. योगायोगाने एक चोर रात्री तिथून घरात उतरायचा प्रयत्न करीत असताना विजेचा धक्का बसून खाली पडला व त्याच्या पायाला दुखापत झाली. त्या चोराने या घरमालकावर नुकसानभरपाईचा दावा

लावला. आणि तो जिंकला! घरमालकाच्या जागेत चोराने प्रवेश केला असला तरी तो सौम्य गुन्हा आहे. पण विजेच्या जिवंत तारा लावूनही त्यावर मालकाने तशी सूचना लिहिली नव्हती हा गंभीर गुन्हा, म्हणून चोराला भरपूर भरपाई मिळाली.

बिल्डिंग कन्स्ट्रक्शनचे नियम आपल्यापेक्षा फारच काळजीपूर्वक पाळले जातात. प्रत्येक इमारतीच्या कोठल्याही भागात अपंगास किंवा वृद्धास व्हील चेअरवर बसून जाता आले पाहिजे, असा नियम. त्यासाठी जे उतार करतात त्याचा कोन ठरलेला. तो उतार जास्त असला आणि व्हील चेअर फास्ट जाऊन माणसाला अगदी मामुली दुखापत झाली तरी तो लगेच सू करतो. हॉटेलमध्ये तर आग लागल्यावर कुठल्या रस्त्याने बाहेर पडा, लिफ्ट वापरू नका. . . वगैरे सूचनांचे कार्डच खोलीत समोर ठेवलेले असते. कितीही छोटी फ्लाईट असली तरी आणि सगळ्यांना सगळ्या सूचना माहीत असल्या तरी एअर होस्टेस धोक्याच्या परिस्थितीत काय करायचे याची कवायत करून दाखवतेच.

या कोर्टबाजीची फायद्याची बाजूही आहे. लोक सरकारवरही सर्रास दावे लावतात. त्यामुळे सरकारला कायद्यांमध्ये बदल करावे लागले, काही तर नवीन कायदेही झाले. सिगारेट ओढणाऱ्यांनी सोडलेला धूर आमच्या शरीरात नाइलाजाने आम्हाला घ्यावा लागतो, ही आमच्या सिगारेट न ओढण्याच्या हक्कावर गदा आहे अशा केसेस झाल्यावर प्रत्येक ठिकाणी स्मोकर्स कंपार्टमेंटस् स्वतंत्र करावी लागली. एखाद्या फॅक्टरीच्या धुरातून अमक्या गॅसमुळे हवेतील त्या घटकाचे अगदी पॉइंट पॉइंट एकने जरी प्रमाण वाढले तरी नागरिक कमिटी स्थापन करून कोर्टात जातात. कारखानदारांपुढे तिथल्या पर्यावरणवाद्यांची ताकद कमी असली तरी काही पर्यावरणवादी सतत या, विशेषतः केमिकल्स इंडस्ट्रीज, न्यूक्लीअर पॉवर वापरणारी पॉवर स्टेशन्स यांच्या हात धुऊन मागे लागलेले असतात. अंतिम विजय कोणाचाही होवो, पण निदान लोकमत तरी तयार होते.

या पार्श्वभूमीवर हजारो माणसे ज्यात मेली, अशा भोपाळ दुर्घटनेबाबत आपण किती नुकसान करून घेतले हे जाणवतं. अमेरिकेत दावे दाखल झाले असते, तर ती कंपनी झोपलीच असती. आपल्या सुप्रीम कोर्टाने रक्कम सांगताच तात्काळ त्या अमेरिकन कंपनीने भरून टाकली. इथे औषधातील भेसळीमुळे अनेक मृत्यू घडतात. एखादी केस योगायोगाने पेपरमध्ये येते. पुढे कोर्टकेसचे किंवा कमिशनचे वर्षानुवर्षे गुऱ्हाळ चालते. शेवटी लोक विसरून जातात. अशा केसचे निकाल कधी लागून जातात तेही कुणाला समजत नाही.

वकिली व्यवसायाचे असे थोडे फायदे सोडले, तर या व्यवसायाने तिथलं जीवन अविश्वासमय करून टाकलं आहे. व्यक्तिगत स्वातंत्र्य, प्रायव्हसीच्या नावाखाली आधीच इतरांपासून तोडून कोष करून राहण्याची लोकांची वृत्ती आणि त्यात अविश्वास आणि भरपाईच्या लोभाची भर.

★★★★★

# टी. व्ही.

टी.व्ही. हा अमेरिकन मनाचा, कुटुंबाचा, सामाजिक जीवनातला केवढा महत्त्वाचा भाग आहे, हे इथं कुणाला नव्याने सांगायला नको. आपल्याकडे टी. व्ही. ने आपलं जीवन व्यापून टाकलेलं आहेच. पण तिथंच ते माध्यम निर्माण झालं आणि आपल्याकडे ते येण्यापूर्वी कितीतरी वर्षे आधीपासून रुजलं आहे. मार्क्यूज, गालब्रेथ इत्यादींच्या पुस्तकांत तिथल्या नागरिकांचं ग्राहकात रूपांतर करण्यात टी. व्ही. हे माध्यम भांडवलदारांनी किती परिणामकारकरीत्या वापरलं, गरजा निर्माण करून वस्तू कशा खपवल्या वगैरे भाग वाचलेला होताच. टी. व्ही. वर बातम्या देणारी व्यक्ती बदलली तरी कित्येक जणांचा मानसिक तोल ढळतो, कारण कामावरून परत आल्यावर टी. व्ही. लावल्यावर त्या वृत्तनिवेदकाचा आवाज त्यांना आश्वासक वाटत होता, असेही एका पुस्तकात वाचले होते.

मी अमेरिकेला जाईपर्यंत इकडे माझ्या घरी टी. व्ही. नव्हता. कुणाकडे गेलो की अधूनमधून पाहायला मिळायचा. पण तिकडे गेल्यावर आयोवातल्या माझ्या अपार्टमेंटमध्ये सामान ठेवल्यावर काही वेळातच आमची हाऊसकीपर मेरी नाझरथ खोलीत टी. व्ही. आणि रेडिओ ठेवून गेली. तिथे सुरुवातीला ओळखी नव्हत्या, वेळ भरपूर असायचा. त्यामुळे मीही झपाट्याने टी.व्ही. ॲडिक्ट होत गेलो. त्यामुळे सर्वसाधारण अमेरिकन नागरिकाला टीव्हीतनं काय मिळतं हे चांगलं समजूही शकलो.

टी. व्ही. वरचा सर्वांत वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम म्हणजे बातम्या. काही चॅनल्स तर केवळ बातम्यांच्या असतात. रोज बातम्यांमध्ये एखादी 'स्टोरी' लागतेच. मी गेलो त्या वेळी यलोस्टोन नॅशनल पार्कमध्ये प्रचंड आग लागली होती. रोज बातम्यांमध्ये आगीत कडाकडा मोडत खाली येणारी झाडं दाखवत. त्या आगीला आवर घालू पाहणारे फायर फायटर्स, त्यांच्या मुलाखती, आसपासच्या खेड्यांमधून सक्तीने स्थलांतर करावे लागणारे नागरिक इ. दाखवीत. अमेरिकेसारख्या संपन्न देशात, आग विझवायची प्रचंड आणि आधुनिक सामग्री वापरूनही आग आटोक्यात येत नव्हती. रोज कित्येक चौरस मैल जंगल जळत होते. मग कॅनडाची फायर फायटर्स युनिट्स् आली. तरीही आग विझेना. शेवटी एका रात्री बर्फ पडला

आणि निसर्गानेच आग विझवली. या सगळ्याचे उत्कंठा वाढवील असे रोजचे न्यूज कव्हरेज होत होते. निसर्गापुढे अत्याधुनिक, सर्वांत श्रीमंत देशाचे सामर्थ्य कसे किडामुंगीसारखे आहे, हे जाणवले.

ते थांबतेय न थांबतेय तोच हरिकेन गिल्बर्ट नावाचे समुद्रातले वादळ दक्षिण किनाऱ्याच्या दिशेने येऊ लागले. यलोस्टोनमध्ये जशी आग तसं इकडं पाणी. पाऊस, समुद्राच्या प्रचंड लाटा, कडाकड मोडणारी पामची झाडं, टेक्सासच्या काही शहरांमध्ये ते वादळ येणार म्हटल्यावर लोक आपापल्या घरांच्या काचांच्या खिडक्यांना लाकडी तक्ते बाहेरून ठोकू लागले, डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये खाण्यापिण्याचे, गरजेचे सामान घेऊन ठेवण्यासाठी गर्दी उडाली. बऱ्याच गावांतील वस्ती हलवली तरी काहीजण थ्रिल घेण्यासाठी त्या वादळात समुद्रात लाँचेस घालून मागे दोरी लावून त्या फळीवर उभे राहून त्याचाही आनंद लुटत होते. इ. दृश्ये टी. व्ही. वर येत होती.

ते संपले तोवर उत्तर टोकाला अलास्काजवळ तीन देवमासे बर्फात अडकल्याची स्टोरी सुरू झाली. हिवाळ्यापूर्वी देवमासे उत्तरेकडून विषुववृत्ताजवळील समुद्राकडे स्थलांतर करतात. हे तीन देवमासे इतर माशांपासून वेगळे पडले किंवा त्यांचा वेळेचा अंदाज चुकला म्हणा, पण ते गोठलेल्या समुद्रात अडकले. हे कळताच सगळ्या टी. व्ही. चॅनल्सचे प्रतिनिधी, बायॉलॉजिस्ट इ. मंडळी तिकडे धावली. दहापंधरा फूट व्यासाचे एक भगदाड बर्फात होते. त्यातल्या पाण्यातनं हे वीसपंचवीस फूट लांबीचे मासे अधूनमधून तोंड बाहेर काढायचे. सगळ्या अमेरिकेला घोर लागला की, यांची सुटका कशी होणार. बर्फाच्या कडांना धडकून त्यांना जखमा होऊ लागल्या. त्यांतला एक मासा तर मरूनही गेला. बर्फ तोडायची यंत्रं तिथं नेली पण त्या भगदाडापासून बर्फ नसलेले पाणी खूपच लांब होते. मग बर्फ तोडत जाणारी रशियन बोट मदतीला धावली आणि ते बर्फ फोडत या भगदाडाच्या दिशेने येऊ लागले. पण ते तिथं पोचेपर्यंत मासे तग धरतील का या काळजीने सगळी अमेरिका हवालदिल झाली होती. शेवटी ती क्रूझर पोहोचली आणि देवमाशांची सुटका झाली, तेव्हा ती स्टोरी संपली.

नंतर पेपरमध्ये आलेल्या एका स्फुटात म्हटले होते, 'दोन देवमाशांना वाचवण्यासाठी मिलियन्स डॉलर्स खर्च झाले, टी.व्ही. वरची माणसे, त्यांचा खर्च इ. खर्चही मिलियन्समध्ये झाला. काय साधले ? एवढे पैसे जर देवमाशांची संख्या वाढवण्यासाठी पर्यावरणावर खर्च केले असते, तर त्यांच्यावर उपकार झाले असते. पण लोकांना त्यात रस नव्हता. त्यांना स्टोरी मिळाल्याशी कारण.

एका अमेरिकन मित्राबरोबर मी हे बोलताच तो म्हणाला, "हे तर काहीच नाही, गेल्या वर्षी 'मर्फी' या देवमाशाची स्टोरी ऐकलीस तर टिपिकल अमेरिकन माइंड तुला कळेल." असे म्हणून ती स्टोरी त्याने सांगितली. गेल्या वर्षी असाच हिवाळ्यात पॅसिफिकमधून उत्तरेकडून दक्षिणेकडे येणारा एक देवमासा चुकून सानफ्रान्सिस्कोच्या खाडीत शिरून

सॅक्रामांटो नदीच्या मुखातून आत आत जाऊ लागला. हे कळताच त्याची टी. व्ही.वर रोजची स्टोरीच झाली. हा देवमासा गोड्या पाण्यात गेल्यावर मरणार म्हणून त्याला परत फिरवणे आवश्यक होते. अमेरिकनांनी त्याला मर्फी हे नावही देऊन टाकले. 'गो बॅक मर्फी' ही एक स्लोगनच होऊन गेली. मग तसे लिहिलेले टी शर्ट छापले जाऊन बाजारात आले. तशा टोप्या आणि इतर काय काय बाजारात आले आणि ते भरपूर खपलेही. पण मर्फी मात्र पुढे जात राहिला. बायॉलॉजिस्ट, अधिकाऱ्यांनी त्याच्या वाटेत जाळी बांधून पाहिली, ती त्याने तोडली. अडथळ्यांना जुमानले नाही. आता तो मरणार हे निश्चित झाले. मग एका शास्त्रज्ञाला युक्ती सुचली. देवमाशाच्या मादीचे टेप केलेले आवाज त्याने बोटीत बसून त्या मर्फीच्या मागे ऐकवले. त्याने मात्र तो फिरला. शेवटी 'सेक्स ही सर्वश्रेष्ठ शक्ती' हे त्याने सिद्ध केले. मग तसे आवाज करीत तो पुढे आणि मर्फी मागे असे करीत त्याला परत पॅसिफिकमध्ये आणून सोडले. मग तोपर्यंत 'फेअरवेल मर्फी'चे टीशर्टही बाजारात आले. जल्लोष झाला. तेव्हा ती स्टोरी संपली.

टायसन हा ब्लॅक बॉक्सरही तिकडे टी. व्ही.वरच्या बातम्यांमधला हीरो होता. तो एका हॉटेलमध्ये गेला असता दुसऱ्या ब्लॅक बॉक्सरशी त्याची बाचाबाची झाली. (त्याला पूर्वी टायसनने हरवले होतेच) टायसनने त्याला तिथे इतके हाणले की, चेहऱ्याला अनेक जखमा, हातापायांना फ्रॅक्चर्स झाली. ती स्टोरी एकदोन दिवस चालली. मधे दोन-चार दिवस जाताहेत तोच त्याने गाडी एका झाडावर आदळून ॲक्सिडेंट करून घेतला. बँडेजने मढलेल्या, स्ट्रेचरवरच्या टायसनने सांगितले, "तरीही मी महिन्यात होणाऱ्या बॉक्सिंग स्पर्धेत उतरणारच." त्याने त्याच्या मॅनेजरला काढून टाकले. मग त्या मॅनेजरच्या मुलाखती. टायसनचा मानसिक तोल ढळलेला आहे, तो सायकियाट्रिस्टकडे ट्रीटमेंट घेतोय, अशी माहिती कुणीतरी बाहेर काढली. त्याची टी. व्ही अभिनेत्री ब्लॅक बायको त्याच्या एकूण अस्थिर वर्तनाला कंटाळून त्याला सोडणार, अशी बातमी फुटली. त्यानंतरच तो कार ॲक्सिडेंट झाला, त्यामुळे तो आत्महत्येचा प्रयत्न की अपघात अशी चर्चा. त्या बाईने एक-दोनदा या बातम्यांचा इन्कार केला, मग ती खरंचच त्याला सोडून गेली. मायकेल टायसनच्या बॉक्सिंग नैपुण्यापेक्षा या इतरच अगदी फालतू कारणांसाठी अमेरिकेत लोकप्रिय आणि टी. व्ही. स्टार बनलेला आहे. आता तर तो रेप केस मधे शिक्षा लागून तुरुंगात आहे. तरी त्याला तुरुंगात कंटाळा आला आहे, अशा मुलाखती टी. व्ही. वर येत आहेत.

मी तिथे असताना आर्मेनियाचा भूकंप, बांगला देशचा पूर, ब्रह्मदेशमधील उलथापालथ ह्या परदेशी घटना घडल्या, त्याचं अगदी जवळून रिपोर्टिंग टी. व्ही. वर बघायला मिळालं. सुवर्णमंदिरातलं ब्लू स्टार ऑपरेशन किंवा इतर घटना ह्या इकडच्या लोकांना आपल्यापेक्षा सविस्तरपणे दाखवल्या गेल्या, असं इथल्या भारतीय मित्रांनी सांगितलं. जगभर या टी. व्ही. चॅनल्सच्या यंत्रणा पसरलेल्या असतात. कुठल्याही

कोपऱ्यातल्या देशात एखादी मिलिटरी उलथापालथ घडो किंवा नैसर्गिक उत्पात घडो, ते बहुधा त्याच दिवशी अमेरिकनांना घरबसल्या प्रत्यक्ष पाहता येतं. पूर्वी घेऊन ठेवलेल्या व्हिडिओ टेप्सचा प्रचंड संग्रह यांच्याकडे असल्याने योग्य वेळी तेही तुकडे दाखवीत असतात. गोर्बाचेव्ह तिथं आले त्या वेळी प्रेसिडेंट रेगन यांनी 'गोर्बाचेव्ह हे अतिशय विश्वासू अध्यक्ष व सभ्य गृहस्थ आहेत आणि त्यांच्यामुळे अमेरिका-रशिया संबंध सुधारत आहेत,' असे विधान केलेले दाखवले. या दृश्यानंतर लगेच रेगन यांनी अधिकार ग्रहणाच्या वेळी 'रशियन अध्यक्ष हे अतिशय विश्वासघातकी, बेभरवशाचे असल्याने त्यांच्या बाबतीत माझे धोरण कडक राहील' असे विधान करतानाचे दृश्यही दाखवले.

ए.बी.सी., एन.बी.सी., सी. बी. एस. या प्रसिद्ध टी. व्ही. चॅनल्स. त्यांचे वृत्तनिवेदकही वर्षानुवर्षे ठरलेले आहेत. ते केवळ वृत्तनिवेदक नसतात. त्यांचा जागतिक राजकारणाचा अभ्यास दांडगा असतो. ते अनेक मान्यवर उच्चपदस्थांच्या, जगातील निरनिराळ्या देशांच्या राष्ट्रप्रमुखांच्या मुलाखती घेतात. कसलेही दडपण न मानता त्या व्यक्तींना कोंडीत पकडतात, त्यांची भंबेरी उडवतात. पण त्यांचाही पूर्वग्रह असतोच. इतर जगाकडे, किंवा तेथील घटनांकडे पाहताना त्यांच्या मनातली तुच्छता अप्रत्यक्षपणे दिसतेच. पॅलेस्टाईनी लोकांनी दहा अमेरिकनांना पकडून लिबियात ओलीस ठेवले. वर्षभरानंतर त्यांतल्या एकाची सुटका त्यांनी केली. तो अमेरिकेतल्या एका विद्यापीठात अनेक वर्षे काम करणारा एक मूळचा भारतीय होता. ही बातमी फक्त एकाच चॅनेलने आणि तीही ओझरती दाखवली, त्यातही प्रोफेसरचा चेहराही अर्धा सेकंद, ते सुद्धा अगदी लांबून व ओझरता दाखवला. इतरांनी तर दखलही घेतली नाही. शाम आसोलेकर म्हणाला, "हाच जर एखादा गोरा अमेरिकन ओलीस सुटला असता तर सगळ्या टी. व्ही. ने केवढा जल्लोष केला असता. त्याची मुलाखत घेतली असती. वर्ष त्याने कसे काढले, त्याला कसे वागवत होते, असे प्रश्न विचारले असते. त्याच्या बायकोची, मुलांची मुलाखत झाली असती..."

तिथला टी. व्ही. आपल्यापेक्षा कितीतरी जास्त जाहिरातींनी व्यापला आहे. टी.व्ही. हे तिथं सरकारी माध्यम नाही, तर तो कमर्शिअल टी. व्ही. असल्याने धंदा हा विचार प्रमुख असणं ओघानंच आलं. आपण टी. व्ही. ॲडव्हरटाईज म्हणतो त्याला ते कमर्शिअल्स म्हणतात. या कमर्शिअल्स कार्यक्रमाच्या मधेआधे कधीही घुसत असतात. तिकडल्या लोकांना मी सांगत होतो की, आमच्याकडे लोकप्रिय कार्यक्रमाच्या आधी चाळीसपन्नास जाहिराती सलग दाखवतात. एकजण म्हणाला, "किती छान, तुम्ही त्यांना टाळू शकता. त्या संपल्या की टी. व्ही. ऑन करू शकता." मी म्हटलं, "पण काही लोकांना, विशेषतः मुलांना कार्यक्रमापेक्षा जाहिरातीच जास्त आवडतात."

तिकडे कार्यक्रम एखाददुसरं मिनिट (किंवा फार तर पाचेक मिनिटं) होतोय न होतोय तो जाहिरातींचा रगाडा सुरू. अर्थात त्या एका वेळी दोनचारच असतात. लोक हातातलं रिमोट कंट्रोलचं बटन दाबून त्याचा आवाज बंद करतात. पण दृश्य चालूच ठेवावं लागतं,

कारण कधी परत कार्यक्रम सुरू होईल हे सांगता येत नाही. जाहिराती म्हणजे खाण्याच्या जास्त. हॅम्बरगर्स, निरनिराळ्या तऱ्हेची बिस्किटं, पिझ्झाज इत्यादी. पोरं तोंडात भला मोठ्ठा हॅंबर्गर किंवा तत्सम काहीतरी कोंबताहेत, तोंडातून पाघळलेलं चीज खाली गळतंय आणि यम यम करीत ते परत चाटताहेत... या प्रकारचं काही तरी. मोटारींच्या- विशेषतः सेकंड हॅंड मोटारींच्या जाहिरातीतले सेल्समन आपल्याकडल्या आरडाओरड करून कपडे विकणाऱ्या रस्त्यावरच्या विक्रेत्यांसारखी धमाल करीत असतात. या जाहिरातींना 'मेसेज' हाही प्रतिष्ठित शब्द टी. व्ही. वाले वापरतात, तेव्हा गंमत वाटली. एका बऱ्याच लोकांच्या चर्चात्मक कार्यक्रमात कोणीतरी चांगलं बोलत असताना संयोजकाने त्याला थांबवून 'आफ्टर फ्यू मेसेजेस, वुई विल बी बॅक इन अ मिनिट' असं म्हटलं, आणि या असल्या जाहिराती सुरू झाल्या. काही चॅनल्स सिनेमांच्याच असतात. ते सिनेमे मी जागून जागून बघायचो. पण ते या प्रकारामुळे इतकं थांबत थांबत चालायचं की बस्स. शेवटी तर चांगला, जुना सिनेमा असला तरी मी तो घरबसल्या टी. व्ही.वर न पाहता सरळ लायब्ररीत जाऊन जाहिरातींच्या उपद्रवाशिवाय पाहायचो.

मी तिकडे असताना सेऊल ऑलिंपिक झालं. त्यात तर जाहिरातींनी कळस गाठला होता. एखादी मॅच अटीतटीला आली किंवा एखाद्या ॲथलेटचा काही परफॉर्मन्स चालू असला की एखादी जाहिरात पुढे यायची. सगळे वैतागायचे. मग तो भाग नंतर कधीतरी दाखवायचे, पण ती गंमत निघून गेलेली असायची. या जाहिरातींवर तिकडे पेपरमध्ये बरीच टीकाही झाली. ऑलिंपिक कव्हरेजमध्येही खास अमेरिकन दृष्टिकोन दिसलाच. अमेरिकन टीम किंवा खेळाडू जिथे जिंकत असतील त्याचे सविस्तर चित्रण यायचे, इतर देशांचे फारसे कव्हरेज नसायचे. बॉक्सिंगच्या एका लढतीत पंचाच्या निर्णयाविरुद्ध काही स्थानिक कोरियन लोक चिडले आणि त्यांनी स्टेजवर येऊन पंचाला धक्काबुक्की केली. याला तिथे टी. व्ही. ने भरपूर कव्हरेज दिले. तेच दृश्य परत परत दाखवले. पण अमेरिकन खेळाडूंनी तिथे दारू पिऊन गोंधळ केला, ते उतरले होते त्या हॉटेलच्या प्रवेशद्वारातले संगमरवरी सिंह उखडून टाकले इ. भाग टी. व्ही. वर आलाच नाही. (तो पेपर्समधून व मासिकांतून आल्यामुळे समजले तरी.)

तिथल्या टी. व्ही.ची यंत्रणा अवाढव्य आहे. त्यांचे तंत्रज्ञान जगाच्या पुढे आहे. त्यामुळे कार्यक्रम त्यांना खूप रंगवता येतात. पडद्यावरच्या दृश्यांच्या करामती तर हव्या तशा, आपल्या कल्पनेपलीकडच्या करतात. मी तिथे 'लीगलायझेशन ऑफ ड्रग्ज्' हा अनेक तासांचा मोठ्ठा कार्यक्रम पाहिला. सगळ्या जगभर गर्दसारखी ड्रग्ज बेकायदेशीर ठरवलेली आहेत. पण आता काही समाजशास्त्रज्ञ, डॉक्टर्स असं म्हणू लागले आहेत की, ही ड्रग्ज कायदेशीर करून टाका म्हणजे त्यातली गुन्हेगारी निघून जाईल आणि ती स्वस्त होतील, चांगल्या दर्जाची मिळतील... इत्यादी. थोडक्यात हा अमेरिकनांचा अतिशय जिव्हाळ्याचा विषय होता. त्याला सुप्रसिद्ध ब्लॅक नेता जेसी जॅक्सन, अनेक तज्ज्ञ, न्यूयॉर्कचे मेयर,

सामाजिक कार्यकर्ते, वगैरे उपस्थित होते. ते तर चर्चेत भाग घेत होतेच, पण हजर नसलेले अनेक तज्ज्ञ आपापल्या शहरातून त्यात भाग घेत होते. बाल्टिमोरचा मेयर त्याच्या शहरात टी. व्ही. कॅमेऱ्यासमोर बसलेला होता, इकडे मुख्य सभागृहात टी. व्ही. मॉनिटरवर त्याचा चेहरा दिसत होता. त्याला इकडचे सर्व दृश्य दिसत होते, इकडच्यांना तो. अशी बरीच जण हजारो मैल दूर असूनही गप्पा मारल्यासारखी बोलत होती, भांडत होती. एवढेच काय, अधूनमधून ते टी. व्ही. वर एक टोल फ्री फोन नंबर (फोन करणाऱ्याला ज्याचे बिल भरावे लागत नाही, जाहीर करणारी व्यक्ती वा संख्या ते बिल भरते असा नंबर) दाखवीत होते आणि हा कार्यक्रम चालू असताना कुणीही प्रश्न विचारू शकते असे सांगत होते. त्याप्रमाणे अमेरिकेच्या कानाकोपऱ्यांतून कॉल्स येत होते. आणि संयोजक अधूनमधून एखाद्या कॉलची टेप ऐकवीत होते, त्यावर तज्ज्ञ उत्तरं देत होते. सगळा देश एका कार्यक्रमात आपापल्या घरी बसून भाग घेऊ शकत होता. आपल्याकडेही निवडणूक निकालांच्या वेळी या तंत्रज्ञानाची थोडीशी झलक आपण पाहिली आहे.

कार्यक्रम चालू असताना जे टोल फ्री कॉल्स यायचे त्याने खूप जिवंतपणा यायचा. बलात्कार झालेल्या स्त्रियांच्या मुलाखती चाललेल्या होत्या. एका स्त्रीने तिच्या लहानपणी घडलेल्या बलात्काराची घटना उत्स्फूर्तपणे टी. व्ही.वर सांगितली. संयोजकाने विचारले, “तुझ्या नवऱ्याला ही घटना माहीत आहे का ?” ती स्त्री म्हणाली, “नाही, मी ही त्याला सांगूच शकलेले नाही.” संयोजक म्हणाला, “मग आता त्याला कळल्यावर काय होईल ?” ती म्हणाली, “आय डोन्ट नो.” काही सेकंदांतच टोल फ्री कॉलवर अमेरिकेच्या दुसऱ्या टोकाला टी. व्ही. पाहत असलेला तिचा नवरा म्हणाला, “काही वाटून घेऊ नकोस. तुझ्या धाडसाबद्दल उलट तुझा मला अभिमानच वाटतो आहे.” हे ऐकताना त्या स्त्रीच्या डोळ्यांत पाणीच आलं. (अर्थात हा सर्व घडवून आणलेला बनाव असू शकतो. टी. व्ही. वाले काहीही करू शकतात. पण खरंही असू शकतं.) एका गमतीशीर कार्यक्रमात अमेरिकेत स्थायिक झालेल्या छोट्या-मोठ्या देशांच्या भूतपूर्व राजकन्यांच्या मुलाखती होत्या. त्या इथे नोकऱ्या, व्यवसाय करून जगत होत्या. त्यांना येणारे अनुभव त्या सांगत होत्या. प्रश्नाला उत्तर देताना एकजण म्हणाली की ती अविवाहित आहे. त्याबरोबर अमेरिकेतून कुठूनतरी एक टोल फ्री कॉल आला की, “मीही अमक्या देशाचा भूतपूर्व प्रिन्स आहे. मी देखणा आहे, माझे केस काळे, डोळे ब्राऊन. उंची अमुक आहे. तू माझ्याशी लग्न करशील का ?” ती चक्क लाजली. पण सावरून म्हणाली, “मी केलं असतं लग्न. पण तुझ्यासारख्या घोगऱ्या आवाजाची माणसं मला आवडत नाहीत.” सर्वजण हसू लागले.

हेराल्डो नावाचा तिथला गाजलेला मुलाखत्या आहे. त्याचा कार्यक्रम खूप लोकप्रिय आहे. डॉक्टरांनी गैरफायदा घेतलेल्या स्त्री रुग्ण, वकिलांनी फसवलेले लोक, धार्मिक पंथांनी नादी लावलेली मुलं आणि त्यांचे त्रस्त पालक, बापांनी शारीरिक गैरफायदा घेतलेल्या मुली. ..असे कोण कोण तो जमवीत असतो. दोन्हीकडच्या लोकांना तो बोलवत असल्याने त्यांची

तिथेच भांडणे जुंपतात. एका कार्यक्रमात ब्लॅक अतिरेकी आणि गोरे अतिरेकी त्याने एकत्र आणले होते. गोरा माणूस काहीतरी अपमानास्पद बोलल्यावर काळा पहिलवान टाईप माणूस उठला आणि खुर्ची उचलून त्याच्या डोक्यात घालू लागला. हेराल्डो मध्ये आल्याने त्याच्या डोक्यात ती खुर्ची बसून त्याला खोक पडली. हे सगळं दृश्य लोक टी. व्ही.वर बघत होते. पुढे टाइम, न्यूजवीकमध्ये या भडक टी. व्ही. जर्न्यालिझमवर टीकाही आली होती. पण मला तो कार्यक्रम भडक असला तरी आवडायचा. कारण खरं अमेरिकन जीवन त्यातनं कधीकधी अचानक समोर यायचं.

दोन कौटुंबिक कार्यक्रम तिकडे खूप लोकप्रिय आहेत. ब्लॅक फॅमिलीच्या पार्श्वभूमीवरचा बिल कॉस्बी शो आणि गोऱ्या कुटुंबावरचा फॅमिली टाइज. बिल कॉस्बी हा उत्तम, विनोदी नट आहे. त्यात त्याची बायको, चार-पाच मुलामुलींची कामे केलेली ब्लॅक मंडळी फारच उत्तम अभिनय करणारे आहेत. ते कुटुंब खूपच श्रीमंत दाखवले आहे. तो व ती डॉक्टर असतात. मुलं हॅपी गो लकी टाइप. जनरेशन गॅपमधून निर्माण झालेले प्रश्न, गमतीदार घटना हे त्याचे वैशिष्ट्य. पण एरवी तिथल्या ब्लॅक्सची परिस्थिती जी पाहत होतो त्यावरून हे तिथल्या सर्वसाधारण ब्लॅक कुटुंबातले चित्र असेल असे अजिबात वाटत नव्हते. काही वास्तव व काही स्वप्नीकरण यांचे ते उत्तम मिश्रण झाले असल्याने ब्लॅक्समध्ये लोकप्रिय झालेले होते. 'बघा, ब्लॅक्स आता किती संपन्न झालेत. आता त्यांना आणखी काय द्यायचे,' असा विचार करून त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करायला सर्वसाधारण गोऱ्या लोकांचीही सोय होत असल्याने, तेही कार्यक्रमावर खूष असायचे. 'फॅमिली टाइज'मध्ये चाळीशीतला बाप आणि आई हे लिबरल डेमोक्रॅट प्रवाहातले, तर मुलगा पक्का रिपब्लिकन मताचा. आईबाप मानवी हक्काच्या निदर्शनांमध्ये भाग घेणारे, तर पोरगा शेअर बाजारात पैसे गुंतवून असली प्रकरणं अंगाशी आणणारा. तीन पिढ्यांचा संघर्ष, त्यांच्यातला फरक हा मला सध्याच्या अमेरिकन जीवनाच्या जास्त जवळचा वाटला. लहान मुलांसाठी कार्टून फिल्म्स असायच्या. स्पायडर मॅन आपल्याकडे दाखवतात. ही फिल्म तिथलीच. कुठलेतरी अक्राळविक्राळ प्राणी पृथ्वीवर येऊन राज्य करताहेत आणि चारपाच माणसं त्यांचा निःपात करताहेत, हा बऱ्याच कार्यक्रमांचा ढाचा. मग त्यात घोस्ट बस्टर्स. . . वगैरे कार्यक्रम आलेच. अक्राळविक्राळ म्हणजे इतके दाखवायचे की बस्स. त्यांची पडदाभर उघडलेली तोंडे, प्रचंड सुळे, त्यांचे क्लोजअप्स. एखादा विकृत माणूस तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सगळ्या शहराचा कब्जा घेऊन बसलेला असायचा. हे सगळं अंगावर यायचं. पण तिथली मुलं स्पेल बाऊंड होऊन पाहत बसायची. मुलांना फॅन्टसी हवी असते, कबूल. पण इतकी सारख्या ढाचाची, सतत विकृतींचंच दर्शन घडवणारी असणं कितपत योग्य ?

तिथला 'रेसलिंग'चा कार्यक्रम हा सिरियसली केलेला पण महान विनोदी कार्यक्रम असतो. फ्रीस्टाईल कुस्त्या. त्यात भाग घेणारी माणसं अवाढव्य शरीराची असतात. भोवती गोंधळ करणारे भरपूर प्रेक्षक आणि मधे उंच चौकोनी स्टेज. हे रेसलर्स चित्रविचित्र नावे

घेतलेले असतात. प्रत्येकाचे काहीतरी वैशिष्ट्य असते. कुणाचे लांब केस, लांब दाढी, कुणाच्या चेहऱ्यावर कायम मास्क चढवलेला, कुणी गळ्यात भला मोठा अजगरच घालून आलेला. कुस्तीपूर्वी त्यांची 'मुलाखत' घेतली जाते. त्यात ते बेंबीच्या देठापासून ओरडत 'प्रतिस्पर्ध्याचं मी तंगडं मोडीन, त्याचं डोकं बाजूला काढून ठेवीन, त्याचा मास्क फाडून त्याच्या चेहऱ्यावर थुंकेन' अशा गर्जना करीत असतात. या कुस्त्या बोगस असतात. कुणी पडायचं ते ठरलेलं असतं. उचलून आपटणं, ही नेहमीची ॲक्शन. पण खाली मॅट असल्यामुळे फारसं लागत नसावं. मग कुणी प्रतिस्पर्ध्याला पाडून त्याचा पाय किंवा हात पिळू लागतो, केस ओढू लागतो. पोटावर दणादणा लाथा मारतो, काय वाटेल ते करतो. त्या वेळी प्रतिस्पर्धी गुरासारखे ओरडत असतो. सगळे खोटे असते. एका अवाढव्य राक्षसाने कुस्तीपूर्वी एका सुकुमार मुलीला 'ही माझी 'इन्स्पिरेशन'– स्फूर्तिदेवता आहे' असे सांगून रिंगमध्येच आणून उभं केलं. पंचाने याला आक्षेप घेताच त्याने पंचालाच खाली फेकून दिले. (पंचांना मारहाण ही इथे नित्याचीच.) दुसरे पंच येऊन त्यांनी त्याला त्याच्या स्फूर्तिदेवतेला खाली उतरवायला तयार केले. मग प्रतिस्पर्ध्याला ठोकून झाले की तो खाली उभ्या असलेल्या छडमाड मुलीकडे हात पसरून 'ओ, माय इन्स्पिरेशन' म्हणून ओरडायचा. एकाने दुसऱ्या लांब केसवाल्या पहिलवानाला खाली पाडले आणि त्याच्या उरावर बसला आणि साहाय्यकाकडून चक्क कात्री घेऊन त्याचे केस कापले! एकाने तर दुसऱ्याला पाडून अजगराचे तोंड त्या पडलेल्या पहिलवानाच्या तोंडाशी नेऊन त्याला घाबरवले होते. आणि तोही घाबरून, बेशुद्ध पडल्याचे सोंग करीत होता. हे खोटे आहे हे माहीत असूनही हजारो लोक कार्यक्रमांना गर्दी करतात. लक्षावधी रसिक अमेरिकन आपापल्या घरी तो कार्यक्रम चवीने पाहत असतात.

अमेरिकेत टी. व्ही. एव्हँजलिस्ट नावाचा प्रकारही पाहायला मिळाला. रविवारी सकाळी सगळेच काही चर्चला जाऊ शकत नाहीत. विशेषतः म्हातारी, किंवा अपंग माणसे. त्यांना घरबसल्या चर्चसारख्या सरमन्स किंवा अन्य धार्मिक कृत्यांना उपस्थित राहता यावे म्हणून या टी. व्ही. एव्हँजलिस्ट पंथाच्या लोकांनी टी. व्ही. वरचा तो वेळ विकत घेतला आहे. ही मंडळी म्हणजे अगदी आपल्याकडच्या बुवा मंडळींसारखी बुवाबाजी करणारी आहेत. ते सतत लोकांच्या भावनांना हात घालणारी भाषणे करून पैसे जमवीत असतात, त्याला विशेषतः काही पैसेवाली सिनियर सिटीझन मंडळी बळीही पडत असतात. यांच्या चेहऱ्यावरचे भाव जगाकडे करुणेने बघण्याचे. आवाजही खास कमावलेला, दयार्द्र, उपकृत करणारा. ही मंडळी पैशाच्या दृष्टीने गब्बर झाली आहेत.

ओरल रॉबर्टस् नावाच्या टी. व्ही. एव्हँजलिस्टची स्वतःची युनिव्हर्सिटीही आहे. या ओरल रॉबर्टसने मधे एक स्टंट केला होता. त्याने टी. व्ही.वर एकदा लोकांना सांगितलं की, "मला ख्रिस्ताचा दृष्टान्त झाला आहे की, तू जर दहा मिलियन डॉलर्स जमवले नाहीस तर तू अमूक एका दिवशी मरशील. तेव्हा लोकहो, मी काय करू? माझं सगळं जीवन तुमच्या

हातात आहे. तुम्ही मला पैसे जमवून द्या." आणि एक मियामी की ह्यूस्टनचा एक श्रीमंत पुढे आला आणि त्याने आठ मिलियन्स डॉलर्स ओरल रॉबर्टसला दिलेही. नंतरच्या रविवारी ओरल रॉबर्टस् म्हणाला, "देवाचा मला परत साक्षात्कार झाला आणि तो म्हणाला 'ठीक आहे, आठ मिलियन असले तरी चालतील. लोकहो, तुम्ही माझा प्राण वाचवला." या ओरल रॉबर्टसच्या मागे एक डेमोक्रॅट सिनेटर हात धुऊन लागलेला असतो. ओरल रॉबर्टस् त्याचा एक टोल फ्री फोन नंबर प्रसारित करीत असतो. या डेमोक्रॅटने कॉम्प्युटरवर असा काही प्रोग्रॅम डेव्हलप केला की, एक फोन त्याने त्या नंबरावर केला की आपोआप कॉल न करताही परत परत कॉल केल्याचे बिल रेकॉर्ड होत राहील. असे दिवसाकाठी ४० ते ५० हजार कॉल्स रेकॉर्ड झाल्यावर ओरल रॉबर्टस् हादरला. मग टेलिफोन कंपनीकडे जाऊन रडला. मग कंपनीने दया येऊन ते बिल त्याला माफ केले.

दुसरा जेरी फालवेल नावाचा टी.व्ही. एव्हँजलिस्ट आहे, त्याचे एका वेश्येबरोबरचे अफेअर कुणीतरी उघडकीला आणले. त्यामुळे काही दिवस त्याचे टी. व्ही. वरचे कार्यक्रमही बंद होते. नंतर त्याने टी. व्ही. वर येऊन असे काही नाटकीपणाने, अंगविक्षेप करून लोकांची माफी मागितली की, एखाद्या जोकरची आठवण व्हावी. लोकांनीही त्याला माफ करून टाकले. जेम्स बेकर या एव्हँजलिस्टबरोबर अफेअर असलेल्या जेसी हॉनने तिच्या भानगडीवर 'आत्मचरित्र' लिहिले आणि ते बेस्ट सेलर म्हणून मिलियन्समध्ये खपलेही. अमेरिकेसारख्या विज्ञाननिष्ठ संपन्न देशात हे घडते. (तिथे सार्वजनिक जीवनातही धार्मिक पुनरुज्जीवनवाद रुजतो आहे. पॅट रॉबर्टसन नावाचा नेता, 'बायबलमधला शब्द न् शब्द खरा आहे, ते चमत्कार खरे आहेत, पृथ्वी सपाट आहे असेच आम्ही मानणार.' असे म्हणतो आणि त्याच्या मागे बराच मोठा समुदाय आहे. रिपब्लिकन पक्षांतर्गत निवडणुकीत बुशखालोखाल त्याला मते पडली होती.)

हे एकीकडे आणि दुसरीकडे काही चॅनल्सवर शास्त्रीय प्रगतीच्या अत्युत्कृष्ट फिल्म्सही दाखवल्या जातात. सायन्स मॉनिटर या नावाचा एक कार्यक्रम आयोवामध्ये मी रात्री उशिरापर्यंत पाहायचो. डोळे फाटावेत अशा फिल्म्स. आतापर्यंत एखाद्या वस्तूमधला सर्वांत सूक्ष्म भाग म्हणजे ॲटम. ॲटमचे अस्तित्व मानलेले, पण हा ॲटम डोळ्यांना, कुठल्याही मायक्रॉस्कोपला प्रत्यक्ष दिसू शकत नव्हता. पण आता ॲटम दिसणे शक्य झाले आहे. उकडलेली अंडी त्यांच्या स्टँडमध्ये मांडून ठेवावीत असं ॲटमचं दृश्य पाहून धन्य झालो. टेक्सासमधे की ॲरिझोनामधे ॲटमचाही सूक्ष्म भाग इलेक्ट्रॉन (की पॉझिट्रॉन) ब्रेक करण्याची यंत्रणा दाखवली होती. काही फर्लांग त्रिज्येच्या उपकरणाला हजारो मैल वेगाने फिरवायचे आणि दुसऱ्या ॲटमवर आदळायचे, अशी प्रक्रिया. त्या हजारो मैल वेगाने फिरणाऱ्या उपकरणालाच कॅमेरा बसवला होता. त्या वेगाने आपलेही डोळे फिरतात आणि नंतर शेवटी शेवटी वेग इतका प्रचंड होतो की काही दिसेनासेच होते. आणि शेवटी स्फोट होतो. त्याचे दृश्य मी वर्णन करूच शकणार नाही. इजिप्शियन ममीच्या कातडीचा एक

तुकडा काढून एका लॅबमध्ये त्याचं इतकं संशोधन केलं की, त्या व्यक्तीचा जीवनक्रम काय होता, अन्न काय खात होता, कुठले कुठले रोग त्याला झाले, कुठल्या रोगाने तो मेला याचे शास्त्रीय आधारावर पुराव्यासहित तपशील शोधून काढले होते. एका रात्री उशिरापर्यंत माझ्या खोलीत एकटाच हा कार्यक्रम पाहत बसलो होतो. कार्यक्रम संपल्यावर काय करावे ते कळेना. मग एकट्यानेच टाळ्या वाजवून माणसाच्या शास्त्रीय प्रगतीचा आनंद व्यक्त केला. दुपारी 'वाइल्ड लाइफ'चे कार्यक्रम असायचे. नॅशनल जिऑग्राफिकने काढलेल्या फिल्म अप्रतिम असायच्या. अमेझॉन नदीच्या खोऱ्यातल्या जंगलाचा ज्या गतीने संहार चाललाय, त्यावरची फिल्म म्हणजे एक अप्रतिम शोकांतिकाच होती.

पण हे चांगले कार्यक्रम नेहमी आडवेळी अपरात्री असायचे. कारण थोडेच लोक ते पाहतात. प्राइम टाइमला मात्र आधी वर्णिलेल्या पद्धतीचे कार्यक्रम, की जे अमेरिकन लोकमत घडवतात, त्यांच्या संस्कृतीला आकार देतात.

ग्रंथालय
प्रभाकर
दा. क्र. 6.84
26650

★★★★★

# व्यसनं

अमेरिकेतून इकडे आल्या आल्या मोठ्ठा फरक जाणवतो, तो म्हणजे तिकडच्यापेक्षा आपल्याकडे सिगारेटचं प्रमाण कितीतरी जास्त आहे. आपल्याकडे लोक सरळ दुसऱ्याच्या शेजारी बसून त्याला 'तुमची काही हरकत आहे का' वगैरे काही न विचारता सिगारेट शिलगावून फकाफका धूरही सोडू लागतात. अमेरिकेत जाताना विमानात चढल्यापासून या बाबतीतला फरक दिसायला लागतो. विमानाचं तिकीट काढताना 'नॉन स्मोकिंग' विभाग हवा म्हणून सांगितलं होतं. मला वाटलं होतं, असं नॉनस्मोकिंगवाल्यांचं छोटं कंपार्टमेंट असणार. पण उलट होतं. विमानाच्या मागच्या जवळपास फक्त एक चतुर्थांश सीटस् या स्मोकिंगवाल्यांच्या होत्या, बाकी विमान आमचंच. अमेरिकेतल्या अमेरिकेत विमान प्रवास केला. दोनचार तासांच्या अंतराच्या फ्लाईट्सची विमानं तर पूर्णपणे 'नॉन स्मोकिंग' असायची. तिकडे एरवीही लोकांच्या तोंडात सिगारेट फार क्वचित दिसायची. आयोवात आमची क्लासरूममधे लेक्चर्स असायची, सिगारेट ओढणारे बाहेरच्या आवारात हिरवळीवर सिगारेट ओढून मग आत यायचे.

अमेरिकेत गेल्या पाच-दहा वर्षांतला हा बदल आहे. सिगारेटमधल्या निकोटिनमुळे रक्तवाहिन्या आकुंचित होऊन हार्ट ॲटॅक्स येतात, आणि छातीत धूर जाऊन जाऊन फुफ्फुसाचा कॅन्सर होऊ शकतो, या गोष्टी अनेक संशोधने आणि आकडेवाऱ्या यांमार्फत लोकांच्या मनावर ठसल्या आहेत. तिथं सगळ्या देशाचा आरोग्यप्रमुख 'सर्जन जनरल' असतो. त्याने या बाबतीत खूप प्रचाराची धमाल उडवून दिली. सिगारेट न ओढणारे संघटित झाले. त्यांनी 'हे सिगारेट ओढणारे जे धूर सोडतात त्यात निकोटिन अधिक त्यांच्या उच्छ्वासातले दूषित वायूही असतात, तो आमची इच्छा नसताना आम्हाला शरीरात घ्यावा लागतो, ही बाब आमच्या सिगारेट न ओढण्याच्या स्वातंत्र्यावर गदा आहे,' अशी आरडाओरड सुरू केली. त्याचा परिणाम खूपच झाला. प्रत्येक ठिकाणी स्मोकर्स कंपार्टमेंटस् वेगळी करावी लागली. विमानात, ट्रेनमध्ये, एवढंच काय हॉटेल्समधेही. मी न्यूयॉर्कमधल्या एका कॉलेजात मित्राबरोबर गेलो होतो. तो स्मोकर होता. त्यामुळे स्मोकर्स कँटिनमध्ये चहा

प्यायला गेलो. ती छोटी खोली धुराने पूर्ण भरलेली. आपल्याकडे देशी दारूच्या दुकानात जसं वातावरण असतं तसं वाटलं. सगळे चेहरे हे 'सिक' वाटले. मनात आलं, बिच्चारे !

तिकडे कित्येक कंपन्यांमध्ये, नोकऱ्यांमध्ये उमेदवार स्मोकर असला तर त्याला अग्रक्रम मिळत नाही. अगदीच घ्यायचा असेल तर अट घालतात, तीन महिन्यांत सिगारेट सोडू शकलास तर नोकरी चालू राहील. कारण तिथल्या अनेक पाहण्यांमध्ये असं सिद्ध झालंय की, सिगारेट ओढल्याने माणसाची कार्यक्षमता कितीतरी कमी होते. यंत्रावर काम करताना त्याचे जजमेंट चुकू शकते. टी. व्ही. वर स्मोकिंगवरच्या एका कार्यक्रमात हे तोटे दाखवले होतेच, पण सिगारेट कंपन्यांची प्रतिनिधी म्हणून एका बाईची मुलाखत दाखवली. ती म्हणत होती, "ही संशोधने फसवी आहेत, ह्या आकडेवाऱ्या अविश्वसनीय आहेत. ह्या गोष्टींचा उगाचच बाऊ माजवला जातोय. स्मोकर्सना जॉब न मिळणे ही गोष्ट व्यक्तिस्वातंत्र्याच्या हक्काला पायदळी तुडवणारी आहे." इ.

'सिक्स्टी मिनिट्स्' या टी. व्ही. वरच्या प्रसिद्ध कार्यक्रमाच्या शेवटी अँडी रुनी हा विनोदी लेखक पाच मिनिटं कॉमेंटस् करतो, त्यात त्याने हा सूर लावला. "हे स्मोकर्स... त्यांना आपण किती छळतो, त्यांना प्रत्येक ठिकाणी कुष्ठरोग्यासारखे वेगळे ठेवतो, त्यांना नोकऱ्या देत नाही. त्यांना खरं पाहिजे तिथं स्मोकिंग करू द्यायला काय हरकत आहे ?..." असं म्हणून थोडं थांबला व शेवटी म्हणाला, "कारण त्यांचे या जगात थोडेच दिवस उरले आहेत." तिथनं एक पिक्चर पोस्टकार्ड मी आणलंय. त्यावर जळत्या सिगारेटचा उभा फोटो छापलाय. त्या सिगारेटवर वरून खाली वाढत्या क्रमाने आकडे लिहिलेत. ४० वर्षे, ६० वर्षे, ८० वर्षे. सिगारेट जळत जळत चाळीसच्या आकड्याच्या आसपास आहे. आणि खाली छापलंय, 'युवर लाइफ टायमर.' तिथं सिगारेट पिणाऱ्यांमध्ये स्त्रियांची संख्या जास्त आहे. याचं कारण विचारता एकजण म्हणाला, "त्यांनी पुरुषांपेक्षा उशिरा ओढायला सुरुवात केलीय ना. त्यांचा हक्क बजावून मग तो सोडतील."

अमेरिकेतल्या सिगारेट कंपन्यांचा खप या सगळ्यामुळे जवळपास पासष्ट टक्के कमी झालाय. काही सिगारेट कंपन्यांनी फूड प्रॉडक्टस् बनवण्याचा उपव्यवसाय सुरू केलाय. बऱ्याच नामवंत सिगारेट कंपन्या आता भारतासारख्या गरीब देशात आपला माल खपवताहेत. त्यामुळे आपल्याकडे डनहिल, ५५५ वगैरे सिगारेटस् सर्रास मिळू लागल्या आहेत. आपल्याकडे लोक ऐटीत इंपोर्टेड सिगारेट ओढून इंपोर्टेड निकोटिनमध्ये भारतीय कार्बन डायॉक्साईड मिसळून तो धूर इतरांच्या तोंडावर सोडू लागले आहेत.

सिगारेटचं प्रमाणं कमी झालं असलं, तरी दारूचं मात्र वाढतंय, असं तिथल्या पाहणीत आढळलंय. मी आयोवातल्या मे-फ्लॉवरमधे राहत होतो. तिथं व्हेंडिंग मशीनमधे नाणं टाकलं की बीयरचा कॅन गडगडत हातात यायचा. मुलं फूटबॉल बघायला जायची, तिथं तर बीयरशिवाय फूटबॉल बघणं, हे म्हणजे बावळटपणाचंच लक्षण. तिथल्या लोकाचं सामाजिक जीवन म्हणजे वीकएण्डला असलेल्या रात्रीच्या पार्ट्या. एरवी आपल्यासारखे ते

एकमेकांना कधीही, मुबलकपणे भेटत नाहीत, त्यामुळे या पार्ट्यांना फार महत्त्व. अशा पार्ट्यांमध्ये एका बाजूला टेबलावर तऱ्हतऱ्हेच्या दारूच्या, वाईनच्या बाटल्या, कॅन्स असतात. दारुड्यांवरच्या लायब्ररी फिल्म्समधे सगळीकडे दाखवलेलं होतं की, पार्टीमध्ये दारूचं प्रमाण कधी वाढायला लागतं ते कळत नाही. या पार्टीतच, विशेषतः तरुण मुलांच्या पार्टीत चरसची चिलीम फिरू लागते, आणि पुढे ड्रगचा मार्ग खुला होतो.

दारूच्या व्यसनालाही आळा घालायचे बरेच प्रयत्न चाललेले आहेतच. 'अल्कोहोलिक ॲनॉनिमस' या संस्थेचा जन्म तिथलाच. ती अमेरिकेची जगाला मिळालेली देणगीच आहे. बॉब आणि बिल हे दोन दारुडे एकमेकांना भेटले. गप्पा मारल्या. आणि त्या दिवशी त्यांना दारूची आठवण आली नाही असं त्यांच्या लक्षात आलं. त्यानंतर ते रोज भेटू लागले आणि त्यातून या संस्थेचा जन्म झाला. आता ही संस्था जगभर पसरलेली आहे.

अमेरिकेत तीन-चार वर्षांपूर्वी एक अपघात झाला. दारू पिऊन मोटार चालवणाऱ्याने एका लहान मुलाला उडवले, त्यात ते मूल तात्काळ मेले. गाडी चालवणारा हा सोळा वर्षांचा मुलगा होता. त्या मेलेल्या छोट्या मुलाच्या आईने लेख लिहून, टी. व्ही.वर मुलाखती देऊन प्रचार केला. एकवीस वर्षांच्या खालच्या मुलांना दारू प्यायला बंदी असली पाहिजे, असं तिचं म्हणणं. तिला खूप लोक सामील झाले. अमेरिकेसारख्या व्यक्तिस्वातंत्र्यवादी देशात शेवटी त्या राज्याला तसा कायदा करावा लागला. त्याचे अनुकरण इतरही राज्यांनी केले.

वीकएंड पार्ट्यांनंतर लोक आपापल्या कारने घरी जातात. त्या वेळी त्यांचे जजमेंट चुकते आणि ते अपघात करतात. अमेरिकेतलं जीवनच मुळी रस्ते आणि गाड्या यांवर अवलंबून. रस्त्यावरची लेन क्रॉस करून गाडी इंचभर जरी इकडे-तिकडे गेली तरी मागून भंग भंग करीत येणाऱ्या गाडीशी टक्कर आणि पाठोपाठ येणाऱ्या दहावीस गाड्या एकमेकींवर चढणार. त्यामुळे 'वीकएण्ड ॲक्सिडेंटस्' 'ड्रंकन ड्रायव्हर्स', हे तिथले दारूतून निर्माण झालेले परवलीचे शब्द आहेत. त्यावर अनेक तऱ्हेच्या उपाययोजनाही खास अमेरिकन पद्धतीने चाललेल्या असतात. एका पार्टीत सुरुवातीच्या टेबलावर 'आय ॲम अ ड्रायव्हर' असं लिहिलेले बिल्ले होते. ज्याला जाताना ड्रायव्हिंग करायचे आहे तो माणूस तो बिल्ला लावायचा, मग त्याला कुणी पिण्याचा आग्रह करीत नसे. 'टाइम'मधे नवीन शोधांची, बाजारात आलेल्या उपकरणांची माहिती असते. त्यात कारला एक उपकरण बसवले होते. पार्टीनंतर कारपाशी मालक आला की त्याने स्टिअरिंगजवळच्या एका नळीत फुंकून श्वास सोडायचा. त्यात अल्कोहोलचं प्रमाण विशिष्ट पातळीपेक्षा जास्त असेल तर ती गाडी चालूच होत नाही. तिथं एक संस्थाही अशी आहे की, कुणी पार्टीमध्ये जास्त प्याला आणि त्याला वाटलं की आपण गाडी चालवू शकणार नाही, तर त्याने त्या संस्थेला फोन करायचा. त्यांचा एक माणूस त्या ठिकाणी येतो आणि स्वतः ड्राइव्ह करून त्याला त्याच्या घरी पोहोचवतो.

तिथं याबाबतचे कायदेही कडक झालेत. एखाद्या पार्टीनंतर घरी जाताना एखाद्याने

**अपघात** केला, तर त्या माणसाबरोबर, तो ज्याच्या घरी प्याला त्या यजमानालासुद्धा आरोपी करण्यात येते. कारण आपला पाहुणा वाजवीपेक्षा जास्त पीत नाही, हे पाहणं यजमानाचं कर्तव्य आहे. एवढंच काय, एखाद्या बारमध्ये पिऊन नंतर रस्त्यावर कुणी अपघात केला तर बारमधल्या विक्रेत्यालाही आरोपी करण्यात येतं. कारण समोरचा माणूस मर्यादेपलीकडे पिऊ लागला आहे हे समजून, तो जरी मागत असला तरी पुढचं ड्रिंक त्यानं द्यायचं नाकारलं पाहिजे. तरुण मुलं पिऊन गाडी रॅश चालवून अपघात करतात त्याच्या बाबतीत एका ठिकाणी एक प्रयोग केला गेला. त्यांना झालेल्या शिक्षेचा निम्मा भाग त्यांना एखाद्या ॲक्सिडेंट हॉस्पिटलमधे इमर्जन्सीज अटेंड करण्यात घालवावा लागतो. कुणाचा चेंदामेंदा झालेला, कुणाचे हातपाय तुटलेले, कुणाचे आणखी काही, अशा व्यक्तींना ही मुलं स्ट्रेचरवरून नेतात-आणतात, त्यांची सेवा त्यांना करावी लागते. अपघातात सापडलेल्या त्या मृत किंवा जिवंत व्यक्तींची ती अवस्था बघून, आपण बेजबाबदारपणे ड्राइव्ह करून अपघात करतो त्याची या, काही संबंध किंवा दोष नसलेल्या व्यक्तींना केवढी जबर किंमत मोजावी लागते, याचा त्यांना धक्का बसतो. अशा काही पश्चात्तापदग्ध मुलांच्या मुलाखती टी. व्ही. वर दाखवल्या होत्या. हा प्रयोग आता इतरही ठिकाणी वापरला जाऊ लागला आहे. आणखी एक शिक्षा तर याहूनही तीव्र आहे. अपघात करणाऱ्यांना अपघातात माणूस गेलंय त्या घरी काही दिवस राहायला लावणे.

दारूपेक्षा 'ड्रग्ज'च्या प्रश्नाने तिथं अधिक गंभीर स्वरूप धारण केलंय. गर्द म्हणजे हेरॉईन. हे व्यसन चार वर्षांपूर्वीपर्यंत जोरात होतं. आता कोकेनचंच एक 'क्रॅक' नावाचं रूप अमेरिका व्यापून राहिलं आहे. मी डेट्रॉईटच्या एका रस्त्यावर उभा होतो. पेट्रोल पंपावर एका बाईच्या चार-पाच किंकाळ्यांचा आवाज ऐकला. त्या शांत वातावरणात एरवी असा आरडाओरडा कधी ऐकू येत नाही, म्हणून दचकूनच तिकडं पाहिलं तर एक गोरी, तरुण मुलगी तिच्या तरुण मित्राच्या मागे किंकाळ्या फोडीत धावत होती. धावताना स्वतःचे कपडे ओरबाडून फाडत होती. बरोबरचा मित्र म्हणाला, "जाऊ दे, ड्रग ॲडिक्ट आहेत ते." कोकेनमुळे किंवा क्रॅकमुळे माणसे अशी बेभान होतात. हेरॉईनचं तेवढं एक बरं आहे, ते घेतलं की माणसं कुठेतरी शांतपणे पडून राहतात. नुसतं कोकेनच नाही, तर अनेक ड्रग्ज तिथं प्रचारात आहेत. पी. सी. पी. नावाच्या गोळ्या लोक घेतात. हे खरे तर एके काळी ॲनेस्थेशियात वापरले जाणारे ड्रग, पण दुष्परिणाम लक्षात आल्यावर बाद झालेले. कुणाला तरी याच्यातली नशा लक्षात आली आणि किंमत इतर ड्रग्जपेक्षा खूपच कमी असल्याने त्याचा थोड्याच दिवसांत प्रसारही खूप झाला. लोक कशातून नशा शोधून काढतील याला सुमारच नाही. लहान मुले जो चिकटवायला फेव्हिकॉलसारखा पदार्थ तिकडे वापरतात, त्याच्या सॉल्व्हंटमधे काहीतरी नशा असल्याचे लक्षात आले. तो 'गम' आणायचा आणि त्याचा वास घेत बसायचे म्हणजे नशा येते. हे समजल्यावर अनेक मुले त्याची व्यसनी झाली. गममध्ये सुवासासाठी जे द्रव्य मिसळण्यात येते त्याने नशा येते. एरवी त्या गमचा

घाणेरडा वास आला असता. शिवाय झोपेच्या गोळ्यांचे व्यसन तर भरपूर आहेच. सर्वसाधारण अमेरिकन माणूस जगातल्या इतर कुठल्याही देशातल्या माणसापेक्षा कितीतरी जास्त औषधे येता जाता खात असतो. टी. व्ही.वरच्या एका कार्यक्रमात वार्ताहर प्रत्येक घरात जायचा आणि त्या माणसाला किंवा बाईला तिचे औषधाचे कपाट उघडून दाखवायची विनंती करायचा. एखादा दवाखाना चालेल इतकी औषधे अशा कपाटात असायची. त्यातही सिडेटिव्हज, ट्रॅन्क्विलायझर्सची संख्या सर्वाधिक असे.

तिकडे ड्रग्जचे व्यसन रस्त्यारस्त्यावर दिसते. न्यूयॉर्कच्या मॅनहॅटनमधल्या अनेक रस्त्यांवर फाटके तुटके कपडे घातलेले– बहुदा ब्लॅक्स– पैसे मागताना दिसतात. तिथल्या रस्त्याने मी चाललो असता एक ब्लॅक रस्त्यावर उभा राहून त्यांच्यात्यांच्यात पुड्यांची विक्री करीत होता. मित्र म्हणाला, "आपण दुसऱ्या बाजूने जाऊ." नंतर मित्राने सांगितलं, "तिथं ड्रग ट्रॅन्झॅक्शन चाललंय." मी म्हटलं, "पण इतक्या उघडपणे ? पोलिस नाहीत का पकडत ?" तो म्हणाला, "इथला कायदा माहीत आहे ना ? समजा, या माणसाने समोरनं पोलिस येताना पाहिले तर हातातल्या पुड्या किंवा व्हायल्स तो सरळ रस्त्यावर फेकून देईल. पोलिस त्याला काहीही करू शकणार नाहीत. अंगावर ड्रग असताना पकडलं तरच पोलिस त्याच्यावर खटला भरू शकतात."

मी म्हटलं, "पण पोलिसांनी याला पकडलं आणि पंचनाम्यात त्याच्या अंगावर पुड्या होत्या असं दाखवलं तर ?"

तो हसला व म्हणाला, "ते आपल्या इंडियासारखं इथं नाही चालत. इथं वकीलमंडळी टपलेलीच असतात. त्या पोलिसचा जॉबच जाईल, तो कशाला रिस्क घेईल ?"

(ॲमस्टरडॅमला तर मी उतरलो होतो त्या घरातल्या खिडकीतून नजर टाकली तरी तरुण मुली-मुलं सिरींजने एकमेकांना ड्रग्ज देत बसलेली किंवा ड्रग्ज घेऊन निवांत पडून राहिलेली दिसायची. रस्त्याने चाललो असता घोळकेच्या घोळके ड्रग ॲडिक्टस्चे दिसायचे. तिथले कॅनॉलकडेचे रस्ते अरुंद. एकदा मी चाललो असता घोळक्यातून पुढं जावं लागणार होतं. तिथून जाताना ते पैसे मागणार, न दिल्यास काहीतरी त्यापुढचं करणार हे अगदी दिसत होतं. पण मी त्या गावचा सराईत असल्यासारखा भरभर चालत त्यांच्याकडे तुच्छतापूर्वक नजर टाकत पुढे निघून गेलो. तिथला मित्र ह्यूब म्हणाला, "माझ्या आतापर्यंत अकरा सायकली चोरीला गेल्या आहेत. आमच्या इथे कारमधे बघ, एकही रेडिओ दिसणार नाही. एखाद्या कारमधे तुला रेडिओ दिसला ना, तर समज की तो कारमालक बाहेरून इथे आलेला आहे आणि त्याला येऊन फार वेळ झालेला नाही." ही सगळी अर्थातच ड्रग ॲडिक्टस्ची किमया. नाहीतर त्या संपन्न देशात दुसरा कोण असे उपद्व्याप करील ?)

युरोप-अमेरिकेत ड्रग्जना एक वलय आहे. तिकडच्या प्रसिद्ध गायकवादकांनी ते वलय प्राप्त करून दिले आहे. एका पुस्तकात त्याच्या डॉक्टर लेखकाने एक अनुभव दिला आहे : त्याच्याकडे ट्रीटमेंटसाठी एक प्रसिद्ध गायक आला. त्याने गायकाला ट्रीटमेंट सुरू

करण्यापूर्वी ड्रगचा किती डोस घेत होता असे विचारल्यावर तो म्हणाला, "मी अमुक इतके मिलिग्रॅम घेतो, पण हे कुणाला सांगू नका. कारण यापेक्षा मी खूप मोठ्ठा डोस घेतो अशी माझी चाहत्यांमध्ये प्रसिद्धी आहे. त्यांना खरा डोस कळला तर माझी प्रतिष्ठा धुळीला मिळेल !" व्हिएटनाम युद्धावरून परत आलेले तरुण सैनिक हे व्यसन तिकडून घेऊन आले तेव्हापासून ते अमेरिकेच्या बोकांडी भुतासारखे बसले आहे. तिथल्या जीवनातील जीवघेणी स्पर्धा, त्यातून असणारे सततचे टेन्शन, समाज व कुटुंबजीवनातून अपरिहार्यपणे उद्भवलेला एकाकीपणा या सगळ्या पार्श्वभूमीवर हे व्यसन इथं आलं आणि फिट्ट बसलंय. आता कितीही तऱ्हतऱ्हेचे उपाय केले तरी त्याचे प्रमाण वाढतेच आहे.

अमेरिकेची प्रश्न सोडवण्याची खास अमेरिकन रीत असते. अमेरिकेला हेरॉईन पाकिस्तानमधनं येतं. मग त्यांनी अफू पिकवणाऱ्या शेतकऱ्यांनी ज्वारी पिकवावी म्हणून त्यांना कर्ज, मदत दिली. ती ते खाऊन बसले आणि हेरॉईनसाठी अफू पिकवणं चालूच ठेवलं. मेक्सिकोत अफूची झाडं लावतात. मग यांनी बेधडक हेलिकॉप्टरमधून जाऊन ती झाडं जळून जावीत अशा औषधाची फवारणी सुरू केली. आता लोक ती रोपं एका जागी न लावता विखरून डोंगराळ भागात लावू लागले. अमेरिकेतल्या ड्रग ॲडिक्टस्‌ची संख्याच इतकी प्रचंड आहे की, ती मागणी पुरवायला कितीही अडचणी आल्या तरी लोक उभे राहतातच. बऱ्याच मध्य व दक्षिण अमेरिका खंडातील लहान लहान देशांमधून कोकेन अमेरिकेत येते. हे 'ड्रग लॉर्डस्' इतके पॉवरफुल आहेत की, त्यांचा देश त्यांच्या मुठीतच असतो. कोलंबिया देशात अशा एका ड्रगलॉर्डला अटक झाल्यावर त्याने सरकारला अशी ऑफर दिली की, 'कोलंबियाला जगातल्या जेवढ्या देशांचे जितके कर्ज आहे, ते मी एका रकमेत देऊन टाकतो, मला सोडा.' हे ड्रग बॅरन्स हवे ते सरकार आणतात, पाडतात. त्यांच्यावर कारवाई करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांचे, त्यांच्याविरुद्ध निकाल देणाऱ्या न्यायाधिशांचे मृत देह गटाराकडेला पडलेले सर्रास सापडलेले आहेत. अमेरिकेतील माफिया टोळ्या आणि हे लॉर्डस् किंवा बॅरन्स यांची घट्ट साखळी आहे. यांचा अर्थव्यवहार प्रचंड मोठा आहे. मी तिथे असताना या बाबतीतले एक प्रकरण वाचले होते. एक बँक या ड्रग बिझिनेसवाल्यांना भांडवल म्हणून पैसा पुरवते असे निष्पन्न झाल्यावरून बँकेच्या सहा-सात डायरेक्टर्सना एका पार्टीत गाठून पोलिसांनी अटक केल्याचे दृश्य टी. व्ही. वरही दाखवले होते. आता याहून या व्यवहाराला अधिकृतता काय यायची राहिली ?

तिथे एका लॅबोरेटरीत काम करणाऱ्या संशोधक मित्रांकडे त्यांची लॅब बघायला गेलो होतो. त्यांनी विमानतळावर बॅगेत ड्रग आहे की नाही हे तपासण्यासाठी लेटेस्ट टेक्नॉलॉजी काय आहे ते सगळं मला दाखवलं. ते म्हणाले, "यापूर्वी कुत्रे ट्रेन करून त्यांना बॅगा हुंगायला लावायचे. पण त्यांना फसवता येतं, हे लक्षात आलं. म्हणून हे उपकरण तयार झालंय. त्या बॅगेभोवतीच्या हवेत त्या ड्रगचा सूक्ष्म कण जरी असला तरी हे उपकरण ते ओळखते. पण हे गुन्हेगार लोक आमच्या संशोधकांना 'कन्सल्ट' करतात. या क्षेत्रात लेटेस्ट

टेक्नॉलॉजी काय आहे ते समजावून घेतात. संशोधकांना त्यांची फी मिळते, ते कशाला बॉदर करताहेत की कोण या माहितीचा कसा उपयोग करणार आहे ? आता गुन्हेगार लोक ड्रग्ज प्लॅस्टिकच्या पिशव्यांमध्ये पॅक करतात. बॅगेला बाहेरून माशाचे तेल चोपडतात. त्यामुळे ड्रगचा कणही बाहेरच्या हवेत सापडत नाही. बॅग आपसूक बाहेर येते. कुठलं उपकरण येणार आहे, याची या लोकांना आधीच माहिती असल्याने ते उपकरण प्रत्यक्ष वापरात यायच्या अगोदर यांची उपाययोजनाही तयार असते.”

ड्रग्जच्या प्रत्यक्ष दुष्परिणामांची काय झळ असते, हे तर आता बहुतेकांना माहीत आहेच, पण अमेरिकेत, युरोपात आता त्याच्या दूरगामी दुष्परिणामांची अवस्था सुरू झाली आहे. तिकडे ड्रग ॲडिक्टस्‌मध्ये स्त्रियांची संख्या पुरुषांच्या बरोबरीने आहे. ती स्त्री गर्भारशी असताना ती ड्रग्ज घेतच राहते. तो डोस त्या पोटातल्या पोरास तिच्या रक्तावाटे मिळत राहतो. त्याच्या शरीराच्या आकाराच्या मानाने तो डोस खूपच मोठा असतो. मूल जन्मते तेव्हा ते त्या ड्रगला ॲडिक्ट झालेले असते. त्यामुळे जन्मानंतर काही वेळाने त्याला टर्की किंवा फिट येणे, इ. विथड्रॉल सिम्प्टम्स दिसू लागतात. अशा मुलांना 'ड्रग बेबी' असेच नाव पडले आहे. यांची बुद्धी तर मंद झालेली असतेच, पण हात-पाय आणि एकूण शरीराच्या हालचाली मंद झालेल्या असतात.

याविषयी एका प्रयोगाची लायब्ररी फिल्म मी पाहिली. पिंजऱ्यात अनेक माकडं खेळताना, उलटसुलट उड्या मारताना दाखवलीत. त्यांतली एक माकडीण वेगळी ठेवतात. ती नुकतीच गर्भार राहिलेली असते. तिला ते रोज चरसचा थोडा डोस देऊन ॲडिक्ट बनवतात. ती मंदपणे आपल्या पिंजऱ्यात बसून राहते. तिला नंतर पिल्लं होतात. त्यांची तपासणी, उद्भवलेले शारीरिक दोष इ. प्रयोगांची माहिती देऊन शेवटचं दृश्य असं दाखवलं आहे की, सगळी माकडं खेळताहेत. एका बाजूला ही माकडीण आणि तिची तीन-चार पिल्लं खिन्न चेहरे करून एकमेकांना खेटून बसले आहेत. ड्रगबेबीजचा प्रश्न अगदी अलीकडचा आहे. पहिल्या पिढीतील मुलं आत्ता कुठे चारपाच वर्षांची होताहेत, त्यामुळे अजून सगळे दुष्परिणाम कळलेले नाहीत. पण जेवढे दिसलेत त्यावरून ही मुलं एखाद्या दुबळ्या जनावरासारखं जीवन जगणार आणि अल्पावधीत मरणार हे दिसतंय. आता यांच्यासाठी वेगळ्या इन्स्टिट्यूट्स्‌ निघाल्या आहेत. गर्भारशी ड्रग ॲडिक्टस्‌ना आधीच हुडकून काढायचं, त्यांना आधीच ॲडमिट करून उपचारांना सुरुवात करायची, अशी सोयही तिथं करण्यात आली आहे.

आता ड्रगबरोबर येणारा आणि भयानक प्रकार म्हणजे एडस्‌. तिकडे ड्रग ॲडिक्टस्‌ हे सिरींजने ड्रग घेत असल्यामुळे एकमेकांच्या सिरींजेस सर्रास वापरतात. त्यांतून एड्‌स्‌ पसरलाय. अमेरिकेत ड्रग ॲडिक्शन हा प्रश्न नसता आणि एडस्‌ हा रोग आला असता, तर तो इतका पसरला नसता. त्याला तो समाज नक्कीच आळा घालू शकला असता. पण तिथे असताना जी आकडेवारी ऐकायचो त्याने थक्कच व्हायचो. 'एकट्या न्यूयॉर्क शहरात

पंचेचाळीस हजार ड्रग ॲडिक्टस् असे आहेत की ज्यांना एड्स् झाला आहे.' आता आधीच एड्सवर औषध नाही, तर इतक्या लोकांच्या नुसत्या मरणपूर्व शारीरिक व्याधींवर उपचार करायचे झाले तरी ते अशक्य आहे. या लोकांपासून इतरांना हा रोग होऊ नये म्हणून यांना समाजापासून अलग ठेवायचे म्हटले तरी अशक्य आहे. परवा सुस्मा टेलर नावाच्या अमेरिकन तज्ज्ञ बाई आमच्याकडे आल्या होत्या. त्या म्हणाल्या, "अमेरिकेत जेवढी ब्लड सँपल्स तपासली गेली आहेत त्यांतली बावीस टक्के माणसे एड्स्चे रोगी किंवा वाहक असल्याचं आढळलं आहे."

एक डॉक्टर मित्र सांगत होता, "एड्स्च्या हॉस्पिटलमध्ये कुणी काम करायला तयार नसतं. पॅथॉलॉजिस्ट एड्स्चं रक्त तपासायला तयार नसतात. कारण बोटाला साधा स्क्रॅच असला आणि त्या रक्ताचा तिथं स्पर्श झाला तरी संपलंच की. त्या वॉर्डात काम करायला माणसं मिळत नाहीत. कारण एड्स् पेशंट हे नंतर नंतर मेंटल पेशंट्सही होतात. ते कुणालाही चावतात. चावलं की झालाच ना एड्स्. मध्ये इथं एक केस झाली होती. एड्स्वाला पेशंट चावला आणि तो माणूस एड्स् होऊन याच्याआधी मेलाही. हा खून समजायचा की नाही ? चावणे हे प्राणघातक हत्यार मानायचे का ? बरीच उलटसुलट चर्चा झाली आणि शेवटी तो खून होता असा निर्णय दिला. त्याला फाशीची शिक्षा फर्मावली गेली. पण एड्स्चे पेशंट फाशीची काय पर्वा करणार ? आज ना उद्या ते मरणारच असतात." अलीकडे काही प्रसिद्ध खेळांडूनी आपल्याला एडस् झालाय हे मानहानीची पर्वा न करता जाहीर केलंय. त्यामुळे अमेरिकन्स या प्रश्नाकडे धीटपणे बघू लागलेत, असं दिसतं. एडस् पेशंट्सनी हक्कांसाठी अभूतपूर्व लढेही दिलेत.

ड्रगबरोबर नंतर येणारा प्रश्न म्हणजे मानसिक रोगांचा. काही वर्षे ड्रग्जबरोबर घालवल्यामुळे मनावर खोल, कायमचे दुष्परिणाम होऊन बसतात. शारीरिक आजारही होतात. जे ॲडिक्टस् हेरॉइन घेतात, त्या हेरॉईनबरोबर असलेल्या एका द्रव्यामुळे पार्किन्सोनिझम हा शारीरिक आजार होत असल्याचं लक्षात आलंय, असं बरंच काही.

अमेरिकेतली व कॅनडातली काही ट्रीटमेंट सेंटर्स पाहिली. मी पुण्याला मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्रात काम करतो, तेव्हा काय काय नवीन चाललंय ते बघावं, असं वाटलं होतं. ही केंद्रं खूप निसर्गरम्य ठिकाणी, भरपूर मोठ्या एरियामध्ये बांधलेली आहेत. न्यूयॉर्कपासून नव्वद मैलांवर 'डे टॉप' नावाचे सेंटर आहे. कित्येक एकर्स, हिरव्यागार झाडीत पसरलेल्या चार-सहा इमारती. तिथलं जिम्नॅशियम पाहिलं तर ते इतकं मोठं, व्यायामाच्या अनेक साधनांनी युक्त की, आपल्याकडल्या कुठल्या विद्यापीठाचं वा शहराचं जिम्नॅशियम त्यापुढे फिकं पडेल. एका वेळी तिथं अडीचशे मुलं-मुली ॲडमिट असतात. आणि तेही वर्षभर. वर्षभर अभ्यास बुडू नये म्हणून शाळा-कॉलेजांच्या वर्गांची व्यवस्थाही तिथं केलेली आहे. सुस्मा टेलर सांगत होत्या, "तिथल्या त्यांच्या सेंटर्सची फी दर पेशंटमागे महिना नऊ हजार डॉलर्स आहे. आणि ते स्वस्त केंद्र समजले जाते. महिना ३५००० डॉलर्स

फीचीही केंद्रे तिथं आहेत."

तिथल्या कुठल्याही केंद्रावर जा, प्रत्येक पेशंटला स्वतंत्र रूम आहे. टी. व्ही., लायब्ररी, फोन इ. सर्व तऱ्हेच्या सोयी आहेत. मी तिथल्या सायकियाट्रीस्टला विचारलं, "तुमच्या थेरपीमध्ये तुम्ही त्याच्या फॅमिलीला सामील करून घेत असालच ना ?"

"हो तर. आमच्याकडे फॅमिली प्रोग्रॅम असतो. त्यांच्या मीटिंग्ज असतात" असं म्हणून त्याने फॅमिली प्रोग्रॅमची फोल्डर्स हातात ठेवली.

मी विचारलं, "फॅमिलीचा रिस्पॉन्स कसा असतो ?"

तो जरा खजिलपणे हसून म्हणाला, "व्हेरी पुअर. आम्ही निरोप पाठवले, तरी कुणी भेटायला येत नाहीत. अगदी त्या मुलाची फियान्सी आली तर भेटायला येते. त्यातल्या त्यात ड्रग ॲडिक्ट वयाने लहान असेल– म्हणजे दहा, बारा किंवा पंधरा वर्षांच्या आतला, तर पालकांची इन्व्हॉल्व्हमेंट असते. पण पंधराव्या वर्षी मुलं आईबापांपासून एकदा सुटी झाली की मग त्याला फॅमिली सपोर्ट जवळपास काही नसतो."

"मग ती मुलं ट्रीटमेंट घेऊन बाहेर पडल्यावर काय होतं ? परत व्यसनाकडे वळत असणार."

"तोच प्रॉब्लेम फार आहे. व्यसनाच्या दृष्टीने घातक अशा वयात ती मुलं कुटुंबं सोडतात. आणि व्यसनी झाल्यावर उपचार जरी घेतले तरी इथून गेल्यावर ती एकटीच राहतात. बरीच मुलं तर इथून गेल्या गेल्या रिलॅप्स होतात."

मला आपल्याकडलं आठवलं. मुक्तांगणमध्ये पालकच मुलांना दाखल करायला आणतात. पेशंट तिथे रुळण्यासाठी पहिले पंधरा दिवस नातेवाईकांना भेटायची परवानगी नसते. आदल्या दिवशी मुलाला दाखल करताना 'याने आम्हाला इतका त्रास दिलाय की, हा मेला तरी आम्हाला कळवू नका,' असं सांगतात. आणि कितीदा बजावूनही दुसऱ्या दिवशी हजर, किंवा फोन 'आमचा मुलगा कसा आहे ? तो जेवला का ? त्याला हॉस्पिटलच्या अन्नाची सवय नाही तर घरचा डबा पाठवू का ?' इत्यादी. प्रत्येक मीटिंगला नातेवाईक हजर. मुलगा बरा होऊन बाहेर आल्यावर त्याच्याशी कसं वागायचं, याविषयीच्या सूचनांचं तंतोतंत पालन. बायको व्यसनाच्या काळात सोडून गेली असली तरी आम्ही निरोप पाठवला की हजर होते. झालं गेलं विसरून परत एकत्र राहायला तयार होते. व्यसनाच्या परत तो आहारी गेला तरी वाऱ्यावर न सोडता सगळे परत त्याला दाखल करायला आणतात. असं कितीही वेळा. तो व्यसनात गुरफटून घर सोडून गेला किंवा भावांनी त्याला घराबाहेर काढलं की, त्याची आई अन्न वर्ज्य करून घरात बसून राहते. घरातली माणसं शेवटी वैतागून का होईना पण त्याला कुठूनतरी शोधून घरी परत आणतात. नोकरीवर कितीही घोटाळे केलेले असले तरी 'आता हा बरा झालाय, परत एक संधी द्या' असं सांगायला आमचे सोशलवर्कर्स जातात. त्यांना सहसा कोणी नकार देत नाही. आम्ही केंद्रात त्याला व्यसनाच्या काळात किती, कोणाची देणी करून ठेवल्याची यादी करायला सांगतो आणि बाहेर गेल्यावर त्या

सगळ्यांना भेटून थोडेथोडे परत करणार असल्याचे सांगायला लावतो. हा बरा झालाय म्हटल्यावर बहुतेक सगळेजण त्याला पैसे माफही करून टाकतात. तिकडच्या आणि इकडच्या वातावरणातला केवढा हा फरक !

तिथल्या सायकियाट्रिस्टनी मला इकडली कामाची पद्धत वगैरे विचारलं. त्यांना आश्चर्याचे धक्केच बसायचे. "आमचे बरे झालेले पेशंट म्हणजे आमची मुलंच. ते, त्यांच्या बायका आमच्या घरी येतात, आमच्या कुटुंबाचे घटक झाले आहेत. त्यांना आम्ही जागा मिळवून देऊ शकलो, लग्नं लावून दिलीत. त्यांच्या मुलांच्या वाढदिवसांना आम्ही त्यांच्याकडे जातो. त्यांची मुलं पास झाल्यावर आमच्याकडे पेढे द्यायला येतात." असं सांगितल्यावर ते म्हणायचे, "आमच्याकडे हे शक्यच नाही. आम्ही पेशंटना आमच्या ऑफिसमध्ये जास्तीत जास्त पंधरा मिनिटं पाहतो. त्यानंतर एरवीच्या जीवनात त्यांच्याशी आम्ही संबंध ठेवावा, हे अपेक्षितच नसतं. आमच्या शिक्षणाच्या शिस्तीत हे बसतच नाही." मला आठवलं, बरे होऊन गेलेले पेशंट नंतर सांगतात, "अमक्या वेळी मला ड्रग घ्यायची तीव्र इच्छा झाली होती, पण तुम्हा लोकांचे चेहरे डोळ्यासमोर आले आणि ती इच्छा निघून गेली आणि बचावलो."

मी जेव्हा त्या सायकियाट्रिस्टना सांगितलं, "आम्ही पेशंट्स्कडून गुन्हेगारांविषयी माहिती मिळवून पोलिसांना पुरवतो, छापे घालतात तेव्हा जातो आणि अनेकदा आमच्या मित्रांनी पंच म्हणूनही काम केलेले आहे," तेव्हा तर तो म्हणाला, "हे माझ्या कल्पनेपलीकडील आहे. आमच्याकडे आम्ही असं केलं असतं तर एव्हाना आमच्या डोक्यात गोळ्या झाडल्या गेल्या असत्या. तुम्हीसुद्धा या फंदात पडू नये, असा काही संबंध नसताना मी सल्ला देतोय."

तिकडच्या केंद्रांमध्ये यंत्रसामग्रीवर भर फार. अशा तऱ्हेची अत्याधुनिक लॅब मी तिथल्या माझ्या केमिस्ट स्नेह्यांबरोबर पाहायला गेलो होतो. रक्तातली किंवा लघवीतली ड्रगची अगदी मायक्रो मायक्रो क्वांटिटी आम्ही या यंत्रावर कशी शोधून काढतो, ते सांगत होते. मी म्हटलं, "याचा उपयोग काय करता ?" तो आश्चर्याने म्हणाला, "म्हणजे ? पेशंटने कुठलं ड्रग किती कंझ्युम केलंय, आणि किती वेळापूर्वी घेतलंय, हे आम्ही अचूक शोधून काढू शकतो. तुम्ही काय करता या बाबतीत ?"

मी म्हणालो, "पेशंटशी आम्ही पाच मिनिटं जरी बोललो तरी आम्ही त्याचा विश्वास मिळवू शकतो आणि पेशंट घडाघडा बोलू लागतो. ही सगळी माहिती तो स्वतः अगदी बिनचूक देतो."

तो जरा हसला व म्हणाला, "खरं सांगू का, बरोबर आहे तुमचं म्हणणं. आम्ही पॅथॉलॉजिस्ट लॅबमधली माणसं. तुम्ही म्हणता हे काम तो डॉक्टर करू शकला असता. पण तो चिठ्ठी लिहून पेशंट आमच्याकडे पाठवतो. आम्ही त्याची लघवी तपासून रिपोर्ट देतो."

माझे स्नेही म्हणाले, "आणि ती सँपल्स तरी विश्वसनीय असतात का ? ते ॲडिक्ट

येतात, त्यांना आम्ही युरिनसाठी जार देतो आणि टॉयलेटमध्ये जाऊन युरिन भरून आणायला सांगतो. ती मंडळी त्यात थोड्या युरिनबरोबर इतकं नळाचं पाणी भरून आणतात की, इतकी डायल्यूट युरीन कुठल्याही सायन्सच्या पुस्तकात आम्हाला शिकवली गेली नसेल. काही मंडळी तर त्यात पेप्सीकोला ओतून आणतात. आमच्या टेस्टमध्ये त्या सॅंपलच्या तपासणीत असते इतकी शुगर कुठल्याही डायबेटिक माणसाची नसेल."

"पण का असं करतात ते ?"

"इथं ड्रग ॲडिक्टला बेकार भत्ता मिळायचा असेल, तर त्याने मेथॉडॉन नावाचे औषध (हे हेरॉइनला पर्याय म्हणून सरकारतर्फे फुकट दिले जाते) घ्यावे लागते. ते हे घेत नाहीत. पण क्लिअरन्स सर्टिफिकेट हवे असते म्हणून. काही मंडळी आमची थट्टा करायची म्हणूनही पेप्सी त्यात ओततात."

अमेरिकेत कोकेन हे दक्षिण अमेरिकेकडून येते. तिथे कोका झाडाची लागवड करून त्यापासून ते बनवतात. पण आता लॅबमध्ये कृत्रिमरीत्या कोकेन बनवण्याची पद्धत सापडली आहे. आणि ते आधीच्या कोकेनपेक्षा खूप स्वस्तही आहे. त्यामुळे कोकेन व्यसनाची नजीकच्या काळात अमेरिकेत मोठी लाट उसळणार आहे. आणि ती लाट भारतापर्यंतही येऊन आपोआपच धडकणार आहे. आतापर्यंत ही ड्रग्ज पौर्वात्य देशातून तिकडे जात होती, आता प्रवास उलटा होणार आहे.

तिकडे आता विचारवंत, समाजधुरिणांमधे एक मतप्रवाह निर्माण झालाय, तो म्हणजे 'लीगलायझेशन ऑफ ड्रग्ज.' ते म्हणतात, "ही ड्रग्ज कायदेशीर करून टाका म्हणजे निदान यातली गुन्हेगारी तरी संपेल. आज ती ड्रग्ज बेकायदेशीर असल्याने माफिया टोळ्या याचा व्यापार करून प्रचंड पैसा मिळवतात. त्यामुळे ड्रगची किंमत हजार पटीने वाढते. ते परवडत नाही, पण घ्यावे तर लागते, म्हणून ॲडिक्ट चोऱ्या, गुन्हे करायला लागतात. शिवाय ड्रग्जच्या दुष्परिणामांमध्ये जास्त दुष्परिणाम हे त्यात भेसळ केलेल्या दूषित व घातक पदार्थांमुळे होतात, तेही या गुन्हेगारी जगात हा व्यापार असल्यामुळे होते. हे सर्व, ड्रग्ज कायदेशीर केल्यावर होणार नाही." तिकडले एक मेयर म्हणत होते, "ड्रगमुळे जेवढी माणसं मरतात त्यापेक्षा अधिक माणसं जास्त खाण्यामुळे मरतात. मग तुम्ही काय आइस्क्रीम खाण्यावर बंदी आणणार काय ?" मध्यंतरी (बहुदा १९३० च्या आसपास) अमेरिकेत दारूबंदी केली होती. त्या काळात पोलिसांनी दारूची लाकडी पिंपंच्या पिंपं कुऱ्हाडीने फोडून रस्त्यावर ओतली होती. या दरम्यान दारू बेकायदा निर्माण करून लोकांना बेकायदा विकणाऱ्या टोळ्या अस्तित्वात आल्या. पुढे लोकमताच्या रेट्यामुळे दारूबंदी उठवावीच लागली. पण या संघटित टोळ्या मात्र अमेरिकन समाजाचा अविभाज्य भाग होऊन बसल्या. आजची आधुनिक गुन्हेगारी ही त्या दारूबंदीची देणगी आहे, असे हे विचारवंत मांडतात. मीसुद्धा ऐकल्यावर संभ्रमात पडलो होतो. पण नंतर दिसू लागलं की दारू आणि ड्रग्ज एका मापाने मोजता कामा नयेत. दारू हे पेय हजारो वर्षे समाजात रुजलेलं आहे, तशी हेरॉईन,

कोकेनसारख्या 'हार्ड ड्रग्ज'ची परंपरा गेल्या पंधरा-वीस वर्षांचीच आहे. दारू घेणं मर्यादित ठेवून माणूस जगू शकतो, तसे ड्रग्जच्या बाबतीत नाही. दारूपेक्षा ड्रग्जमध्ये माणसाला अल्पावधीत व्यसनी बनवायची ताकद अनेक पट आहे. ड्रग्जचे व्यसन फसवून लावता येते, तसे दारूच्या बाबतीत नसते. दारू पिणाऱ्यांपैकी १३ टक्के लोक अल्कोहोलिक होतात, तर ड्रग्जच्या बाबतीत जवळपास ९९ टक्के लोक ड्रग्ज ॲडिक्ट होतात.

पण तरी काय, हा विषय विवाद्य आहे. अमेरिकेतही ड्रग्ज कायदेशीर करा असं म्हणणारे फारच थोडे लोक आहेत. हा प्रयोग नेदरलँड सरकारने काही प्रमाणात करून पाहिलाय. तिथे ड्रग ॲडिक्शन कमी होण्याऐवजी जगातल्या ड्रग ॲडिक्टस्‌चा 'स्वर्ग' म्हणून ॲमस्टरडॅम प्रसिद्ध आहे. देशोदेशीचे ॲडिक्ट तिथं गोळा होत आहेत. आता तिसऱ्या गरीब जगातही हा प्रश्न वाढतो आहे. ज्या आशियाई देशात ड्रग्जचे उत्पादन होऊन युरोप-अमेरिकेत ते विकून ड्रग्ज लॉर्डस्‌नी प्रचंड पैसा कमावला, आणि अमेरिका ओरडत असतानाही त्या देशांनी त्याकडे दुर्लक्ष केलं, आता त्या त्या देशांमध्येही ड्रग ॲडिक्टची संख्या बेसुमार वाढत चालली आहे. आणि त्या समाजाचे डोळे पांढरे व्हायची वेळ आलेली आहे. पूर्वी नुसती गरिबी हा प्रश्न होता. आता ड्रग ॲडिक्शन अधिक गरिबी असा प्रश्न झाला आहे.

★★★★★

# कौटुंबिक

आमच्या ग्रूपमध्ये डीना नावाची तिशीतली गोरी, अमेरिकन बाई होती. जरा स्थूलत्वाकडे झुकलेली. स्कर्ट किंवा फ्रॉक्स घालणारी. वर कधीकधी काऊब्वॉय टाइप लेदरची हॅट घालायची. तिची चांगली ओळख झाल्यावर अमेरिकेतली लग्नं, कुटुंबं या विषयांवर बोललो; ती म्हणाली, "आमच्याकडे पहिलं लग्नं बहुदा मोडतंच. माझ्या माहितीतल्या बहुतेकांची पहिली लग्नं मोडलेली आहेत. ते आम्ही ट्रायलसाठीच गृहित धरतो. त्यातनं अनुभव घेऊन माणूस शहाणा होतो. मग पुढच्या वेळी तो अधिक कॉशस असतो."

"पण मग दुसरं लग्नं त्यानंतर किती काळानं होतं, साधारणपणे ?"

"ते सांगता येत नाही. पण बऱ्यापैकी गॅप पडते. पहिल्या धक्क्यानंतर माणूस ती कटुता ओसरेपर्यंत दुसरा विचार करू शकत नाही. मग तो सेव्हिंग करायला लागतो. पुरेसं सेव्हिंग झाल्याशिवाय दुसरं लग्न करायचं नाही, असं ठरवता ठरवता काही वर्षं उलटतातच. दुसरं लग्न बहुदा बराच काळ टिकतं."

पुढे अमेरिकेत काही कुटुंबं अशी भेटली की, ज्या स्त्री-पुरुषांनी लग्नं केलेली नव्हती, पण तरीही दीर्घकाळ (म्हणजे चार-सहा वर्षं) ते एकत्र राहत होते. अमेरिकन माणसांना स्वातंत्र्य, प्रायव्हसी या गोष्टींचं फार महत्त्व वाटतं. रिनी नावाची बाई आमच्या प्रोग्रॅममध्ये होती. ती स्पॅनिश शिकली. भाषेच्या प्रॅक्टिससाठी स्पेनमध्ये गेली. तिथं एका माणसाशी मैत्री होऊन लग्न केलं. दोन मुलंही झाली. जवळपास पंधरा वर्षांच्या संसारानंतर तिनं घटस्फोट घेतला. तिला कारण विचारलं तेव्हा म्हणाली, "आम्हाला एकमेकांविषयी काही वाटेनासंच झालं होतं. मी एके दिवशी त्याला म्हणाले, 'आपल्यात काही नातं उरलेलं नाही, हे तुला आणि मला दोघांनाही माहीत आहे. स्वतःशी फसवणूक करून एकत्र राहण्यात काय अर्थ आहे ?' तो म्हणाला, 'पण इतकी वर्षं संसार केला, मुलं झाली, आता का एकमेकांना सोडायचं ?' पण त्यात अर्थ नव्हता. त्याला पाहून मला पूर्वीसारखी कसलीही व्हायब्रेशन्स जाणवेनाशी झाली होती. मग मी मुलांना घेऊन परत अमेरिकेत आले. त्यांना कॉलेजला

घातलं. ते सुटीत कधीतरी स्पेनला त्यांच्या वडिलांकडे जाऊन येतात."

"इकडं आल्यावर मग परत लग्नाचा विचार कधी केला की नाही ?"

"एक झालं ना लग्न. तो माझ्यापेक्षा बराच तरुण होता. त्याच्याविषयी जवळीक वाटू लागली. आम्ही एकत्र आलो. लग्न केलं. पण नंतर त्याच्या वागण्यातला पुरुषी अहंकार जाणवल्यावर त्याला बाय बाय करून टाकला. आता मला वाटतं, मी परत लग्न करणार नाही. इट इज नॉट माय कप ऑफ टी. मी ऑन कॉन्ट्रॅक्ट जॉब करते. अमेरिकन सरकारचे स्पॅनिश बोलणारे परदेशी पाहुणे आले की, त्यांची दुभाषा म्हणून काम करते. त्यांचे प्रोग्रॅम्स ठरवते. येणाऱ्या लोकांमध्ये डिप्लोमॅट्स्‌ आर्टिस्टस्‌, इकॉनॉमिस्ट असे तऱ्हेतऱ्हेचे लोक असतात. मी काही महिने काम करते, काही महिने भटकते. मी एकटी आहे म्हणून माझं कुठं अडत नाही, आता मला त्याची गरजही वाटत नाही."

तिकडे बायका सहजपणे 'माझा एक्स-हजबंड त्या देशात असताना मी तिथं गेले होते.' किंवा माझ्या 'एक्स एक्स हजबंडला पेंटिंगचं खूप वेड होतं,' असं सांगतात. इतके तिथं हे प्रकार सर्रास आहेत.

मी रिनीला विचारलं, "तुमच्याकडे घटस्फोट घेणं सोपं आहे का ? कारण आमच्याकडे तो खूप अवघड आहे. एक वर्ष सेपरेट राहायचं, कोर्टात खूप काळ केस पडून असते. पोटगीची रक्कम कोर्टाने ठरवून दिली, तरी त्याची वसुली होत नाही..."

ती म्हणाली, "आमच्याकडे आता कारणाशिवाय घटस्फोट मिळण्याचा कायदा झाला आहे. प्रोसिजर अगदी सोपी आहे आणि झटपटही आहे. आमच्याकडून जो उशीर होईल तेवढाच."

"तुमच्याकडून कशाला उशीर होईल ?"

"फायनान्शियल मॅटर्स सेटल करण्यामध्ये. तसं आम्ही लग्न करतानाच ते मोडणार हे गृहित धरलेलं असतं. म्हणून दोघांचे बँक अकाऊंट्स्‌ पहिल्यापासूनच सेपरेट ठेवतो. एकमेकांच्या खात्यात किती पैसे आहेत, हे एकमेकांना माहीत नसतं. मी अशी कुटुंबं पाहिली आहेत की, ज्यांना एकमेकांचे पगार किंवा इन्कमसुद्धा माहीत नाही. असं एकमेकांना विचारणंही गैर समजलं जातं. मग घर घेतलं तर दोघांनी निम्मे निम्मे पैसे त्यात घालायचे. म्हणजे सेपरेट होताना सोयीस्कर. घरातल्या मोठ्या वस्तूंबाबत तसंच. डिस्प्युट येतो कुठं ? एखादं पेंटिंग असलं तर त्याची आजची किंमत कशी ठरवायची ? नवऱ्याला ते चित्र ठेवून घ्यायचं असलं तर बायकोला तो त्या चित्राची त्या वेळची निम्मी किंमत ऑफर करतो. बायकोचा वकील म्हणतो, 'त्याची आजची किंमत कितीतरी जास्त होईल.' त्यात वेळ जाईल तेवढाच. पण कोर्टाकडून फारसा डिले होत नाही."

आपल्याकडे जसं लग्न झालं की मूल होणं हे आपोआपच येतं. तिथं ते तितकं सोपं नाही. आधी आपलं लग्न कितपत टिकेल याचा दोघांना भरवसा वाटला पाहिजे. मूल होऊ द्यायचं म्हणजे आर्थिक जबाबदारी. त्यासाठी आधी सेव्हिंग करायला लागतं. बायकोला रजा

घ्यावी लागते. किंवा एक जॉब सोडून बिनपगारी रांहून बाळंतपण आणि पुढचे तीन-चार महिने उलटल्यावर दुसरा जॉब शोधावा लागतो. त्यामुळे मुलं दुर्मिळ. रस्त्याने बाबागाडीतनं छान, गोरी, सोनेरी केसांची लहान मुलं त्यांच्या आया ढकलत जातात तेव्हा अनेकजण थांबून वाकून त्यांना पॅट करून, काहीतरी बोलून पुढं जातात.

घटस्फोटानंतर सगळ्यात नुकसान कुणाचं होत असेल तर मुलांचं. तिथं चाळीस ते पन्नास टक्के मुलं ही घटस्फोटित कुटुंबात एकट्या आईकडे किंवा एकट्या वडिलांकडे वाढतात. 'सिंगल पेरेंट' असं या समस्येचं नाव. एवढ्या मोठ्या प्रमाणावर मुलं सिंगल पेरेंटकडे वाढत असल्यामुळे तो मोठाच सामाजिक प्रश्न निर्माण झालाय. त्याला तोंड देण्यासाठी, मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी त्याचा अमेरिकन पद्धतीप्रमाणे अभ्यासक्रमातही समावेश केलाय. माझा इथला मित्र, त्याची बायको, व दोन लहान मुलं वर्षभर अमेरिकेत राहून परवा इकडं आली. तो एका विद्यापीठात व्हिजिटिंग प्रोफेसर म्हणून गेलेला होता. मुलांना तिथल्या शाळेत घातलं होतं. मित्राची बायको सांगत होती, "माझी मुलगी मला एक दिवस म्हणाली, 'तुझा आणि पपांचा जेव्हा डायव्होर्स होईल तेव्हा आमचं काय होणार? तुझ्यात आणि पपांमध्ये मला कोणाची तरी निवड करावी लागणार. ती कशी करायची?' मला धक्काच बसला. पुढं मुलीकडनंच कळलं की वर्गातल्या निम्म्याहून अधिक मुलांपुढे हा प्रश्न येणार असल्याने त्याचा तासच ठेवलाय. 'हाऊ टु मेक अ चॉइस' किंवा 'हाऊ टु अॅडजस्ट विथ द सिच्युएशन' बापरे, मी थक्कच झाले."

मीसुद्धा थक्क झालो. काय त्या लहान मुलांपुढं त्या वयात हे ताट वाढून ठेवलंय? कसं होत असेल त्यांचं? आणि या गोष्टी शाळेत सगळ्या मुलांना शिकवून काही उपयोग होत असेल का? पण शिक्षणाची खास ही अमेरिकन स्टाईल आहे. एक लग्न मोडलं आणि ते मूल आईपाशी राहत असलं, काही काळाने त्या आईलाही स्वतःच्या आयुष्याचा विचार करावासा वाटू लागतो. ती डेट्स् करायला लागते. प्रत्येक डेटच्या वेळी ती खूप टेन्शनखाली असते. आपलं वय वाढलंय, पूर्वीसारख्या आकर्षक, तरुण राहिलो नाही, आपण त्या माणसाला 'ऑन' करू शकू की नाही. . . अशा अनेक काळज्या. मुलाच्या लक्षात हा आईतला बदल यायला लागतो. आईनं लग्न केलं तर आपलं काय होणार, या कल्पनेनं त्याला असुरक्षित वाटू लागतं. मग आईच्या डेटच्या आधी तो आक्रस्ताळेपणा करतो. मुद्दाम आजारी पडतो, आईला त्रास देतो. आधीच टेन्शनखाली असलेली आई मग त्याला धोपटून काढते. मग त्यातनं आणखीनच ते एकमेकांपासून दूर जातात. एका अमेरिकन एज्युकेशनल प्रोग्रॅममध्ये या प्रश्नासाठी फिल्म केलेली होती. त्यात आईला सांगितलं होतं की 'मुलाला विश्वासात घ्या. यातनं जरी माझं लग्न होण्याची शक्यता असली, तरी तुला मी अंतर देणार नाही, असं त्याला समजावून सांगा.'

या सिंगल पेरेंट प्रॉब्लेममधनं लहान मुलांना क्रूरपणे बदडण्याचा 'बॅटर्ड चिल्ड्रेन' असा प्रश्न निर्माण झालाय. मुलं बहुदा आईकडेच वाढतात. आई नोकरी करून, कारने तास-दोन

तासांचं अंतर कापून दमूनभागून घरी येते. आई दिवसभर न भेटल्यानं मूल चिडलेलं असतं. ते चिडचिड करायला लागलं की आई धोपटते. दिवसभराचं किंवा आयुष्यातलं फ्रस्ट्रेशन काढायला ते असहाय मूलच तिला बरोबर सापडतं. अमेरिकेसारख्या पुढारलेल्या, सुशिक्षित देशात मुलं अशा पालकांच्या मारामुळे जखमी होतात. कित्येकदा त्यांचे हात-पाय फ्रॅक्चरही होतात. एका ब्लॅक बाईने तिचं सहा महिन्याचं मूल चिडून लाँड्रीमशीनमध्ये टाकून ते ऑन केलं. अनेक जखमा होऊन ते मूल मेलं. ही घटना तिकडे बरीच गाजली.

म्हणून या बॅटर्ड चिल्ड्रेनबाबत तिथं कायदाही झालेला आहे. एखाद्या घरात मुलांचा त्यांचे पालक जर असा छळ करीत असतील, तर शेजाऱ्यानं जरी पोलिसांना कळवलं, तर पोलिस ताबडतोब येऊन त्या मुलाची सुटका करतात. त्याला संस्थेत ठेवतात. आणि मग चौकशी करून पालकांवर खटला भरतात. अशा खटल्याच्या निकालांच्या बातम्या वरचेवर पेपरात वाचत होतो. त्यावरून ह्या अगदी दुर्मिळ घटना नसाव्यात.

आणखी एक कौटुंबिक प्रश्न या प्रसारमाध्यमांमधून नेहमी चर्चिला जातो. तो म्हणजे 'चाइल्ड इन्सेस्ट'– बापाचे मुलीबरोबर किंवा आईचे मुलाबरोबरचे शरीरसंबंध. यात बापाचे मुलीबरोबरचे संख्येने जास्त. बाप मुलगी लहान असताना तिच्या अवयवांबरोबर खेळू लागतात आणि तिला काही कळायच्या आत हे संबंध निर्माण होतात. टी. व्ही.वर अशा चाइल्ड इन्सेस्टच्या बळी असलेल्या स्त्रियांच्या मुलाखती पाहिल्या. त्या अगदी निर्भिडपणे, मोकळेपणाने आपले अनुभव सांगत होत्या. एक तिशीची बाई तिचे लहानपणचे अनुभव सांगताना म्हणाली, "माझं लहानपण एखाद्या दुःस्वप्नासारखं आहे. पण ते माझ्या पाठीशी लागलेलं आहे. मी मोठी झाल्यावर आजपर्यंत कुणाही पुरुषाशी यशस्वी शरीरसंबंध ठेवू शकलेले नाही, मी अगदी पांगळी होऊन गेले आहे." असं म्हणून ती ढसाढसा रडू लागली. दुसरी बाई मुलाखतीत म्हणाली, "हे माझ्या बाबतीत घडलं तरी मी त्यातून सावरले. मी 'ह्यूमन वीकनेस' म्हणून बापाला माफ करून टाकलं. पुढे लग्न झालं. मुलगी झाली. माझे वडील अधूनमधून मला भेटायला येतात. त्यांना कुणी नसल्यामुळे मी त्यांना येऊही देते. पण परवा माझी छोटी मुलगी म्हणत होती की, तिचे आजोबा तिच्या अवयवांशी चाळा करतात. तेव्हा मात्र मी संतापले आणि त्यांना घरी यायचं बंद करून टाकलं." चाइल्ड इन्सेस्ट विषयीही कायदे झालेत, त्यानुसार केसेस भरल्याच्या किंवा कोर्ट केसेसच्या बातम्या पेपरमध्ये अधूनमधून वाचायला मिळाल्या.

पुढे ड्रग ॲडिक्शन, मानसिक रोग यांविषयी वाचलं. त्यात बहुतेक विकृतींच्या मुळाशी सिंगल पेरेंटस्, बॅटर्ड चिल्ड्रेन, चाइल्ड इन्सेस्ट अशा कारणांची यादी असते. पालक फार वेळ मुलांना भेटत नसल्यानं लहान मुलांचे ताणतणाव निर्माण होतात. तो त्या पालकांचा दोष नसून जास्त करून त्या व्यवस्थेचा आहे. दोघांना नोकऱ्या कराव्या लागणं, ही गरजच होऊन बसली आहे. काही पालक मुलाच्या तान्हेपणी आळीपाळीने रजा घेऊन किंवा पार्टटाइम जॉब घेऊन मुलाचं सगळं करतातही. पण दोघांचं करियर असतं. कुणी ही

तडजोड करायची, कुणी माघार घ्यायची हा प्रश्न निघतो. बरं, ही तडजोड पहिले काहीच महिने शक्य असते. मग 'बेबी सीटर'कडे सोपवावंच लागतं. बेबी सीटर ही तिथली अत्यावश्यक संस्था बनलेली आहे. त्यात घरबसल्या चांगल्यापैकी पैसे मिळतात. पण त्यातही काही गैरप्रकार उघडकीला आलेत. एका केसमध्ये ती बेबीसीटर सर्व मुलांना झोपेचं औषध पाजायची. डोस असा ॲडजस्ट करायची की, पालक संध्याकाळी येईपर्यंत ती बरोबर जागी होऊन खेळत असायची. त्या मुलांना त्या झोपेच्या औषधाची सवय लागल्याचं नंतर सुटीच्या दिवशीचं त्यांचं वागणं पाहून पालकांच्या लक्षात आल्यावर, हे सगळं बाहेर आलं. त्यामुळे चांगली बेबीसीटर मिळणं ही ते लोक भाग्याचीच गोष्ट समजतात. (मी आयोवात संजय-कल्पनाबरोबर त्यांच्या मुलीला- तन्मयीला- पोहोचवायला-आणायला जायचो, ती बेबीसीटर इतकी छान होती की, तन्मयी घरी यायला कबूल नसायची.)

बेबी सीटिंगचे वय जाऊन मुलं शाळेत जातात, त्या वयातले काही विशिष्ट प्रश्न पुढे आले आहेत. एक प्रश्न की जो आपल्याकडेही प्रश्न बनतो आहे, तो म्हणजे टी. व्ही. ॲडिक्शनचा. कुणाकडे गेलो आणि तिथं दोन-तीन कुटुंबं वीकएण्डला एकत्र आलेली असली की, मुलांना टी. व्ही. ऑन करून द्यायचे आणि मोठी माणसं लॉनवर किंवा मागच्या लाकडी डेकवर खुर्च्या टाकून निवांत गप्पा मारीत बसायची. मुलांची टी. व्ही. पहायची एक फॅशन लक्षात आली. टी. व्ही. समोरच्या गालीच्यावर ती मुलं पालथी पसरायची आणि दोन्ही हात कोपरावर टेकवून चेहऱ्याखाली आधाराला पंजे धरून टी. व्ही. बघत बसायची. फोटोग्राफीच्या मोठ्या पुस्तकात मला एक फार चांगला फोटो पहायला मिळाला. ब्लॅक अँड व्हाइट फोटो होता. टी. व्ही. मागून तो घेतलेला असल्याने अंधारात टी. व्ही.चा काळा चौकोन अस्पष्ट दिसत होता. टी.व्ही.वरच्या दृश्याच्या अप्रत्यक्ष प्रकाशात समोर गुबगुबीत सोफ्यात पडून टी. व्ही.'पाहत असलेल्या मुलांचा चेहरा दिसत होता. त्या अपुऱ्या प्रकाशातही मुलाच्या चेहऱ्यावरचे भाव उत्कंठेचे, एखाद्या व्यसनी माणसासारखे होते. फोटोचं नाव होतं, 'लेट नाईट.'

टी. व्ही. सारखंच लहान मुलांच्या बाबतीत आणखी एक कॉम्प्युटरचं व्यसन सुरू झालं आहे. 'कॉम्प्युटर किडस्' असं या प्रश्नाला त्यांनी सुटसुटीत नाव देऊन टाकलं आहे. सुस्थितीतील कुठल्याही घरातल्या मुलांच्या खोलीत डोकावलं की, इतर अनेक खेळण्यांच्या बरोबर टेबलावर छोटा कॉम्प्युटर दिसायचाच. मी त्यातला पूर्ण अडाणी. मग ती मुलंच मला त्यांच्या भॉ भॉ इंग्लिशमध्ये आत डिस्क कशी सरकवायची, बटनं कशी दाबायची, त्यानंतर स्क्रीनवर येणाऱ्या सूचना कशा फॉलो करायच्या हे उत्साहाने, घाईने समजावून देत. तशी खडखड बटनं दाबून ते गमती दाखवीतही. कॉम्प्युटरवर चित्रं कशी काढायची, त्याचे प्रोग्रॅम्स तयार केलेले असत. मी लेखक आहे, अशी त्या मुलाच्या वडिलांनी माझी त्याच्याशी ओळख करून दिल्यावर तो म्हणाला "मग तुम्हाला तर हे यायलाच पाहिजे."

म्हणून त्याने पॅरिग्राफ कसे पाडता येतात, स्पेलिंगच्या चुका कॉम्प्युटर कसा परस्पर सुधारतो, इ. माहिती पुरवली. माझा मित्र नंतर सांगत होता, "माझा मुलगा कॉम्प्युटरपासून दहा फूटही दूर जाऊ शकत नाही." टी. व्ही. प्रोग्रॅममधले पालक सांगत होते, "आमचा मुलगा इतर मुलांशी खेळण्याऐवजी कॉम्प्युटरबरोबर खेळणं, जास्त प्रीफर करतो. कुठं गावाला जायचं झालं तरी तो त्याचा कॉम्प्युटर बरोबर घेतो."

मला धक्काच बसला. याबाबत मी तिकडे राहणाऱ्या मराठी मित्राशी बोललो. तो म्हणाला, "त्यात काय बिघडलं? ही मुलं लहान वयातच किती हुशार होतात. त्यांना आपल्याकडच्या तरुण मुलांपेक्षा जास्त माहिती असते." मी म्हटलं, "पण ही माहिती कशाला? इतर माणसांशी जो संबंध ठेवू शकत नाही, त्याचं व्यक्तिमत्त्व दुबळं नाही का राहणार?" त्यावर तो हसून म्हणाला, "आता त्याची जरूरच राहणार नाही. इतर लोकांमार्फत जी कामं पूर्वी करून घ्यावी लागायची, ती आता एकटा कॉम्प्युटरच करतो." मी मनात म्हटलं, 'मी अगदी आऊटडेटेड माणूस झालेलो दिसतोय.' पण या मराठी मित्राचा उत्साह तिथल्या सायकॉलॉजिस्ट किंवा सोशालॉजिस्टना मान्य नसावा. एरवी त्यांनी या समस्या पुस्तकातून किंवा टी. व्ही. वर मांडल्या नसत्या.

निमा गुजर ही मूळ पुण्याची, आता सानफ्रान्सिस्कोला असते. तिच्याकडे मी उतरलो होतो. तिची सहा-सात वर्षांची मुलगी रोशन, ही खूप हुशार व चुणचुणीत मुलगी. तिची माझी लगेच दोस्तीही झाली. दर वीकेंडला वर्गातली कुणीतरी गोरी मुलगी तिच्याकडे राहायला यायची. आम्ही खूप खेळायचो. एकदा निमा सांगत होती, "त्या मुली इतक्या गोड आहेत ना, पण प्रत्येकीच्या घरची बॅकग्राऊंड वेगळी. ती ल्युसी आहे ना, तिच्या आई-वडिलांच्या डायव्होर्सची प्रोसेस चालू आहे, त्यामुळे ती खूप टेन्स असते. ती अमकी ना, ती तिच्या आईकडेच असते. ती तिसरी मैत्रीण आहे ना, तिचे वडील तर जेलमध्ये होते, नुकतेच सुटले आहेत."

मी आश्चर्यानं विचारल, "कशाबद्दल जेलमध्ये गेले होते?"

"चाइल्ड इन्सेस्टबद्दल. या मुलीला काही केलं नव्हतं, पण हिच्या थोरल्या बहिणीला त्यांनी काहीतरी केलं होतं. हिला काय घडलं त्याची कल्पना नसावी. पण असेलही. आमच्या रोशनला सगळं माहीत असतं. आणि ती मला सविस्तर ह्या मुली जे जे बोलतात ते ते सांगत असते. मला तिच्या तोंडी हे असलं काही ऐकवत नाही. या वयात तिला हे कळायलाही नको, त्याचे दुष्परिणाम तिच्यावर होतील, असं वाटतं."

"पण टाळून तरी कसं चालणार? याच समाजात ती राहणार असेल, तर तिला हे माहीत व्हायला पाहिजे."

"पण या वयात ते नको वाटतं. पुढं व्हायचं ते होऊ दे. माझी मुलगी नॉर्मल मुलांमध्ये वाढावी, असं मला वाटतं. तिच्या एकाच मैत्रिणीचं घर नॉर्मल म्हणता येईल असं आहे. बाकीच्या सगळ्यांच्या घरी या ना त्या प्रकारे काहीतरी चाललेलंच आहे. इथं पोरांना

वाढवणं फार अवघड आहे. नोकरी करून, घरचं बघून, नवऱ्याचं बघून, पोरांचं बघायचं म्हणजे अगदी जीव निघतो. आपल्याकडे तिकडे जशी कुटुंबात माणसांची सपोर्ट सिस्टिम असते, तशी इथं अजिबात नाही. तिचं महत्त्व इथं आल्यावर कळतं."

निमा, अजित इकडं वाढलेले. एकमेकांना खूप मदत करीत असूनही ही परिस्थिती, तर तिथं एकट्या राहणाऱ्या व एकटीनंच मूल वाढवणाऱ्या स्त्रीची काय अवस्था होत असेल? तिकडे मुलांपुढे एकाकीपणाचे प्रश्न तर आपल्याकडे उलटं. चाळीत मूल झालं की सगळे त्याला इतकं उचलून घेऊन लाड करतात की, मुलाला पाऊल टाकून चालायला शिकायलाही कितीतरी जास्त वेळ लागतो. सपोर्ट सिस्टिम निमा म्हणते, पण इकडं इतकी माणसं, नातेवाईक बोलणारे, टीका करणारे की माणसाला व्यक्तिगत आयुष्यातले निर्णय घेण्याची चोरी. कोण काय म्हणेल, याचा आधी विचार करावा लागतो. तिकडे म्हणायला कोणीच नाही, यातून आलेली पोकळी.

किशोर वयातल्या मुलांच्या प्रश्नावरनं आठवलं— एकदा टी. व्ही. वर सॅटॅनिक गॅंग्ज हा कार्यक्रम दाखवला होता. किशोर वयातील मुलं या गॅंग्जकडे आकर्षित होतात. त्या वयात मुलांना काहीतरी थ्रिल् हवं असतं. टी. व्ही. वरचे स्पायडरमॅन व त्यासारखे कार्यक्रम पाहून थ्रिल वाटेनासं होतं. काही विकृत किंवा सॅडिस्ट मनोवृत्तीची माणसं याचा फायदा घेऊन अशा मुलांना या सैतानाच्या पंथात ओढतात. सैतानाचे पूजक या मुलांना गुप्ततेची शपथ देतात. या पंथाचं चिन्ह म्हणजे चांदणी आणि इतर काही आकृत्या. सैतानाला रक्त हवं, म्हणून मेंढ्या चिरून रक्त शिंपडून सुरुवात होते. आपल्याकडे जसं देवाला प्राणी बळी देणं सोपं असतं तसं तिथं नसतं. प्राणी मिळवणं ही खूप दुरापास्त गोष्ट असते. तरीही एका सार्वजनिक बागेच्या कडेला एके दिवशी बेचाळीस मेंढ्या मारून टाकलेल्या आढळल्या. त्याशेजारी रक्ताने काढलेली सैतानाची चिन्हं आढळली. एका शहरात एका दहा-बारा वर्षांच्या मुलानं आत्महत्या केली. त्याच्या खोलीची तपासणी केली असता भिंतींवर, वह्यांमध्ये ही चिन्हं आढळली. त्याने चिठ्ठी लिहून ठेवली होती, 'सॅटॅनिक गॅंगचा मी मेंबर असून तिथे असं ठरलं की प्रत्येकाने आपल्या सर्वांत प्रिय व्यक्तीचा खून करायचा. माझी सर्वांत प्रिय व्यक्ती म्हणजे माझी आई. तिचा खून करू शकत नसल्याने मी स्वतःचा खून करीत आहे.' टी. व्ही. वर त्याच्या आईची मुलाखत दाखवली होती. ती रडत रडत म्हणत होती, "मी कधी खाली याच्या खोलीत येऊन ही चिन्हं पाहिली नव्हती. माझा मुलगा असल्या कल्टमध्ये सापडलाय, याची मला पुसटशी कल्पनाही नव्हती." याच टी. व्ही. प्रोग्रॅममध्ये पोलिस डिटेक्टिव्हही होता. तो म्हणाला, "अनेक खून घडतात, ज्यांचा तपास लागत नाही. खुनाचे मोटिव्हेशन काहीच नसते. आमचा संशय आहे की यामागे अशा सॅटॅनिक गॅंग असाव्यात, पण पुरावा काहीच मिळत नसल्याने सिद्ध करणे अवघड जाते." "सैतानाला ताजा नरबळी देण्यासाठी गॅंगच्या स्त्री सभासद त्यासाठी प्रेग्नंट राहतात. जे मूल होईल त्याचा समारंभपूर्वक जिवंत बळी देण्यात येतो. त्याची सगळी कातडी सोलली जाते.

ते चालू असतानाच ते मूल मरतं. व नंतर सर्वजण ते मूल शिजवून प्रसाद म्हणून खातात." अशी माहिती निवेदकाने दिली. असा बळी देणारी महिला सुद्धा तुरुंगवास भोगत आहे. अशा घटना अर्थातच अपवादात्मक. पण तिथल्या जीवनाचे काही कोपरे दाखवणाऱ्या.

आई-वडील आणि मुलांमध्ये वाढत्या वयाबरोबर तिकडे फार झपाट्यानं अंतर पडत जातं मुलं लवकर सुटी होतात. ड्रग अॅडिक्शनवरच्या शॉर्ट फिल्ममध्ये हे खूप भर देऊन दाखवलं होतं. मुलगा ड्रगमध्ये गुंतत चाललाय हे आई-वडिलांच्या लवकर लक्षात येत नाही. कारण तिथल्या स्पर्धात्मक आणि गतिमान जीवनात पालक इतके अडकलेले असतात की, त्यांचा व मुलांचा संवादच जवळपास संपलेला असतो. शाळा संपवून मुलगा कॉलेजमध्ये गेला की त्याने घर सोडायचे, हा संकेतच आहे. होस्टेलवर तो राहू लागला की त्याचा तो. त्यानंतर फक्त सुटीतच येणार-जाणार. आमच्या ग्रूपमधली फ्रेंच लेखिका मारी हिच्याबरोबर मी बोलत होतो. ती पॅरिसमध्ये छोट्या खोलीत राहते. तिच्याकडे मोठ्ठं गिटार आहे ते ती कॉटखाली कसं ठेवते, आणखी काय काय वस्तू आहेत, ते ती सांगत होती. पुढे कधीतरी बोलताना म्हणाली, "माझी आई पॅरिसमधेच राहते. तिचं मात्र मोठ्ठं घर आहे. तिला आता कुणीच कंपनी नाही." मी आश्चर्याने म्हटलं, "मग तू आईजवळच का राहत नाहीस ?" ती म्हणाली, "का राहावं ? माझं माझ्या आईवर प्रेम नाही असा त्याचा अर्थ नाही. मला तिच्याविषयी खूप वाटतं, पण असं स्वतंत्र राहणं हा आमच्या वाढण्याचा भाग आहे."

तिकडे मुलं जेव्हा घर सोडतात तेव्हा तो एक वेदनेचा प्रसंग असेल, असं मला वाटायचं. त्यावर तिकडला एकजण म्हणाला, "असंच काही नाही. ती मुलं आधीच हळूहळू सुटी व्हायला लागलेली असतात. कॉलेजमध्ये गेल्यावरही तो मुलगा आई-बापांकडेच राहत असेल, त्यांच्याच पैशाने शिकत असेल, तर ते इकडे सामाजिकदृष्ट्या कमीपणाचं समजलं जातं. त्या मुलात काहीतरी कमी आहे, असा सगळ्यांचा ग्रह होतो. तेव्हा सुटं हे व्हावंच लागतं. आणि तो बाप हा त्याच्या बापापासून असाच त्या वयात सुटा झालेला असतो. आणि नाती तुटतातच असंही नाही. दूर राहूनही माणसं त्यांच्या पालकांशी संबंध ठेवतात. नोकरीमुळे हजारो मैल लांब राहायला गेल्याने प्रत्यक्षात काही वरचेवर भेटता येत नसलं तरी लाँग डिस्टन्स फोन कॉल करून चौकशी करतात.'

डीना एकदा सांगत होती की तिची आई हँडिकॅप्ड् आहे. डिनाला तीन बहिणी आहेत. त्या आळीपाळीने रजा घेऊन आईजवळ राहायच्या. आईला आजारपणात उपयोग व्हावा म्हणून डिनाने हा कॉन्ट्रॅक्ट जॉब घेतलाय. म्हणजे तिला तिच्या सोयीने आईकडे जाता यावे. पण आता बहिणी नोकऱ्यांनिमित्ताने दूर दूर गेल्यात, आता त्या येऊ शकत नाहीत, म्हणून डिनावर सगळा भार पडलाय. 'सांता-फे' मध्ये राहणाऱ्या रिनीची आई लॉस एंजेलिसमध्ये असते. आईचा स्वभाव तऱ्हेवाईक आहे. रिनी तिला म्हणते, "मी तुझ्या मदतीला हजर आहे, पण तुला मी पांगळं बनवणार नाही. प्रत्येकाला म्हातारपण येणार आहे. तेव्हा हे रिकामपण कसं जगायचं, याची प्रत्येकाने स्ट्रॅटेजी ठरवायला पाहिजे. त्यासाठी तुला हवी तेवढी मदत

करीन, पण तुझ्याबरोबर मी गटांगळ्या खाणार नाही."

वॉशिंग्टनमधल्या रायटर्स सेंटरमध्ये एका लेखकाबरोबर गप्पा चालल्या होत्या. मी त्याला म्हटलं, "भारतात असा सर्वसाधारण समज आहे की, अमेरिकन तरुण माणसं आपल्या आईवडिलांना विचारत नाहीत, त्यांची नीट काळजी घेत नाहीत. . ." तो गडगड हसून म्हणाला, "तुझ्या भारतातल्या मित्रांना सांग, इकडं आयुर्मर्यादा फार वाढलीय. माणसं सहजपणे नव्वदी ओलांडतात. अशा वयात त्यांचा मुलगासुद्धा पासष्ट वर्षांचा असतो. जो स्वतःच वृद्ध असतो, तो आपल्या वृद्ध बापाची कशी काळजी घेणार ?"

निवृत्तीनंतरची काही वर्षं हात-पाय धड असेतोवर तिथे मंडळी काहीतरी काम करीत राहतात. छोट्या छोट्या धंद्यांमध्ये जायचा त्यांचा कल असल्याचं वाचलं होतं. पण तरुण माणसांना जॉब पाहिजेत, विद्यार्थी तर कमी पगारावर अर्धवेळ काम करायला तयार असतात. यामुळे वृद्धांना अशी कामं मिळण्याची शक्यता कमी. त्यामुळे छोटे व्यवसाय करण्याचा हा कल. पण त्याला स्कोप फारच कमी. कारण शॉपिंग सेंटर्सच्या देशभरच्या मालिकांमुळे छोटे धंदे टिकूच शकत नाहीत. सत्तरी-पंचाहत्तरीनंतरचा काळ हा जाता जात नाही. पैशाचा प्रश्न फारसा नाही. 'सिनियर सिटीझन्स' ना भरपूर सवलती असतात. पेन्शन मिळते. कधी बसनं प्रवास करीत असताना पाहायचो. पुढच्या काही सीट्स् त्यांच्यासाठी राखीव. पुढच्याच का, तर दारातून चढल्याचढल्या त्यांना फार आत चालावे लागू नये म्हणून. ड्रायव्हरला ते कार्ड काढून दाखवीत म्हणजे तिकीट पडत नसे. या सगळ्यावर तो समाज भरपूर खर्च करतो. मधे वाचलं होतं, अमेरिका ही दिवसेंदिवस जास्त 'ग्रे' बनत चालली आहे. वाढत्या आयुर्मर्यादेमुळे वृद्धांची संख्या वाढत चालली आहे, त्याचा खर्च काम करणाऱ्या लोकांवर पडतो. अशा कार्यरत अमेरिकनांचं प्रमाण पस्तीस टक्के व त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांचं प्रमाण पासष्ट टक्के, इतका हा तोल ढळलेला आहे. बऱ्याच जणांच्या मनांत या सवलतींविषयी, खर्चाविषयी नाराजीही आहे. पण तेही उद्याचे वृद्ध असल्याने त्याला विरोध करीत नाहीत इतकंच. पंचाहत्तरी ते नव्वदी हा फार खडतर काळ असतो. आजारी पडल्याशिवाय किंवा शारीरिक दृष्ट्या अपंग झाल्याशिवाय वृद्धाश्रम किंवा तत्सम संस्थेत ते जात नाहीत. होता होईल तो बाहेर राहायचे. एरवी वृद्धांची संख्या पाहता अशा किती संस्था काढाव्या लागल्या असत्या !

काही वर्षांपूर्वी इंग्लंडमधील एक मैत्रीण भारतात काही अभ्यासासाठी आली होती. ती सांगत होती, "तिकडे वृद्ध एकेकटे राहतात. बऱ्याचदा ते वारल्याचं कुणाच्या लक्षातही येत नाही. त्यांच्या दारासमोर दुधाच्या पिशव्या साठतात. पेपरचा गठ्ठा साठतो, पण शेजारपाजारचे कुणी बॉदर करीत नाहीत. म्हणून आता तिकडे एक संस्था निघाली आहे. त्यांनी त्या भागात राहणाऱ्या वृद्धांची यादी केली आहे. आणि संस्थेचे मेंबर्स ठराविक दिवसांनी अशा वृद्धांच्या घरी जाऊन वास्तपुस्त करतात."

एकाकीपणा हा वृद्धावस्थेत पराकोटीला गेलेला असला, तरी तो एकूणच अमेरिकन

जीवनाचा स्थायीभाव झालेला आहे. एकमेकांच्या जीवनात डोकावणं, याला तिथं ढवळाढवळ करणं म्हणतात. प्रायव्हसी हे मूल्य आता अगदी दुसऱ्या टोकाला गेलं आहे. मी आमच्या ग्रूपमध्ये विमानतळावरून इकडून तिकडे जाताना कुणाला सामान घेऊ लागलो तर तो माणूस गडबडून जायचा. मी म्हणालो, "माझ्या हातात एकच बॅग आहे, तुझ्याकडे तीन आहेत. मी घेतो की." तो म्हणाला, "तुझ्या भावना मला समजल्या. त्याबद्दल आभारी आहे. पण मित्र म्हणून तुला एक गोष्ट सांगून ठेवतो. इथे समोरच्या माणसाने मदत मागितल्याशिवाय आपण मदत करायची नसते. कारण ती त्याच्या प्रायव्हसीमध्ये ढवळाढवळ समजली जाते." मला मुंबईच्या युसिसमधनं हा कानमंत्र दिला होता, "तुम्हाला काही माहीत नसेल तर ते विचारा. तुम्हाला माहिती मिळेल. तुम्ही विचारलं नाहीत, तर तुम्हाला ती गोष्ट माहीत आहे असं गृहित धरलं जाईल." तिथल्या सगळ्या मुक्कामात अमेरिकन जीवनाचा अर्क असलेली दोन वाक्यं मी शोधून काढली होती: 'इट इज हिज (किंवा 'युवर') प्रॉब्लेम' आणि दुसरं, 'इट्स् नन् ऑफ माय बिझिनेस.'

शॉपिंग सेंटर्समधे आपण सामान घेऊन काऊंटरवर बिल भरायला जातो, तेव्हा ती मुलगी 'हाय' म्हणते, ते इतकं कृत्रिम असतं की बस्स. त्यानंतर वीकएण्ड असेल तर पेमेंट झाल्यावर 'हॅव अ गुड वीकेण्ड' म्हणते. ख्रिसमस, हॅलोवेन, थँक्स गिव्हिंग यांसारख्या सणांच्या वेळी तसे विश् करणार. "हाऊ आर यू ?" असं कुणी विचारल्यावर आपण "फाइन. थँक्यू." असं म्हणायचं असतं. आपण खरोखरीच कसे आहोत सांगू लागलो तर त्यांना अजिबात इंटरेस्ट नसतो. आयोवात गेल्या गेल्या तिथला स्थानिक टी. व्ही. किंवा डेली आयोवन नावाचं वर्तमानपत्र यांच्यातर्फे आमच्या मुलाखती घेतल्या जायच्या. गरीब देशातील लेखकांना ते हटकून प्रश्न विचारायचे, "इथली शॉपिंग सेंटर्स पाहून तुम्हाला काय वाटलं ?" हे लेखक सांगायचे, "एवढी प्रचंड दुकानं, इतका प्रचंड माल आम्ही प्रथमच पाहत आहोत." त्यावर दुसऱ्या दिवशी पेपरमध्ये यायचं, 'अमेरिकेतील विपुलता पाहून आफ्रिकन लेखक थक्क'. . . वगैरे. मला एकानं विचारलं तेव्हा मी म्हणालो, "मी माझ्या शहरात जिथून जिथून माल घेतो ती ती दुकानं वर्षानुवर्षं ठरलेली आहेत. काहीतर माझ्या वडिलांपासून चालत आलेली आहेत. ते सगळे माझे फॅमिली फ्रेंडस् आहेत. तुमच्या या शॉपिंग सेंटर संस्कृतीत या नात्यांना तुम्ही पारखे झालात, याबद्दल मला वाईट वाटतं." हे वाक्य मात्र त्या पेपरमध्ये छापून आलं नाही. बँकिंगची तेथे मशिन्स आहेत. आपलं कार्ड घालून बटन दाबलं की खाली पैसे मिळतात. कोपऱ्याकोपऱ्यावर ती यंत्रं असतात. ते यंत्र पाहून मला पुण्यातल्या आमच्या बँकेची आठवण झाली. मी ज्या ज्या वेळी जातो त्या वेळी तिथल्या कर्मचाऱ्यांशी पंधरा-वीस मिनिटं तरी गप्पा होतात. कुणाची बदली होणार, कोण येणार, परवा कशी कॅशिअरला खोट आली. मग ते नुकसान सगळ्यांनी वर्गणी काढून कसं भरून काढलं. . . असं एक ना दोन. तिथं एक यंत्र आलं की त्यामागे अनेक माणसांशी तुमचा संपर्क तुटतो. तिथं अशी अनेक तऱ्हेची यंत्रं अनेक बाबतीत सतत येत आहेत. मी या

सगळ्यामुळे भांबावून गेलो असता आमच्या ग्रूपमधली मेक्सिकन मैत्रीण म्हणाली, "मी पाच वर्षांपूर्वी इथं दोन वर्षं राहून गेलेय, पण आता तुझी अवस्था जशी झालीय, तशीच माझी झालीय, इतकं हे सगळं झपाट्यानं बदलतंय."

ही माणसामाणसांची नाती निर्माण होतात ती एका जागी स्थिर राहिल्यानं. तिथं अमेरिकेत तेच नाही. तिथल्या जीवनाची गती एवढी जबर आहे की ती माणसांना गरगरा फिरवते. तिथला एकजण म्हणाला, "दहा डॉलर जरी दुसरीकडे जास्त पगार मिळत असला तरी माणसं जॉब बदलतात." कित्येक ठिकाणी तुम्ही ठराविक कोट्याइतकं काम केलं नाही तर जॉब जातोच. शॉपिंग सेंटरमधले सेल्समन किंवा बँका-पोस्टातले काऊंटरवरचे क्लार्क यांच्याविरुद्ध दोन-चार गिऱ्हाइकांच्या तक्रारी आल्या तरी त्यांना 'सॅक' केलं जातं. या ना त्या कारणामुळे माणसं नोकऱ्या बदलतात, गावं बदलतात. गावं अमेरिकेच्या दुसऱ्या टोकाचीही असूं शकतात. एका शहरातही जास्त सोयीचं घर मिळालं तर घर बदलतात. मी लॉसएंजेलिसला एका मैत्रिणीकडे उतरलो होतो. ती एका ग्रूप हाऊसिंगमध्ये राहते. तिथं प्रत्येक बिल्डिंगला खाली लाँड्री मशिन्स ठेवलेली रूम होती. तिथं मी कपडे धुवायला गेलो. एक चिनी चेहऱ्याची बाई दुसऱ्या मशीनमध्ये कपडे घालत होती. मी तिला यंत्र कसे सुरू करायचं विचारलं, तिने सांगितलं. ड्रायर किती वेळ ऑन ठेवायचा म्हणजे कपडे चुरगळणार नाहीत, यांसारख्या खाचाखोचाही सांगितल्या. मी परत आल्यावर मैत्रिणीस म्हणालो, "कोण ग ती चिनी बाई ? काय करते ती ?"

"मला नाही माहीत."

"पण आपल्याच बिल्डिंगमध्ये राहते."

"मला या बिल्डिंगमधलं कुणीच माहीत नाही."

"भारतात हे कुणाला सांगितलं तर खरंच वाटणार नाही. आम्हाला बिल्डिंगमधलीच काय त्या गल्लीतलीही अनेक माणसं माहीत असतात. वर्षानुवर्षांचे आमचे संबंध असतात."

"अरे पण, ओळख व्हायला तो शेजारी तरी काही काळ राहिला पाहिजे ना. उद्या तो नसेल किंवा मीही नसेल. आणि तो कसा आहे हे आपल्याला काय माहीत. समजा तो ड्रगमधला असला तर ?"

अमेरिकेतल्या गुन्हेगारीमुळे या एकाकीपणात आणखीनच भर पडली आहे. इतका संपन्न देश पण तितकाच असुरक्षित. मी एका वर्गमैत्रिणीकडे आठवडाभर राहिलो होतो. ती, तिचा नवरा दोघं डॉक्टर्स. त्यामुळे एका उपनगरातल्या अति श्रीमंत वस्तीत भल्या मोठ्ठ्या बंगल्यात ते राहतात. अमेरिकेतल्या भल्या मोठ्ठ्या श्रीमंत आयकोकाचा बंगला त्याच परिसरात होता, अशी ती वस्ती. मैत्रिणीने माझ्यासाठी आठवडाभर रोजची अर्धा दिवस रजा घेतली होती. ती सकाळी नऊला जाऊन एकला यायची. जाताना बजावून जायची, "कुणीही बेल वाजवली तरी दार उघडायचं नाही. काहीही कारण सांगोत, कुठल्याही वयाचा पुरुष

असो, बाई असो. मी येईन तेव्हा माझ्या किल्लीनं बाहेरनं मी उघडीनच. इथं काहीही होऊ शकतं." ती माझ्यासाठी उत्तमोत्तम सिनेमाच्या व्हिडिओ कॅसेटस् आणून ठेवायची. फ्रीज पदार्थांनी, फळांनी भरलेला. घरात काय नाही, असं नव्हतंच. पण बाहेर पडायचं नाही, कुणाला आत घ्यायचं नाही. त्या परिसरात सुरेख बंगले. सगळीकडे हिरवळी. आखलेले, वळणं घेत गेलेले काळेशार, पांढऱ्या बॉर्डर्स असलेले रस्ते. त्या कडेने उंचच उंच झाडं. तो फॉल सीझन असल्याने त्यावरचे लाल, पिवळे धमक रंग... त्यावर पडलेलं कोवळं कोवळं ऊन... हे सगळं मी खिडक्यांमधून बघायचो, पण फेरफटका मारायचा नाही. इतक्या आरामशीर कैदेचा अनुभव तरी एरवी मला कुठं मिळाला असता ? एक दीडला मैत्रीण परत यायची, मग घरात मानवी आवाज सुरू व्हायचा. ती सांगत होती, "इथं कुणी गावाला गेलं असलं की बंगला बंद पाहून घरफोड्या होतात, म्हणून आता इलेक्ट्रॉनिक गॅजेट निघालंय. ते बसवलं की आपण गावाला गेलेलो असलो तरी संध्याकाळी ठराविक वेळेला घरातले सगळे दिवे ऑन होतात. टी. व्ही. ऑन होतो. त्यामुळे घरात कुणी नाही हे बाहेरून समजत नाही. रात्री उशिरा नेहमीसारखे दिवे बंदही होतात." अर्थात हे चोरांनाही माहीत असणारच. त्यावर त्यांचेही ओळखण्याचे काही आडाखे असणार.

मोठ्या शहरांत गुन्हेगारी आणि उपनगरात किंवा लहान गावात नसते अशातला भाग नाही. मोठ्या शहरांत रस्त्याने माणसं दिसतात. काही दक्षता घेतल्यास तुम्हाला माणसांमध्ये वावरता येते. लहान गावांत घरं मोठी, सुटी, एकमेकांपासून लांब लांब अंतरावर. एका अमेरिकन बाईंकडे गेलो होतो. तिनं एकजण पेइंग गेस्ट म्हणून ठेवली होती. ती सांगत होती, "मला खरं तर आर्थिक गरज काही नाही, फक्त 'जस्ट टु हियर अनादर ह्यूमन व्हॉईस' मी तिला इथं ठेवलंय." शहरात काम करून ड्राइव्ह करत आल्यावर पोटात काही घातलं की टी. व्ही. पुढे पसरतात. टी. व्ही. तसाच चालू राहतो. हे झोपून जातात. त्यामुळे अशा उपनगरी जीवनाला 'बेडरूम कम्युनिटीज' असंच नाव पडलंय. यांचा त्या वस्तीशी, गावाशी काही संबंध येत नाही. झोपण्यापुरतं ते त्या गावचे.

आज मुंबईच्या आसपासच्या उपनगरांचं जीवनही हळूहळू तसंच व्हायला लागलंय. डोंबिवलीहून मंत्रालयात कामाला जाणारा माणूस झोपण्यापुरता डोंबिवलीत असतो. 'बेडरूम कम्युनिटी' हे नाव आता इथंही लागू झालंय. आपल्याकडे अजून इतर बंध शिल्लक असल्याने तिकडल्याइतका एकाकीपणा नसतो, पण तो आता येऊ लागलाय. मी आमच्या गावी ओतूरला जातो तेव्हा एक दिवसासाठी जरी गेलो तरी पाच-सहा ठिकाणी चहा प्यायला जावंच लागतं. नाही गेलो तर रागावतात. माझ्या वडिलांबरोबरची माणसं. त्यांना नाही म्हणता येत नाही. एखाद्या वेळेस वेळ नसला, तर मी स्टँडकडे जाताना मागच्या गल्लीने, चोरासारखा तोंड लपवीत सटकतो. त्या खेड्यात माझ्या वडिलांच्या वरच्या जेवढ्या पिढ्या नावाने माहीत आहेत, त्या तिथे राहत होत्या. आमचं घर शेकडो वर्षं जुनं आहे. आमच्या घरातली ही पूर्वीची माणसं तिथंच जन्मली, तिथंच गेली. गती नसलेला

समाज होता तो. त्यातनं वेगळे प्रश्न, वेगळ्या विकृती तयार होतच होत्या. माणसं नको एवढी एकमेकांशी जोडली गेली होती. सामाजिक बंधनांनी जखडलेली होती. त्याउलट स्थिती अमेरिकेतल्या महानगरी जीवनातली. तिथं प्रश्न आलाय तो एकटेपणाचा आणि तुटलेपणाचा. आयोवातली वृद्ध माणसं म्हणत होती, "तुम्ही भारतातलं वातावरण सांगताय, तसं इकडंही पन्नास वर्षांपूर्वी होतं हो. पण आता ते गेलं. आयोवात आम्ही शेती करायचो. आता शेतीवर भागत नाही म्हणून आमची मुलं अमेरिकाभर जॉब करीत फिरतात. त्यांचं जीवन, आवडी निवडी आणि आमच्या, यात फार फरक पडलाय."

पुण्या-मुंबईकडे येणारे बीड-उस्मानाबादचे शेतमजूर काय आणि आयोवातल्या शेतकऱ्यांची ही मुलं काय, सांपत्तिक दर्जाचा तेवढा फरक. बाकी तसंच.

o

★★★★★

# आयोवा प्रोग्रॅम

वॉशिंग्टनच्या स्मिथ्सोनियन म्युझियमच्या तळघरात एका खूप प्रकाशित हॉलमध्ये आमचा ओळखीचा कार्यक्रम झाला, तेव्हाच समजलं, किती वेगवेगळ्या प्रवृत्तीची माणसं या ग्रूपमध्ये आहेत ! गेले दोन दिवस उतरलो होतो त्या हॉटेलात किंवा वॉशिंग्टन दर्शन करणाऱ्या बसमधे पाहून ओळखी झालेल्याच होत्या. तीन-चार आफ्रिकन चेहरे, तीन-चार मंगोलियन चेहऱ्याचे आशियायी, तीन-चार लालबुंद गोरे युरोपियन्स आणि इतर असं चेहऱ्यांचंही संमेलन भरल्याचं लक्षात आलेलं होतंच.

पोलंडचा ग्रेगरी हा डोळ्यांचा डॉक्टर होता. तो म्हणाला, "जीवन हे अनेक आश्चर्यांनी भरलेलं आहे. अशा आश्चर्यांचा शोध घेण्यासाठी मी लिहितो." गोरी, सोनेरी केसांची, सरळ नाकाची, पस्तीस-चाळीस वयाची युगोस्लावियाची स्लॅव्हेंका डूक्युलिना तिच्या खणखणीत आवाजात म्हणाली, "मी वुमन लिबमधली कार्यकर्ती आहे. माझी चार वेळा लग्नं झालेली आहेत आणि मोडली आहेत. दर वेळी कुणाशी तरी मैत्री करायची, प्रेमपत्रं पाठवायची, घर घ्यायचं, लग्न करायचं, सामान लावायचं, भांडायचं आणि विभक्त व्हायचं. . . या सगळ्याचा आता मला कंटाळा आलाय."

त्या वेळी वाटलं होतं की, ही स्त्रीस्वातंत्र्यवादी असल्याने आपलं-हिचं चांगलं जमेल. पण तसं झालं नाही. फारच कडक आणि करकरीत स्वभाव. आयोवात आम्ही गेलो तेव्हा लिफ्टने सामान एकत्र चढवलं गेलं. लांबच लांब कॅरिडॉरमधनं मोठमोठ्या बॅगा खोलीपर्यंत नेणं काहींना अवघड जाऊ लागलं. माझी रूम लिफ्टजवळच होती म्हणून मी माझं सामान ठेवून इतरांना मदत करायला तिथं जाऊन उभा राहिलो. स्लॅव्हेंका एक बॅग कशीबशी उचलत ओढत होती. मी तिला म्हटलं, "मी घेतो ती." तिने 'थँक्स' वगैरे काही न म्हणता माझ्याकडे दिली. मला जरा हे खटकलं. मी ती तिच्या दारापाशी नेऊन ठेवली. स्लॅव्हेंकाकडे दुसरं काहीच सामान नव्हतं. ती ऐटीत माझ्या मागून चालली होती. दारापाशी आल्यावर ती कृतज्ञता व्यक्त करण्याऐवजी म्हणाली, "आत नेऊन ठेव." यात प्लीज वगैरेसुद्धा काही नाही. मी तसाच परत आलो. त्यानंतर मी आपण होऊन कधी तिच्याशी बोललो नाही. एकदा

'सांता-फे'ला मला म्हणाली, "तू योग कधी शिकवणार आहेस?" (मी आधी तसं शिकवायचं सगळ्यांना कबूल केलेलं होतं.) मी म्हटलं, "जे त्याबाबत सिरियस आहेत ते येतात माझ्याकडे."

सुदानचा तबन लियाँग हा एक वल्लीच होता. काळाकभिन्न रंग. पन्नाशीचा. अमेरिकेत जायचं म्हणजे शोभतील असे कपडे पाहिजेत वगैरेबाबत मी फारच कॉन्शस होतो. तबन मांजरपाटाची गुडघ्यापर्यंत अर्धी चड्डी आणि वर तशीच कोपरी घालून आला होता. हातात अडीच-तीन फूट लांबीची वेडीवाकडी काठी घेऊन वावरायचा. आणि तेही कुठं तर अमेरिकेच्या राजधानीतल्या डाऊन टाऊनमधल्या सुप्रसिद्ध ड्यूपाँट सर्कलशेजारच्या एम्बसी सूट्स् या भारी हॉटेलमधे. आपल्या बकऱ्यांना काठीने बाभळीचा पाला काढून देणारा एखादा गुराखीच शोभला असता. त्या हॉटेलच्या दारावरचे भारी वेषधारी रक्षक पाहून मी दबकलो होतो. तिथं हा त्यांच्यापासून तो रिसेप्शनिस्ट, मॅनेजरपर्यंत सगळ्यांची थट्टामस्करी करायचा. म्युझियम पाहताना आफ्रिकन आदिम देवांचे लाकडी उंचच उंच पुतळे, दगडी आदिम शिल्पे, धातूचे मुखवटे पाहताना त्याच्या मी बरोबर होतो. माझ्याकडे वळून म्हणाला, "सी धिस अमेरिकन्स. दे आर फाँड ऑफ कलेक्टिंग दीज स्टोन्स अँड पीसेस ऑफ वूड. दे आर नॉट इंटरेस्टेड इन् पीपल. दे आर इंटरेस्टेड इन दीज थिंग्ज." एका मोठ्या आदिम देवाच्या ओबडधोबड मूर्तीकडे बोट दाखवून म्हणाला, "सी धिस पॅथेटिक गॉड, शिव्हरिंग इन कोल्ड विदाऊट वर्शिप. कॅन यू इमॅजिन अ गॉड विदाऊट वर्शिप? दीज वेस्टर्नर्स आर फनी पीपल." पुढे प्रोग्रॅममध्येही माझ्याशी येताजाता बोलायचा. माझ्यावर लक्ष असायचं. मी एका परिसंवादामधे भाग घेतला. माझं भाषण झाल्यावर मला उद्योग नव्हता म्हणून एकीकडे ऐकता ऐकता ओरिगामीतली फुलं करीत बसलो, फ्लॉवरपॉट केला. आणि कार्यक्रमाच्या शेवटी अध्यक्षांनी आम्हा वक्त्यांचे आभार मानले तेव्हा मी फुलांसहित फ्लॉवरपॉट त्या अध्यक्षांना भेट दिला. त्यावर तबन सारखा म्हणत होता, "सी धिस इंडियन मॅजिशियन, ही डज समथिंग समथिंग लाइक धिस (हाताची बोटं एकमेकांत हलवून) अँड समथिंग कम्स आऊट!" मी प्रोग्रॅममधनं माझ्या मजुरांच्या पाहणीसाठी काही दिवस निघून जायचो, परत सामील व्हायचो. तबनचं लक्ष असायचं. म्हणायचा, "धिस इंडियन योगी (मी योगासनं करतो म्हणून सगळ्यांना माहीत होतं)... ॲपिअर्स अँन्ड डिसॅपिअर्स... ॲपिअर्स...डिसॅपिअर्स... व्हेरी फनी फेलो."

त्या दिवशीच्या ओळखीत त्याने सांगितलं, "माझी इतकी पुस्तकं प्रसिद्ध झालीत. इतकी मॅन्युस्क्रिप्ट पडून आहेत." सगळे या त्याच्या मोकळेपणामुळे हसले. तो म्हणाला, "येस... येस... काही मॅन्युस्क्रिप्ट पडून असलेली बरं असतं. आपल्या मृत्यूनंतर आपल्या चौथ्या, पाचव्या... किंवा जी शेवटची असेल त्या बायकोला ते उपयोगी पडतं." त्यावर तर त्या पोशाखी वातावरणातही सगळे मनमुराद हसले.

नीई असुंदरे या ब्लॅक कवीने सांगितलं की, त्याच्या कवितेत आफ्रिकेतल्या तुटणाऱ्या

जंगलाचा आणि पर्यावरणाचा थीम असतो. शिन नावाच्या कोरियन बाईने तिच्या कविता फिलॉसॉफिकल असल्याचं आणि त्यातही तिला झेन फिलॉसॉफीचं आकर्षण असल्याचं सांगितलं. फिलिपिन्सचा नोनिलॉन क्विनो बोलला. तो इंग्लिशमध्ये बोलला असूनही त्याचं इंग्लिश कुणाला कळलं नाही. उच्चारांवर केवढं अवलंबून असतं हे तेव्हा कळलं.

ओळखीच्या कार्यक्रमानंतर बसमधे बसताना ज्याच्याविषयी कुतुहल असेल, त्याच्या शेजारी लोक बसू लागले. नैसर्गिकपणेच जोड्या, ग्रूप्स तयार होऊ लागले. पाकिस्तानचा लेखक या प्रोग्रॅममध्ये आहे असं आधी जेव्हा समजलं तेव्हा जरा काळजीच वाटली होती. हा कसा असेल ? हा जर फंडामेंटलिस्ट असला तर आपलं कसं जमणार ? अगदी युद्ध नेहमीच चालू नसलं, तरी या दोन देशांत शत्रुत्वाची भावना असतेच. तेव्हा हा कसा असेल याची उत्सुकता होती. पाकिस्तानचा वाकस ख्वाजा हा टिपिकल पंजाबी, गोरा, नाकेला, तिशीतला सुदृढ तरुण होता. इम्रान खान वगैरेंची आठवण व्हावी असा. वॉशिंग्टनमध्ये बसमध्ये आम्ही बसलो असताना तबन बसमध्ये चढत होता. तो त्याला म्हणाला, "ओ, यू आर फ्रॉम पाकिस्तान ? माय कन्सोलेशन्स फॉर युवर प्रेसिडेन्टस् अन्‌फॉर्च्युनेट डेथ. . ." (त्याआधी काही दिवसच झियांचं विमान कोसळलं होतं.) त्यावर वाकस पटकन म्हणाला, "कन्सोलेशन्स ? यू शुड कॉंग्रॅच्युलेट अस फॉर दॅट." मी चकितच झालो. तबन खळखळून हसला.

पुढे माझ्या शेजारी तो बसू लागला. मी त्याच्यासाठी जागा ठेवू लागलो. मी त्याला म्हणालो, "तुमचा इम्रान खान आमच्या इथल्या मुलींमध्ये खूप लोकप्रिय आहे." तो म्हणाला, "तुमचे गावसकर, रवी शास्त्री यांचे फोटो आमच्याकडच्या मुलींच्या खोलीत चिकटवलेले तुम्हाला दिसतील." मग क्रिकेटवरून खूप गप्पा. हिंदी सिनेमाचा विषय निघाला. माझा गेल्या दहा-बारा वर्षांत हिंदी सिनेमाचा टच गेलाय. पण वाकसने अगदी ताजे हिंदी सिनेमेही पाहिलेले होते. पुढे आमच्या गाण्याच्या मैफिली जमल्या तेव्हा तो कुठली कुठली जुनी हिंदी गाणी काढायचा. मला आश्चर्य वाटायचं. पण नंतर त्यानं सांगितलं की त्याचे सासरे त्या वेळचे प्रसिद्ध संगीत-दिग्दर्शक होते. त्यामुळे त्याच्याकडे हिंदी जुन्या गाण्यांच्या शेकडो रेकॉर्डस्‌चा संग्रह बायकोमार्फत आला होता. राजकपूर, दिलीपकुमार पाकिस्तानमधे मूळ गावी आले असताना कुठल्याही राजकीय नेत्याचं झालं नसेल, असं उत्स्फूर्त आणि भव्य स्वागत झालेलं होतं, ते त्यानं सांगितलं. मलाही नूरजहानचं मुंबईतलं स्वागत आठवलं. मग आमच्यात खूप मोकळेपणा आला. अर्थात स्वभावातला फरक हा राहतो तसा होताच. तो सफाईदार इंग्लिश बोलायचा. माझा त्या बाबतीत स्वतःवर भरोसा नव्हता. मी अमेरिकन फाइव्ह स्टार ट्रीटमेंटला दबकून गेलो होतो, तो उलट जास्ती क्रिटिकल होता. बसमध्ये आम्ही बसलो की प्रोग्रॅम ऑफिसर पॅसेजमध्ये उभा राहून माणसं मोजायचा. म्हणजे कोणी कमी असल्यास त्याला घेतल्याशिवाय गाडी जाऊ नये. या कृतीचा वाकसला फार राग यायचा. "अशी बोटं दाखवून माणसं कसली मोजताय ? या अमेरिकन लोकांना

कल्चरच नाही. आम्ही काय कैदी की मेंटल पेशन्टस आहोत?" वॉशिंग्टनमधे आमचा भरगच्च प्रोग्रॅम ठेवलेला होता. मला वाटायचं, म्हणजे जास्तीत जास्त बघून घेता येईल. नाहीतरी रूममध्ये बसून आम्ही काय करणार होतो? कार्यक्रमात काही वेळा कंटाळा आला तरी वाटायचं, भारतातही असं होतंच. कुठं आपला वेळ एवढा महत्त्वाचा आहे? पण वाकस सतत म्हणायचा, "काय प्रोग्रॅम? काय प्लॅनिंग? मला तर मी इथं आपला वेळ वाया घालवतोय असंच वाटतंय!" आम्हाला अमेरिकेवर, तिथल्या संस्कृतीवर व्याख्यानं ठेवली होती. आयोवात गेल्यावरही रिफ्रेशर्स कोर्स असायचे. त्यावरही वाकसची प्रतिक्रिया तिखट असायची. "आम्हाला काय ते शाळकरी मुलं समजतात की काय? संस्कृती त्यांनी आपल्याकडून शिकावी." नेहमी माझ्याशी बोलताना 'इन अवर पार्ट ऑफ द वर्ल्ड' असं बोलून त्याच्या कक्षेत तो मला घ्यायचा. मी तिथल्या वातावरणाला दबलेलो असल्याने मला हा त्याचा अहंकार आवडायचा.

त्या वेळी झिया गेल्याने अनिश्चित परिस्थिती निर्माण झालेली होती. बेनझिर भुट्टो अजून निवडून यायची होती. वाकस म्हणाला, "एक वेळ अशी होती की तिला संपूर्ण पाकिस्तानभर अतिशय सहानुभूती होती. पण तिनं काही चुका अशा केल्या की ज्यामुळे ती निवडून येईल की नाही याबद्दल अनिश्चितता आहे." वाकसचे वडील पाकिस्तानातील चार-पाच प्रसिद्ध वकिलांपैकी एक आहेत. भुट्टोंचे ते चांगले संबंधित होते. वाकस म्हणाला, "भुट्टोंना झियाने पकडून खुनाचा आरोप ठेवला तेव्हा माझे वडील त्यांचं वकीलपत्र घेणार होते. पण सरकारमधल्या त्यांच्या उच्चपदस्थ मित्रांनी त्यांना सांगितलं, तुम्ही या भानगडीत पडू नका. झिया सुप्रीम कोर्टाचे जजेससुद्धा बदलून त्यांचं ऐकणारे जजेस आणणार आहेत. सगळा स्टेज मॅनेज्ड खटला आहे. निर्णय ठरलेलाच आहे. तेव्हा तुम्ही त्यात पडू नका. म्हणून वडिलांनी ते ऐकलं." मी त्याला भारतातल्या भ्रष्टाचाराविषयी सांगत असताना तो म्हणाला, "पण पाकिस्तानइतकं करप्शन जगाच्या पाठीवर कुठं असेल असं मला वाटत नाही." एकदा राज्यकर्ते टी. व्ही.चा गरीब देशांत कसा वापर करतात, अशी ग्रूपमध्ये चर्चा चालली होती. वाकस म्हणाला, "पाकिस्तान टी.व्ही. हा राज्यकर्त्यांनी इस्लाममय करून टाकला आहे. सकाळ, दुपार. . . असं पाच वेळा त्यावर नमाज पढतात, बांग देतात. एरवीही कुराणातली वचनं वगैरे चालूच असतं. तेव्हा असं काही असलं की लोक टी.व्ही बंदच करून टाकतात."

एकदा म. गांधींवरून विषय निघाला होता. हा थोडा नाजूक विषय. पण वाकस म्हणाला, "मला गांधींविषयी खूप आदर आहे. पण मधे मी शिक्षणासाठी दोन वर्षं टेक्सासमध्ये होतो ना, तेव्हा भारतीय विद्यार्थी तिथं भेटले. मी अगदी एक्साइट होऊन गांधींची स्तुती करीत होतो, तर ते एकजात गांधींविरोधी बोलत होते. आणि मी गांधींचं समर्थन करीत होतो. असं का झालं?"

मी म्हटलं, "तिकडून इकडे येणाऱ्यांमध्ये आर. एस. एस. किंवा सावरकरवादी लोकांचा भरणा असतो, त्यामुळे असं झालं असणार. ते काही भारतीयांचं प्रातिनिधिक मत नाही."

त्याच सुमारास माझ्या सामाजिक कार्यकर्त्या मित्राचं भारतातून पत्र आलं होतं. त्यानं मुलाचं नाव 'रुस्तुम' ठेवल्याचं कळवलं होतं. मी वाकसला म्हणालो, "हे बघ, आमच्यातल्या कित्येक जणांनी स्वतः हिंदू धर्मात जन्मले असूनही मुलांची मुस्लिम नावं ठेवली आहेत. मुस्लिम समाजाशी माणूस या पातळीवर आपली मैत्री असावी; अनेक धर्मांच्या लोकांचा एक माणूस म्हणून प्रवाह निर्माण व्हावा, असं तिथल्या बऱ्याच जणांना वाटतं."

पुढे पुढे वाकस आमच्या सगळ्या ग्रूपचा केंद्रबिंदूच झाला. मी अधिकृत प्रोग्रॅममध्ये असायचो, नसायचो. त्यामुळे आपसात काय भानगडी चालू आहेत, भांडणं चालू आहेत, कुणाकुणाचे ग्रूप पडलेत, याबद्दल काही माहीत नसायचं. एकदा रात्री उशिरा डाऊन टाऊनमधून मित्राच्या गाडीने येत असताना मारी आणि आईसलँडचा लेखक यांना एकमेकांच्या कंबरेभोवती हात टाकून फिरताना पाहिलं. मी जरा भीतभीतच वाकसला हे सांगताच तो खूप हसला व म्हणाला, "त्यांची भानगड कधीपासून चालू आहे. सध्या त्यांचा 'पोस्ट हनिमून' चालू आहे." आमच्या ग्रूपमधला एक लेखक 'गे' (होमोसेक्शुअल) आहे, ही बातमी वाकसनेच मला पुरवली. मिसिसिपीवर आम्ही बोटीने प्रवास केला. अल्जेरियाचा मोहम्मद मगानी आमच्या ग्रूपमधल्या चिनी लेखिकेला एका बाजूला बाकावर शेजारी घेऊन बसला होता. पाठीवर हात टाकून तिच्या बटांशी खेळत होता. वाकस माझ्या कानाशी म्हणाला, "गेले तीन-चार दिवस त्यांचं कोर्टिंग चालू आहे."

वाकस चांगला कवी आहे. प्रत्येक ठिकाणी काव्यवाचनात तो असायचाच. लाहोर शहरावर त्याने केलेली कविता ही भारतातल्या कुठल्याही ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या शहराला लागू पडेल अशी आहे. तटांच्या पडक्या भिंती, त्यामुळे दिसणारं दारिद्र्य, रस्त्यानं चाललेल्या आलिशान गाड्या, जुने मनोरे, त्यांतून वर गेलेल्या अनेकमजली सिमेंटच्या इमारती... असं काय काय त्यात होतं. एका जीर्ण पण चैनीसाठी वखवखलेल्या आशियायी समाजाचं सध्याचं ते चित्र होतं. वाकस पाकिस्तानात नवीन प्रवाहातल्या लेखक-कवींचा ग्रूप चालवतो. एक साहित्यिक अनियतकालिकही चालवतो.

मी कधी कुठं गायब होऊन परत आलेलो असलो की म्हणायचा, "अनिल, व्हेअर वेअर यू? यू मिस्ड सो मच हियर." मी कुठं कुठं जाऊन आलो ते सांगायचो. मग म्हणायचा, "सो यू वेअर डुईंग समथिंग इम्पॉर्टंट." आम्ही पोर्टलँड, सांताफेच्या टूरवर गेलो. माझी कल्पना, न्यू मेक्सिको हा दक्षिणेकडचा रखरखीत भाग– तिथं कसली थंडी आलीय? म्हणून गरम कपडे फारसे घेतले नव्हते. पण सांताफे हे थंड हवेचं ठिकाण, त्यामुळे पंचाईत झाली. मग वाकसने जाडजूड स्वेटर दिला. पुढे मी स्वतंत्रपणे ग्रँड कॅनियनला जाणार होतो. त्याने मला आग्रहाने स्वेटर ठेवून घ्यायला लावला. ग्रँड कॅनियन, योसेमिती येथे तर बर्फच होते. त्यामुळे त्याचा फारच उपयोग झाला. दोन्ही ठिकाणी माझ्या काढलेल्या फोटोत वाकसचा स्वेटर आला आहे.

माझ्याकडून त्यानं माझं भाषांतरित लिखाण वाचायला मागून नेलं होतं. त्यांत ललित

लेखांबरोबरच, निपाणीच्या विडीकामगारांवरचा, हमालांवरचा असे गरीब लोकांच्या जीवनावरीलही लेख होते. काही दिवसांनंतर ते परत आणून दिले. म्हणाला, "मला यावर तुझ्याशी निवांत बोलायचं आहे. कधी वेळ काढशील?" कॅलिफोर्नियाच्या दौऱ्यावर असताना एक रात्र तशी निवांत मिळाली. त्याने आमच्या इथं आम्ही काय काय उपक्रम करतो ते विचारलं. या सामाजिक कार्यास कशी सुरुवात झाली, काय काय अडचणी आल्या, त्या कशा दूर केल्या... वगैरे अगदी तपशिलातून विचारलं. शेवटी म्हणाला, "मला हे फारच महत्त्वाचं वाटतंय. मी आत्तापर्यंत साहित्यिक उपक्रम करीत होतो, पण आता तुमचं हे ऐकल्यावर वाटू लागलंय की लाइफ इज बिगर दॅन लिटरेचर. आय मस्ट डू समथिंग फॉर द पीपल. काय काय करता येईल?" आम्ही पाकिस्तानात काय काय सामाजिक प्रश्न आहेत याची चर्चा केली. मी भंग्यांची पाहणी केल्याचं त्याला सविस्तर सांगितलं होतं. तो म्हणाला, "आमच्याकडे खूप भंगी आहेत. ते अजूनही त्याच पद्धतीनं काम करतात. पण त्यांचे प्रश्न इतके भीषण असतात हे माहीत नव्हतं. मी गेल्यावर त्यांच्याशी कॉन्टॅक्ट्स जोडणं सुरू करतो. तू पाकिस्तानला का येत नाहीस?"

माझ्या मनात खूप दिवस पाकिस्तानला जायचं चाललं आहेच. माझे दोन डॉक्टर मित्र पाकिस्तानात त्यांच्या विषयातल्या कॉन्फरन्सेससाठी वेगळ्या शहरांमध्ये जाऊन आलेत. ते सांगत होते, "आपण समजतो तसे पाकिस्तानी लोक नाहीत. ते खूप उमदे, फ्रेंडली आहेत. भारताविषयी तर त्यांना खूप उत्सुकता आहे. आमचं ठिकठिकाणी अगदी मनापासून स्वागत झालं, पाहुणचार झाला..." मी वाकसला म्हटलं, "माझंही तिकडं कधीतरी यायचं चाललंय. माग मी पाकिस्तानच्या उत्तर सीमेवरच्या भागात गालिचे करणाऱ्या लोकांवरची डॉक्युमेंटरी पाहिली होती. त्यातली मुलं यंत्रासारखी काम करतात. गाठी मारण्याचं काम करून वयाच्या दहा-पंधरा वर्षांतच त्यांची बोटं निकामी होतात, असं त्यात दाखवलं होतं. अशा लोकांचा पाकिस्तान मला पाहायला हवा आहे."

तो म्हणाला, "तू जरूर ये. तू म्हणशील त्या भागात मी तुला नेईन. माझ्या सगळ्या मित्रांना तू तुमच्या कामाची माहिती सांग. तुझं अगदी प्रत्येक मिनिट आम्ही कारणी लावू."

बसमध्ये बऱ्याचदा आम्ही शेजारी बसायचो. माझ्या पिशवीत बासरी असायची. मला म्हणायचा, 'प्ले समथिंग.' मी वाजवायचो. त्याचा आवाज चांगला नव्हता, पण त्याला हिंदी गाणी खूप माहिती होती. तो ती मला म्हणायला लावायचा. आम्ही कॅलिफोर्नियात मॉन्ट्रीजवळ पॅसिफिकच्या किनाऱ्यावरच्या ॲसिलोमार नावाच्या हॉटेलात उतरलो होतो. रात्री बऱ्याच गप्पा झाल्यावर अकरा-बारा वाजता वाकसने समुद्रकिनारी जायची कल्पना काढली. इतकं थंड वारं सुटलं होतं की, ते आमच्या बंद खोलीचं दार किलकिलं केलं तरी जाणवत होतं. पण सेल्सो, फिलिपी, मगानी, वाकस व मी निघालो. वाकस म्हणाला, "तुझी बासरी असू दे बरोबर." मी म्हटलं, "एरवीही उघड्यावर वाजवणं कठीण असतं– आणि अशा वाऱ्यात ती वाजणार कशी?" तो म्हणाला, "घे तर खरं!"

बाहेर संपूर्ण अंधार पसरलेला. हॉटेलसमोरचा रस्ता ओलांडला की समुद्राकाठची वाळूच सुरू. संध्याकाळीच या हॉटेलात पोहोचल्यानं वाळवंट किती आहे, दगड कुठे आहेत, वगैरे काही माहीत नव्हतं. समोरच्या अंधारातून फक्त पॅसिफिकच्या गर्जनांचा आवाज येत होता. पायांतले बूट वाळूत रुतत चालले होते. वाळूचा गारवा त्या बुटाच्या मोज्यांच्या आतही पायापर्यंत जाणवत होता. पुढे पुढे जात राहिलो. समुद्र आता काही फुटांवर असावा. भोवती धुक्यामुळे आसपासचं काहीच दिसत नव्हतं. आमचं हॉटेल, आम्ही वाळूत बरेच खोल उतरून आल्यानं कधीच दिसेनासं झालं होतं. वाऱ्याचा घों घों आवाज आणि समुद्राच्या गरजणाऱ्या लाटा यांशिवाय दुसरा आवाज नव्हता. वाकस म्हणाला, "अनिल, बासरी वाजव काहीतरी." मी बासरीतून आवाज काढायचा प्रयत्न केला. पण आवाज कसला निघतोय ? शेवटी वाऱ्याच्या उलट्या दिशेला उभा राहिलो. भोवती हे सर्व कोंडाळं करून उभे राहिले. आणि बासरी वाजू लागली. दरबारीचे स्वर निघू लागले. लाटांचे आणि वाऱ्यांचे आवाज कमी होत होत दरबारीच्या सुरात मिसळले गेले आणि भोवतीचा अंधारही.

वाकसशी शेवटी शेवटी खूपच मैत्री झाल्यावर एक प्रश्न विचारायचं धाडस केलं. कारण हा प्रश्न आधी विचारल्यावर कदाचित तो दुरावलाही असता. त्याला विचारलं, "फाळणीविषयी तुझं मत काय ?"

तो पटकन म्हणाला, "इट वॉज ए ग्रेट मिस्टेक, अ ब्लंडर ! आम्ही स्वतंत्र राष्ट्र घेऊन काय मिळवलं ? आम्ही एकसंध राष्ट्र किंवा समाज निर्माण करू शकलो नाही. आम्ही दारिद्र्य हटवू शकलो नाही. आम्ही करप्शन घालवू शकलो नाही. आपला सांस्कृतिक दृष्ट्या एकसंध असलेला देश असा करवतीनं कापल्यासारखा कापता येतो काय ? आपण अगदी एकच आहोत खरे. समजा, फाळणी त्या वेळी अपरिहार्यच होती तर संघराष्ट्र, फेडेरल पद्धत, अशा काहीतरी पद्धतीने आपण एकत्र राहू शकलो असतो."

मी म्हणालो, "फार बरं वाटलं हे ऐकून."

तो म्हणाला, "पण हे केवळ माझंच मत नाही. माझ्या पिढीतल्या अनेकांचं मत आहे."

वाकसशिवाय इतरही काही आशियायी लेखक होते. थायलंडचा सुचार्तो, इंडोनेशियाचा धर्मन मुनीर, फिलिपिन्सचा नोनिलॉन, कोरियाची शिन ताँगचुन. . पण यांपैकी कुणाशी माझं फारसं सख्य झालं नाही. आमच्या पहिल्या भेटीत शिनने "तू योगा करतोस का ? मला इंडियन फिलॉसॉफीत फार रस आहे. मी झेन मानते. आपण बोलू या." असं सांगितलं होतं. तेव्हा वाटलं होतं, हिच्या आपल्या गप्पा होऊ शकतील. पण ती बरीच उथळ निघाली. साइट सिईंगला आम्हाला न्यायचे. कुठंही बस थांबली की आम्ही उतरायचो. शिन तिथल्या एखाद्या पुतळ्यापाशी पोझ घेऊन चेहऱ्यावर कृत्रिम हास्य आणून उभी राहायची आणि आमच्यापैकी कुणालातरी तिच्या कॅमेऱ्याने फोटो काढायची विनंती

करायची. पुढे पुढे प्रेक्षणीय स्थळांचा आम्हाला इतका कंटाळा आला होता की आम्ही बसमधनं खालीही उतरायचो नाही, पण शिन मात्र उतरून फोटो काढून घेणार म्हणजे घेणारच. तिचं ठुमकत चालणं, कृत्रिम बोलणं यावरून नंतर नंतर ती सगळ्यांच्या टिंगलीचा विषय झाली होती. एक तरुण लेखक फिरताना जरा तिच्या बरोबर बरोबर राहत असलेला पाहून वाकसने त्याला हाक मारून आमच्यात बोलावलं, "डु यू नो, प्रोफेसर शिन इज फिफ्टी सिक्स इयर्स ओल्ड ?" त्यानं चेहराच टाकला. (शिन ही तिच्या वागण्यामुळे आणि कोरियन चेहऱ्याच्या ठेवणीमुळे वयापेक्षा खूपच तरुण दिसायची.)

इस्त्राएलचा श्लोमो निसान हा लालबुंद, गोरा, ज्यू लेखक. तो वयाने साठीच्या पुढचा असला, तरी तो ग्रूपमधला बरोबरीचा मित्र झाला होता. श्लोमोला माझा आवडता ज्यू लेखक स्टीफन झ्वाइग आवडत असणारच अशा खात्रीने विचारलं,

"स्टीफन झ्वाइग आवडतो का ?"

तो म्हणाला "ठीक आहे. पण आवडत नाही."

आश्चर्य वाटून मी म्हटलं, "त्याचं वर्ल्ड ऑफ यस्टरडे, रॉयल गेम, बीवेअर ऑफ पिटी आवडलं नाही ?"

तो मान हलवून म्हणाला, "कसं सांगू ? एवढंच सांगू शकेन की इट्स नॉट माय कप ऑफ टी."

श्लोमो एकदा म्हणाला, "मला तुझ्याशी हिंदू धर्माविषयी, हिंदू फिलॉसॉफीविषयी बोलायचंय."

मी म्हणालो, "मी त्यातला अधिकारी नाही. पण त्या धर्मात जन्मलो आहे, म्हणून जेवढी माहिती देता येईल तेंवढी देईन."

एका विमानप्रवासात आम्ही शेजारच्या जागा ॲडजस्ट करून घेतल्या आणि बोलू लागलो. मी हिंदू धर्मातले अनेक देव, अनेक पंथ, अनेक धर्मग्रंथ असं काही सांगू लागताच तो गोंधळलाच. तो म्हणाला, "मला कॉमन क्रायटेरिया सांग. काय केलं असता किंवा काय मानलं असता त्याला हिंदू म्हणावं ?"

मी म्हटलं, "असं काही नाही. रामाला देव मानणारे हिंदू आहेत आणि त्याच्या शत्रूला– रावणाला देव मानणारेही स्वतःला हिंदू समजतात. देवळात जाणारेही हिंदू असतात. कित्येक हिंदू देवळात जातही नाहीत. आत्मा, कर्मविपाक, पुनर्जन्म ही बैठक प्रामुख्याने मानली जात असली, तरी ती न मानणारेही हिंदू आहेत. हिंदूंमध्ये कुणी बंडखोर निघाला तरी त्यालाही इतर हिंदू हे हिंदूच मानतात. आणि कालांतराने तो सामावलाही जातो. एवढंच काय, देव न मानणाराही पंथ आमच्यात आहे."

तो चक्रावलाच. म्हणाला, "हे माझ्या आवाक्याबाहेरचं आहे."

आमच्या ग्रूपबरोबर कॅरी केयीस नावाचा एस्कॉर्ट ऑफिसर होता. लाल गोरा, गोल चेहऱ्याचा, जरा अपऱ्या नाकाचा. डोक्यावर नेहमी नेपाळी लोक घालतात तशी पण जरा

बुटकी टोपी. आतून मागून एक छोटी केसांची वेणी बाहेर आलेली असायची. रेड इंडियन लोकांविषयी सहानुभूती बाळगणारे लोक अशी वेणी हेतूतः वाढवतात. पहिल्याच भेटीत (जेव्हा मला सगळं परकं परकं वाटत होतं) म्हणाला,

"मी भारतात जाऊन आलोय."

आश्चर्याने विचारलं, "कुठं ?"

"आंध्रप्रदेशात. पीस कोअर कार्यक्रमात मी दोन वर्षं तिथं होतो. तेलंगणातील एका खेड्यात. तसा मुंबई, दिल्ली वगैरे शहरांतही थोडे थोडे दिवस होतोच."

"बापरे, दोन वर्षं तुम्ही तिथल्या खेड्यांत कशी काढलीत ? खाणं, अन्न, पाणी, हवा..."

तो हसला व म्हणाला, "मला ते आवडतं."

नंतर समजलं, तो अमेरिकेतल्या ॲपेलेशियन डोंगराळ भागातल्या उंचीवरच्या खेड्यात राहणारा आहे. तो चांगला कवी आहे. त्याच्या भारतातल्या कवितांचं पुस्तक कलकत्त्याच्या एका प्रकाशकाने प्रसिद्ध केलंय. तो वर्षातले तीन-चार महिने हे या लेखकांच्या प्रोग्रॅमबरोबर एस्कॉर्ट म्हणून राहून पैसे मिळवतो आणि उरलेलं वर्ष त्याच्या खेड्यात राहतो, शेती करतो. मला ॲपेलेशियन लोकांविषयी माहिती हवीच होती. हे डोंगराळ भागात राहणारे लोक. अमेरिकन टेक्नॉलॉजी एवढी पुढे गेली असली तरी त्या सुधारणा त्यांच्यापर्यंत पोहोचल्याच नाहीत. अमेरिकेत अशी काही मागास बेटं निर्माण झाली आहेत. दारिद्र्य तर आहेच, पण आता ते टुरिस्टांचं आकर्षणही बनले आहेत. कॅरी म्हणाला, "आता त्यांना सरकारने खूप सवलती दिल्या आहेत. पण त्यांचा लाभ घ्यायला तेच तयार नाहीत."

कॅरीने एकदा आम्ही रात्री बसलो असता त्याची कविता वाचून दाखवली. आंध्रप्रदेशात गेल्यावर पहिल्या दिवशी संडासला उघड्यावर जायचा प्रसंग आला. लोक कुतूहलाने पाहायला जमले. त्या प्रसंगातून तो एका संस्कृतीकडून दुसऱ्या संस्कृतीकडे कसा वळला, ते त्या कवितेत आहे. एरवी बीभत्स वाटेल अशा विषयाचं तपशीलवार वर्णन करूनही त्याचं गांभीर्य कायम राखणं हे किती अवघड आहे आणि किती धाडसाचं आहे ! अशा प्रसंगातून भारतातल्याही एखाद्या शहरवासीयाला पहिल्यांदा खेड्यात गेल्यावर जावं लागतं. पण कुणी अशी कविता लिहिल्याचं मला माहीत नाही.

आमच्या अमेरिकन लेखकांबरोबर गाठीभेटी असायच्या. वॉशिंग्टनजवळच्या बेथेस्डा या उपनगरातील 'रायटर्स सेंटर'मध्ये आमची दिवसभर भेट ठरवलेली होती. एका दुमजली घराचा वरचा मजला म्हणजे रायटर्स सेंटर होतं. तिथं आमच्यापुढे लेक्चर्स आणि त्यावर चर्चा ठेवलेल्या होत्या. संध्याकाळी 'ओव्हर द कॉकटेल्स' त्या भागातील लेखकांबरोबर, निमंत्रितांबरोबर 'गेट-टुगेदर' होतं. अमेरिकनांना आपण इन्फॉर्मल आहोत, हे दाखवायची फार हौस. सेंटरमध्ये सकाळीच गेल्या गेल्या फिलीप जेसन नावाचा नाटककार व सेंटरचा पदाधिकारी आम्हाला सेंटरची माहिती देत होता. तो म्हणाला, "पलीकडची खोली ही

डायरेक्टरची खोली आहे. तिथं आता व्हॅक्यूम क्लीनरने खोली झाडत असलेला माणूस तुम्हाला दिसेल. तो ॲलन (लेफ्कॉविट्झ). तो या सेंटरचा डायरेक्टर आहे. पण स्वभावाने फार गमत्या आहे. तुम्ही ओळख करून घ्यायला गेलात तर भलतेच नाव सांगेल."

कार्यक्रमातील भाषणात ते नवोदित लेखकांचे वर्कशॉप्स घेतात, असं त्यांनी सांगताच मी विचारलं, 'वर्कशॉप म्हणजे नेमकं काय करता ?'

तो म्हणाला, "त्याने कविता लिहून आणली असली, तर ती कुठं बिघडली आहे, काय केलं असता ती चांगली होईल, असं सांगतो. कवितेची शेवटची ओळ हा कवींपुढे नेहमी पडलेला प्रश्न असतो. त्या बाबतीत आम्ही त्यांना मार्गदर्शन करतो."

मी म्हटलं, "ही त्याच्या 'क्रिएटिव्ह प्रोसेस'मध्ये ढवळाढवळ नाही का ?" फ्रेंच 'मारी' ही माझ्या मदतीला धावून आली. म्हणाली, "मी कादंबरी लिहिते. कुणी मला सांगू लागलं की अमुक बदला तर मी कधी नाही ते खपवून घेणार." यावर फिलिप गडबडला. पण हसून सावरून म्हणाला, "आम्ही त्या कवीला सांगतो, नाऊ इट इज फॅंटॅस्टिक. बट इफ यू मेक सम चेंजेस, इट विल बी मोअर फॅंटॅस्टिक." सगळे हसले.

'स्मॉल प्रेस'वर एक भाषण झालं. या शब्दावरून मला वाटलं होतं, छोटा प्रिंटिंग प्रेस. पण ते निघालं तिकडलं लिटल् मॅगेझिन किंवा साहित्यिक अनियतकालिक. वक्ता म्हणाला, "प्रॉफिटकडे लक्ष न देता हे आम्ही काढतो. त्यामुळे मुळातल्या कल्पनेपासूनच हे अन्-अमेरिकन आहे. ते चालवण्यात खूप अडचणी येतात, वर्गणीदार फारसे मिळत नाहीत. पहिल्यांदा जे होतात ते पुढल्या वर्षी कंटिन्यू होत नाहीत. जाहिराती मिळत नाहीत. त्यामुळे निघतात, बंद पडतात. त्यामुळे चांगल्या साहित्याला आता प्रसिद्ध करायला जागाच उरलेली नाही. आता फक्त विद्यापीठातर्फे प्रसिद्ध होणारी साहित्यिक नियतकालिकं उरलीत. पण ती प्रेस्टिज पब्लिकेशन्स असतात. तिथं 'ॲंटी एस्टॅब्लिशमेन्ट' साहित्य प्रसिद्ध होऊ शकत नाही."

मला आश्चर्याचा धक्काच बसला. मला वाटलं होतं, 'सत्यकथे'सारखी मासिकं इथं बंद पडतात. कारण आपल्या समाजाची आर्थिक कुवत नाही. पण या सर्वांत संपन्न देशातही हीच परिस्थिती ! टी.व्ही.मुळे आपल्याकडे वाचकवर्ग कमी झाल्याची तक्रार करतो. तीच तक्रार तेही करतात. एकजण म्हणाला, "टी.व्हीवर एखाद्या पुस्तकावर प्रोग्रॅम झाला आणि गाजला तर ते पुस्तक खपतं, एरवी नाही." टेक्नॉलॉजीमुळे पुस्तकाचे फॉर्म्सही आता कसे बदलत चाललेत ते एकानं सांगितलं. तो म्हणाला, "क्लासिक वाङ्मयाच्या कॅसेटस् निघाल्यात. कारने जाताना पाहिजे त्या लेखकाची कॅसेट ऐकत जाता येतं. पुस्तकाची आता जरूरच राहणार नाही. मॅन्युस्क्रिप्टचे फॉर्म्स बदललेत. लेखक आता कॉम्प्युटरच्या वर्ड प्रोसेसरवर डायरेक्ट आपलं साहित्य अगदी लेआऊट, प्रस्तावना, अर्पणपत्रिकेसह टाइप करतात. प्रकाशकाला मॅन्युस्क्रिप्टचं बाड देण्याची जरुरी नाही. सॉफ्ट-वेअरची एक डिस्क दिली की पुरे. आता पुस्तक छापलं जाण्याचीसुद्धा जरुरी राहणार नाही. डिस्क सरकवली की तुम्ही

पुस्तक कॉम्प्युटरच्या स्क्रीनवर वाचू शकता. अशी अनेक पुस्तकं, मॅन्युस्क्रिप्टस साठवलेल्या कॉम्प्युटरचे तुम्ही मेंबर असलात की तुम्हाला डिस्क घ्यायचीही जरुरी नाही. कसला बुक ट्रेड घेऊन बसला! कॉम्प्युटरवरच्या काळ्या पडद्यावरची चमकती अक्षरं आजपर्यंतच्या व्यावसायिक कल्पनांना, व्यवस्थेला खाऊन टाकणार आहेत."

वाङ्मयीन नियतकालिकांच्या प्रतिकूल अशा परिस्थितीतही 'पोएट्री लोअर' हे नियतकालिक गेली ९९ वर्षं टिकून आहे. पण एवढ्या मोठ्या इंग्रजीभाषक जगात त्याचा खप मात्र फक्त एक हजार आहे. त्यांतले पाचशे अंक लायब्ररीजना आणि पाचशे वर्गणीदारांमध्ये जातात. पण टिकून राहिलंय हेच त्याचं वैशिष्ट्य.

प्रकाशन-व्यवसायाविषयी मला कुतुहल होतं, म्हणून मी तिथं कशी व्यवस्था असते ते विचारलं.

ॲलन म्हणाला, "प्रकाशकांच्या आणि लेखकांच्यामध्ये एजन्टस असतात. ते व्यवहार जमवून देतात आणि स्वतः कमिशन घेतात. म्हणून एजंटांचं आपल्याकडे लक्ष जावं म्हणून लेखक धडपडत असतात. पहिलं पुस्तक बरेचजण स्वखर्चानं काढतात."

संध्याकाळी बरेच लेखक आले होते. त्यांना प्रकाशनव्यवसायाबद्दल विचारलं. एक तरुण, दाढीवाला आणि सोनेरी गोल फ्रेमचा चष्मा लावलेला लेखक म्हणाला, "इथं पहिलं पुस्तक प्रसिद्ध होणं हे फार अवघड आहे. कित्येक वर्षं ओपनिंग मिळायला थांबावं लागतं." थांबून मला विचारलं, "तुला किती वर्षं लागली पहिलं पुस्तक प्रसिद्ध व्हायला?"

मी म्हणालो, "मी एक प्रवासवर्णन बिहारमधल्या पूर्णिया जिल्ह्याचं एका साप्ताहिकात क्रमशः लिहिलं. शेवटचा लेख प्रसिद्ध झाला आणि काही महिन्यांतच पुस्तक प्रसिद्ध झालं."

तो म्हणाला, "काय लकी आहेस तू!"

तिथं उभा असलेला त्याचा मित्र म्हणाला, "पहिल्याच पुस्तकाच्या बाबतीत नाही, तर कुठलंही सिरियस पुस्तक प्रसिद्ध होणं इथं फार कठीण आहे."

"पण मी तर ऐकलंय की इंग्लिश बोलणारं जग एवढं मोठं आहे की इथं मिलियन्समध्येच आवृत्त्या निघतात."

"ती बेस्ट सेलर पुस्तकं. ती वेगळी. तुमच्याकडे सनसनाटी काही असेल तर तुम्हाला प्रकाशक लगेच मिळेल. एखाद्या राजकीय नेत्याबरोबर वेश्येचे संबंध असलेले उघडकीस आलं आणि त्याची खळबळजनक बातमी झाली की मग त्या वेश्येने 'आत्म'चरित्र लिहायचं. असं लिहून द्यायला इथं 'घोस्ट रायटर्स' भरपूर मिळतात. असं पुस्तक लगेच खपतं. समजा, टायसनने (बॉक्सर) लिहायचं म्हटलं तर खपेल. पण सिरियस प्रयत्नांना, समाजाच्या रूढ कल्पनांना विरोध करणाऱ्या साहित्याला अमेरिकेत स्थान नाही."

त्याचे आणखीन दोन-तीन समवयस्क मित्रही गप्पांत आले, सगळे समदुःखी दिसत होते एक म्हणाला, "आता पुस्तकांचे रिव्ह्यूज देणारी नियतकालिकं तरी कुठं राहिलीत? 'न्यूयॉर्क टाइम्स' आणि दोन-चार इतर सोडली, तर कुणी रिव्ह्यू करीत नाहीत तिथं किती

पुस्तकांचे रिव्ह्यूज येऊ शकणार? तुमच्याकडे काय परिस्थिती आहे? तुमच्या पुस्तकांचे किती रिव्ह्यू आलेत आतापर्यंत?"

"मी अकरा पुस्तकं लिहिलीत. प्रत्येक पुस्तकाची दहा-बारा तरी परीक्षणं छापून आली असतील."

तो आश्चर्याने म्हणाला, "बापरे, भलताच लकी आहेस. आमच्याकडे आयुष्यात एखाददुसरा रिव्ह्यू आला तरी लोक स्वतःला धन्य समजतात."

मला मी एखाद्या संपन्न देशातून आलेलो आहे आणि गरीब देशातील लोकांशी बोलतोय असं वाटू लागलं. मी काय लिहितोय ते त्यांनी विचारलं. मी सांगितलं. त्यावर एक तरुण म्हणाला, "तुमचं बरंय. तुमच्याकडे गरिबी, सामाजिक प्रश्न असे लिहायला विषय आहेत. आमच्याकडे तेही नाहीत." मनात आलं, हे म्हणजे फारच झालं. पण तरीही म्हणालो, "का, तुमच्याकडे कितीतरी प्रॉब्लेम्स आहेत–" असं म्हणून मला कळलेल्या तिथल्या कौटुंबिक, सामाजिक प्रश्नांची यादीच बोलून दाखवली. त्यावर तो म्हणाला "आमच्याकडे एखादा प्रश्न उपस्थित झाला की टीव्हीवाले तिकडे धावतात. न्यूयॉर्कसारख्या एका शहरात तेरा-चौदा चॅनेल्स आहेत. ते सर्व संबंधितांच्या मुलाखती घेऊन त्या विषयाचा अगदी चोथाच करून टाकतात. त्यातलं नावीन्य संपतं. मग काय आम्ही जास्तीत जास्त त्याच्यावर भाष्य करणार, जे वाचायला कुणाला इंटरेस्ट नसतो. आमच्यासारख्यांपुढे यशस्वी व्हायचा एक मार्ग म्हणजे टी.व्ही.साठी लिहिणं. ते दुय्यम दर्जाचं साहित्य असतं. त्या वेळात बसवायचं. त्या निर्मात्याला, दिग्दर्शकाला पाहिजे तसं लिहून द्यायचं. दुसरा मार्ग म्हणजे, घोस्ट रायटिंग. ते तर त्याहून वाईट. आम्ही ठरवलंय की काही झालं तरी तडजोड करायची नाही."

मला त्यांच्याविषयी आदरयुक्त अनुकंपा वाटली.

एका संध्याकाळी एक झेकोस्लाव्हॅकियन लेखक डॉ. अर्नोस्ट लुस्टिग यांच्याबरोबर आमच्या गप्पा ठेवलेल्या होत्या. सत्तर-पंचाहत्तरीच्या वयाचे, पूर्ण पांढरे केस झालेले, नाकेले गृहस्थ. पूर्वी झेकोस्लॉव्हॅकियात होते, नंतर ते अमेरिकेत स्थायिक झाले आहेत. ते म्हणाले, "आपण आपल्या देशात लेखक म्हणून एस्टॅब्लिश झाल्यावर मग अमेरिकेत आलात तर तुम्हाला या क्षेत्रात वर जाणं सोपं जातं. कारण तुम्ही तुमच्या देशात वाचकवर्ग तयार केलेला असतो. तुम्हाला कॉन्फिडन्स आलेला असतो. तुमच्या देशात तुम्हाला प्रकाशक मिळणं हे ह्याच्यापेक्षा खूप सोपं असतं. पण इथं येऊन लेखन सुरू करणाऱ्याचे खूपच हाल होतात."

कॅलिफोर्नियातल्या ॲसिलोमारला असताना एका अमेरिकन प्रोफेसरचे आमच्यापुढे व्याख्यान ठेवले होते. ते स्वतः चांगले लेखकही होते. ते म्हणाले, "अमेरिकेतला प्रकाशनव्यवसाय न्यूयॉर्कमधल्या मॅनहॅटन या छोट्या बेटात केंद्रित झाला आहे. अमेरिकेतील तीन चतुर्थांश पुस्तकं न्यूयॉर्कमध्ये छापली जातात. त्यामुळे पुस्तकाच्या धंद्यातील मक्तेदारीमुळे इतर प्रांतांतल्या लेखकांना न्यूयॉर्ककडे डोळे लावून बसावं लागतं.

या परिस्थितीचा तिथं असणाऱ्या लेखकांना जो फायदा मिळतो तो आम्हाला मिळत नाही. ही मक्तेदारी मोडायचा कॅलिफोर्नियातल्या पब्लिशर्सनी खूप प्रयत्न केला, पण त्याचा उपयोग झाला नाही." मला अगदी आपल्याकडच्यासारखी परिस्थिती वाटली. नागपूर, औरंगाबाद, बीडचे लेखक हेच म्हणतात– "तुम्हा पुण्या-मुंबईची या बाबतीत मक्तेदारी आहे. प्रकाशक, वितरक, मासिकांची ऑफिसेस, सगळं तिकडंच. त्यामुळं तुमच्या तिथं राहणाऱ्या सुमार लेखकांनासुद्धा केवळ ओळख आहे म्हणून प्रकाशक लवकर मिळू शकतो, मासिकात लिहिण्याची संधी पटकन मिळू शकते. तसं आमचं नाही." या दोन्ही परिस्थितीत फरक आहे तो फक्त वरवरच्या श्रीमंती-गरिबीचा, पण आतला गाभा एकच.

आमच्याकडे दलित साहित्य एका सामाजिक प्रक्रियेतून वर आलं आणि 'उपरा', 'बलुतं' ही पुस्तकं दर्जा असून उतम खपाची ठरली, तसं तिकडं टोनी मॉरिसन, ॲलिस वॉकर या ब्लॅक लेखिका चांगलं लिहूनही बेस्ट सेलरही ठरल्या. टोनी मॉरिसनचे 'साँग ऑफ सॉलोमन', 'टार बेबी', 'बिलवेड' किंवा ॲलिस वॉकरचे 'कलर पर्पल' ही पुस्तकं अजूनही प्रचंड खपतात. तिकडे एकदा तुम्ही टॉपला जाऊन बसलात की पैसा हवा तेवढा. आमच्या इन्टरनॅशनल रायटर्स प्रोग्रॅममध्ये टोनी मॉरिसन येणार असल्याचं आधी मला भारतात आलेल्या प्रोग्रॅममध्ये छापलं होतं, तेव्हापासून मी खूप उत्सुक होतो. पण तिथं गेल्यावर तिचं नाव दिसेना म्हणून मी प्रोग्रॅमचे मुख्य डीन वुडार्डना विचारलं. ते म्हणाले, "आम्ही एक दिवस त्यांना बोलावलं, त्यांनी किती मानधन मागावं ? दहा हजार डॉलर्स ! आम्हाला ते परवडण्यासारखं नव्हतं म्हणून आम्ही त्यांना आणू शकलो नाही." एक दिवस मोडून दोन तास भाषणाला यायचे ती बाई दीड लाख रुपये मागू शकते– की जे खुद्द अमेरिकन सरकारलाही देणं परवडत नाही ! एकदा 'स्टार व्हॅल्यू' आली की मग ते त्याची किंमत मागू लागतात. पी.टी. उषा सुवर्णपदकं मिळवून आल्यावर भारतात सत्कार सुरू झाले. पुण्याच्या मॅरेथॉनला तिला उद्घाटक म्हणून बोलवायला संयोजक गेले, तिच्या सेक्रेटरीने पन्नास हजार मागितले, तेही 'तुम्हाला म्हणून.' पण सगळ्या व्यवस्थेत खरी कुचंबणा होते ती नवे प्रयत्न करणाऱ्या, नवी आकलनं मांडणाऱ्या, अप्रसिद्ध तरुण लेखक-कवींची.

आयोवात आल्यावर यासारख्या विषयावर परिसंवाद व्हायचे, किंवा आपसातही चर्चा व्हायच्या. ग्रूपमधल्या बहुतेक देशांमध्ये हुकूमशाही किंवा हुकूमशाहीसदृश परिस्थिती असल्याचं कळलं तेव्हा धक्काच बसला. नायजेरियाचा नीयी म्हणाला, "मी पूर्वी साप्ताहिकातून कॉलम लिहीत असे. माझ्यावर सरकारी दडपण येऊ लागलं तेव्हा मी स्ट्रॅटेजी बदलली. मी कविता लिहू लागलो. कविता हे गद्यापेक्षा अप्रत्यक्ष आणि सेन्सॉरला कळायला अवघड माध्यम." असं बऱ्याच जणांनी केलेलं आढळलं. त्यामुळे अशा देशामध्ये कवी भरपूर आहेत. कविताही चांगली आणि सिरियसली लिहिली जाते आणि गुप्तपणे ती प्रसारित होत असते. तिथल्या लोकजीवनात कवितांना आपल्यापेक्षा कितीतरी

महत्त्वाचं स्थान असतं. कारण त्या सगळ्या भरडपट्टीत लोकांचा कॉन्शन्स फक्त कवितेद्वारा व्यक्त होत असतो. एका परिसंवादात फिलिपी ग्वाटेमालातल्या वातावरणाविषयी ओझरतं बोलला, पण नंतर तो स्वतःच घाबरला. मी त्याला म्हटलं, "अमेरिकेतल्या मध्यावरच्या छोट्या शहरातल्या एका क्लासरूममध्ये पंचवीस-तीस लोकांसमोर- आणि तीही आपल्यातलीच मंडळी- तू जे बोललास ते तुझ्या राज्यकर्त्यांपर्यंत कसं जाईल ?" तो म्हणाला, "तुम्हा लोकांना हुकूमशाहीत राहणाऱ्या लोकांची मनःस्थिती काय असते हे समजणारच नाही. त्यांना मी काय बोललो हे समजायची गरजच नाही, मी काहीतरी विरुद्ध बोललो एवढं कानावर जरी गेलं तरी माझी धडगत नाही. मी डिसॲपिअरच होईन."

या सगळ्यांच्या बोलण्यातून माणूस डिसॲपिअर होण्याचं नेहमी यायचं. मी आश्चर्याने विचारायचो, "असं कसं शक्य आहे ?" ते म्हणायचे, "एखादा माणूस असा नाहीसा झाला की त्याच्या नातेवाईकांना, मित्रांना नंतर काहीसुद्धा कळत नाही. जेलमध्ये ठेवण्याचा खर्च येतो. त्यापेक्षा बंदुकीची एक गोळी कितीतरी स्वस्त." मला ही अतिशयोक्ती वाटायची. म्हणून मी जरा पाहणीसारखेच प्रत्येकाला प्रश्न विचारले. या देशांमधल्या प्रत्येक लेखकाच्या आसपासचे किमान चार-पाच जण तरी नाहीसे झाल्याचे त्यांना माहीत होते. मेक्सिकोतला लेखक आमच्या ग्रूपमध्ये नव्हता. मला एका अमेरिकन कार्यकर्तीने सांगितले, "मेक्सिको हा देश तर नाहीसे होण्यासाठी सर्वांत प्रसिद्ध देश आहे."

हे लोक मला विचारायचे, "तुझ्या लिखाणावर काही बंधनं नाही का येत ?" "मी काही वेळा लोकांच्या काही रूढ कल्पनांविरुद्ध लिहिलंय. म्हणून त्या त्या वेळी संबंधित लोक रागावले. पण थोड्याच दिवसांत ते विसरूनही गेले. त्यांतले पुढे माझे चांगले मित्रही बनले आहेत. पण सरकारकडून तर काहीच प्रश्न आला नाही."

त्याच वेळी सलमान रश्दीच्या पुस्तकावर भारतात बंदी घातल्याचं वृत्त आल्यावर त्यांनी विचारलं, "हे कसं काय ?" मी म्हणालो, "हा विशिष्ट राजकीय परिस्थितीत घडलेला अपवाद आहे. आणि तसं करणं चुकीचं आहे, असं मी मानतो. पण माझ्या इतक्या वर्षांच्या आठवणीत अशी एक-दोनच पुस्तकं असतील." त्यांना वाटायचं, जितका देश गरीब तितकी कडक हुकूमशाही. तसं जगभरचं समीकरणच आहे. भारत तर किती गरीब आहे हे हाच सांगतोय, आणि वर लिहायचं, बोलायचं भरपूर स्वातंत्र्य असल्याचंही सांगतोय.

हुकूमशाही देशात लेखनस्वातंत्र्याची गळचेपी आणि अमेरिकेसारख्या संपन्न देशात चांगल्या साहित्याला प्रकाशक न मिळाल्याने तिथेही वेगळ्या तऱ्हेची गळचेपी, मग लिहिण्याचं स्वातंत्र्य आहे तरी कुठे ? अशी जोरजोरात चर्चा चालली होती. कॅरी शांतपणे म्हणाला, "तुम्हाला हे चमत्कारिक वाटेल, पण सगळ्या जगात अनेक बाबतीतलं स्वातंत्र्य भारतात आहे. भारतात लेखनस्वातंत्र्य तर आहेच, पण गायींना रस्त्यात उभं राहण्याचं, प्राण्यांना मोकळेपणाने वावरण्याचं स्वातंत्र्य आहे. एखाद्याला मनात आलं तर तो शेळी पाळू शकतो. अमेरिकेत असा एखादा प्राणी पाळायचा असेल तर म्युनिसिपल आरोग्यखात्याचे

इतके नियम असतात की आपल्याला ते नियम पाळणं शक्यच नसतं. अशा कितीतरी गोष्टी!"

सगळे हसू लागले. कॅरी म्हणाला, "हसा, पण मी सिरियसली बोलतोय."

मला खरोखरीच, मी अशा देशाचा असल्याबद्दल खूप बरं वाटलं.

मराठी ग्रंथ संग्रहालय
प्रवास
वा. क्र. ७४५
२६६५०

## ★★★★★ *

# आयोवा मुक्काम

मे फ्लॉवर रेसिडेन्स हॉल या आठमजली इमारतीच्या आठव्या मजल्यावरील मला दिलेल्या छोट्या फ्लॅटच्या सरकत्या संपूर्ण काचेच्या खिडकीतून खाली पाहिलं, आणि हायसं वाटलं. हिरव्यागार उंच टेकड्यांमधून, मधे पांढऱ्या रेघा आखलेला काळाशार ड्युब्यूक स्ट्रीट, धबधब्यावरून पडणाऱ्या पाण्यासारख्या वेगाने येऊन मेफ्लॉवरसमोर संथ होऊन सपाट मार्गाने आयोवा शहराकडे निघून गेलेला होता. समोर जिकडे पाहाल तिकडे हिरवा रंग होता. रस्त्यापलीकडे हिरवळ होती, त्या पलीकडे दाट, उंच गर्द झाडी होती. झाडीतून वाहत आलेली शंभरेक फूट रुंदीची, पाण्याने पूर्ण भरलेली आयोवा नदी दिसत होती. नदीपलीकडेही दाट झाडी, त्यात आयोवा शहराच्या बाजूला पाहिलं तर झाडीतून वर आलेल्या टॉवर, चर्चसारख्या इमारती तुरळक दिसत होत्या.

आयोवाला येण्यापूर्वी या शहराचं किंवा राज्याचं देखील नाव ऐकलेलं नव्हतं. अमेरिकेत जाऊन आलेल्यांना विचारीत होतो, तर लोक सांगायचे,"आयोवा ना? आपल्याकडे कसं बीड, उस्मानाबाद मागासलेलं आहे ना, तसा हा प्रांत आहे. न्यूयॉर्कमध्ये कसं चैतन्य आहे, कल्चर आहे, तसं इथं काही नाही. निसर्गाच्या दृष्टीने म्हणशील तर अगदी सपाट भाग आहे. मक्याशिवाय काही पिकत नाही. . ." आणि आता पाहतो तो बघाल तिकडे हिरवी उंच, गच्च झाडी, उघडी जमीन कुठं नाहीच, सगळी हिरवळीने मढलेली. आणि माझ्या खिडकीसमोर तर तुडुंब भरलेली नदी. . . रम्य निसर्गदृश्यं पाहिली होती, पण इतक्या समोर कधी राहिलो नव्हतो.

आयोवा नदीच्या पाण्याप्रमाणेच मी तिथले तीन महिने अगदी संथपणे जगलो. एक बेडरूमवजा मोठी खोली आणि छोटी, लांब आकाराची अभ्यासिका एवढी जागा पूर्ण माझ्याकडे. किचन आणि टॉयलेट हे दोन फ्लॅट्स् मिळून समाईक होते. दुसऱ्या फ्लॅटमधे इंडोनेशियाचा धर्मन मुनीर राहायचा. सगळे त्याच्या नावाचा उच्चार 'डारमन' असा करायचे. किचन आणि टॉयलेटला दोन्ही फ्लॅटकडून दारं होती. मी निवांत जगण्याच्या इच्छेपोटी धर्मनशी जितक्यास तितके संबंध ठेवायचे ठरवले होते. तो मांसाहारी होता.

सिगारेट ओढणारा होता. मी हे दोन्हीही नव्हतो. ते मी त्याला आधीच सांगितलं. त्याने किचनमधे कधी सिगारेट ओढली नाही आणि स्वयंपाक करायची भांडी अलगही ठेवली होती. फ्रीजमध्ये माझे टोमॅटो, दूध, चीज आणि त्याची अंडी, हॅम हे शेजारी नांदत, पण कोणाचंच काही खटकलं नाही. रात्री उशिरापर्यंत तो टाईपरायटरवर टाईप करीत बसलेला असायचा. सकाळी किचनमधे गाठ पडल्यावर त्या आवाजाचा त्रास झाला का विचारायचा. पण मला कधी कणही आवाज आला नाही. याउलट इतर लेखकांच्या बाबतीत, आधी पार्टनरच्या गळ्यात गळा आणि नंतर कुरबुरी. शेवटी पार्टनर बदलाबदलीपर्यंत पाळी आली होती. एक जण तर अल्कोहोलिक असल्याने त्याच्याबरोबर किचन शेअर करायला कुणी तयार नसे. त्यामुळे या बाबतीत मी निश्चिंत झालो होतो.

सकाळी उठल्यावर निवांत आवरायचो. टॉयलेट विभागात मोठ्ठं टब होतं. बेसिनपासून प्रत्येक ठिकाणी शेजारी गरम-गार पाण्याचे नळ होते. इथली गार पाण्याच्या आंघोळीची सवय तिथंही चालू ठेवली होती. मी गेलो त्याला तिथले लोक उन्हाळा म्हणत असले, तरी आपल्या हिवाळ्यासारखी थंडी होती. मी येईपर्यंत बर्फ पडू लागलं होतं. तरीही मी गार पाण्याची आंघोळ करीत राहिलो. शेवटी सुनंदाने इकडून पत्र लिहिलं की तिकडे आजारी पडू नकोस आणि हे प्रयोग बंद कर, तेव्हा दुसरा गरम पाण्याचा नळ थोडा सोडून थंड पाण्याचा काटा मोडण्याइतकं कोमट करू लागलो. आंघोळीनंतर निवांतपणे योगासनं. इकडल्या योगवर्गाच्या आगाशे गुरुजींची आणि वर्गातल्या इतर लोकांची आठवण काढत काढत. मग दार उघडून 'डेली आयोवन' हे वर्तमानपत्र आत आणायचं. माझा चहा म्हणजे बिनदूध, बिनसाखर. कूकिंग रेंजवर पाणी उकळलं, कपात घेतलं की टी बॅग टाकायची आणि दोन-तीन सेकंदात परत उचलायची की झाला चहा. 'डेली आयोवन' हे पत्र फुकट यायचं. ते सर्व युनिव्हर्सिटी विद्यार्थी, प्राध्यापक व संबंधितांना फुकटच मिळतं. पंधरावीस पानं असायची. पेपरचा दृष्टिकोन उदारमतवादी, डेमोक्रॅटिक पक्षाला अनुकूल होता, त्यामुळे लेख, बातम्या, व्यंगचित्रं पाहायला आवडायचं. ती सोमवार सकाळ असली तर घरी पत्र लिहायचो. आठवड्यातून एकतरी पत्र लिहीन असं मुलींना, सुनंदाला कबूल केलेलं होतं. कधीही पत्र लिहिलं आणि ते लक्षात न राहिल्यास उगाच गॅप पडेल म्हणून वार ठरवून घेतला होता.

इथं आल्यापासून सगळं परकं वातावरण. सुरुवातीला भाषा, उच्चार कळायचे नाहीत, त्यामुळे घरची आठवण खूपच व्हायची. पत्र लिहिण्याचा काळ घरच्यांबरोबर जगायला मिळतो म्हणून आवडायचा. पत्रात इकडल्या सगळ्यांची आठवण काढायचो. तिथं गेल्यावर लक्षात आलं की आपलं पुण्यातलं कुटुंब चौघांचं असलं तरी ते वगळूनही आप्त आणि मित्रपरिवाराचं केवढं मोठ्ठं कुटुंब आहे! कितीतरी लोकांनी त्यांना पत्र लिहिण्याविषयी बजावलं होतं. या सगळ्यांना लिहायचं म्हटलं तर आयोवाचा मुक्काम पत्र लिहिण्यातच आटोपला असता. सुरुवातीला बरेच दिवस मला इकडून एकही पत्रच आलं नाही.

मेफ्लॉवरमध्ये तळमजल्यावर प्रत्येकाच्या नावाच्या स्टीलच्या, मध्ये छोटी काचेची खिडकी असलेल्या पोस्ट बॉक्सेस होत्या. खाली उतरलो की आशेने तिकडे जायचो, पण लांबूनच काचेच्या छोट्या खिडकीतून रिकामी पोस्ट बॉक्स दिसायची. तरीही किल्ली लावून कुठे तळात पत्र पडलं असेल म्हणून उघडून पाहायचो, पण मागून मोकळी असलेली, धातूंच्या चार भिंतींची रिकामी बॉक्स दिसे. मी एका मित्राला म्हणालोही, "मी कधी कविता केली नाही, पण ही रिकामी बॉक्स पाहून मात्र कविता कराविशी वाटतेय." तो म्हणाला, "मग थांबला काय? गो अहेड." पण ते करणं जमलं नाही. कधी कधी गावातल्या काही दुकानांच्या जाहिराती, पिझ्झा आणि तत्सम पदार्थांची स्वस्त कूपन्स असा काय काय कचरा बॉक्समध्ये येऊन पडायचा, पण पत्र नाही. माझी कॅनडातली बहीण नेहमी म्हणते, "काय, तुम्ही पत्र लिहीत नाही. तुम्ही कोणी कधी लिहायचं ठरवून घेतलं तर मला रोज पत्र येईल." तिचा टोरांटोहून मला आयोवात रात्री उशिरा फोन यायचा, तेव्हा ती म्हणायची, "आता कळतंय ना, मी कशी इकडे वाट पाहत असते तुमच्या पत्राची ते? तू तीन-चार महिन्यांत परत जाणार आहेस, आम्ही वर्षानुवर्षं अशीच वाट पाहणार."

शेवटी महिन्याने एकदाचं सुनंदाचं पत्र आलं. आणि मग ओघच सुरू झाला. ती दिवसभराचं काम संपवून रात्री साडेदहाला दवाखाना संपवून घरी आली की कितीही दमली असली तरी पत्र लिहायची. त्यामुळे तर वाचताना तिच्याबरोबर दिवस जगतोय असं वाटायचं. यशोचं स्वभावाप्रमाणे सरळ भोळं भाबडं पत्र यायचं. मुक्ती एरवी 'आपल्याला कुणाची गरज नाही,' अशा अलिप्ततेने वागते. तिचं पत्र वाचताना ती आतून किती विवश आहे, बाबाच्या परत येण्याची तिला किती ओढ लागलीय हे स्पष्ट जाणवायचं. आमच्या काम करणाऱ्या बाईचा छोटा मुलगा आहे, तो मी इकडे आल्यावर पंधरावीस दिवस जेवेनासा झाला. दार वाजलं की 'बाबा' म्हणून तिकडे बघतो, असं त्याच्या सातवी शिकलेल्या आईनं तोडक्या मोडक्या अक्षरात कळवलं. पूर्वी गुन्हेगारीत सापडलेल्या, पण माझ्या पोलिस इन्स्पेक्टर मित्राने वाचवलेल्या एका तरुण मुलानं लिहिलं की, 'मी नीट आहे, गणपतीत गडबड करणार नाही, काळजी करू नये.' मुक्तांगणमधे बरे झालेले व्यसनी म्हणजे सुनंदाची 'मुलं' आणि त्यांच्या बायका या माझ्या 'मुली'. या मुलामुलींची पत्रं येऊ लागली. मी आठ-दहा दिवसांच्या ट्रीपला आयोवाबाहेर गेलो, आणि आल्यावर पाहतो तो बॉक्स गच्च भरलेलं. पस्तीस की छत्तीस पत्रं. उद्या सकाळी निवांत वाचू असं ठरवलं, पण एक पत्र वाचायचा मोह झाला आणि सगळी पत्रं संपस्तोवर रात्रीचे तीन वाजले. प्रविणाला हे फोनवर कळवताच ती म्हणाली, "मला तर अगदी जेलस वाटतंय तुझ्याबद्दल."

महिन्यातून एकदा भारतात फोन करायचो. मी मेफ्लॉवरमधे सामान ठेवतोय तोच एक माणूस येऊन फोन बसवून गेला. अक्षरशः पाच मिनिटांच्या आत. लोकल कॉल्स फुकट! फक्त लाँग डिस्टन्स कॉल्सला पैसे पडत. त्यातही संध्याकाळी सात ते सकाळी सहा निम्मा दर. पहिला घरी फोन लावला आणि सुनंदाचा, मुलींचा आवाज ऐकला तर कानशिलं, सगळं

अंग गरम झालं. नंतर कितीतरी वेळ पडून सगळं संभाषण रिवाईंड करून पाहिल्यासारखं आठवत बसलो. तिकडनं पत्र यायला पंधरा दिवस लागायचे, फोनवर ताज्या बातम्या मिळायच्या. नुकत्याच आलेल्या पत्रातल्या आणि फोनवरच्या माहितींमध्ये चमत्कारिक गोंधळ उडायचा आणि गंमत वाटायची. रात्री उशिरा आल्यावर अमेरिकेतल्या मित्रमैत्रिणींना, मेडिकल कॉलेजमधल्या, आता इथं स्थायिक झालेल्या वर्गमित्रांना फोन लावायचो. फोनवर अनेक वर्षांनी माझा आवाज ऐकून ते चकित व्हायचे. मी भारतातून येताना सगळ्यांचे फोन नंबर्स त्यांच्या घरून, मित्रांकडून घेऊन आलो होतो. कॅलिफोर्नियातल्या हरीश पोरेचा आणि दिलीप जेस्तेचा, डेट्रॉइटच्या आशा भोगावकर आणि कॅनडातल्या प्रतिभा आगाशेचा पत्ता, फोन माहीत नव्हता. तो मी दिला आणि त्यांना एकमेकांना फोन करायला लावले. अशा रीतीने आमच्या अमेरिकावासी वर्गमित्रांचं संमेलन मी फोनवरच उरकलं. फोन करताना टाइमझोनची भानगड लक्षात घ्यावी लागे. मी न्यूयॉर्कच्या मित्राला फोन केला. जांभयांचे आवाज ऐकून त्याला मी विचारलं, "जांभया काय देतो आहेस?" तो म्हणाला, "आता इथले रात्रीचे साडेबारा वाजले आहेत." आयोवा अमेरिकेच्या मध्यावर आहे. पूर्व किनाऱ्यावर फोन करताना एक तास मिळवावा लागायचा, तर पश्चिम किनाऱ्यावर कॅलिफोर्निया साईडला दोन तास वजा करावे लागायचे. ही भानगड भारतात नाही. कॅनडा तर अधिक उत्तर ध्रुवाजवळ जातो. तिथं रेखांश अधिकच जवळ त्यामुळे तिथं तर जास्त टाइम झोन पडलेले असायचे.

आमच्या रायटर्स प्रोग्रॅममधे जायला मी थोडा दबकायचो. मागेमागेच राहायचो. मराठी माध्यमाच्या शाळेत शिकलेलो असल्याने इंग्लिश सभ्यता अवगत नव्हती. आमचा ग्रूप गप्पा मारीत उभा असला, तर मला नेहमी जाणवायचं की, आपण एखाद्या विषयावर इंग्लिशमध्ये बोलू शकतो, कारण ते बरंचसं पूर्वी ठरलेलं असतं. पण इथं हा असं बोलल्यावर त्यावर आपल्याला बोलायला त्या वेळी शब्द आठवायचे नाहीत. त्या त्या संस्कृतीच्या संभाषणाची धाटणीही वेगळी असते. मला त्यांचं बोलणं ऐकताना अनेकदा चांगले विनोद सुचायचे. पण तेव्हा समजलं की परभाषेतली सगळ्यात अवघड गोष्ट असते ती म्हणजे विनोद करण्याची. असे तिथं सुचलेले अनेक विनोद मी जागीच गिळलेले आहेत. (त्यामुळे माझं वजनही वाढलं.) तेव्हा साहजिकच माझा सहवास कुणाला अगत्याचा नसणार, या कल्पनेनं मी मागेमागे, शक्यतो एकटा राहायचो. त्यांत बरेचसे ते कवी होते. मला कवितेतलं आणि त्यातही इंग्लिशमधल्या कवितेतलं जवळपास काही कळत नाही, त्यामुळे हा अलगपणा आणखीनच वाढत गेला.

सकाळी पत्र लिहायचं नसलं, तर वाचन किंवा लेखन करायचो. माझ्याबरोबर माझ्या आगामी पुस्तकांची कात्रणं आणली होती, ज्याची प्रस्तावना लिहायची होती, ती लिहून टाकली. भंग्यांवरचं पुस्तक पूर्ण करायचं ठरवलं पण कंटाळा आला. विचार केला, ते भारतातही पुरं करता येईल, इथला वेळ त्यात का घालवायचा? मग मेक्सिकन मजूर, ड्रग्ज,

अमेरिकेतली गरिबी आणि कू-क्लक्स क्लॅन संघटना या विषयावर आणून ठेवलेली भरपूर पुस्तकं टेबलावर होतीच. त्यांतले काहीबाही वाचू लागलो. आणि आजवर कधी न केलेलं, पुस्तकांच्या नोट्स् काढण्याचं काम शहाण्या मुलासारखं करू लागलो.

दुपारी अकरा-बारा वाजता खाली लिफ्टने उतरायचो. आमचा आठवा मजला हा 'इंटरनॅशनल रायटर्स'ना दिलेला असला, तरी खालचे सातही मजले विद्यार्थ्यांचे वसतिगृह (डॉरमेटरी) होते. फरक एवढाच की आम्ही ज्या जागेत एकटे राहत होतो तिथं दोन दोन किंवा तीन तीन मुलं राहायची. बहुतेक मुलं-मुली पांढऱ्या, पातळ कापडाच्या, लांबीला गुडघ्यापर्यंत असलेल्या, दादा कोंडके स्टाईल हाफ पँट मध्ये असायची.(दादा कोंडके इथेही एवढा लोकप्रिय ?) वरती एखादा टी शर्ट किंवा बनियन. हा वेष थेट बर्फ पडेपर्यंत. नंतर फुल पँट, जर्किन्स दिसू लागत. ही सगळी गोरी, उंच, सोनेरी केसांची मुलं-मुली. काळे अगदी क्वचित. गोऱ्यांव्यतिरिक्त त्यातल्या त्यात चिनी चेहऱ्याची मुलंच दिसायची. खाली पोर्चमध्ये भिंतींवर पिवळ्या किंवा ऑरेंज कागदांवर काळ्या मार्करने फूटबॉल, सॉकरच्या मॅचच्या अनाउन्समेंट्स्, टाइपरायटर, पुस्तकं इ. विकणं आहेच्या वैयक्तिक जाहिराती इ. लिहिलेल्या असायच्या. काचेची डबल दारं उघडली की बाहेरची गार हवा लागायची. बोचरा वारा केसात, कानात शिरायचा. पायऱ्यांवर मुलं बसची वाट पाहत बसलेली दिसायची. मी जाऊन एखाद्या रिकाम्या पायरीवर जाऊन बसायचो. आम्ही रायटर्स प्रोग्रॅमवाले लोक त्यांच्या मानाने जरा वयस्क दिसायचो. त्यांच्या कुतूहलाचा विषय असायचा. वेगळ्या कळपातल्या जनावरांसारखे ते थोडे खुन्नसने पाहायचे, पण कधी कुणी बोललं नाही.

आम्ही आलो त्या दिवशीच प्रोग्रॅमच्या लोकांनी तिथल्या बसेसचं वेळापत्रक आयोवाचे नकाशे, निरनिराळे रूट्स (इथे ते राऊट्स् म्हणायचे) इ. मटेरियल दिलेलं होतं. आयोवा शहर म्हणजे युनिव्हर्सिटीचंच शहर. सगळा परिसर म्हणजे युनिव्हर्सिटीचा कॅंपस. बसेसही युनिव्हर्सिटीच्या. कॅंपस-बसचा 'कॅम्बस' (Cambus) असा खास अमेरिकन शॉर्टफॉर्म केलेला. तर ही कॅम्बस वेळापत्रकाप्रमाणे 'मिनिट टु मिनिट' म्हणणे हेही भरड होईल, पण जवळपास सेकंद टु सेकंद चालायची. बारा दहाची बस बारा नऊ, साडेनऊपर्यंत दृष्टिपथातही नसायची, पण त्या वेळेला ती थांबलेली असायची. दारं आपोआप उघडली जायची. ड्रायव्हर बहुदा गोरी, सोनेरी केसाची, चुईंगगम चघळणारी तरुण मुलगी असायची. तांबारलेल्या डोळ्यांचा, बिडी पिणारा, शिवी हासडणारा बसचा ड्रायव्हर ही जन्मापासून रुजलेली आपल्याकडची रूढ प्रतिमा होती, तिचा या प्रथमक्षणीच चक्काचूर झाला. नंतर समजलं की ही सगळी पार्टटाईम कामं असतात. युनिव्हर्सिटीचे विद्यार्थीच बहुदा ही कामं करतात. या ड्रायव्हर मुली बस थांबल्यावर चाकावर कोपर टेकून, चढणाऱ्या प्रवाशांकडे हसतमुखाने पाहत असायच्या. कुणी 'विश' केलं तर विश् करायच्या. कानाला वॉकमनसारखा हेडफोन असे. बसमध्ये अर्ध्या मिनिटात सगळे चढून बसले की वायरलेस

सेट ऑन करून सांगत, अमक्या ठिकाणापाशी मी आहे, आणि आता निघते आहे. तिकडून काही न कळणाऱ्या खरखर आवाजात सूचनाही यायच्या. आयोवा एवढंसं गाव. कुठूनही कुठे जा चारपाच मैलांत गाव संपायचं. त्यातल्या या बसेस कुठेही अडचण न येता सतत चालत असतात. त्यात हा एवढा मिनिट टु मिनिट संपर्क ड्रायव्हरशी कशाला ठेवतात, कोण जाणे. पहिल्या दिवशी मी ड्रायव्हर मुलीला तिकीट किती आणि कुठं काढायचं विचारलं. ती जे म्हणाली ते मला कळलं नाही. गाडीतली मुलं हसू लागली. नंतर समजलं की बसला तिकीटच नाही. कुठूनही कुठे, कितीही वेळा जा. मी हे घरी नवलाईनं कळवलं तर मुक्तीचं पत्र आलं, 'सुरेखाला (काम करणाऱ्या मुलीला) हे अजून खरंच वाटत नाही आहे.'

बस अगदी गर्दीच्या वेळीसुद्धा जेमतेम निम्मी भरलेली असायची. त्यामुळे गडबडीने चढून जागा पकडणं किंवा रांगेत पुढं सरकण्यासाठी धक्काबुक्की करणं ही भानगडच नाही. रात्री बाराची बससुद्धा त्या स्टॉपला जवळपास त्या सेकंदाला येणार असल्याने माणसं निवांतपणे उभी असायची. बस स्टॉप तीन बाजूंनी काचेने बनवलेले असायचे. थंडीच्या दिवसांत बोचरे वारे वाहू लागल्यावर त्या आडोशांचं महत्त्व कळलं.

ड्युब्यूक स्ट्रीटवरून बस मुख्य गावाकडे– डाऊन टाऊनकडे धावू लागायची. स्वच्छ रस्ते, त्याशेजारी हिरवळी, त्यावर मोठमोठे वृक्ष, आत विस्तृत आवारातील पांढऱ्या रंगाचे बंगले. आपल्याकडे शहरात चार-चार मजली सिमेंटच्या चाळवजा अपार्टमेंट, बिल्डिंग्ज असतात, तशा इथं नव्हत्या. सगळी घरं सुटी सुटी, बंगलेवजा, उतरत्या, काळ्या, हिरव्या किंवा लाल रंगाच्या छपरांची. बाहेरच्या भिंती विटा, व आतल्या भिंती प्लॅस्टर बोर्डने बनवलेल्या. सगळ्या लाकडी कामाला पांढरा ऑईलपेंट दिलेला. शहरातल्या मुख्य मुख्य इमारती घडीव दगडांच्या, जुन्या ऐश्वर्यशाली वळणाच्या. ओल्ड कॅपिटल बिल्डिंग, पोस्ट ऑफिस, कौन्सिल हॉल वगैरे इमारती घुमटाच्या किंवा कॅसलसारखे बुरूज असलेल्या. कुठेही भडक रंग दिलेली इमारत नव्हती. चर्चच्या पूर्ण छपराला तांब्याचे पत्रे बसवलेले, पण चकचकाट नव्हता. बस नदीकाठाने जाऊ लागे. नदीत भरपूर बदकं दिसत. काठाकाठाने युनिव्हर्सिटीच्या इमारती होत्या, त्याच्या आवारातल्या हिरवळीवर ही हिरव्या मानेची बदकं कुटुंब कबिल्यासह स्वैरपणे हिंडताना दिसत.

पहिले दोन-तीन स्टॉप्स बसमध्ये मेफ्लॉवरसारख्या डॉर्मेटरी बिल्डिंग्ज जवळ असल्याने विद्यार्थ्यांची आवक होत असे आणि पुढे जसजशी डिपार्टमेंट्स् लागत तसे विद्यार्थी उतरून जात असत. चर्च मागे टाकली की डाउन टाउन सुरू होई. दुकानं दुकानं लायनीने दिसू लागत. बुक शॉप्स, सलून्स, झेरॉक्स, स्टेशनरीच्या पाट्या दिसत. ओल्ड कॅपिटल शॉपिंग कॉम्प्लेसची मोठी इमारत मागे पडली की लायब्ररी बिल्डिंग दिसू लागे, मग मी उतरायची तयारी करू लागायचो.

लायब्ररी ही एका चौकापासून दुसऱ्या चौकापर्यंत पसरलेली, विटांची, पांढरा दर्जा भरलेली इमारत होती. पहिल्या दिवशी आमच्या सगळ्या ग्रूपला लायब्ररी बघायला नेलं.

तिथलं कार्ड काढून दिलं. तिथल्या जनसंपर्क अधिकाऱ्याने लायब्ररी कशी वापरायची ते दाखवलं. सगळीकडे कॉम्प्युटरचे टर्मिनल्स. बटनं दाबली, पाहिजे त्या पुस्तकाचं नाव टाइप केलं, की क्षणात त्याचं नाव, लेखकाचा परिचय, पुस्तकाचा परिचय, नंबर इ. स्क्रीनवर दिसू लागायचं. विषयाचं नाव टाइप केलं की त्यावरच्या पुस्तकाच्या याद्याच्या याद्या सरकत जायच्या. त्यातलं जे पुस्तक हवं असेल त्याचा नंबर परत दाबला की पुस्तकाचा वर सांगितलेला तपशील मिळायचा. हे जमणार नाही त्यांच्यासाठी, आपल्याकडे असते तशी ड्रॉवर्समध्ये असलेली कार्ड सिस्टिम असायचीच.

मी त्या अधिकाऱ्याला विचारलं, "लायब्ररीची फी काय?" तो बुचकळ्यात पडला. म्हणाला, "फी नसतेच." मी थक्कच झालो. पुढं भीतभीत म्हणालो, "एका वेळी किती पुस्तकं नेता येतात?" तो हसला. त्याने वजन उचलल्यासारखं दोन्ही हात पसरून म्हटलं, "तुम्हाला उचलतील तेवढी." (ही युनिव्हर्सिटीच्या लायब्ररीची गोष्ट. पुढे नगरपालिकेच्या सिटी लायब्ररीत गेलो. ते म्हणाले, "तुम्ही या शहरात राहता याचा कसलाही पुरावा आणा. तुम्हाला मोफत सदस्यत्व मिळेल." मी मला, मेक्लॉवरच्या पत्त्यावर आलेलं एक साधं पत्र दाखवलं, त्याबरोबर मला सदस्यत्व मिळालं.)

मला हे पाहून आश्चर्यच वाटलं. आयोवात वर्तमानपत्र फुकट, बस फुकट, लोकल टेलिफोन फुकट, लायब्ररी फुकट, आहे काय? प्रेसिडेंट रेगन (त्या वेळचे) यांच्या नकळत समाजवादी राज्यच इथं अस्तित्वात आलंय की काय? पण नंतर मित्रांनी सांगितलं की, यातल्या काही आयटेमचे पैसे विद्यार्थ्यांच्या फीमधून, प्राध्यापकांच्या पगारामधून परस्पर कापूनच घेतलेले असतात. आम्ही पाहुणे असल्यामुळे आम्हाला या सोयी आपोआपच फुकटात उपलब्ध झालेल्या होत्या.

लायब्ररीत पाच मजले होते. गेल्या गेल्या काउंटरच्या उजव्या हाताला ब्राऊझिंग रूम होती. ही सहज पुस्तकं चाळायची जागा. इथं मोठमोठी, भरपूर फोटो असलेली, ओव्हरसाईझ पुस्तकं ठेवलेली असायची. छान कोच होते. मी या खोलीत जास्तीत जास्त वेळ असायचो. तिथं 'अमेरिकेतले बेघर लोक' असं मोठं पुस्तक होतं. मला ते पुस्तक पाहून धक्काच बसला. या संपन्न देशात काही लोक कसे राहतात, याचे विलक्षण फोटो त्यात होते. जिऑफ्रे मूर हाऊस लिखित 'रेल ॲक्रॉस इंडिया' या अशाच भल्या मोठ्या पुस्तकात आपल्याकडच्या रेल्वे आणि संबंधित जीवनाचे इतके तऱ्हतऱ्हेचे फोटो होते की आपली रेल्वे म्हणजे काय विलक्षण प्रकरण आहे, हे तिथं समजलं. त्या रेल्वेवरच्या फोटो पुस्तकाच्या आठ-दहा पानी प्रस्तावनेत भारताविषयी वाचकाला थोडी माहिती व्हावी म्हणून जो मजकूर लिहिलाय तो वाचून या दृष्टीने आपण भारताकडे पाहिलं नव्हतं, हे जाणवलं. भारतात पंधरा प्रमुख भाषा, अकरा वेगवेगळ्या लिपी, दोनशे वीस सर्वसाधारण भाषा आणि आठशे पंचेचाळीस बोली भाषा आहेत, हे वाचून थक्क झालो. रेल्वेच्या आकर्षणाबद्दल जयपूरच्या (की जोधपूरच्या) महाराजांचं उदाहरण गमतीशीर होतं. त्यांनी स्वयंपाकघरापासून तो थेट

डायनिंग टेबलावर पदार्थ घेऊन येणारी छोटी रेल्वे तयार करून घेतली होती. आणि पाहुणे आल्यावर तिचं ते हौसेने प्रात्यक्षिक करून दाखवत. एकदा व्हाइसरॉय आल्यावर ती गाडी मध्येच बंद पडली आणि तिच्यावरचं सूप व्हाइसरॉयच्या अंगावर सांडल्यावर नंतर तसं प्रात्यक्षिक कायमचं बंद झालं. ब्राऊसिंग रूममध्ये अशा गमतीजमती वाचत बसायचो.

मला कॉम्प्युटरवर पुस्तकं शोधून काढणं नको वाटायचं. मला पाहिजे असलेल्या विषयाचा विभाग कुठं आहे हे काऊंटरवर विचारायचो. आणि तिथं प्रत्यक्ष पुस्तकं चाळत, शोधत बसायचो. मजलेच्या मजले, हॉलच्या हॉल एका टाइपच्या रॅक्सने भरलेले. कशी पुस्तकं सापडणार याची चिंता वाटायची. पण कधीतरी नेमक्या ठिकाणी पोहोचायचो, आणि परक्या गावात ओळखीच्या मोहल्यात यावं तशी पुस्तकं सापडू लागायची. मेक्सिकन मजुरांचा गांधीवादी नेता सीझर शॅवेझ याच्याविषयी ऐकून होतो. त्याचं आत्मचरित्र सापडलं, त्याच्यावरची पुस्तकं, बेकायदेशीरपणे आलेल्या मजुरांच्या शोषणावरची पुस्तकं, इतकं सापडलं की किती वाचू आणि किती नको. तेच कू क्लस क्लॅनबद्दल. सगळा आयोवातला वेळ वाचतच बसायचं का, असा प्रश्न पडला.

लायब्ररीत हिंडत असताना तिथला व्हिडिओ सेक्शन सापडला. त्याचा कॅटलॉग बघितला, तर जगातल्या आतापर्यंतच्या उत्तमोत्तम फिल्म्स तिथं होत्या. तिथं भीतभीत विचारलं, ती बाई म्हणाली, "तुम्हाला टेप घरी न्यायचीय की इथं बघायचीय?" मी म्हटलं, "इथं." तिनं आतल्या छोट्या छोट्या खोल्या दाखवल्या. टी.व्ही., व्ही.सी.आर. ठेवलेला. आपली आपण फिल्म बघायची. मग मी चांगल्या फिल्म्स पाहायचा सपाटाच लावला. ॲलिस वॉकर या ब्लॅक लेखिकेच्या 'कलर पर्पल' कादंबरीवरचा सिनेमा पाहिला. क्लॉक वर्क ऑरेंज, ट्रूमन कपोटेच्या 'इन कोल्ड ब्लड' या कादंबरीवरचा सिनेमा, 'गॉन विथ द विंड' हा माझ्या आधीच्या पिढीत येऊन गेलेला सिनेमा, व्हिएटनाम वॉरवरचा गाजलेला 'प्लॅटून', स्टाईनबेकच्या कादंबरीवरचा 'ग्रेप्स ऑफ राथ'. . . असं सैरभैर होऊन अनेक प्रकारचे, वेगवेगळ्या काळातले सिनेमे पाहून घेतले. माझं गेल्या आठ-दहा वर्षांत सिनेमा-नाटकं खूपच कमी झालंय. अक्षरशः वर्षाला दोन-चारसुद्धा सिनेमे पाहत नाही. पण तिथं सगळं पारणं फेडलं. रोज सकाळचा लायब्ररीतला वाचायचा हप्ता संपला की दुपारी तीन ते पाच एक चांगला सिनेमा बघू लागलो. कलर पर्पल हे पुस्तक मी नंतर आणून वाचलं. जी पुस्तकं काही वर्षांपूर्वी अर्धवट वाचली होती, उदा. मादाम बोव्हरी, ती त्यावरची फिल्म पाहिल्यावर नंतर आणून पुरी करू शकलो. अगदी लहानपणी पाहिलेला 'झोर्बा द ग्रीक' परत पाहिला.

जवळच शहरात 'ऑडिओ व्हिज्युअल सेंटर' असल्याचा शोध लागला. तिथं १६ मि.मि. च्या अनेक विषयांवरच्या फिल्म्स होत्या. एका बोर्डवर अनेक पत्रिका विषयवार ठेवल्या होत्या. चाइल्ड ॲब्युज, स्थलांतरित लोकांचे प्रश्न, व्हॅन गॉव्हची चित्रं अशा अनेक विषयांवरच्या दहा-दहा, वीस-वीस मिनिटांच्या फिल्म्स तिथं होत्या. तिथल्या प्रौढ बाईने

मला हव्या असलेल्या फिल्म्सच्या रिळांचे डबे उचलून आणले. डार्करूममध्ये १६ मि. मि. प्रोजेक्टर होता. तिनं विचारलं, "हा कसा चालवायचा तुम्हाला माहीत आहे का?" मी "नाही" म्हणताच तिने रिळ कुठं लावायचं, फिल्म कुठल्या मार्गानं आणून कुठं बसवायची ते दाखवलं. 'काही अडचण आली तर मी बाहेर आहे' सांगितलं. मी ते चांगलं चालवू शकलो. पुढं तिची मला रिळं आतून काढून देण्याव्यतिरिक्त कधीच गरज लागली नाही. मनात आलं, आपल्याकडे एखादं यंत्र असलं तर केवढा बाऊ करतात. इथं उलट तुम्ही वापरावं असं उत्तेजन देतात. कदाचित संपन्न देश आहे म्हणूनही ते असं करू शकत असतील. तिथं 'मायग्रंटस्' या विषयावर टी. व्ही. वर वीस-पंचवीस वर्षांपूर्वी होऊन गेलेले प्रोग्रॅमही बघितले. ड्रग्जवर पालकांसाठी, मुलांसाठी, शिक्षकांसाठी खास तयार केलेले वेगवेगळे प्रोग्रॅम्सही पाहिले. संपन्नता ही आपल्याला रस्ते आणि इमारती एवढीच दिसते. पण अशी खोलपर्यंत, अनेक तऱ्हेने पसरलेली संपन्नता पटकन लक्षात येत नाही.

दुपारी मधल्या वेळेत मी सुटी घेऊन लायब्ररीतून बाहेर पडायचो. भूक कडकडत असायची. पण बाहेर खाण्यात पैसे कसे घालवायचे? समोर ओल्ड कॅपिटल सेंटरमध्ये चहा आणि स्नॅक्सचं दुकान होतं. तिथं जाऊन बसायचो, काउंटरवरून बटाट्याचे तळलेले काप (फ्रेंच फ्राईज) आणि चहा घेऊन यायचो. हे स्वस्तातलं स्वस्त खाणं खात निवांत बसायचो. शेवटी करायच्या खरेदीसाठी आधी फार खर्च करायचा नाही असं धोरण होतं. ओल्ड कॅपिटल सेंटर हे दुमजली होतं. त्यात अनेक दुकानं होती. एके दिवशी किचन वेअरचं दुकान बघायचो. तऱ्हतऱ्हेच्या सुऱ्या, चिमटे, सालकाढणी... यांतलं काय घ्यायचं ते ठरवून ठेवायचो. एखाद्या दिवशी खेळण्यांचं दुकान. खाली उतरून डाऊन टाऊनमधली दुकानं भटकायचो. एक सेकंड हँड वस्तूंचं दुकान होतं. आयोवा म्हणजे विद्यार्थ्यांचं जग असल्याने विद्यार्थी जाताना टाइपरायटर्स, सायकली, कपडे, इलेक्ट्रिक हीटर्स, क्रोकरी, भांडी विकून जातात. नवे येणारे स्वस्तात ते विकत घेतात. त्यामुळे इथं मी पाच डॉलर्सला थ्री पीस सूट पाहिला, आणि पाच की सात डॉलर्सना मिळणारा टाइपरायटरही पाहिला. खरं वाटणार नाही, एवढा बाजारभावात आणि यात फरक. मी इथं बघायचो पण खरेदी काहीच केलं नाही. वापरलेल्या कपड्याची झिप लवकर गेली तर काय करायचं, टाइपरायटर लवकर बिघडला तर काय करणार, असे प्रश्न पडायचे. शेवटी घ्यायचं ते नवंच घेऊ असं ठरवायचो. सलूनवरून रोज चक्कर असायची, पण आत शिरायचं धाडस झालं नाही. दहा डॉलर फी ! म्हणजे आपल्या भाषेत दीडशे रुपये. (आता तर तीनशे रुपये) मी इकडं येण्यापूर्वी कटिंग करून आलो होतो. इथल्या मुक्कामाच्या मधोमध केली की त्यापुढची कटिंग भारतात गेल्यावर स्वस्तात करू शकणार होतो. शेवटी हो ना करता दहा डॉलर टाकून कटिंग करून घेतली.

हातात थर्मोकोलच्या ग्लासात चहा घेऊन पीत पीत रस्त्याने चालण्यात मजा वाटे. नाताळ जवळ येऊ लागला तशी दुकानं सजू लागली. 'ख्रिसमस ट्री' शोकेसमध्ये किंवा

शॉपिंग सेंटर्सच्या मधल्या मोकळ्या जागेत दिसू लागले. नवीन नवीन माल दुकानात भरती होऊ लागला. शॉपिंग संस्कृतीची ही स्पंदनं माझ्यासारख्या बाहेरच्यालाही जाणवू लागली.

मी सप्टेंबरात आयोवात आलो तेव्हाचा हिरवागार निसर्ग ऑक्टोबरमध्ये हळूहळू बदलू लागला. झाडांची पानं अर्धवट पिवळट दिसू लागली. पुढे पुढे ती लालसर आणि शेवटी लालजर्द झाली. मला पूर्वी वाटायचं, ह्या 'फॉल' सीझनचं एवढं सांगतात पण सुकत जाणाऱ्या पानांचं एवढं काय सौंदर्य असणार आहे? पण तिथं पाहिलं तर पानं रंग बदलायची तरी ती डल् पडत नसत. त्यांच्यातली चमक तशीच राहत असे. त्यामुळे झाडंच्या झाडं पिवळी धमक होत. पानं विशेषतः पलीकडे सूर्य असताना पाहिली तर इतकी छान चमकून उठत की बोलायची सोय नाही. शेवटी पिवळ्या-लाल रंगाचा खेळ तर अप्रतिम असे. वाऱ्याने ती पानं हलत तेव्हा एखाद्या कॅलिडोस्कोपसारखे ते रंग आणि आकार बदलत. जवळच्या केन्स पार्कमध्ये निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर अशा पिवळ्या झळाळत्या प्रचंड आकाराच्या झाडासमोर उभा राहिलो तर भानच निघून गेलं. वाटलं, आपण अनेक चित्रकारांची उत्तमोत्तम पेंटिंग्ज पाहिली, पण हा अनुभव किती वेगळा आहे. केवढा भव्य आहे. मानवनिर्मित रंगात किंवा शब्दात तो आपण कधी पकडू शकणार आहोत का? माझ्या खिडकीतून रोज बदलणारं दृश्य मी कॅमेऱ्याने टिपत होतो आणि फोटो घरी पाठवायचो. परवा जवळपास वर्षानं ते फोटो पाहिले. फोटो म्हणून ते बरे असले तरी मूळ अनुभव कुठच्या कुठे होता!

हळूहळू पानगळ सुरू झाली. एरवी कचऱ्याचा टिपूस नसलेल्या रस्त्यांवर, हिरवळींवर पानांचे खचच्या खच पडू लागले. वाऱ्याबरोबर इतस्ततः उडू लागले. मेपलची साधारणपणे चांदणीच्या आकाराची पानं मला फार आवडायची. कॅनडाने तर त्या पानाला राष्ट्रीय चिन्हच केलं आहे. मेपलची निरनिराळ्या छटांची पानं मी जमवून वही-पुस्तकांमध्ये ठेवू लागलो. वस्त्रे उतरवल्यासारखी झाडं नग्न दिसू लागली. झाडाचा एक्स रे पाहावा तशा त्याच्या फांद्या, उपफांद्यांचा सांगाडा दिसू लागला. हिरवळ भुरकी होऊ लागली. आयोवाचे लोक गरम कपड्यांची तयारी करू लागले. सगळे जण आला हिवाळा, एप्रिलपर्यंत बर्फाशिवाय काही नाही, असे म्हणू लागले. माझ्या मनात थंडीचा धसका होताच. पण डिसेंबरअखेर मी जाणार असल्याने बर्फाच्या आत आपण इथून घरी सटकतोय असं आतून आश्वासन होतं.

हिवाळ्याचं वर्णन लोक जे सांगायचे ते खरं वाटायचं नाही. समोरची आयोवा नदी पूर्ण गोठते. आपण तिच्यावरून सरळ चालत जाऊ शकतो, असं कुणीतरी सांगितलं तेव्हा चाटच झालो. मला पाण्यावरून चालू इच्छिणाऱ्या भारतीय योग्याची आठवण झाली. मी गेलो तेव्हापासून पुण्याइतकी थंडी तर आधीपासूनच होती. एका पेट्रोलपंपावर, आता किती टेंपरेचर आहे त्याची लाईटची चमकती अक्षरं असायची. चार तपमान बऱ्याचदा असायचं. ते रात्री उशिरा शून्यापर्यंत जायचं. मला वाटायचं, शून्यावर पोहोचलं की सगळीकडे बर्फ दिसेल. पण तसं झालं नाही. सगळीकडे आधी होतं तसंच वातावरण. मग मित्राने सांगितलं

की शून्याच्या खाली तपमान गेलं आणि त्या वेळी पाऊस पडला तर त्याचं बर्फ होतं. आणि असं बर्फ साठत कडक होत जातं. त्यानंतर तपमान शून्याच्यावर जरी आलं तरी बर्फ असतोच, तो लगेच वितळत नाही. मनात आलं, एवढी साधी गोष्ट कळायला इतके हजारो मैल दूर यावं लागलं.

वारे जोरात वाहत असले की थंडी आणखी भयंकर होते. म्हणून हवेच्या प्रत्यक्ष तपमानात हा 'विंड चिल फॅक्टर' मिळवतात. त्यामुळे तपमान आणखी खाली जातं. शून्याखाली वीस डिग्रीज, चाळीस डिग्रीज असं तपमान आपण ऐकतो, त्यात हा फॅक्टर मिळवलेला असतो. या थंडीवाऱ्यापासून सगळ्या इमारतींचं कडेकोट रक्षण केलेलं असतं. सगळी दारं पॅकबंद होणारी. कुठूनही फट म्हणून राहू नये. प्रत्येक इमारतीच्या तळघरात एक भला मोठा अवजड यंत्रासारखा दिसणारा हीटर असे. त्यातून पाइपने उष्ण हवा सगळ्या इमारतीत खेळवलेली असायची. हे सेंट्रल हीटिंग. लोक वाजवीपेक्षा जास्तच घरं उष्ण करायचे. बसमध्येही हीटिंग. कुठूनही दार उघडून बाहेर आलं की बसलाच थंडीचा तडाखा. थंडीचे तिकडचे कपडे वेगळेच असायचे. आपल्याकडनं नेलेले कपडे मी ठेवूनच दिले. तिथे बहिणीकडनं, मित्रांकडून घेतलेले कपडे वापरायचो. कपड्यावर कपडे, स्वेटरवर स्वेटर चढवून वर रजईसारखा गादीचा कोट लोक चढवीत. मी एक स्वेटर आणि त्यावर पातळ जर्किनवर दिवस काढायचो. तिथले लोक तसला हिवाळी दरवर्षी काढतात, पण थंडी सोसण्याच्या बाबतीत फारच हळवे वाटले. मला खोलीत खिडक्या दडपून बंद करणे आवडायचे नाही, मी थोडी फट ठेवायचो. त्यावर आमची हाऊसकीपर मेरी नाझरथ मला प्रेमाने रागवायची. भारतात आल्यावर पार्ल्याच्या मेव्हण्यांच्या घरात पहिल्यांदा आलो तर इतकं आश्चर्य वाटलं, चक्क खिडक्या उघड्या ! आपण आतून हात बाहेर काढू शकतो !

बर्फाने मला आयोवातल्या शेवटच्या दिवशी गाठले. आदल्या रात्री मित्राकडे निरोपाचं जेवण होतं. कुणीतरी बाहेरून आलं आणि म्हणालं, बाहेर बर्फ पडतंय. मी दार उघडून पाहिलं तसं दिव्याच्या प्रकाशात पांढरे कण भुरभुरत होते. मित्राच्या गाडीने घरी परत आलो, तर वाऱ्याच्या लोटाबरोबर रस्त्यावरचे पांढरे, रांगोळीसारखे कण इतस्ततः उधळत होते. आपण एखाद्या नदीतून लाँच चालवत आहोत असं वाटलं. सकाळी मेफ्लॉवरच्या खिडकीबाहेर पाहिलं तर मैदानात, रस्त्याच्या कडेकडेला आट्यापाट्या, हुतूतूच्या पाट्या आखाव्यात तसा बर्फ साठला होता.

दुपारी सिनेमा, सेमिनार किंवा तत्सम काही आटोपलं की पाच-साडेपाचला रस्त्यावर यायचो. आयोवातली संध्याकाळ संजय-कल्पनाकडे तरी जायची किंवा अधूनमधून शाम-उमाकडे. मी आयोवात जाणार असल्याची पुण्याच्या 'सकाळ'मध्ये बातमी आली होती. ती वाचून राजगुरूनगरहून दिगंबर जोशी नावाचे निवृत्त मुख्याध्यापक माझ्याकडे आले आणि म्हणाले, "माझा मुलगा व सून आयोवात आहेत त्यांना एवढं मसाल्याचं पाकीट द्याल का ?" मी 'हो' म्हटलं. आयोवात पोहोचल्यावर त्यांच्याकडे फोन केला. एका

स्त्रीने तो घेतला. मी त्यांना म्हटलं, असं असं पाकीट तुम्हाला पोहोचवायचं आहे. काय करूयात. त्या म्हणाल्या, "संजय तुम्हाला न्यायला येईल, तुम्ही जेवायलाच या." मला मनातून बरं वाटलं. एक संध्याकाळ स्वयंपाकाची वाचली.

संध्याकाळी संजय आला. पोरसवदा तरुण होता. त्याच्या गाडीतून त्याच्या घरी गेलो. कल्पना सावळी, बोलक्या डोळ्यांची तरुण मुलगी. त्यांची दोन-अडीच वर्षांची तन्मयी नावाची चुणचुणीत, सावळी मुलगी. जेवण झाल्यावर त्यांनी सांगितलं, "आता तुम्ही रोज इथंच जेवायला यायचं." मी उडालोच. "रोज ?" कल्पना ठसक्यात म्हणाली, "त्यात काय ? संजय तुम्हाला रोज घ्यायला येईल, सोडायला येईल. तुम्ही तीन महिन्यांसाठी कशाला स्वयंपाकाचा घाट घालताय ? इथं एकटं येणाऱ्यांना किती कष्ट पडतात ते मी अनुभवलंय. तसं मी तुम्हाला काही करू देणार नाही." तिनं एकूण माझं प्रकरण हातातच घेऊन टाकलं. संजयचा साधा, सरळ, मदत करण्याचा स्वभाव आणि कल्पनातलं चैतन्य आणि माया यामुळे आमचं जमूनच गेलं. संजय-कल्पना दोघांनाही मला अहोजाहो न करण्याबद्दल बजावलं. कल्पनाला तर मी माझं काळजीवाहू सरकारच म्हणायचो. ती रात्रीचं जेवायला लावायचीच, पण सकाळी मला ब्रेकफास्ट करायला लागू नये म्हणून काहीतरी पदार्थ डब्यात घालून बरोबर द्यायची. एकदा संध्याकाळी आमचा मेफ्लॉवरमधेच दुसरा काही प्रोग्रॅम होता. मला त्यांच्याकडे जायला जमणार नव्हतं. तर रात्री दहाला तसल्या थंडीत तन्मयीला रगमध्ये लपेटून गाडीने आठ मैलांवरून डबा घेऊन आले होते. माझा मधून कॅलिफोर्निया किंवा शिकागो, कॅनडा इकडे जायचा प्रोग्रॅम असला की, संजय फोनवर सगळी चौकशी करून ज्या एअरलाइनने जाण्यात कमी तिकीट असेल त्याचं बुकिंग करून द्यायचा.

पण सगळ्यात जमलं माझं तन्मयीबरोबर. मी संध्याकाळी आलो की कल्पना स्वयंपाकाला लागायची, संजय तिला मदत करायचा आणि मी तन्मयीला खेळवायचो. पाठीवर बसून घरभर फिरवण्यापासून ओरिगामीतले बेडूक करून देण्यापर्यंत अनेक खेळ खेळलो. दिवसभर ती जवळच्या एका पाळणाघरात असे. तिथल्या गोऱ्या अमेरिकन बेबी सीटरशी आणि तिच्या मुलीशी तिची फार गट्टी होती. इतकी की कल्पना-संजय तन्मयीला संध्याकाळी आणायला गेले तर ती यायला तयार नसायची. रोज रडवून आणावे लागे. मी बरोबर असलो की कल्पना तिला गाडीकडे बोट दाखवून 'काका आलाय बघ' म्हणाली की अगदी हात काढून यायची. रोज मी तिला भरवायची इतकी सवय लागली की मधे तीन आठवडे मी टूरला गेलो होतो, त्या अवधीत तिचं वजन उतरलं. मी इकडे आल्यावर पाच-सहा महिन्यांनी संजयचं पत्र आलं. त्यानं लिहिलं होतं की शामकडे ते तिघं गेले होते. तिथं शामचे एक मित्र आले होते. एरवी नवख्या माणसाकडे अजिबात न जाणारी तन्मयी त्या मित्राकडे ताता ताता म्हणत धावत गेली आणि पायाला लटकली. पण त्यांनी काही प्रतिसाद न दिल्याने कावरी बावरी झाली. त्या मित्राची माझ्यासारखीच दाढी आणि चष्मा

होता. नंतर कधीतरी एकदा ते फोटोंचा अल्बम पाहत होते. तन्मयीने माझा फोटो पाहताच एक्साईट होऊन ताता. ताता...म्हणून बोटानं दाखवायला सुरुवात केली.

आमच्या या गट्टी कुटुंबात पहिल्या दिवसापासून आसोलेकर कुटुंब सामील झालेलं होतंच. शाम आसोलेकर हा तिथं एन्व्हायरनमेंट इंजिनियरिंग मध्ये पीएच.डी. करतोय असं पुण्यात कळलं होतं. ते पहिल्या रात्रीच संजयकडे मी जेवत असताना दाखल झाले. थोडा स्थूल पण रसरशीत चेहऱ्याचा शाम आणि अगदी शाळेतली मुलगी वाटावी अशी हसरी उमा ही दोन्ही माणसं पटकन आपलीशी झाली. कल्पना-संजय दोघेही मिळवते त्यामुळे त्यांची सांपत्तिक स्थिती चांगली असावी. शाम पीएच.डी करीत असल्याने त्याच्या विद्यार्थी वेतनावर ते कुटुंब चालत होतं. उमा डेंटिस्ट होऊन इकडे आली होती, पण इकडे पुढच्या कोर्सला लागणारी प्रचंड फी भरू शकत नसल्यानं ती काही करत नव्हती. अधूनमधून छोटे कोर्स करायचीही. तरी हे दोघे हसतमुख, इतरांना मदत करणारे. त्यांना कुणीतरी एक जुनी, मोठी गाडी तशीच वापरायला दिलेली होती. आठवड्यातून एकदा ते ग्रोसरी आणायला फक्त वापरायचे. कारण पेट्रोल अनावश्यक जाळायचं नाही हे तत्त्व. त्या वेळी त्यांच्या आसपासच्या गाडी नसलेल्या कुटुंबांना बरोबर घेऊन जाऊन त्यांचाही बाजार करू लागायचे. दुधाचे रिकामे प्लॅस्टिकचे कॅन्स, कोल्ड्रिंक्सचे कॅन कधीही गार्बेज फेकून द्यायचे नाहीत. ते रिसायक्लिंगसाठी विकायचे. तो औरंगाबादच्या छात्रयुवा संघर्ष वाहिनीचा कार्यकर्ता होता. सतत तो इतक्या तळमळीने बोलायचा की संजय आणि मी त्याची चेष्टाही करायचो. साने गुरुजींच्या शामने पुन्हा जन्म घेतलाय असं वाटायचं. पर्यावरणावर तो नेहमी पोटतिडीकीने बोलायचा. मी त्याला म्हटलं, “असं उडत उडत नको, माझी तू चार-पाच लेक्चर्सच घे.” मग शामच तो, सिन्सिअरली त्याने विषयांचे विभाग पाडले, नोट्स् तयार केल्या. संध्याकाळी त्याच्याबरोबर त्याच्या घरी जायचो, तिथं तो सविस्तर बोलायचा. चारी लेक्चर्स संपल्यावर त्या नोट्स्ही माझ्या हातात ठेवल्या. अमेरिकेत पर्यावरणाचे काय काय इश्श्यूज आहेत, आणि शास्त्रज्ञ, सरकार, प्रसारमाध्यमं, लोक त्याबद्दल काय काय विचार करताहेत याचं आयतं ताटच शामने माझ्यापुढे वाढून ठेवलं.

श्यामच्या मानाने उमाला जास्त वेळ असे. ती व मी ओल्ड कॅपिटल सेंटरसमोर भेटायचो. सिटी लायब्ररीत जायचो, थोडं शॉपिंग करायचो. कधी नुसते भटकून बसने त्यांच्या घरी यायचो. शाम तोपर्यंत यायचा. सगळे मिळून स्वयंपाक करायचो. झोपायला मी परत यायचो. वाटेत एक बस बदलावी लागायची. तरी शाम-उमा त्या थंडीत बाहेर पडायचे. पहिल्या बसने माझ्याबरोबर यायचे, दुसऱ्या बसमधे मी पाऊल ठेवलं की त्याच बसने परतायचे. उमाला कलांची आवड होती. मी ओरिगामी करायचो. जरा अवघड वस्तू करीत होतो. उमा म्हणाली, “मला शिकव हे.” मी म्हटलं, “हे जरा गुंतागुंतीचं आहे. तुला मी आधी काहीतरी प्राथमिक शिकवीन” ती म्हणाली, “बघू तर खरं.” मी सांगेल तशा घड्या घालत गेली. मला वाटलं, हे ठीक आहे, पण परत करता येणार नाही. मी पुढच्या वेळी गेलो तर

तसल्या वस्तूंचा खच टेबलावर पडलेला होता. मी मग तिला शिकवत गेलो, ती भराभरा शिकत गेली. आम्ही आयोवातल्या लायब्ऱ्या धुंडाळून ओरिगामीची पुस्तकं आणली. माझ्याकडे एक अगदी ॲडव्हान्स ओरिगामीचं पुस्तक होतं. योगायोगाने तेच पुस्तक परत मला भेट मिळाले. त्याबरोबर माझं आधीचं मी येताना तिला देऊन टाकलं. त्यातली तिनं सगळी मॉडेल्स एव्हाना अवगत करून गुरूपुढं आघाडी मारली असणार.

शाम-उमा, संजय-कल्पना-तन्मयी व मी आम्ही रविवारी कुठं कुठं जाऊ लागलो. जवळ 'केन्स पार्क' नावाचं 'अरण्य'च होतं. तिथं जायचो. मधे मोठ्ठं सरोवर होतं. कलोना गावच्या जत्रेला एकदा गेलो. शेजारी असलेल्या इलिनॉय राज्यातल्या गेल्सबर्गला अशोक व अजिता काळे राहायचे. त्यांच्याकडे दोन दिवस राहायला गेलो. तेही एकदा दोन दिवस राहायला आले. त्यांच्या बागेतलं सफरचंदाचं झाड मी कधी विसरणं शक्य नाही. पंजात मावणार नाहीत एवढी मोठमोठी सफरचंदं, आणि संपूर्ण झाड त्यांनी भरलेलं. अगदी फांद्या त्या भाराने जमिनीपर्यंत टेकलेल्या. जमिनीवरही सर्वत्र सडा पडलेला. मी म्हटलं, "तुम्ही उचलत का नाही?" अशोक मान हलवून म्हणाला, "खाणार कोण ती? उचलून करायचं काय त्याचं?" बरं ते झाडं तसं लहानखोरंच होतं. अजिताच्या गोष्टीतल्या कुमारी मातांसारखंच वाटलं मला ते.

कल्पना मायक्रोबायॉलॉजिस्ट आहे. तिला वाटेल तेव्हा ग्रीन कार्ड मिळू शकतं. तिला चांगला, पोस्ट डॉक्टरल जॉब आहे. संजय ठाण्याला लेक्चरशिपवर क्लेम ठेवून तीन वर्षांसाठी आलाय. संजय, कल्पना, शाम, उमा यांनी हे त्यांचं संशोधन झाल्यावर लगेचच भारतात यायचं असं ठरवूनच टाकलं आहे. तिथं स्थिर झालेल्या एका बाईचा कल्पनाचा वाद चालला होता. कल्पना म्हणाली, "आम्ही ९१ साली परत जाणार आहोत." ती बाई म्हणाली, "तुम्ही कसले जाताय? तुम्ही राहणारच इथं." "मुळीच नाही, ठरवून टाकलंय यायच्या आधीच."

"तसं सगळेच ठरवतात."

"पण आम्ही संजयच्या नोकरीचा क्लेम ठेवून आलोय."

"असं सगळेच ठेवून येतात, पण शेवटी इथंच राहतात."

कल्पना वैतागत गेली. चिडून बॉल मारावा आणि प्रतिस्पर्ध्याने हसत परतवावा तसं चाललं होतं. मी शेवटी म्हटलं, "आता नुसतं 'होच मुळी' आणि 'नाहीच मुळी' असं चालू द्या." शाम म्हणाला, "या बाबतीत आम्ही कुणाशी वाद घालायचंही सोडून दिलंय. इथं आलेल्यांपैकी ९९ टक्के इथंच राहतात. त्यांतले आपण नाही, हे फक्त आपण कृतीनेच सिद्ध करू शकतो."

पण एरवी शामला वाद घालायची हौस असे. संजयची पार्श्वभूमी आर.एस.एस.ची आणि शामची छात्र युवाची म्हणजे समाजवादाची. कधी कधी संजय वाद उकरून काढे, शाम हिरिरीने उत्तर देत बसे. मी टेबलटेनिसचा खेळ पाहावा त्याप्रमाणे एकदा याच्याकडे

एकदा त्याच्याकडे पाहत बसे. मला मते आहेत पण मतपरिवर्तनाचा अजिबात उत्साह नाही. तोंडाशी उत्तरं असून मी सहसा अशा वादात पडलो नाही. पण संजय तसा उदार होता. उत्तर सापडलं नाही, तर माघार घ्यायचा. समोरच्याचं म्हणणं मान्य करायचा.

रायटर्स प्रोग्रॅममधले मला अधूनमधून इतर कार्यक्रम असायचे. संध्याकाळी कसल्याकसल्या पार्ट्या असायच्या. एक दिवस आशियाई मुलांच्या असोसिएशनने आम्हाला बोलावलं होतं. त्यातली बहुतेक मुलं चिनी चेहऱ्याची होती. तिथं एक गोरी, ओथंबलेल्या डोळ्यांची इराणी बाई भेटली. काळ्या कपड्यात, तोंड वगळता सर्वांग लपेटून घेतलं होतं. तिची ओळख झाल्यावर तिनं सांगितलं की ती कवी आहे आणि खोमेनीच्या दडपशाहीमुळे अमेरिकेत हद्पार जीवन जगतेय. अशा कपड्यांतली बाई ही कवी असू शकते, हे पूर्वी मला खरंही वाटलं नसतं. आयोवा मेमोरियल हॉलमध्ये आम्हाला विद्यापीठाने वेलकम पार्टी दिली. त्यात ओळख होईल त्याच्याशी मेक्सिकन मजुरांविषयी माहिती विचारीत होतो. एक सोशल वर्क कॉलेजमधली प्रोफेसर बाई होती. तिने विद्यापीठात चिकॅनो मूव्हमेंट (अमेरिकेतील स्पॅनिश बोलणाऱ्या मेक्सिकन वंशाच्या लोकांची चळवळ) चालवणाऱ्या लोकांचे पत्ते दिले. त्या पार्टीतच एका मुलीची ओळख करून दिली. तिच्याबरोबर पुढे मी चिकॅनो लोकांच्या एका पिकनिकलाही गेलो. या प्रोफेसर बाईने मला भारतातल्या सामाजिक प्रश्नांवर लेक्चर द्यायला बोलावले. नंतर मी तिच्या कॉलेजात जाताच तिने मेक्सिकन मजुरांविषयी छापून आलेल्या पुस्तिका, कात्रणांचे झेरॉक्स याचा गठ्ठाच हातात ठेवला. मी भारतीय, म्हटल्यावर सगळेजण विचारायचे, "शेल्डन पोलॉकची तुमची गाठ पडलीय की नाही?" मी या शेल्डनला खूप शोधलं. पण मी आयोवा सोडायच्या आदल्या की त्याच्या आदल्या दिवशी त्याचा माझा कॉन्टॅक्ट झाला. मग आम्ही एका हॉटेलात भेटलो. भारतातल्या दलित चळवळीविषयी त्याला खूप आस्था आहे. तो संस्कृत स्कॉलर आहे. वेदात अस्पृश्यतेची मुळं सापडतात का, यावर त्याने खूप संशोधन केलं आहे. (पण मुख्य म्हणाल तर तो रामायण-एक्स्पर्ट आहे.) तो अमेरिकन रॅटरेस संस्कृतीच्या अगदी विरुद्ध होता. परत परत हळहळत होता, 'आपण किती उशिरा भेटलो. नाहीतर तुझा आम्ही किती उपयोग करून घेतला असता.' त्याच्या मित्रांचा गरीब देशांतील गरिबांच्या चळवळींना मदत करणारा ग्रूप आहे. तो म्हणाला, "आम्ही ग्वाटेमालातल्या चळवळीसाठी पैसे जमवतो तर भारतातल्या दलितांच्या चळवळीसाठी का जमवू नये?" मी त्याला म्हटलं, "भारतातली दलितांची चळवळ पैशाअभावी अडलेली नाही, तर तिला तळमळीच्या, प्रामाणिक आणि दूरदृष्टीच्या कार्यकर्त्यांची गरज आहे." त्याचा इकडे आल्यावर माझ्याशी पत्रव्यवहार चालू आहेच. आता त्याचं पत्र आलंय. तो आता आयोवा सोडून शिकागो विद्यापीठात रुजू झालाय.

'डेली आयोवन'मध्ये 'नारकॉटिक ॲनॉनिमस'च्या सभेची जाहिरात असायची. तो एकदा पत्ता शोधत गेलो. एका जुन्या इमारतीतल्या वरच्या मजल्यावर सहा-सात ॲडिक्टस्

जमले होते. त्यांतल्या ३-४ स्त्रियाच होत्या. ती माणसं आपल्या इकडच्या व्यसनी मुलांसारखा घडघडीतपणे पाढा वाचून दाखवण्याऐवजी दिवसात केव्हा काय वाटलं हे अतिशय संथपणे आणि पिंजून पिंजून सांगत होती. त्यातला एकजण पुढे जास्त ओळखीचा झाला. त्याच्याबरोबर मी आयोवातलं 'मेक्का' हे ड्रगजचं उपचारकेंद्रही पाहिलं. तिथलं वातावरण फारच प्रोफेशनल वाटलं. मुक्तांगणसारखा जिव्हाळा तिथं नव्हता.

एवढं मोठं विद्यार्थिजग पण आरडाओरडा कुठं नसे. भिंतींवर घोषणा कुठं लिहिलेल्या नव्हत्या. इंग्लिश फिलॉसॉफी बिल्डिंगच्या मागं पूल होता. पायी जाताना दहा-वीस फूटच त्याखालून जावं लागे. त्या बोगद्यात फक्त काही घोषणा लिहिलेल्या होत्या. त्या प्रकाराला ते 'ग्राफिटी' म्हणायचे. मेफ्लॉवरमधे हजार दोन हजार मुलं राहत असतील, पण कुठं आरडाओरडा ऐकू आला नाही. एकदाच गडबड जाणवली ती फूटबॉल मॅचच्या वेळी. फूटबॉल हा तिथला अजबच खेळ होता. लंबवर्तुळाकृती बॉल हातात घेऊन खेळाडू पळत असला की इतरजण त्याला पाडून त्याच्या अंगावर माणसांचा ढीगच करायचे. त्यातनं तो सुटून बॉल दुसऱ्याकडे पास करायचा प्रयत्न करायचा. या हिंस्र प्रकारामुळे ते खेळाडू हेल्मेट, खांद्याला आतून पॅडिंग वगैरे घालत असल्याने महाकाय राक्षसच दिसत. मॅचच्या वेळी ग्राऊंडच्या दिशेने गाड्यांची रीघ लागे. ट्रॅफिक जाम होत. गावभर तीच चर्चा.

रात्री उशिरा आल्यावर टी. व्ही. माझी जसा वाटच पाहत असायचा. कितीतरी वेळ टी. व्ही. बघत बसायचो. कधी पुस्तक वाचायचो तर कधी न्यूयॉर्कच्या मित्रांना फोन. बहिणीचा कॅनडातून रात्री साडेबारा-एकनंतर फोन यायचा. तिचा तान्हा मुलगा झोपला की मग ती फोन करायला मोकळी व्हायची. तोपर्यंत तिचा थोरला मुलगा नील झोपून जायचा. त्यामुळे अनिलमामाशी बोलायला मिळालं नाही, म्हणून दुसऱ्या दिवशी रुसून बसायचा.

आयोवात सुरुवातीला दिवस कसे रेटायचे असा प्रश्न होता, पण शेवटी शेवटी वेळ कसा पुरवायचा अशी चिंता लागली. अजून बघायच्या राहिलेल्या शॉर्ट फिल्म्सची यादी बरीच मोठी होती. न वाचलेल्या पुस्तकांचा तर खोलीत ढीगच साठला होता. नवीन नवीन ओळखी होत होत्या. आणि आयोवा सोडायची आता रुखरुख वाटत होती.

एकदा मोठ्या बुकशॉपमध्ये पुस्तकं चाळत असता एक उंच, तिशीतली गोरी, नितळ चेहऱ्याची, नाकेली, प्रसन्न व्यक्तिमत्त्वाची स्त्री पुस्तकं पाहताना दिसली. ती बघतबघत माझ्या जवळपास आल्यावर मी "तुम्ही भारतीय का" असं विचारताच, हसून "ऑफ कोर्स" म्हणाली. ती मुंबईची गुजराथी डॉक्टर होती. मी कुठे राहतो ते विचारून ती म्हणाली, "आम्ही पलीकडेच राहतो. चला तुम्हाला सोडते" म्हणून मला मेफ्लॉवरपाशी सोडले. तिचा नवरा अर्नोल्ड मेनेझेस हा न्यूरोसर्जन होता आणि तिचं नाव मीनल, ती ॲनेस्थटिस्ट होती.

मी लिफ्टने वर जाऊन दार उघडतोय तोच फोन वाजला. तिचाच फोन होता. मी चकितच झालो. "रात्री काय करताय, जेवायला येता का?" एरवी आपली ओळख होते, वाढते, मग घरी जाणं, त्यानंतर जेवायला बोलावणं या पायऱ्या पायऱ्यांनी आपण हळूहळू

जातो. मीनलचं काम तसं झटपट होतं. कदाचित इथं माणसांना आपल्यासारख्या माणसांची तहानही लागत असणार. तिचं घर म्हणजे भला मोठा टेकडीवरचा बंगलाच होता. तिची दहा-बारा वर्षांची मोठी, गुब्रगुबीत, मैथिली नावाची मुलगी होती. तिला मी चित्रं काढून दिली. बरोबर बासरी होती, ती वाजवून दाखवली. अर्नोल्डचा एक भाऊ धर्मगुरू आहे. मुंबईला असतो. ड्रग ॲडिक्टसाठी काम करतो. त्याचा विषय निघाला. मैथिलीनं जेवल्यानंतर सगळ्यांना गेम्स खेळायला लावलं. मीनल आयोवातल्या इंडिया असोसिएशनची सेक्रेटरी आहे. तिनं तिच्या ॲक्टिविटी सांगितल्या. रात्री उशिरा अर्नोल्डने घरी सोडलं. त्याच्या दुसऱ्या दिवशी मी मोठ्या प्रवासाला जाणार होतो. नंतर आल्यावर आयोवात दोनेक दिवस राहून लगेच भारताच्या दिशेनं परतणार होतो. त्या तिघांनी आग्रह करून त्या पॅकिंगची गडबड असली तरी त्या दोन दिवसांतल्या एका रात्री जेवायला यायचा आग्रह केला.

आल्यावर मैथिली आता अधिक उत्सुकतेनं वाट पाहताना दिसली. तिनं माझ्यासाठी बरीच प्रेझेंट्स् आणून ठेवलेली होती. ओरिगामीचं एक खूप महागडं पुस्तक, ओरिगामीच्या कागदांचा एक गठ्ठा, बुक मार्क्स असं काय काय आणलेलं होतं. मला जेवढं येतं तेवढं काय काय करून देत होतो. मीनल, अर्नोल्ड तिला म्हणत होते, "अग, त्या काकांना आमच्याशी बोलू तर दे" त्यावर ती माझ्या कोचाच्या हातावर बसून माझ्या गळ्यात एक हात टाकून दुसऱ्या हातानं माझे केस विस्कटत म्हणाली, "ही इज 'माय' अंकल, आय लव्ह हिम." आपली पोरंसुद्धा त्यांना वाटतं ते इतक्या उघडपणे व्यक्त करीत नाहीत. आणि दुसऱ्या भेटीतच आपलंसं करणाऱ्या या छोटीबद्दल मला फारच कौतुक वाटलं.

रात्री तिथून उठताना मैथिली म्हणाली, "उद्या ब्रेकफास्टला का नाही येत ?" मी सर्दच झालो. म्हणालो, "अग, पॅकिंगची गडबड आहे. उद्या माझा इथला शेवटचा दिवस." मीनल म्हणाली, "पण तुम्ही ब्रेकफास्ट स्वतः करण्यात जो वेळ घालवणार तो इथं या." शेवटी मी 'हो' म्हटलं. हे कुठल्याही औपचारिक संकेताबाहेरचं चाललं होतं. सकाळी परत आलो. मीनलने बटाटा शेव पुरीचा ब्रेकफास्ट केला होता. वेळ कसा आणि किती वापरू असं प्रत्येकाला झालं होतं. मैथिली एक प्रकारचा गोफ विणू शकते, हे कळलं त्याचं मी कौतुक केलं. मी तिला सेंडॉफनिमित्त चित्रं दिली आणि परतलो.

संध्याकाळी खोलीतल्या सामानाच्या पसाऱ्यात मी बसलो असता मीनलचा फोन आला, "तुम्ही पाच मिनिटांनी खाली येऊन मेफ्लॉवरच्या काचेच्या दाराआड येऊन थांबता का, मैथिलीचं काहीतरी काम आहे."

मी तिथे जाऊन थांबलो. मीनलची मरून रंगाची लांबलचक गाडी रस्त्यावर थांबताना दिसली. सोसाट्याच्या वाऱ्याने झाडं हलत होती. भुरभुर बर्फ पडायला सुरुवात झाली होती. जाड कोट घातलेली, कानाभोवती स्कार्फ गुंडाळलेली मैथिली धावत पायऱ्या चढून आत आली. माझ्या हातात छोटे बॉक्स ठेवले आणि तशीच पळत परत गेली. मीनलनं हात

केल्याचं दिसलं व गाडी गेलीही.

वर आल्यावर पाहिलं तर त्यात तीन-चार रंगी दोऱ्याने विणलेले कडेला गाठ मारलेले, बुकमार्क म्हणून वापरायचे दोन गोफ होते. नंतर मीनलने सांगितल्यावरून कळलं की ती आदल्या रात्रीपासून ते करत होती, पण सकाळपर्यंत पुरे न झाल्यानं ती खट्टू झाली होती. मी परत आल्यावर बसून ते पुरे केले होते. मैथिलीचा तो प्रफुल्लित पण संकोचलेला चेहरा अजून डोळ्यांसमोर येतो. केवळ दोन दिवसांची ओळख. मी नंतर मीनलला लिहिलेही. 'तुम्ही कधी भारतात याल तेव्हा तुम्हाला असला वेळ तर आपली गाठ पडणार. तोपर्यंत मैथिली मोठी झाली असणार. माझी 'काबुलीवाल्या'सारखी ती कदाचित ओळखही विसरलेली असणार.'

इकडे आल्यावर हे पत्र आणि मी त्यांचे काढलेले फोटो त्यांना पाठवून सात-आठ महिने झाले तरी त्यांच्याकडून काही उत्तर आलं नाही. मला वाटलं होतं तशी ही मंडळी आपल्याला विसरली, असं वाटू लागलं. परवा मीनलचं दिवाळीनिमित्त कार्ड आणि पत्र आलं, त्यात लिहिलं होतं, 'अर्नोल्डला एक सौम्य प्रकारचा पण कॅन्सर झाला. ऑपरेशन झालं. नंतर रेडिएशन, केमोथेरपीचे कोर्स झाले. आता तो आजार म्हणजे भूतकाळ झाला आहे. पण तरीही आमची सगळी घडी त्यामुळे बदलावी लागली आहे. त्यामुळे या वर्षी आम्ही भारतात येणार होतो, ते येऊ शकणार नाही. मैथिली आता बरीच उंच झाली आहे. तुम्हाला ती ओळखू येण्यासाठी आपण खरं तर लौकरच भेटलं पाहिजे.' मला काही सुचेनासं झालं. मैथिलीचा चेहरा ओठवला. वाटलं, आपण काळजी करत बसायला किती घरं वाढवून ठेवली आहेत ! दोन दिवसांतल्या ओळखीने आपण त्या कुटुंबातले कसे झालो याचं मला आश्चर्य वाटतं. एकूणच तिथल्या मुक्कामात मी अनेकांशी जोडला गेलो. माझी त्यांची तिकडे गाठ पडली. परक्या देशात 'आपला' माणूस हवासा वाटतो. पण तसंही नाही. तिथल्या काही अमेरिकन किंवा मेक्सिकन कुटुंबांशीही माझं अतूट नातं निर्माण झालेलं आहेच. मला वाटतं, 'वेळ' हा हे ठरवणारा फॅक्टर असावा. आपल्याला वेळ थोडा आहे, आपण बहुतांशी परत भेटणार नाही आहोत, तर आहे या वेळाचा जास्तीत जास्त उपयोग करून घ्या, असा आम्ही परस्पर विचार करीत असल्याने या नात्यात झपाट्याने उत्कटता येत असणार, पण तसंही नाही. नक्की काही कळत नाही हेच खरं.

मला आता विचारलं की-परत अमेरिकेत जाणार का ? तर मी म्हणेन, "परत आयोवात जायला मिळालं तर आवडेल." आयोवातला मुक्काम एखाद्या स्वप्नासारखा होता. रंगीबेरंगी तरीही शांत संथ जीवन. तिथल्या युनिव्हर्सिटीमध्ये किती पॉलिटिक्स, जीवघेणी स्पर्धा असते याविषयी मी ऐकलं, वाचलं. महागड्या फीमुळे विद्यार्थ्यांचं जीवन किती कष्टाचं असतं, हेही माहीत आहे. आयोवा विद्यापीठातही के.के.के.चे छुपे ग्रूप्स आहेत. पण तरीही तिथे सगळ्यांशी जमून गेलं, कारण मी पाहुणा होतो. व्यावहारिक दृष्ट्या कुणाच्या आड येत नव्हतो, हीही एक बाजू आहेच. तिथं कायमचा राहिलो असतो तर आयोवा मला

वेगळंच वाटलं असतं. पण तरीही चांगल्या स्वप्नाचा दिवसाच्या वास्तवतेवर छान परिणाम होतोच. शेल्डन पोलॉक आता शिकागोला गेलाय. संजय, शाम हेही तीन वर्षांत परत येतील. मिनिता आता राजीनामा देऊन घरी आहे, ती कदाचित आयोवा सोडेलही. मी समजा काही वर्षांनी गेलो आणि ही कोणीच मंडळी तिथं नसली, तर ते आयोवा पूर्वीच्या स्वप्नासारखं वाटेल का ? गाव म्हणजे तिथली माणसं, की तिथला निसर्ग, की दोन्हीही ?

माझ्या रोजच्या वाहत्या प्रवाहात मला मिळालेला तो छान विसावा होता. घरची सगळी माणसं प्रेमाची, आवडती असली तरी दिवसाचं शेवटी एक रुटीन असतं. आपण बाप, नवरा, मित्र अशा भूमिका बजावत असतो. आयोवातल्या मुक्कामात हे सगळं सुटलं. नवी माणसं, त्यांचे नवे संबंध, प्रत्येक गोष्ट कुतुहल निर्माण करणारी, सगळे क्षण निर्हेतुक. म्हणून आयोवात घालवलेल्या काळाच्या छोट्या तुकड्याला मनात कायमचं स्थान राहणार आहे.

o

★★★★★

# पोर्टलँड

अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्याजवळचे जवळपास उत्तर टोक. रजनीश आश्रमामुळे ओरेगॉन राज्य आपल्या माहितीचं झालं आहेच. त्या ओरेगॉनची राजधानी. सगळ्या अमेरिकेच्या एका टोकाचं गाव. त्यामुळे अमेरिकेतल्या मुख्य प्रवाहापासून बाजूला पडलेलं छोटं शहर आहे. राज्यात भरपूर जंगल आहे. त्यामुळे लाकडाचा धंदा, पूर्वभागातल्या सपाट भागात शेती. बाकी औद्योगीकरण फारसं नाही. त्यामुळे सर्वसाधारण अमेरिकनाच्या चर्चेत पोर्टलँडचं नाव सहसा येणार नाही. इतर प्रांतांमध्ये वांशिक वाद, ताणतणाव असतात, तसा इथं नसतो. कारण ब्लॅक्सची संख्या अगदी नगण्य आहे.

या शहरात आमचा चार-पाच दिवस मुक्काम होता. आम्ही मोठमोठ्या नेत्रदीपक शहरांमध्येही राहिलो. पण मला आवडला तो पोर्टलँडचा मुक्काम. डाऊन टाऊनमधल्या पोर्टलँड-हिल्टन या हॉटेलात आम्हाला उतरवलं होतं. पंधराव्या मजल्यावर माझी खोली होती. तिथून खालचं सगळं शहर दिसायचं. अगदी मोजक्या उंच इमारती सोडल्या, तर बहुतेक जुन्या वळणाच्या, चांगल्या रीतीने देखभाल केलेल्या इमारती, आखीव रस्ते, भरपूर झाडी. शहराच्या कडेने तिन्ही बाजूंनी भरपूर झाडी असलेला डोंगर उतार.

पोर्टलँडच्या रस्त्याने भटकणं ही एक मजाच होती. रस्त्यावर चौकोनी दगडांनी बनवलेल्या फूटपाथवर अधूनमधून बसायला बाकं असायची. तीही वेगवेगळ्या उत्तम स्कल्पचरल डिझाइनची. पावला पावलांवर उत्तम दर्जाची ब्राँझ, स्टील किंवा अन्य माध्यमातली शिल्पं. मधल्या चौकात भरपूर कारंजी. इतर अमेरिकन शहरासारख्या दडपून टाकणाऱ्या इमारती नाहीत की भव्य झगमगती डिपार्टमेंट स्टोअर्स, शॉपिंग सेंटर्स नाहीत. छोटी-मोठी पण वैयक्तिक मालकीची दुकानं पाहून जरा घरच्यासारखं वाटलं. शहरची म्हणून म्युझियम्स आर्ट गॅलरीज् तर आहेतच, पण खासगी आर्ट गॅलरीज् रस्तोरस्ती आहेत.

एका चित्रकाराची वॉटर कलर वॉशने केलेल्या चित्रांची पिक्चरकार्ड्स् मी अमेरिकेत आल्या आल्या पाहिली होती. रेड इंडियन किंवा तत्सम लोकांची, प्राण्यांची चित्रं होती. त्याच

ओरिजिनल चित्रांची गॅलरी पोर्टलँडमध्ये सापडल्यावर कॅलिफोर्नियात सोनं सापडावं तसा आनंद झाला. आमच्या हॉटेलसमोर जुन्या इमारतीत प्रशस्त रेस्टॉरंट होतं. अनेक माणसांनी गजबजलेलं. चारी बाजूंना पदार्थ मिळण्याची काऊंटर्स होती. त्यामागे ते पदार्थ गरमागरम तयार होताना दिसायचे. तिथून घेऊन आपण मधल्या टेबल-खुर्च्यांवर येऊन खात बसायचं. मेक्सिको ते चीनपर्यंत अनेक देशांतले लोकप्रिय पदार्थ तिथं मिळायचे आणि तेही स्वस्तात. त्यामुळे सर्वसामान्य लोकांच्या गर्दीमध्ये छान, इम्फार्मल वातावरण तयार झालं होतं. रस्त्याने ट्राम खडखडत जायच्या. रस्त्याच्या मधून ट्रामचे रूळ सरळ किंवा वळत एकमेकांत मिसळत गेलेले पाहिले की, लहानपणी पाहिलेली मुंबई आठवायची. तिथे ट्राम सर्वांना फुकट असल्याचं नंतर समजलं. पण मी पायीच भटकत असल्याने ट्राममध्ये चढायचा कधी प्रश्नच आला नाही. अधूनमधून विस्तृत बागा, त्यांमधून असणाऱ्या उंच झाडांच्या रांगा, पानगळीचा मोसम असल्याने बदललेले रंग, पायांखाली पडलेली ओलसर, रंगीबेरंगी पानं. अधूनमधून पॉऊस भुरभुरून जायचा.

पोर्टलँडला 'लिंकन इंटरनॅशनल स्कूल' नावाची शाळा आहे. तिथं आमच्या टीमला एके दिवशी सकाळी नेलं. त्या मुलांच्या शिक्षणात सुरुवातीपासून आंतरराष्ट्रीय बाज दिलेला असतो. प्रत्येकाने आवडीचा एक देश निवडायचा. एरवीच्या अभ्यासाबरोबरच त्या देशाची माहिती जमवत रहायचं. त्या देशाची भाषा शिकायची. अशा अनेक भाषा शिकायची तिथं सोय आहे. (हिंदी शिकायची तिथं व्यवस्था आहे.) मुलं त्या त्या देशातली पिक्चर कार्ड्स् जमवतात. त्रिकडल्या पेपर्समध्ये त्या देशाची बातमी आली, तर कात्रण काढून वहीत चिकटवतात. . . असं खूप काही. आमच्या ग्रूपमधल्या लोकांना तिथल्या टीचर्स रूममध्ये नेण्यात आलं. मुख्याध्यापक अतिशय तरुण, उत्साही बाई होती. उपमुख्याध्यापक मात्र सौम्य, वयस्क गृहस्थ होते. बाहेर मुलामुलींचा आपल्या इकडल्यासारखाच गलका चालला होता. बाईंनी सांगितलं, "आतापासून चार लेक्चर्स आहेत. प्रत्येक वर्गावर तुमच्यापैकी दोघादोघांनी जायचं. तुम्हाला बोलवायला मुलं येतील. ती तुम्हाला वर्गात घेऊन जातील. ती तुम्हाला प्रश्न विचारतील. तुम्ही त्यांना विचारा. तुम्हाला काही कला येत असल्यास त्या सादर करा. असं काहीही करा व वेळ छान घालवा."

एका वर्गावर मला व ग्वाटेमालाच्या फिलीपीला जायचं होतं. एक चौदा-पंधरा वर्षांची मुलगी बोलवायला आली. गर्दीतून वाट काढीत चाललो. बहुतेक मुलामुलींनी रंगीबेरंगी स्वेटर्स घातले होते. फिलीपी गमतीशीर तरुण मुलगा आहे. त्याने त्या मुलीला नाव विचारलं. तिनं सांगताच तो म्हणाला, "वाः फारच छान आहे– नाव. माझं लग्न झाल्यावर हे नाव माझ्या बायकोला ठेवेन. समजा, बायकोने हे नाव ठेवून घ्यायला नकार दिला, तर माझ्या मुलीला तर नक्कीच हे नाव ठेवेन." त्या मुलीला हा काय बोलतोय हे पहिल्यांदा कळेचना, पण नंतर ती लाल होऊन हसू लागली.

वर्गात आम्ही आल्यावर मुलं उठली नाहीत, एक साथ नमस्ते म्हटली नाहीत. खुर्च्यांना

हातालगत असलेल्या फळीवर कोपरं टेकवून निरनिराळ्या पोजेसमध्ये तंगड्या आरामात पसरून बसली होती. मधूनच कोकाकोलाचं कॅन टॉक् करून फोडल्याचा आवाज येई. कुणी बाहेरनं थर्मोकोलच्या ग्लासात काळी कॉफी किंवा चहा आणून पीत बसले होते. होती मुलं मजेदार. फिलिपीने त्याचं गिटार आणलं होतं. उभ्याने खुर्चीवर एक पाय ठेवून गिटार वाजवीत स्पॅनिश भाषेतली गाणी त्याने म्हणून दाखवली. मी बासरी वाजवून दाखवली. ओरिगामीची एक-दोन चित्रं करून दाखवली. एका मनस्वी चेहऱ्याच्या, कमी बोलणाऱ्या मुलीला त्या मुलांनी कविता म्हणायचा आग्रह केला. तिने एक-दोन कविता म्हणून दाखवल्या. असं करत एक तास संपला. दुसऱ्या वर्गावर मी व पाकिस्तानचा वाकस ख्वाजा गेलो होतो. वाकसच्या गप्पा झाल्यावर मुलांनी माझी मुलाखत घेतली.

मी थोडक्यात पूर्वायुष्य सांगत असताना माझी बायको सायकियाट्रिस्ट असल्याचं सांगितले. त्यावर एक मुलीने उठून विचारलं, "तुमची बायको सायकियाट्रिस्ट कशी? तिथं मुली शिकतात का? आम्ही इकडे असं वाचलंय की तिकडे लग्नानंतर पहिल्या वर्षात मुलींना जाळून मारलं जातं."

मी थक्कच झालो, पण सावरून म्हणालो, "तसं असतं तर माझा जन्म तरी झाला असता का आणि आज मी तुमच्यासमोर उभा राहिलो असतो का?" सगळे हसू लागले. मी म्हटलं, "तू म्हणतेस तशा घटना तिथं घडतात हे खरं आहे. तो गंभीर सामाजिक प्रश्न आहे. पण अशा घटना तशा अपवादच. त्या काही घराघरांत घडत नाहीत. नाहीतर भारतापुढचा लोकसंख्येचा प्रश्न कधीच मिटला असता. तिथं खूप मुली शिकतात. माझ्या मेडिकल कोर्सच्या वर्गात जवळपास निम्म्या मुली होत्या. माझ्या मुलीची तुम्हाला माहिती सांगतो. ती ट्रेकिंगला जाते, बर्ड वॉचिंग, माउंटेनियरिंग असं काय काय करते. त्यांचा मुलामुलींचा ग्रूप आहे. तंबू ठोकून कुठेही जंगलात राहतात. धाकटी गाणं शिकते, चित्रं काढते. तुम्हाला असं वाटतं का की माझ्या मुली तुमच्यापेक्षा काही वेगळ्या आहेत?"

त्या मुलींनी 'नाही'ची मान हलवली.

मी पुढे म्हटलं, "अमेरिकेविषयी भारतात काय समज आहेत माहीत आहे का? अमेरिकेत रस्तोरस्ती पिस्तूल दाखवून लुटतात. आपण प्रतिकार केला तर सरळ गोळी झाडून मोकळे होतात. खरं आहे का हे?"

एक मुलगा म्हणाला, "हे न्यूयॉर्कच्या बाबतीत आणि तेही तिथल्या काही रस्त्यांच्या बाबतीत खरं आहे, पण न्यूयॉर्क म्हणजे अमेरिका नव्हे."

पोर्टलँडमधे एक प्रसिद्ध बुकशॉप आहे. आमच्याबरोबर एस्कॉर्ट ऑफिसर कॅरी म्हणून होता. तो म्हणाला, "तिथं फार दुर्मिळ पुस्तकंही मिळतात. मागच्या एका प्रोग्रॅममधे एक आफ्रिकन कवी होता. त्याचं इंग्लिशमधे भाषांतर झालेलं आणि बऱ्याच वर्षांपूर्वी त्याच्या देशात प्रसिद्ध होऊन दुर्मिळ झालेलं कवितेचं पुस्तक या दुकानात मिळालं. त्याच्याकडेही त्या पुस्तकाची प्रत नव्हती. मग बुकशॉपने ती त्याला भेट म्हणून दिली."

कॅरीबरोबरच त्या दुकानाकडे निघालो. 'पॉवेल्स बुक शॉप' नावाचं ते दुकान तीन मजली आणि एका चौकापासून दुसऱ्या चौकापर्यंत पसरलं होतं. गेल्या गेल्या दुकानाचा नकाशा हातात मिळाला आणि आत शिरलो. मला मेक्सिकन मजुरांचा नेता सीझर शॅवेझ याचे आत्मचरित्र, ड्रग्ज, के.के.के. संघटना अशी बरीच पुस्तकं हवी होती. आयोवा विद्यापीठाच्या लायब्ररीतून ती घरी आणून जमतील तेवढ्या नोट्स काढीत होतो. पण एवढ्या सगळ्याला वेळ पुरणार नव्हता, म्हणून आयोवातल्या मोठ्ठ्या पुस्तकाच्या दुकानात चौकशी केली, तर बहुतेक पुस्तकांच्या आवृत्त्या संपल्याचं त्यानं कॉम्प्युटरवर बघून सांगितलं होतं. इथं हा पॉवेल पावतोय का हे बघायचं होतं. तिथल्या एप्रन घातलेल्या माणसाला विचारलं, त्याने लेबर सेक्शन दाखवला, मायनॉरिटीज् सेक्शनमध्येही पहा असे म्हणाला. मी गेलो आणि एकच टिकाव मारावा आणि पाण्याचा फवारा वर उडावा तशी सगळी पुस्तकं मिळत गेली. आणखी एक मजा म्हणजे नवीन पुस्तकांशेजारीच त्या पुस्तकाच्या सेकंडहँड प्रती ठेवलेल्या. त्यावर पेन्सिलीने किमती लिहिलेल्या होत्या. सीझर शॅवेझच्या आत्मचरित्राच्या नवीन प्रतीची किंमत तीस डॉलर्स होती, पण त्याच्या शेजारी अगदी जवळपास नवीनच असलेल्या प्रतीची किंमत सहा डॉलर होती. मी कॅरीला विचारलं, "यात बुकशॉपचं नुकसान नाही का होत?" तो म्हणाला, "पण किंमत कमी असल्याने पुस्तक न घ्यायचं ठरवून आलेल्यालाही मोह पडतो." माझंही असंच झालं. इतक्या कमी किमतीला आहेत म्हणून घेत सुटलो.

त्याआधी आम्ही ज्या ज्या मोठ्या शहरांत गेलो, तिथल्या बुकशॉपमध्ये जायचो. ओरिगामीची पुस्तकं नेहमी शोधायची. तुरळक दोन-चार पुस्तकं दिसायची. इथं मोठा सेक्शनच होता. भारतीय तत्त्वज्ञानाच्या विभागात गीता, उपनिषदे, जे. कृष्णमूर्ती, बुद्ध. . . अशा पुस्तकांच्या कपाटांच्या दोन रांगा होत्या. भारतीय समाजशास्त्र विभागात भारतातल्या कुठल्याही दुकानात मिळणार नाहीत इतकी पुस्तकं होती. काही अमेरिकन समाजशास्त्रज्ञांनी इकडे येऊन केलेले व्हिलेज स्टडीज तिकडे प्रसिद्ध केले होते, ती पुस्तकं तर इकडे कधी पहायलाही मिळाली नव्हती. त्यांतलीही काही उचलली. मोठ्या प्लॅस्टिकच्या बास्केट भरत होत्या. मला नंतर लक्षात आलं हे भारतात न्यायचं कसं? कारण पुस्तक हा फारच वजनदार पदार्थ. कॅरी म्हणाला, "तू, तुझा भारतातला पत्ता दे, हे लोक सरफेस मेलनं पाठवतील." मी म्हटलं, "पण पॅकिंग वगैरे करावं लागेल ना?"

तो म्हणाला, "सगळं ते करतात."

मी पुस्तकं काऊंटरला आणली. बिल दिलं. माझा भारतातला पत्ता दिला. पोस्टाचे सगळे मिळून वीस डॉलर्स त्यांनी घेतले. मी भारतात आल्यावर महिन्याभरात सगळी पार्सल्स व्यवस्थित घरी पोहोचलीही.

पॉवेल्स बुक शॉपच्या एका रस्त्यालगतच्या भागात कॉफी शॉप आहे. तिथं बरीच खुर्च्या-टेबलं आहेत. पुस्तकं बघून बघून दमल्यावर तिथं जाऊन बसलो. तिथं एका

टेबलावर ठेवलेली वर्तमानपत्रं, मासिकं चाळीत अनेकजण बसले होते. गप्पाही साहित्यावरच्या, चित्रप्रदर्शनावरच्या चालल्या होत्या. हे साहित्य व कलाप्रेमींचं रोजचं जमायचं ठिकाण असावं.

या बुकशॉपने आम्हाला एका संध्याकाळी रिसेप्शन दिलं. आल्या आल्या आम्हा प्रत्येकाच्या नावाचं कार्ड तयार होतं, ते खिशाला पिनेने अडकवलं गेलं. दुकानाची मालक म्हणजे साध्या ड्रेसमधली एक तरुण मुलगी होती. ती स्वतः प्रत्येकाला खाण्यासाठी बशा किंवा कॉफी नेऊन देत होती. आधी ओळख करून दिली नसती, तर ती तिथली कर्मचारी वाटली असती. तिने 'प्रिसिला' नावाच्या सोनेरी केसांच्या, गोऱ्या पन्नास-पंचावन्न वयाच्या बाईशी ओळख करून दिली. तिच्याबरोबर मी चहाचा कप घेऊन एका टेबलाशी बसलो. हिच्याशी काय बोलायचं असा विचार करतोय तोच ती म्हणाली, "भारतात मी जाऊन आलेय." मी चकित झालो. म्हणालो, "तुम्ही खूप फिरलेल्या दिसताय." ती म्हणाली, "तुमच्या भागात आणखी म्हणजे चायनाला गेले होते. माझा पूर्वीचा नवरा हा चायना एक्सपर्ट होता."

प्रिसिलाचा एक भारतीय माणूस इथं ओळखीचा झाला. तो आसामी होता. त्याच्याबरोबर ती तिकडे जाऊन आली. मग तिथल्या गरिबांसाठी चालवल्या जाणाऱ्या काही उपक्रमांना ती अमेरिकेतून मदत जमवून पाठवू लागली. आता अधूनमधून ते काम कसं चाललंय ते बघायला भारतात जाऊन येते. मीही जेवढा भारत बघितला नाही, तेवढा तिने बघितला होता. हे पाहून मी खजिलच झालो.

मी मेक्सिकन स्थलांतरितांमध्ये इंटरेस्टेड आहे, हे सांगताच तिने पर्समधनं चार-पाच ब्लॅक अँड व्हाइट फोटो काढून माझ्या हातात ठेवले. म्हणाली, "तुम्हाला भेट द्यायलाच आणलेत." ते मेक्सिकन हॅट्स् बनवणारांचे, काही रस्त्यावरील दृश्यांचे फोटो होते. फोटो फारच दर्जेदार होते. ते तिने काढलेले होते. मी आश्चर्याने विचारलं, "माझा इंटरेस्ट तुम्हाला कसा माहीत ?" ती म्हणाली, "मी तो माहीत करून घेतला. पॉवेल्सनी तुम्हा पाहुण्यांना एकेकावर सोपवलंय. मी भारतात जाऊन आले म्हणून तुमच्याकडे पहायला मला सांगितलंय. इतरांशी गप्पा कितीही झाल्या तरी हवंच, पण कुणी एकटं राहू नये म्हणून ही व्यवस्था. तुमचा बायोडेटा, स्पेशल इंटरेस्ट, सगळं मी आधीच वाचलंय. मेक्सिकन मायग्रंटस्‌मध्ये मी काम केलंय. इथं ओरेगॉनपर्यंत ते दरवर्षी येतातच ना. त्यांच्या लीगल केसेस आम्ही फाइट केल्यात. त्यांचं शोषण होऊ नये, म्हणून काही प्रकरणं उजेडात आणलीत. यांना नागरिकत्व द्यावं म्हणून कायदा बदलावा अशी मागणी केली..."

श्वास घेऊन ती म्हणाली, "पण तुम्हाला हे माहीत आहे का की, या मजुरांमध्ये रशियन स्थलांतरित मजूरही आहेत ?"

मी उडालोच. "रशियातून कोण कशाला येईल इथं ?"

"रशियात क्रांती झाली तेव्हा ऑर्थोडॉक्स चर्चची बरीच कुटुंबं आता धर्म पाळता

येणार नाही, या भीतीने सैबेरियामार्गे मंगोलियातून चीनकडे आली. तिथून समुद्रमार्गे दक्षिण अमेरिकेत आली. तिथून ती वर यु.एस.ए. मध्ये कॅलिफोर्नियात आली. मेक्सिकन लोकांसारखे स्थलांतर करीत तेही जगतात."

"तुम्हाला यांचा पत्ता कसा लागला ?"

"मेक्सिकन लोकांमध्ये काम करताना. हे इतरांपासून फारच अलिप्त राहतात. हे लोक त्या वेळची रशियन भाषा छान बोलतात. लग्न त्यांच्या त्यांच्यात हे तर ओघानंच आलं. पण कुठल्याही शाळेत मुलांना पाठवीत नाहीत. ते ऑर्थोडॉक्स चर्चचे असले तरी त्यांचा त्या चर्चशी काही संबंध राहिलेला नाही. कारण स्थलांतराच्या काळात यांच्या बरोबरचा प्रीस्ट मरून गेला. मग यांच्यातला एखादा वडीलधारा माणूस त्याला जमेल त्या पद्धतीने बाप्तिस्मा देतो, लग्न लावतो. त्यांची लग्नं फार पाहण्यासारखी असतात. बाहेरच्या कुणाला ते येऊ देत नाहीत. पण मला येऊ तर दिलंच, पण फोटोही काढू दिले. लग्नाला सगळीकडनं त्यांची माणसं येतात. अगदी अलास्काहूनही माणसं येतात."

"अलास्काहून ?" अमेरिकेच्या उत्तरेचं ते नकाशात पाहिलेलं बर्फाच्छादित बेट आठवलं.

"यातली काही कुटुंब अलास्कात पोहोचलीत. ते रशियाशी जुळतं हवामान असल्यानं काहींनी तिथं शेती विकत घेऊन ते सेटलही झालेत."

"तुम्ही त्यावर काही लिहिलंय का ? ते फोटो प्रसिद्ध केलेत ?"

"नाही. कारण त्यांचा चालता-बोलता टुरिस्ट स्पॉट व्हावा, असं मला वाटत नाही. अर्थात तो व्हायचा थांबणार नाही. कारण नुकतच तसे फोटो कुठंतरी प्रसिद्ध झालेत. आमची अमेरिकन संस्कृती अशी आहे की ज्याला ती स्पर्श करते, त्याचं 'कंझ्युमर प्रॉडक्ट' मध्ये रूपांतर होतं. आता या पिढीत ते लोक मुलं इथल्या शाळेत घालू लागलेत. ड्रगचे प्रॉब्लेम सुरू झालेत... हे कुणी थोपवू शकणार नाही, पण निदान माझा त्याला हातभार नको."

आम्ही अनेक विषयांवर भरभरून बोललो. तिने अमेरिकन कंझ्युमर संस्कृतीवरची नाराजी व्यक्त केली. यंत्रांमुळे माणसं एकमेकांपासून कशी तुटली, जगाचे लीडर म्हणून असलेला अहंकार सोडल्याशिवाय इतर संस्कृतींपासून आम्ही काही शिकूच शकणार नाही, ध्येयवाद हरपल्यामुळे आतून ही संस्कृती कशी कुजत व किडत चालली आहे... इत्यादी. ती बोलत होती. मी भारतात वाढणारा जातीयवाद, शोषण... इत्यादी विषयांवर बोललो. आमच्या उपक्रमांविषयी सांगितलं. प्रत्येक बोलण्यातून सूर जास्तच जमत गेले. कधीतरी बाजूला पाहिलं तर कुणीच राहिलं नव्हतं. आम्ही दोघंच त्या टेबलापाशी. दुकानातले कर्मचारी तेवढे वावरत होते. संध्याकाळी सहाला जे बोलायला सुरुवात केली ते आत्ता अकरा वाजले होते. बाहेर पाऊस पडत होता. तिने तिच्या गाडीने मला हॉटेलपाशी सोडलं.

पोर्टलँडमध्ये आम्हा प्रत्येकाला एका रात्री एकेका अमेरिकेन कुटुंबात जेवायला जायचं होतं. मी हॉटेलच्या लॉबीत बसलो होतो. एक गोरा, प्रौढ, मायकेल केनसारखा दिसणारा

माणूस काऊंटरवर माझ्या नावाची चौकशी करीत होता. डॉन विल्लर त्यांचं नाव. त्यांच्याबरोबर पूर्णपणे काळया रंगाचा, कुरळया केसांचा तरुण मुलगा होता. गाडीत बसल्यावर त्यांनी ओळख करून दिली, "हा माझा जावई. हा भारतीय आहे." त्याचं नाव दिवाकर. तो आंध्रप्रदेशातला होता. तिथल्या विद्यापीठात शिकत होता. डॉन हे पूर्वी सिनेटर होते. त्यांनी स्थलांतरितांचं शोषण थांबावं, म्हणून कायद्यात बऱ्याच सुधारणा करण्याचा प्रयत्न त्यांच्या कारकीर्दीत केलेला होता. काही वेळाने दिवाकरची बायको बेकी ही तिची नोकरी संपवून आली व सामील झाली. गोरी, छोटी, छान दिसणारी मुलगी. ती आणि दिवाकर बरोबर शिकत होते, तिथली त्यांची ओळख. आता ही नोकरी करते म्हणून दिवाकर शिक्षण घेऊ शकतो. ते 'ब्लॅक अँड व्हाईट' कपल पाहून बरं वाटलं. घरातल्या सगळ्यांचा या लग्नाला मनापासून पाठिंबा होता. डॉनची बायको मार्जोरी ही इंग्लिशची प्रोफेसर होती. ती म्हणाली, "तुमच्यासाठी शाकाहारी जेवण करायचा प्रयत्न केला आहे. कसं झालंय ते बघा. कारण तुमच्या बायोडेटात 'नॉट इव्हन एग्ज्' लिहिलेलं असल्याने माझी पंचाईत झाली. कारण अंडं आम्ही जवळपास प्रत्येक पदार्थात घालतो." पण जेवण छान झालं होतं. तिचा माझा आवडता लेखक एक निघाला, डी.एच. लॉरेन्स. मग आम्ही त्यावर भरभरून बोलू लागलो. इतरांची पंचाईत होतेय असं लक्षात आल्यावर विषय बदलला. नंतर बोलण्यातनं समजलं की मार्जोरी ही बेकीची आई नाही, ती डॉनची दुसरी बायको. बेकीची आई ही पोर्टलँडमध्येच राहते. तिलाही दुसऱ्या दिवशी भेटलोच. तिनेही डॉन, मार्जोरीची चौकशी केली. मला या सगळ्याचं नवल वाटलं. या घटस्फोटाविषयी कुणी उल्लेख टाळीत नव्हतं. नाती संपली असली, तरी कटुता आलेली दिसत नव्हती. डॉन, दिवाकर-बेकी, बेकीची आई हे तीन ठिकाणी राहत असून बऱ्यापैकी जाणं येणं असावं. बेकीची आई म्हणाली, "मार्जोरी किती क्यूट आहे, नाही ? आणि तिचा मुलगा ? तो फारच गोड आहे." समजा हे वरकरणी असलं तरी त्याने कडवटपणा तर निदान किती कमी होत असेल ! आपल्याकडे घटस्फोटाला केवढं व्यंग समजण्यात येतं. दुसरी माणसं तर त्यांना टोचतातच, पण स्वतःलाही ती माणसं दोष देऊन कुढत राहतात.

मी दिवाकरला म्हटलं, "आतापर्यंत ज्या शहरात गेलो तिथं कुणीतरी महाराष्ट्रीयन मला भेटलेच. मी तिकडनं पत्ते आणले होते. पण हे एकच शहर असं आहे की माझ्याकडे असा एकही पत्ता नाही." तो म्हणाला, "उद्या संध्याकाळी तुम्हाला वेळ आहे का? इथं दिवाळी-फंक्शन आहे. या भागातले भारतीय लोक जमतात. तिथं तुम्हाला महाराष्ट्रीयन भेटतील." मी 'हो' म्हटलं. बेकी, दिवाकर, बेकीची आई असे त्यांच्या गाडीने त्या फंक्शनला गेलो. तेही पहिल्यांदाच जात होते. शाळेच्या इमारतीत ते फंक्शन होतं. पंजाबी, सिंधी, मद्रासी अनेकजण जमले होते. दिवाकरने दहा डॉलर फी भरताना तिथल्या माणसाला कुणी मराठी माणूस आल्यास आम्हाला सांगा असं सांगूनही ठेवलं. काही वेळाने एक-दोन कपल्स दिसली. सांगावंच लागलं नाही की ती मराठी आहेत. आणखीही काही जमले.

बहुतेकजण इंजिनियर होते. तेही पुण्याच्या इंजिनियरिंग कॉलेजचे. माझ्याच वयाचे असावेत. माझी मीच ओळख करून दिली. एरवी सुशिक्षित, मध्यमवर्गीय माणूस भेटला की निदान माझे नाव त्याच्या कानावरून गेलेलं असण्याइतपत ओळख पटते. पण यांनी माझं नावही ऐकलं नव्हतं. मी जरा नर्व्हस झालो. पण नंतर लक्षात आले, माझ्या पिढीच्या कुठल्याही बऱ्या लेखकाचं, कार्यकर्त्याचं नाव किंवा कार्य त्यांना माहीत नव्हतं. पुण्यात राहून ही मंडळी किती समाजापासून अलिप्त जीवन जगत होती. शेवटी शेवटी एक-दोन कपल्स आली. त्यांतल्या तरुण मुलीचे व तिच्या नवऱ्याचे मात्र माझं नाव ऐकून डोळे लकाकले. त्यामुळे जरा बरं वाटलं.

तिथं अनेक ग्रूप्स उभ्यानं गप्पा मारीत होते. मी जाऊन 'जॉईन' व्हायचो. ओळख करून द्यायचो, पण ते 'हाय' म्हणून त्यांचं ते बोलत राहायचे. त्या त्या भाषकांचे ग्रूप्स आपोआप तयार झालेले, एकमेकांत कुणी मिसळत नव्हतं. जेवण अनाउन्स झाल्यावर लाइन लावण्यासाठी झुंबड उडाली. लायनीत घुसाघुशीही सुरू झाली. सगळं अगदी भारतासारखंच. अमेरिकेत आल्यापासून सगळं शांत, शिस्तशीर पाहायची सवय लागली होती, तिचा क्षणात निचरा झाला. बेकी, बेकीची आई व दिवाकर हे तिघे एके ठिकाणी उभे होते. त्यांच्याशी कुणी बोलत नव्हतं. रांग या प्रकाराकडे तर त्या दोघी हतबुद्ध होऊन पाहत होत्या.

दिवाकर आदल्या दिवशी म्हणाला होता, "इथं एक रॅडिकल विचारांचा ग्रूप आहे. भारतातले प्रश्नही त्यांना समजून घ्यावेसे वाटतात. त्यांना तुम्हाला भेटायचं आहे." मी अर्थातच हो म्हटल्यावर त्याने त्यांना या दिवाळी फंक्शनच्या इथे भेटायला बोलावलं होतं. ते पाच-सहा जण तिथं येऊन पोहोचले. त्या भरजरी भडक रंगाच्या साड्या आणि पंजाबी ड्रेस घातलेल्या स्त्रियांच्या समुदायात अगदी साध्या कपड्यात आलेली ही अमेरिकन मुलंमुली फारच वेगळी पडत होती. जेवण उरकल्यावर नंतर तिथं 'जादूचे प्रयोग' सुरू होणार असल्याने आम्ही सगळे बेकीच्या आईच्या घरी येऊन बसलो. त्यांच्यात एक मारी ऑर नावाची स्मार्ट, तुडतुडीत, भरभर बोलणारी, ज्वलंत विचारांची मुलगी होती. अशा प्रत्येक ग्रूपमधे बहुधा अशी एखादी व्यक्ती असतेच, तिच्याभोवती तो ग्रूप उभा राहतो. अमेरिकेत आल्यापासून अमेरिकन मनातला सुप्त जातीयवाद (रेसिझम) जाणवत होता, त्याबद्दल मी भीतभीत विचारलं. ती ताडकन म्हणाली, "बहुतेक अमेरिकन हे रेसिस्टच आहेत. ते अगदी नक्की बुशला निवडून देणार. आणि बुश आल्यावर रेसिस्टांना ऊतच येणार आहे. डुकासिससुद्धा खरा रॅडिकल नाहीच आहे. रेगनच्या काळापासून अमेरिकेचं चित्र अधिकच बिघडलं आहे," पुढं ती म्हणाली, "अमेरिका जगातल्या गरीब देशांमधल्या अर्थव्यवस्थेत, राज्यव्यवस्थेत मन मानेल अशी ढवळाढवळ करीत आहे. ग्वाटेमाला, निकाराग्वा. . . सगळ्या लॅटिन अमेरिकन देशांत त्यांनी निर्लज्ज उत्पात घडवून आणलेत. सी.आय.ए. तर मानवी संस्कृतीच्या विकृतीचं प्रतीक आहे." ही मुलं त्यांच्या परीनं जगातल्या

गरीब देशांच्या लढ्यांना तुटपुंजी का होईना मदत गोळा करून देतात. जमल्यास जाऊनही येतात. मला त्यांनी इकडच्याबद्दल खूप प्रश्न विचारले. कासेगावला काम करणाऱ्या गेल ऑमवेटची तिची ओळख होती. मी अमेरिकेतून इंग्लंडला जाणार असल्याचं सांगताच तिने मला एका कोळसा खाण कामगारात काम करणाऱ्या वृद्ध दांपत्याचा पत्ता दिला आणि म्हणाली, "१९३० पासून ते काम करताहेत, पण अजूनही हरलेले नाहीत."

रात्रीचे दोन-अडीच झाले होते. दिवाकर आणि बेकीने मला हॉटेलवर पोहोचवले. वाटेत तो म्हणाला, "माझा थोरला भाऊ तिकडं आंध्रातल्या अगदी डोंगराळ भागात सामाजिक काम करतो. त्याचं काम शैक्षणिक स्वरूपाचं आहे. बेकी तिथं वर्षभर राहून, काम करून आलीय. इथला माझा कोर्स व्हावा म्हणून ती परत आलीय. हा कोर्स संपला की आम्ही दोघंही जाऊन भावाच्या कामात सामील होणार आहोत." बेकीला विचारलं, "भारतात तुला राहायला कसं वाटलं ?" ती म्हणाली, "खूपच आवडतं. तिथं माणसांना माणसाविषयी जिव्हाळा आहे, इथं ते नाही."

"पण अस्वच्छता... खेड्यात तर टॉयलेटचा प्रॉब्लेम..."

ती हात उडवून हसून म्हणाली, "छेः छेः, त्या फारच कमी महत्त्वाच्या गोष्टी आहेत."

पोर्टलँडमध्ये 'संडे मार्केट' असतं, असं कळलं. म्हणजे चक्क आठवड्याचा बाजार. या सुपरमार्केटच्या देशात या संडे मार्केटविषयी कुतुहल वाटलं, म्हणून हातात नकाशा घेऊन पायीपायी निघालो. एका चौकानंतर बरीच गर्दी दिसू लागली. रिदमवरचं म्युझिक ऐकू येत होतं. गर्दीतून डोकावलं तर जुन्या इमारतीच्या पोर्चमधे एक तुकतुकीत ब्लॅक तरुण हातात माइक घेऊन इकडे तिकडे नाचत गाणं म्हणत होता. त्याच्यामागे तेलाच्या रिकाम्या चार-पाच पिंपांवर पुढे रबरी गोळा असलेल्या दोन दांडूंनी बडवून रिदम देत होता. त्या प्रत्येक पिंपाचा आवाज वेगवेगळा असल्याने एखाद्या प्रगल्भ ताल वाद्यासारखा आवाज येत होता. वाजवणारा माणूस डोळे मिटून तालाप्रमाणे बसल्या बसल्या शरीराला हेलकावे देत होता. त्या रिदमच्या नशेच्या सुखामुळे त्याच्या चेहऱ्यावर स्मित फुललेलं होतं. गाणारा माणूस बसक्या खर्ज आवाजात गात होता. पूर्वी असा आवाज मला आवडायचा नाही. पण इथं आल्यापासून अशी गाणी ऐकून ऐकून त्याची गोडी वाटू लागली होती. गाणारा गातानाही हळूहळू नाच करीत होता. लोकही उभ्या उभ्या पायाने थोडा ताल देऊन नाचल्यासारखे करून दाद देत होते.

मी पुढं झालो. छोटी छोटी वर कापडाचे छत लावलेली अनेक दुकानं होती. बहुतेक सगळी कलाकुसरीच्या वस्तूंची, खेळण्यांची होती. सर्व माणसं गोरी, सोनेरी केसांची. एक तिशीची बाई तिच्या मुलाला सांभाळत समोर पाण्यात तरंगणाऱ्या खेळण्यातल्या लाकडी बोटी घेऊन बसली होती. त्याची कापडी, रंगीत शिडं स्वतः शिवून होड्यांच्या दांड्यांना अडकवत होती. एक म्हातारी बाई कापसासारख्या पण सिंथेटिक मटेरिअलचे प्राणी करीत होती. एक तसा पांढरा गोळा घेऊन दुसरा त्याला पांढरा गोळा जोडायची. त्यावर लुकलुकणारे प्लॅस्टिकचे दोन तयार डोळे चिकटवायची, कान आणि मागे लोकरीच्या तुकड्याचे शेपूट लावायची.

सगळ्यात शेवटी खाली मॅग्नेटचा तुकडा लावून समोरच्या वस्तूंमध्ये ते मांजर विक्रीसाठी ठेवून द्यायची. लाल रंगाचा किडा, आणखी बरेच प्राणी करीत होती. एकजण लाकडी छोटे लांबट ठोकळे रंधा मारून एकसारखे करीत होता. त्याची छोटी मुलगी ते रचून, टॉवर करून मुलांचं लक्ष वेधून घेत होती. जवळपासच्या डोंगरांवर सापडणारे रंगीबेरंगी दगड मांडून बसले होते. आपण दगड निवडल्यावर त्याला जवळच्या छोट्या यंत्राने भोक पाडून त्यात तार ओवून त्याचं पदक करून देत होते. एकजणाने दगडांना दगड कसल्या तरी पांढऱ्या चिकट द्रवाने चिकटवून बेडूक, जिराफ इ. प्राणी केलेले होते. त्याच्या बेसवर तो गिऱ्हाइकाचं नाव कोरून घालून देत होता. कुणी टीशर्टवर आपलं नाव उमटवून देत होतं.

सगळ्यात आवडलं ते दुकान म्हणजे स्टीलच्या टाकाऊ वस्तूंपासून उपयुक्त किंवा गमतीदार वस्तू बनवण्याचं. तो करणारा माणूस तिथं बसूनच काम करीत होता. ते छोटं दुकान अशा वस्तूंनी लगडलेलं होतं. चमच्या-काट्यांपासून त्याने कितीतरी वस्तू केल्या होत्या. काट्याच्या पुढच्या तुकड्याचे, दांड्याला भोक पाडून त्याला रिंग बसवून त्याचे छान इअरिंग केले होते. चमचा वाकवून पिळून त्याची दंडातली वाकी किंवा हातातली ब्रेसलेट केलेली होती. एक चष्मा फारच गमतीशीर होता. दोन गोल, जाळीवाली चहाची गाळणी घेऊन त्यांना मधे चष्म्याला असते तशी वाकडी, नाकावर बसवायची पट्टी आणि बाजूला चष्म्याच्या स्टीलच्या काड्या बसवल्या होत्या. असं खूप काही. पट्ट्याच्या बकलावर काही लोक स्वतःची आद्याक्षरं करून बसवून घेत होते. तो दाढीवाला, चष्मेवाला अबोल माणूस लोकांना पाहिजे ते करून देत होता.

आत एक स्टेशनची की कसली तरी इमारत आहे. तिथं खूप दुकानं होती. पोपट, सनबर्डसारख्या अनेक पक्ष्यांचं दुकान होतं. तिथं आवडीप्रमाणे पिंजरा करून देत होते. जुन्या, अंधाऱ्या जागेत ती छोटीछोटी दुकानं होती. सुपर मार्केटसारखा प्रकाश आणि विस्तार तिथं नव्हता. पण कारागीर तिथं स्वतः वस्तू विकत होता. गिऱ्हाईकाला इथं महत्त्व होतं. त्याच्या आवडीनिवडीप्रमाणे वस्तू प्रत्यक्ष तयार करून मिळत होती. मी तिथं अनेक खेळणी, ठोकळे, प्राणी घेतले. अमेरिकेहून आल्यावर इथले लोक अपेक्षित अशा इलेक्ट्रॉनिक वस्तूंऐवजी असल्या वस्तू पाहून चकितच झाले होते. तो सगळा या संडे मार्केटचा महिमा होता.

खाली उतरलो तर मघाच्या गाणाऱ्या ब्लॅक्सपाशी आलेलो होतो. गाणारा आता अधिक रंगून गात होता. वाजवणारा तर बेभान झालेला होता. तिसरा एकजण या गायकाच्या गाण्याच्या त्याने स्वतः काढलेल्या कॅसेट्स् विकत होता. आणि लोक त्या विकत घेत होते. वाजवणाऱ्याच्या चेहऱ्यावरचं स्मित आता आणखीनच विस्तारलं होतं. ऐकणारी सगळी माणसं जागच्या जागी उभी राहून ठेका देत होती. काहीजण तर नाचतच होते. माझेही पाय नकळत ठेका धरू लागले.

★★★★★

# रेडवूड, ग्रँडकॅनियन

अमेरिकेचं वैभव न्यूयॉर्क किंवा शिकागोच्या गगनचुंबी इमारतींच्यामधे दिसतं, असा सर्वसाधारण समज आहे. तिथल्या निसर्गाच्या समृद्धीची कल्पना तिथे जाईपर्यंत मला फारशी आलेली नव्हती. वॉशिंग्टनहून थॉमस जेफर्सनच्या शार्लेटव्हिल् या गावी आम्हाला बसने नेलं तेव्हा बाजूचे डोंगर दाट झाडीने मढलेले. पुण्याच्या आसपास थोडी झाडी दिसली तरी केवढं अप्रूप वाटतं. स्कूटर उभी करून निवांत त्या झाडीत जाऊन बसावंसं वाटतं. तिकडच्या शहरातसुद्धा किती झाडी असते ! शिकागोला गुन्हेगारीमुळे मी बकाल शहर समजत होतो. पण विमानातनं पहिल्यांदा शिकागो जेव्हा पाहिलं तेव्हा आखीव रस्ते, छोटे छोटे बंगले आणि सर्वदृश्य भरून टाकणारी, झाकून टाकणारी भरपूर झाडी. कॅनडातून अमेरिकेत डेट्रॉइटला कारने येताना वस्त्याच्या दोन्ही बाजूंना भरगच्च झाडी (आणि तीही फॉल सीझनमधली रंगीबेरंगी झाडी) पाहिली. आपल्याकडेही ताडोबाचे जंगल किंवा केरळमधली सायलेंट व्हॅली किंवा आसाममधली जंगलंही सुरेख आहेत यात शंकाच नाही. पण देशाच्या मानाने ती अगदी लहान बेटं. तिकडे टेक्सास ॲरिझोना हा वाळवंटी भाग उजाड आहे; पण तो सोडला तर उरलेल्या अमेरिकेत भरपूर झाडी आहे. तिथं झाडी ते टिकवू शकले याचं कारण त्यांच्या लाकडाच्या गरजांसाठी गरीब देशांची जंगलं तुटत असतात, हेही तितकंच खरं आहे. पण तरीही कुठलीही झाडी ही मनाला आल्हाद देते, तसा मी तिथं रमलो.

सानफ्रान्सिस्कोजवळ म्यूरवूड नॅशनल पार्क आहे. तिथं रेडवूड नावाच्या झाडांचं जंगल असल्याचं ऐकलं होतं. जगात फक्त आफ्रिकेत, म्यूरवूडमध्ये आणि अमेरिकेच्याच पोर्टलँड भागात अशा तीनच ठिकाणी रेडवूडची जंगलं टिकून आहेत. गेल्सबर्गला अशोक काळेकडे गेलो होतो. तिथं त्यानं मला आवर्जून रेडवूड फॉरेस्ट पाहायला सांगितलं होतं. ते लक्षात ठेवून सानफ्रान्सिस्कोला आल्यावर निमा गुजरला म्हणालो. त्या दिवशी तिला ऑफिस असल्याने ती म्हणाली, "तू बसने जा. ती बस तिथं थांबते आणि तीच तुम्हाला परत घेऊन येते. अगदी सहज जमेल." एके दिवशी सकाळी तसा बसने म्यूरवूड फॉरेस्टकडे

निघालो.

बसमधल्या गाईडने सांगितलं, "जगातल्या इतर रेडवूड जंगलांप्रमाणे हेही जंगल सगळीकडून तुटत चाललं होतं. पण एका श्रीमंत माणसाने ते सगळं जंगलच विकत घेतलं. आणि ती झाडं तुटायची वाचवली. नंतर अमेरिकन प्रेसिडेंटला त्याने इथं बोलावलं आणि सरकारच्या हवाली केलं. या फॉरेस्टला तो स्वतःचं नाव देऊ शकला असता, पण म्यूर नावाच्या निसर्ग शास्त्रज्ञाचं नाव त्याने या जंगलाला दिलंय."

बस तिथं फक्त पाऊण तास थांबणार होती. मी निराश झालो. इतक्या थोड्या वेळात जंगल कसं दिसणार. निमाला रजा नव्हती आणि मीही एक-दोन दिवसांत गाव सोडणार असल्याने इलाज नव्हता. ठरवलं की वीस मिनिटं चालत राहायचं. पाच मिनिटं थांबायचं. आणि परत यायला वीस मिनिटं. बसमध्ये त्या फॉरेस्टचं फोल्डर चाळू लागलो. हे जगातलं सर्वांत जुनं, हयात असलेलं झाड. सुमारे अडीच हजार वर्षं जुनं. तसंच हे जगातलं सर्वांत उंच, म्हणजे अडीचशे ते तीनशे फूट उंच झाड आहे. मला कल्पनाही करता येईना. मी राहतो ती तीन मजली इमारत तीस- बत्तीस फूट उंच आहे, अशा दहा इमारती एकावर एक ठेवायच्या ? एवढी उंची ? त्यावरून पुढे त्यात लिहिलं होतं 'जगातली सगळ्यात जुनी सजीव गोष्ट' पुढं आणखीही गमतीशीर गोष्टी लिहिल्या होत्या. हे झाड एवढं टिकायचं कारण याच्या सालीमध्ये 'टॅनिन' असतं. त्याच्यामुळेच झाडाला लालसर रंग येतो. टॅनिन हे अग्निरोधक असल्याने इतर झाडं- जंगलं वणवा लागला की जळून जातात, त्या धोक्यापासून ही बचावली. आणखीही एक नवलाईची गोष्ट त्यात होती. ती म्हणजे इतक्या उंच झाडांची मुळं मात्र फार खोलवर जाणारी नव्हती. ती जमिनीलगत, आडवी पसरणारी होती. पण ती या झाडांना एकमेकांना जोडणारी, त्यांचं खाली एक जाळंच तयार करणारी होती. त्यामुळे समजा जरी मधली अधली झाडं कुजली, तुटली तरी तिथं नवी येऊ शकली. कॅलिफोर्नियात भूकंप हे नेहमीचे. या जमिनीखालच्या मुळांच्या जाळ्यामुळे ती भूकंपातही तग धरू शकली. तुटलेल्या झाडांचा आडवा काप घेऊन आतल्या गोलाकार रेषांवरून वय ठरवता येतं. अशा कापाचं चित्र दाखवलं होतं. त्यात एका रेषेवर 'या वेळी ख्रिस्त जन्मला' असं लिहिलं होतं. जगातल्या अशा प्रमुख घटनांचा काळ त्या झाडाच्या सेक्शनवर दाखवला होता.

झाडीने भरलेला घाट गाडी उतरत होती. भोवतालची झाडं पाहून हीच तर नसतील रेडवूड, खोडांना दिसतोय का लालसर रंग, असं बघायचो. पण बस थांबली आणि समोर दोन टेकड्यांच्यामध्ये असलेल्या दाट जंगलातली सुरुवातीचीच उंच, लाल खोडाची झाडं बघितली तेव्हा ओळखलं की हीच ती रेडवूडची झाडं. बसमध्ये बजावलं होतं, 'ही झाडं ही राष्ट्रीय संपत्ती म्हणून जतन केलेली आहेत. त्यामुळे आत जो रस्ता आहे तो सोडून आत जाऊ नका. रस्त्याच्या कडेला लाकडी कठडे आहेत ते ओलांडू नका. सिगारेट ओढू नका. हळू बोलण्याव्यतिरिक्त कुठलाही आवाज करू नका. टेपरेकॉर्डर, ट्रान्झिस्टर लावू नका.'

आणि या नुसत्या सूचना नव्हेत तर तसे तिथं नियम आहेत.

सुरुवातीलाच गिफ्ट शॉप आणि रेस्टॉरंट होतं. बसमधल्या प्रवाशांपैकी निम्म्याहून अधिक लोक तिकडे पळाले. काही लोक पहिली पाच-सात मिनिटं चालून परतले. आणि आम्ही एकदोघंच पुढं निघालो. पुढे तर मी एकटाच राहिलो.

सहा फूट रुंदीच्या दोन वाटा, त्यांमधून वाहणारा ओढ्याचा प्रवाह. त्यावर दोन-तीन ठिकाणी त्या वाटांना जोडणारे लाकडी पूल. आणि भोवती सरळसोट, आकाशात गेलेली, मधेअधे कुठेच फांद्या नसलेली उंचच उंच झाडं. काळपट लाल रंगाची खोडं होती. खोडं खूपच खडबडीत होती. त्यावर सहा-सहा इंच खोलीच्या करकरीत वळ्या होत्या. एखाद्या ट्रॅक्टरच्या टायरला असतात तशा. आत जाऊ लागलो तशी उंच उंच झाडं लागू लागली. त्यांचे घेरही मोठमोठे होत गेले. किमान तीन-चार माणसं हात पसरून उभी राहिल्यावर मावतील एवढे ते घेर होते. इकडे गोरख चिंचेची खूप मोठ्या घेराची झाडं पाहिलीत. पण ती झाडं उंचीने कमी, आणि खोडं खाली फुगल्यासारखी असतात. तसं या झाडांचं नव्हतं. सरळ प्रचंड खांबासारखी झाडं. याची सालच एक फूट जाडीची असते, असं त्या फोल्डरमधे लिहिलं होतं, ते आता खरं वाटलं. खोडावरून नजर वर नेत नेत शेवटी त्याला फुटलेल्या फांद्या आणि पानांवर जायची. अनेक झाडांची फांद्या, पानं एकत्र आल्याने फक्त अधूनमधून आकाशाचे तुकडे दिसायचे तेवढंच. सकाळी दहाची वेळ होती. पण या जंगलात अजून उन्हं पोहचलेली नव्हती. सकाळचे सहा-सात वाजले असावेत एवढाच प्रकाश होता. जसजसा आत जाऊ लागलो तसा तोही कमी होऊ लागला. आकाशाचे तुकडे अगदीच क्षुल्लक होऊ लागले. आणि नंतर तर ते आकाशातल्या चांदण्यांसारखे दिसू लागले. आता एखाद्या प्रचंड आकाराच्या गुहेत प्रवेश करतोय असंच वाटू लागलं. आवाजांची दुनिया तर कधीच मागे पडली होती. शांततेच्या डोहात शिरल्यासारखं वाटत होतं.

रस्त्यालगतच्या एका झाडाला हात लावून पाहिला. त्याचा खडबडीतपणा कुठल्याही झाडाच्या खोडासारखा एरवी वाटला असता. पण या झाडाची माहिती झाल्याने तो स्पर्श वेगळाच वाटला. अडीच हजार वर्षं जुनी सजीव वस्तू, हिला वस्तू म्हणणंही चूक. सजीव अस्तित्व म्हणावं. अडीच हजार वर्षांचा काळ. माझं रेटत रेटत पंचेचाळीसाव्या वर्षापर्यंत आणलेलं आयुष्य मला केवढं वाटतं, आता सर्रासपणे 'आमच्या लहानपणी असं होतं...' असं मी सांगत असतो. पण या झाडाच्या एक फूट सालीच्याही वरचा एखादा कण म्हणजे ही पंचेचाळीस वर्षं असतील का ? याच झाडात कुठंतरी ख्रिस्त आहे, कृष्ण आहे, बुद्ध आहे, चार्वाक आहे, तुकाराम आहे आणि हिटलरही आहे. काव्यात्म भाषेत असं म्हणता आलं असतं की, ही सगळी माणसं, संस्कृतींचे उदय आणि विनाश या झाडाने पाहिलेत, पण तसं म्हणवेना. ते चालू असता हे झाड हयात होतं, एवढं फारतर म्हणता येईल. पूर्वी याच्याखाली आदिमानवांच्या चुली पेटत होत्या आणि आता टुरिस्टांच्या बसेस थांबताहेत.

बसची आठवण झाल्यावर घड्याळ बघितलं. त्या अपुऱ्या प्रकाशातही लक्षात आलं

की भरभर गेलो तरच बस सापडणं शक्य आहे. नाहीतर काही तासांनी दुसरी बस, मग निमाची माझी चुकामूक, घरी पोहोचायची पंचाईत.

भरभर पावलं टाकीत होतो. स्वतःच्या पावलांचे आवाज येत होते. उंच खांबांच्या रोमन साम्राज्यातल्या इमारतीतून चालतोय असं वाटलं. प्रकाश हळूहळू वाढू लागला. गेटबाहेर आमच्या ग्रूपमधली माणसं हसत खेळत, आइस्क्रीम खाताना दिसली, तेव्हा वाटलं, चला, आता बस सापडणार.

ग्रँड कॅनियनवर भरपूर रंगीत फोटो छापलेलं पुस्तक माझ्याकडे आहे. मी ते अनेकदा बघत आलेलो आहे. पूर्वीपासून मी उघड्याबोडक्या डोंगरांची चित्रं काढीत आलेलो आहे. त्यातही वरून दिसणारी खोल दरी आणि त्यातून वाहणारा नदीचा चिंचोळा, नागमोडी, बारका प्रवाह... असं दृश्य तर अनेकदा काढलंय. मी ही चित्रं कल्पनेनंच काढत आलेलो असताना ते ग्रँड कॅनियनचं पुस्तक हातात पडलं आणि वाटलं, माझ्या चित्रातला निसर्ग कोणीतरी खरा करून माझ्यासमोर मांडला आहे. उंचच उंच कडे, त्यांतून सुट्या झालेल्या शिळा, खालून वाहणारी कोलोराडो नदी. वाटायचं, पक्ष्यासारखा विहार करीत या दरीवरून निवांत फेरफटका मारावा. ध्यान करायची मला आवड. ध्यानात कल्पनेनं एखादं दृश्यं डोळ्यांसमोर आणलं की ते दृश्य अधिक उठावदार, अधिक खऱ्याखऱ्या रंगांचं दिसू लागतं. ते साध्या फोटोसारखं स्थिर न राहता त्यातली झाडं वाऱ्याने हलूही लागतात. ध्यानात मी ग्रँड कॅनियनची दृश्य डोळ्यासमोर आणलीत. झूमलेन्सने जसं एकदम तळापर्यंत जाता येतं, तसंही करून बघितलेलं आहे.

खरा ग्रँड कॅनियन कधी बघायला मिळेल असं वाटलं नव्हतं. मी तसं मनोराज्यही केलं नव्हतं. अमेरिकेत पोहोचलो तरी तो नेमका कुठं आहे आणि तिथं जायला आपल्याला जमणार आहे का, याची काहीच कल्पना नव्हती. पण शांता शेळक्यांची भाची अंजू मला आयोवात भेटली. ती म्हणाली, "त्यात काय, तू माझ्याकडे लॉसएंजेलिसला येणारच आहेस ना, तेव्हा आपण ड्राइव्ह करीत जाऊ." आणि खरोखरच महिन्या दीडमहिन्याने मी तिच्याकडे गेल्यावर एका पहाटे तिचा नवरा अजय, ती व मी ग्रँड कॅनियनकडे निघालो. ती सहजपणे म्हणाली असेल की आपण ड्राइव्ह करीत जाऊ, पण तितके ते जवळ नव्हते. त्यांच्या वेगानेही ते जवळपास दहा-अकरा तासांचे अंतर होते. कॅलिफोर्निया, ॲरिझोना अशी दोन राज्ये पार करीत तिथपर्यंत पोचावे लागले. भोवती सगळा उघडा माळ होता. काही टेकड्या आणि त्यांतून उभ्या तुटलेल्या मातीच्या घट्ट दगडांच्या शिळा दिसल्या. वाटले आपण त्या परिसरात येतोय. पण तसं नव्हतं. पुढे जवळ यायला लागलो तसं दृश्य पार बदललं. चक्क उंच उंच झाडं भोवती दिसू लागली. पुढे तर ती दाट होत गेली. थिएटर, दुकानं असलेलं छोटं गाव लागलं. अंजूने फोनवर बुक केलेल्या हॉटेलवर आधी जाऊ आणि फ्रेश होऊन

मग बाहेर पडू असं ठरवलं, म्हणून ते गाव ओलांडून तसंच पुढे जात राहिलो. गाडीने वळण घेतलं आणि उजव्या बाजूला पाहिलं तर ओळखीचा ग्रँड कॅनियन !

तुरळकपणे लोक कठड्यापाशी उभे राहून कॅनियन बघत होते. त्यांच्या मागनंही समोरची गुलाबी रंगाची शिखरं दिसली आणि अजयला म्हटलं, "थांबायचं का ?" अंजू म्हणाली, "मीही तेच म्हणणार होते." आम्ही गाडी उभी केली आणि रस्ता क्रॉस करीत तिकडे जाऊ लागलो. सौंदर्याची एक छोटीशी पट्टी दिसली, तरी आम्ही भूल पडल्यासारखं तिकडे अक्षरशः खेचले जात होतो. काही क्षणांतच कडा तुटतो, त्या जमिनीच्या कडेला एकमेकांना धरून उभे राहिलो. आणि वाचाच गेली. दुपारी तीनची वेळ. समोर जिकडं पाहाल तिकडं गुलाबी रंगांची अनेक शिखरं, त्यावर आडव्या काळसर रेघा किंवा ठिपके. सिनेमास्कोप दृश्य म्हणणंसुद्धा फारच अपुरं ठरेल. डोळ्याच्या कुठल्याही कोपऱ्यातूनही तेच दृश्य. फक्त मागंच वळलं तर डोंगर नव्हते, पण सुमारे २७० अंशभर कुठेही पाहा शिखरंच शिखरं. माझी दरीची कल्पना म्हणजे दोन डोंगर जवळ आलेले आणि त्यांत खूप खोली. इथं समोरच्या डोंगरांमधे आणि माझ्यामधे काही मैल अंतर. खाली पाहिलं. नजर दगडांवरून उड्या मारीत खाली जातेय, जातेय पण थांबतच नव्हती. शेवटी थांबली एकदाची. नंतर तिथं लक्षपूर्वक पाहिलं तर तोही तळ नव्हता, तर एक टप्पा होता. ती काय नजर तिकडनं आणखी खाली चाललीय. परत टप्पा. परत फसतोय. परत लक्षात येतंय. परत चालली नजर आणखी खाली. खोल श्वास घेऊन छाती गच्च झाली. शेवटी तळ शोधायचा नादच सोडून दिला. कल्पनेने कोणतेही दृश्य डोळ्यांसमोर उभं करू शकतो, हा माझा अभिमान मी त्या क्षणी ग्रँड कॅनियनच्या तळाच्या दिशेने सोडून दिला. कुणी हलायला तयार नव्हतं. आमचा अकरा-बारा तास ड्राइव्ह करीत आल्याचा शिणवटा कुठे गेला होता, कोण जाणे.

हॉटेल अगदी जवळच होतं. सामान टाकून, फ्रेश होऊन परत निघालो. आम्हाला संध्याकाळ पहायची होती. सूर्य मावळायच्या आधी अर्धा तास एका कड्यावर पाय खाली सोडून बसून राहिलो. मघाचा गुलाबी रंग आता हळूहळू अधिक गडद होत चालला होता. जवळचे बहुतेक सगळे दगड चुनखडीचे पांढरे-पिवळे होते. आडव्या, मोठमोठ्या लाद्या एकावर एक रचून ठेवल्यासारख्या. त्याखाली उभे उंचच उंच कॉलम्स. सगळ्या दृश्यात कुठं झाडं नव्हतीच. या चुनखडीच्या दगडांतून डोकावणारी छोटी झुडपं होती तेवढीच. आता मघापेक्षा किरण दरीतल्या डोंगरांवर तिरपे पडत असल्याने जो डोंगर पूर्वी एकच वाटला होता त्याच्या पोटात अनेक सुळके, शिखरं असल्याचं त्यांच्या सावल्या मागच्या डोंगरांवर पडत असल्याने आता दिसत होतं. पुठ्ठ्याचे कट आऊट्स् उभे करून कुणीतरी प्रकाशाचा खेळ खेळतंय असं वाटलं. हळूहळू सूर्य खाली चालला होता. तसतशी दरीतली प्रकाशाची रेषा वर सरकत चालली होती. रेषेच्या वरचे डोंगर आता जवळपास भडक लाल या छटेपर्यंत पोहोचले होते. अशा रंगाचा डोंगर असू शकेल, यावर या क्षणी पूर्वी विश्वास बसू शकला नसता. प्रकाशाच्या रेषेखाली मातट रंगाचा, धूर पसरावा तसा पट्टा दिसत होता. आणि त्या

खाली दरीत चक्क जांभळा रंग दिसत होता. हळूहळू जांभळा रंग, दरीच्या तळातून पाझर फुटावा तसा भरत येऊ लागला. प्रकाशाला तो वर ढकलत होता आणि किरणंही काढता पाय घ्यावा तशी माघार घेत होती. डोंगराच्या माथ्यांवरचा लाल रंग पुसला गेला आणि जादू व्हावी तसा दरीतला जांभळा रंगही क्षणात राखट होऊन गेला. प्रेमीक जोडीने आत्महत्या करताच तसे ते दोन्ही विरोधी रंग ठरवून एका क्षणाला नाहीसे झाले. आता सर्वत्र हळूहळू अंधाराचं राज्य.

रात्री ग्रँड कॅनियन गावात आलो. 'आयमॅक्स' या अतिप्रचंड पडद्यावर डोळे फिरवून टाकणारा ग्रँड कॅनियनवरचा सिनेमा पाहिला. जी दृश्यं आपण दरीच्या कडेला उभं राहून पाहू शकत नाही, ती विमानात कॅमेरा ठेवून शूटिंग केल्यामुळे खालून, वरून, वेगात सुळकांड्या मारत पाहायला मिळाली. पहाटे उठून सूर्योदय पाहायला जायचं ठरवलं होतं. तिथल्या हॉटेलात तिघांत मिळून एक भला मोठा पिझ्झा मागवला. त्या गावात आणि या हॉटेलातही सगळे आमच्यासारखे टूरिस्ट. सगळ्यांच्या गप्पासुद्धा त्याच्यावरच चाललेल्या ऐकू येत होत्या. कुणी तरुण उत्साही लोक खाली उतरून पायवाटेने जायचा बेत करत होते. ज्यांना आणखी दोन-चार दिवस वेळ होता ते ग्रँडकॅनियनला सलग पण दूरवर असलेल्या ग्लेन किंवा ब्रूस कॅनियनला जायचे बेत मोठ्याने जाहीर करीत इतरांना जळवत होते. पण सगळे ग्रँड कॅनियन या एकाच विषयाने जोडले गेलेले असल्याने छान कौटुंबिक वातावरण निर्माण झालेलं होतं. आम्हा सगळ्यांना जोडणारा महापुरुष ग्रँड कॅनियन पाच-दहा मिनिटांच्या अंतरावर अंधारात शांतपणे पहुडलेला होता.

पहाटे उठलो आणि आंघोळी उरकून बाहेरचं दार उघडलं, तेव्हा कळलं की बाहेर प्रचंड थंडी आहे. गाडीत सामान ठेवायला गेलो तर पायाखाली पाचोळा जसा चुरचुरतो तसा आवाज आला तर पाहिलं- चक्क बर्फाचे पारदर्शक पापुद्रे ठिकठिकाणी तयार झालेले. गाडीवर अगदी पातळ पांढरट पापुद्रा आणि काच दुधी झालेली. अजयने आत जाऊन बेसिनमधनं गरम पाण्याचा मोठा जग भरून आणला आणि तो काचेवर ओतल्यावर ती अगदी पहिल्यासारखी दिसू लागली. मग ही युक्ती सापडल्यावर आम्ही पाळीपाळीने जग भरून आणून गाडीला गरम पाण्याची आंघोळच घातली.

ग्रँड कॅनियनमध्ये सूर्योदय अधिक चांगला दिसेल अशी ठिकाणं आदल्या दिवशी माहीत करून घेतली होती. तिथं पोहोचलो. आमच्या आधीही दहा-वीस लोकं तिथं होतेच. आम्ही पुढं आलेल्या कड्याच्या पूर्वेकडच्या कठड्याजवळ उभे राहिलो. लोक कॅमेरे घेऊन सज्ज होते. प्रत्येकाने भरपूर गरम कपडे अंगावर घातले होते. अंजूने त्या वेळी माझा फोटो काढला. तो पुढे मी घरी पोस्टानं पाठवताना त्याच्यामागं लिहिलं, वरचा स्वेटर अजयचा, त्याच्या आतला वाकस (पाकिस्तानी लेखक) याचा, त्याच्या आत शर्ट, जाकीट सदाशिव अमरापूरकरचं, गळ्याभोवती प्रविणा (बहीण)ने दिलेला स्कार्फ, डोक्यावर रिनी (प्रोग्रॅम ऑफिसर)ची टोपी. . .' अर्थात तरीही थंडी वाजत होती. काल दुपारी अगदी आपल्या

इकडच्या सारखं ऊन होतं. ग्रँड कॅनियनची दरी, दरीतली, पलीकडची असंख्य शिखरं, दगडा-दगडांतून डोकावणाऱ्या वनस्पती आणि दरीकाठाला उभे असलेले आम्ही. . . हे सगळेच स्तब्ध होऊन सूर्याची वाट पाहत होतो. आकाश एका बाजूला प्रकाशमान झालं असलं तरी सूर्य नेमका कुठल्या बिंदूतून वर येणार हे कळत नव्हतं.

मागे एक गोरी बाई तिच्या बरोबरच्या कुणाला म्हणत होती, "आय कॅन हियर द सायलेन्स. . ." मला असं काव्यमय बोलणाऱ्यांचा वैताग येतो. मनात म्हटलं, 'बाई, समोर आहे ते न बोलता बघून घे की.' म्युझियममधेही उत्तम चित्रासमोर मी बसून राहायचो, तिथंही असं बोलणाऱ्या मंडळींचा त्रास व्हायचा. इकडं हा असा एक वर्गच दिसतोय.

शेवटी तो बिंदू एका डोंगराच्या सपाट पठारावर आला. एखाद्या छोट्या तेजस्वी ताऱ्यासारखा तो चमकला. त्याचा दिमाख एवढा की कुठल्याही मानवनिर्मित दिमाखाची, ऐश्वर्याची उपमा देणं अशक्य. सुरुवातीला त्याची नजर दरीतून वर आलेल्या डोंगरशिखरांवर पडली आणि आपादमस्तक न्याहाळणाऱ्या नजरेप्रमाणे ती किरणं खाली खाली तळाकडे जाऊ लागली. जो चांदणीएवढा असताना मी त्याच्याकडे सरळ पाहू शकत होतो, तोच ठिपका इतक्या झपाट्याने मोठा होत गेला की एका मिनिटभरात त्याच्याकडे पाहायचं सोडून दरीत पसरणाऱ्या त्याच्या किरणांकडे नजर वळवावी लागली. डोंगरांच्या एकमेकांवर पडलेल्या सावल्याही वेगवेगळे आकार निर्माण करीत होत्या आणि ते आकारही क्षणोक्षणी बदलत होते. काल संध्याकाळी जे डोंगर गुलाबी दिसले होते, ते आता पिवळ्या, सोनेरी रंगाचे प्रकाश परावर्तित करू पाहणारे दिसत होते. पाच मिनिटांपूर्वी इथं खोल दरीत अंधार साठला होता, ते आता खरंच वाटत नव्हतं. सुईने फुगा फुटावा तसा अंधार फुटून हवेत विरून गेला होता. किरणांच्या एका स्पर्शाने, गोष्टीतला जादूगार जसा काही फिरवल्यावर राजवाडा निर्माण करतो तसं इथं तऱ्हेतऱ्हेची शिखरं असलेल्या झळाळणाऱ्या अनेक उभ्या खांबांनी बनलेल्या इमारतींसारख्या दिसणाऱ्या डोंगरांचं शहरच क्षणात उभं राहिलं होतं.

परत येऊन एका हॉटेलात कॉर्न फ्लेक्स आणि दुधाचा नाश्ता केला आणि नऊ-साडेनऊला ग्रँड कॅनियन काठाकाठाने पाहत निघालो. एव्हाना सूर्य चांगलाच वर आला होता. दरीच्या कडेला अधूनमधून शेडस् होत्या. त्यांत धातूची नळी एका बिंदूभोवती फिरती ठेवून खालच्या बोर्डवर तिथून दिसणाऱ्या शिखरांची नावं लिहिली होती. त्या नावांवर धातूच्या नळींचं मागचं टोक आणून नळीतून पाहिलं की इतर दृश्यं वगळून तेवढंच शिखर दिसायचं. तिथल्या शिखरांची नावं पाहून आश्चर्य वाटलं. आपल्याकडच्या देवांचीही नावं त्यांना दिली आहेत. विष्णू टेंपल, शिवा टेंपल, ब्रह्मा टेंपल, बुद्धा टेंपल, मनु टेंपल अशी नावं आहेत. यावरून इथेही हिंदू संस्कृती पोहोचली होती, असा निष्कर्ष कुणी काढू नये. कारण ही नावं इ. स. १५४० ला या जागेचा आधुनिक जगाला शोध लागल्यावर तिथं गेलेल्या संशोधकांनी (त्यांत कुणी भारतीय नव्हते तरीही) दिलेली आहेत. ग्रीक पुराणातील व्हीनस, अपोलो यांचीही नावं आहेत. तिथल्या दगडांच्या एका थराला झोरोस्टर ग्रॅनाईट असं नाव

दिलेलं आहे. तिथं मूळ राहणाऱ्या रेड इंडियन देवता किंवा टोळ्यांची नावंही दिलेली आहेत. या उदारवृत्तीच्या संशोधकांचं मला फार कौतुक वाटलं.

ह्या विष्णू टेंपल किंवा त्यासारख्या डोंगरांचा वरचा भाग देवळासारखा दिसायचा. खाली थोडा उतार. मग परत थराथरांनी बनलेल्या दगडांचा सरळ कड्यासारखा, पेटीसारखा वाटावा असा भाग. मग परत उतार, परत सरळ कडा. . . असं खालपर्यंत. अगदी सरळ कड्यांचा रंग पांढरट उजळ तर उतारांचा रंग गुलाबी. यामुळे अशा आडव्या पट्ट्यापट्ट्यांनी हे डोंगर बनलेले होते. या उतरत्या पायऱ्या किती आहेत बघावं, तर त्या मोजताच येत नव्हत्या.

पूर्वेकडे आम्ही जात होतो. वाटेत चांगले डोंगर दिसले की उभे राहायचो, जमलं तर थोडं उतरून पाहायचो. एका ठिकाणी पाहिलं तर एखाद्या भिंतीसारखा डोंगर. खाली रुंद असला तरी वरचा सगळा भाग तुकड्या तुकड्यांनी बनलेला, पण भिंतीसारखा सलग. ही भिंत खूप लांबवरून नागमोडी वळणाने समोरपर्यंत आली होती. वरचा भाग उभ्या पांढरट शिळांनी बनलेला, पडझड झालेल्या भिंतीसारखा. अंजू म्हणाली, "तो बघ. एखादा माणूस पाठमोरा बसल्यासारखा दिसतोय." बघितलं तर हसूच आलं. एका रुंद शिळेवर डोकं बसवल्यासारखा गोल लहान दगड राहिलेला होता. मग आम्हाला सगळीकडेच अशी माणसं शोधून काढायचा छंद लागला. आणि आतापर्यंत निर्मनुष्य वाटणारी ही महादरी आता माणसांनी गजबजू लागली.

या दरीतून खोलातून वाहणारं निळ्या रंगाचं पाणी दिसलं. कालपासून पहिल्यांदाच हा प्रवाह दिसला. आम्ही इतक्या वरून पाहत असल्यानं तो फक्त वेड्यावाकड्या आकाराचा निळा पट्टा फक्त दिसला. तो वाहताना वाटत नव्हता. खोल दरीतल्या डोंगरांच्या गर्दीत तो कुठं खंडित व्हायचा, कुठं परत दिसू लागायचा. कुठून कुठं गेलाय हे शोधण्याचा प्रयत्न करून पाहिला, पण ते डोंगराचं इतकं महाभयानक कोडं होतं की तो प्रयत्न फसलाच. ग्रँड कॅनियनच्या मुख्य दरीला अनेक शाखा फुटलेल्या होत्या. विमानानं हिंडलं तरच ते कोडं उलगडू शकेल असं वाटलं.

ग्रँड कॅनियनच्या काठावर एक बैठं छोटं म्युझियम आहे. तिथं नकाशे, स्लाईडस्, पोस्टर्समार्फत ग्रँड कॅनियनच्या भूगर्भाविषयी माहिती आहे. मी भारतात असताना त्यावरचं पुस्तक वाचलेलं होतंच. पण ते काही कळलं नव्हतं. पण आता ते प्रत्यक्ष ठिकाण पाहिल्यानं त्याचा उलगडा होऊ लागला होता. ग्रँड कॅनियन हे जगातलं एक आश्चर्य आहे. ते नुसतं सौंदर्याच्या दृष्टीने नव्हे तर भूगर्भ शास्त्राच्या, प्राणी व वनस्पती शास्त्राच्या दृष्टीनेही आहे. ग्रँड कॅनियनच्या वरच्या भागातला 'कैबाब' चुनखडीने बनलेला जमिनीचा थर हा दोनशे पन्नास दशलक्ष वर्षांत बनलेला आहे. तर सगळ्यात तळात इंग्रजी 'V' च्या आकाराचा जो भाग आहे, ज्यातून कोलोराडो नदी वाहते तो दगडाचा थर (ब्रह्मा अँड विष्णू शिस्ट) दोन हजार दशलक्ष वर्षांपूर्वी बनलेला आहे. त्याच्यावर अकरा थर आहेत. वरपासून खालपर्यंत

नजर टाकली तर एका नजरेत पृथ्वीचा इतिहास लिहिलेला, असं दुसरं ठिकाण जगात नाही. भूगर्भाच्या इतक्या खोलवर असलेल्या ब्रह्मा अँड विष्णू शिस्टचा दगड अशा रीतीने पृथ्वीवरच्या वातावरणात दुसरीकडे कुठे उघडा पडलेला नाही. या थरांमधे पृथ्वीच्या घडणीमध्ये झालेले भूकंप, प्रलय, समुद्राची स्थलांतरे नोंदली गेलेली आहेत.

त्या म्युझियममधल्या एका विभागात ग्रँड कॅनियन कसा तयार झाला याच्या उपपत्ती आकृत्यांसह दाखवलेल्या होत्या. तीस ते साठ दशलक्ष वर्षांमध्ये सध्या ग्रँड कॅनियन जिथं आहे ते कैबाबचं पठार आठ हजार फूट उंच उचललं गेलं. पश्चिमवाहिनी कोलोराडो नदी त्यामुळे अडली जाऊन ती दक्षिणेकडे गल्फ ऑफ मेक्सिकोमधून अटलांटिकला मिळाली. परत भूगर्भातल्या हालचालींमुळे तोही प्रवाह अडला आणि त्या पाण्याने जवळच एक सरोवर तयार झालं. कैबाबच्या पठारात आधी असलेलं पाणी वाहून जायची व्यवस्था (ड्रेनेज सिस्टीम) होतीच. ती या पठारातून उलट चरत जाऊन कोलोराडो नदीला मिळाली आणि त्या कोरड्या पडलेल्या ड्रेनेज सिस्टीममधून प्रवाह परत पश्चिमेकडे वाहू लागला. सरोवर आटले. पण त्यातून निघालेली लिटल् कोलोराडो नदी ही या पश्चिम वाहिनीस मिळाली. हे साधारणपणे दहा दशलक्ष वर्षांपूर्वी घडलं.

मी या सालांचे आकडे ऐकून चक्रावलोच. आपण गेल्या महिन्यात की त्याच्या गेल्या महिन्यात असं म्हणतो, त्याच सहजतेनं हे तीस दशलक्ष की साठ दशलक्ष वर्षं असा उल्लेख करीत होते. या सगळ्या थरांमधे अगदी सुरुवातीच्या काळातल्या वनस्पती, ट्रिलोबाईट हे खेकड्यासारखे दिसणारे आदिम प्राणी, मग मासे, बेडकासारखे ॲम्फिबियन प्राणी, नंतर सरपटणारे प्राणी... अशा सगळ्यांचे सापडलेले फॉसिल्स त्या म्युझियममध्ये ठेवले आहेत. आपण तळापासून वरपर्यंत आलो तर वनस्पती व प्राणिसृष्टीचा इतिहास पाहता येतो. अनेकदा सृष्टीची हवामाने बदलली त्याचेही पुरावे या थरांमध्ये आहेत.

तेव्हा अस्तित्वात आलेला ग्रँड कॅनियनचा आकारही खूप बदलत गेला. लहानपणी भूगोलाच्या पुस्तकातलं 'झीज आणि भर' हे प्रकरण वाचायला फार आवडायचं. त्याचं प्रत्यक्ष प्रत्यंतर समोर पाहत होतो. वरून जमिनीवर इतस्ततः पडलेल्या एखाद्या निळ्या वस्त्रासारखी दिसणारी कोलोराडो केवढी वेगवान व ताकदवान नदी आहे, हे त्या पुस्तकावरून कळलं. ही नदी ग्रँड कॅनियनमधून रोज किती वाळू, दगड, माती वाहून नेते याचं मोजमाप केलं गेलं. त्याप्रमाणे ही नदी रोज पाच लाख टन माल वाहून नेते. पुरामध्ये तर एका दिवशी तिने सत्तावीस दशलक्ष टन माल वाहून नेला. सहा सहा फुटी शिळा ही नदी सहज वाहून नेते. या नदीच्या वेगामुळे जसे भोवतीचे डोंगर चरत जातात, तशी इतरही कारणं या पडझडीमागे आहेत. दिवसा रखरखीत ऊन व रात्री बर्फ अशा हवामानात दगड आकुंचन-प्रसरण पावून फुटतात. पावसाचं पाणी चिरांमधे जाऊन गोठतं आणि बर्फाच्या वाढलेल्या आकारमानाने दगड फुटतात. खुरट्या वनस्पतींच्या मुळांपासून झिरपणाऱ्या सौम्य ॲसिडमुळे तो चुनखडीचा दगड ठिसूळ होतो... इत्यादी.

या क्षणाक्षणाला होणाऱ्या झिजेमुळे ग्रँड कॅनियन रुंद होत गेला आहे. आज दरीच्या दोन कडा 'नॉर्थ रिम' व 'साऊथ रिम' या हवेतून रेघ आखल्यास वीस मैल दूर आहेत. हे अंतर पूर्वी बरंच कमी होतं. रोज क्षणाक्षणाला होणाऱ्या पडझडीमुळे मधल्या जोडणाऱ्या भिंती अरुंद होत गेल्या. त्या मूळ 'रिम'पासून तुटून त्यांचे शिवा किंवा विष्णू टेंपलसारखे स्वतंत्र डोंगर झाले. त्यांचेही वरचे थर झडून त्यांची सपाट पठारे होतील, परत त्यातले उघडे पडणारे दगड फुटू लागतील. . . असं कायम चालू राहणार आहे. कोलोराडोच्या जोरदार प्रवाहामुळे हे दोन्ही भाग अनेक दशलक्ष वर्षं तुटल्यानं अनेक जीवशास्त्रीय गमतीही घडलेल्या आहेत. पूर्वी एका वंशाची खार अस्तित्वात होती. नंतर कोलोराडोमुळे त्या प्राण्यांच्या समूहांचे दोन भाग झाले. ते नदी ओलांडू न शकल्याने त्यांच्यात परिस्थितीनुसार बदल घडत गेले. दोन्हीकडचे वेगळे हवामान, वेगळे वृक्ष, वेगळे अन्न यामुळे काही बदल झाले. दक्षिणेतल्या खारींचा इतर (मेक्सिकन) खारींशी संयोग झाला व त्यांच्यात बदल झाला. तसा नॉर्थरिम भागातल्या खारींचा न आल्याने त्यांचा रंग, आकार, शेपटी वगैरे तसंच राहिलं.

दिवसभर कॅनियनच्या कडेकडेने भटकलो. डोंगराच्या पृष्ठभागाचे तऱ्हेतऱ्हेचे पोत, डोंगरांचे वेगवेगळे आकार आणि दरीची खोली पाहून डोळे निवले तसे दमलेही. अजय म्हणाला, "चला. आपल्याला निघायला पाहिजे. आपला रात्रीचा मुक्काम 'लास व्हेगस' मधे आहे." ग्रँड कॅनियनचा निरोप घेताना मनात म्हटलं, पुढच्या वेळी आलोच आणि हातीपायी धड असलो तर ग्रँड कॅनियन तळातून पाहू. म्हणजे उंचीचं परिमाणही एकदा भंग होऊन जाईल.

सान्फ्रान्सिस्कोजवळच्या म्यूरवूड फॉरेस्टमधली अडीच हजार वर्षं जुनी झाडं पाहून हादरलो होतो. इथं तर दोन हजार दशलक्ष वर्षं समोर उभी. मेडिकल कॉलेजला शिकत असताना अभ्यासात त्वचेचा छेद सूक्ष्मदर्शकातून पाहायचो त्याची आठवण झाली. एपिडर्मिस, डर्मिस वगैरे थर एकावर एक असायचे. भूकंपांमुळे किंवा अंतर्गत गडबडींमुळे पृथ्वीला हे थोडं खरचटलं आहे, म्हणून एवढं दृश्य दिसू शकलं. याच्या आत कित्येक पट खोल आहेच की. कुठलीही जमीन वरून नेहमीसारखी सपाट दिसते, पण आत केवढं विश्व भरलेलं असतं, हे एरवी लक्षात येत नाही. आपण कशावर उभे असतो हे या ग्रँड कॅनियनमुळे समजलं. ते एक बरंच झालं.

आता ध्यान करताना दृश्य पाहायला ग्रँड कॅनियनने माझी मोठीच सोय केलेली आहे.

o

★★★★★

# लास व्हेगस

ग्रँड कॅनियनहून येताना अजयने आणि अंजूने मला लास व्हेगस दाखवायचा बेत आखलेला होता. वास्तविक मला ते पाहण्याची फारशी उत्सुकता नव्हती. जुगाराचं आणि माझं तंत्र कधीच जमलं नाही. मी शिरूरला इन्टर्नशिप करीत असताना डॉक्टरमित्रांबरोबर एकदाच पैसे लावून रमी खेळलो होतो. मला सारखे मार्क मिळतच गेले. मित्र म्हणाले, हे 'बिगिनर्स लक' आहे. मी पैसे मिळवत होतो आणि काही वेळाने वाटलं, आता इथंच थांबावं. म्हणजे मिळालेले वीस-पंचवीस रुपये आपल्याकडेच राहतील. तसं मी जाहीर केलं आणि पुढं म्हणालो, "आणि परत कधीही खेळणार नाही." सगळे ओरडले, "असं नाही चालणार." मी आश्चर्याने विचारलं, "का ? अशी काय सक्ती आहे ?" ते म्हणाले, "पैसे इथल्या इथं सर्क्युलेट झाले पाहिजेत. असं कुणीही इथनं पैसे घेऊन जायला लागलं तर खेळ चालणार कसा ?" मी त्यांच्या आरड्याओरड्याकडे लक्ष न देता निवृत्त झालो. तो कायमचाच. नंतर लॉटरी अधिकृत झाली. पण कधी ते तिकीट काढावंसं वाटलं नाही.

पुढे मुंबईला गुन्हेगारी जगातल्या माणसाशी ओळख झाली. त्याचा व्यवसाय मला आधी माहीत नव्हता. त्याला विचारलं तर म्हणायचा, "मशिन्स आहेत माझी." मला वाटायचं वर्कशॉपमधली लेथ मशिन्स असणार. प्रत्यक्षात त्याच्या घरी गेलो तर खाली बोळकांडीमध्ये छोट्या छपरी घरांमध्ये ही स्लॉट मशिन्स बसवलेली. मला हे कसं चालतं याची उत्सुकता होती. मी विचारताच त्यानं तिथलं एक टोकन घेऊन मला तिथल्या फटीत सरकवून बाजूचा दांडा ओढायला सांगितला. तसं मी करताच समोरची बरीच चक्रं फिरली आणि खाली मशीनला जोडलेल्या धातूच्या वाडग्यात खणखण करीत बरीच नाणी पडू लागली. तोही आश्चर्याने शिरूरच्या मित्रांसारखंच म्हणाला, "वा ! बिगिनर्स लक दिसतंय तुमचं." तो त्या टोकन्सच्या किमतीचे पैसे देऊ लागला. मी नकार देताच तो म्हणाला, "अहो तुम्ही जिंकलेले आहेत हे." पण न घेतल्याने शिरूरची खंत पुसली जाणार असल्याने म्हटलं, "नको, राहू द्यात तुमच्याकडेच."

त्यामुळे लास व्हेगसला असणार काय तर असेच जुगाराचे अनेक प्रकार. पण अंजूला

मला अमेरिका दाखवायचा उत्साह होता. निदान दुसरे जुगार कसे खेळतात, हे पाहू या म्हणून मीही हो म्हटलं. अंजूने लॉस एंजेलिसवरूनच फोनाफोनी करून तिथल्या मोटेलमधली खोली रिझर्व केली होती. ॲरिझोनामधनं आमची गाडी नेवाडा राज्यातील रस्त्यांवरून धावू लागली. सरळसोट रस्ते, आसपास सगळे उजाड. संध्याकाळ संपत होती, रात्र पसरत होती. हूवर धरण येऊन गेले. परत अंधार पसरला आणि एकाएकी क्षितिजावर सूर्य उगवावा तसा प्रकाश दिसला. नंतर क्षितिजभर पसरलेले दिवेच दिवे दिसू लागले.

लास व्हेगसविषयी बरंच ऐकलं-वाचलं होतं. 'गॉडफादर' फेम मारिओ पुझोचं 'इनसाईड लास व्हेगस' हे त्याने चक्क पाहणी करून लिहिलेलं पुस्तक वाचलं होतं. नेवाडा या रखरखीत वाळवंटी राज्यात हे कॅसिनोयुक्त मौजमजा करणारं केंद्र कसं निर्माण झालं, याचं त्याला आश्चर्य वाटलं होतं. या राज्याला जुगारातून मिळणारी कमाई हेच प्रमुख उत्पन्न. इतर राज्यांनी हा प्रयोग करून पाहिला पण जमला नाही. न्यूयॉर्क वॉशिंग्टनला जवळ असलेल्या न्यूजर्सीमधील ॲटलांटा सिटीतही असं केंद्र आहे. पण तिथं गुन्हेगारी आहे. पैसे जिंकलो तर सुरक्षितपणाची हमी नाही. लास व्हेगसमधे गुन्हेगारी नाही. माणसं मोकळेपणाने येऊन इथे जुगार खेळू शकतात. हरतात-जिंकतात. पुझो म्हणतो, "जुगार ही माणसाची प्रवृत्ती असेल तर तिला मोकळेपणानं वाट देणं काय गैर आहे ? इथं स्लॉट मशीनवर बसलेल्या म्हातारीच्या आयुष्यात तेवढीच करमणूक असेल, तर त्याला नावं काय म्हणून ठेवायची ? तिला दुसरा काय पर्याय तुम्ही देताहात ?" इत्यादी. या बाबतीत मला काहीच कळत नसल्याने वाचलं, पण योग्य काय ते ठरवण्याचा प्रश्नच नव्हता. आता चाललो होतो तो लास व्हेगस हे कसं दिसतं ते बघायला.

मोटेलवर सामान टाकून फ्रेश होऊन बाहेर पडलो. तेव्हा रात्रीचे आठ वाजले असतील. प्रशस्त रस्ते पायी चालणाऱ्या माणसांनी फुलले होते. रस्त्याच्या दोन्ही बाजूला कॅसिनोच्या उंच, प्रशस्त इमारती होत्या. त्यांवर प्रचंड लायटिंग केलेलं होतं. स्टार डस्ट नावाच्या कॅसिनोपुढे प्रचंड आकाराच्या लायटिंगमध्ये हातात मद्याचा पेला घेतलेली बाई दाखवलेली होती. तिचा चेहरा, डोळे हलत, हातातला पेला लाल पेयाने भरत येई. परत रिकामा होई. जवळपास शंभर फूट उंच असं हजारो दिव्यांनी बनवलेलं ते डेकोरेशन असणार. प्रत्यक्ष इमारतीवरही नाना आयडिया केलेलं लायटिंग. फिरत जाणारे दिवे, सटासट रंग बदलत जाणाऱ्या निऑन साइन्स... याने सगळा परिसर खच्चून भरलेला होता. कॅसिनोच्या इमारती एरवीसारख्या इमारतींसारख्या नसून काल्पनिक जगातल्या असाव्यात तशा डिझाइन्सच्या होत्या. सिनेमातले सेट्स् पाहावेत तसे वाटत होते. मागे माटुंग्याच्या वरदराजनच्या गणेशोत्सवातलं लायटिंग पाहिलं होतं, तेव्हा दिपून गेलो होतो. पण इथल्या एकेका कॅसिनोने दहा-बारा वरदराजन सहज खिशात घातले असते.

संबंध रस्ताभर या लाखो चमचमणाऱ्या दिव्यांचा भरपूर प्रकाश पडला होता. त्यांत न्हाऊन निघालेली रस्त्यावर फिरणारी माणसंही सिनेमातल्यासारखीच वाटत होती. लास

व्हेगसला मोठ्ठ्या थिएटर्समधे 'शो' असतो. त्याची तिकिटं प्रत्येक हॉटेल, मोटेलवर मिळतात. अंजूने एका प्रसिद्ध फ्रेंच शोची तिकिटं काढली होती. तो शो म्हणे गेली पन्नास वर्षं चाललेला आहे. अनेक नटनट्यांच्या पिढ्या त्यात काम करून गेल्या. थिएटरला सर्कसच्या तंबूचं रूप होतं. मधल्या गोलात शेकडो स्त्रिया कमरेवरच्या शरीरावर कुठलंही वस्त्र न घालता नृत्य करीत होत्या. लाईट्स, स्लाईडस किंवा चलत्‌चित्रांचे प्रत्यक्ष माणसांवर प्रोजेक्शन करून साधलेले परिणाम यांची त्या 'शो'मध्ये रेलचेल होती. मला त्या दोन नृत्यांच्या मधनं मधनं असलेले, अनेक चेंडू हातातनं फेकत झेलत राहण्याच्या करामतीचे खेळ आवडले. अतिशय तंग, भडक आणि अपुरे कपडे घातलेल्या वेट्रेसेस प्रेक्षकांत फिरून ज्यूस, वाईन किंवा बियर सर्व्ह करीत होत्या.

शो संपल्यावर रस्त्याने भटकत निघालो. एका मोठ्ठ्या कॅसिनोत शिरलो. स्लॉटस् मशिन्सच्या रांगाच्या रांगा दिसत होत्या. लाल-पिवळे आलटून पालटून चमचमणारे दिवे प्रत्येकावर असल्याने ते दृश्य म्हणजे रंगाच्या धबधब्यासारखंच होतं. एकेका लायनीत चाळीस, पन्नास, शंभर मशिन्स आणि अशा नजर पोहोचेतोवर रांगा म्हणजे ते हॉल केवढे असणार. एक हॉल पुरा करून पुढे गेलो तरी पुन्हा तेच दृश्य. प्रत्येक यंत्रापुढं माणसं बसलेली. समोरच्या वाडग्यात खणखण पडणारे नाण्यांचे आवाज सगळीकडे भरलेले. यंत्रासमोर तरुण मंडळी तर असायचीच, पण जास्त करून म्हातारी मंडळी आणि त्यांतही स्त्रिया बऱ्याच दिसत होत्या. एखाद्या देवपूजेला बसावं तसा एकेक माणूस एकेक यंत्रापुढे बसलेला. केडगावचे नारायण महाराज शेकडो सत्यनारायण एकदम घालायचे, आणि त्यांचे भक्त जोडीने एकेका पूजेला बसायचे, असा फोटो पूर्वी पाहिला होता, त्याची आठवण झाली. बाजूचा दांडा ओढला की समोरच्या तीन छोट्या खिडक्यांमधून अनेक चित्रं फिरून जायची. एकेक स्थिर व्हायचं. ती तिन्ही एकच चित्रं असली की खाली नाणी पडण्याचा खणखणाट सुरू. एक म्हातारी नाण्यांची चळत बाजूला ठेवून एकेक नाणे सरकवून दांडा ओढत होती. पण नंबर काही लागत नव्हता. ती संपल्यावर तिने काळी कापडी थैली काढून तिचा बंद सोडून परत नाण्यांची चळत रचली. शंकराच्या पिंडीवर एकेक बेलपान वाहावं त्या तन्मयतेनं ती एकेक नाणं खाचेत सरकवत होती. पण तो देव तिला काही प्रसन्न होत नव्हता.

एका हॉलमध्ये पन्नास सेंटचं नाणं खेळता येईल अशी मशिन्स, तर दुसऱ्यामध्ये पाच सेंटची मशिन्स. अंजू म्हणाली, "खेळ ना काहीतरी. मी पैसे देते." मी म्हटलं, "नाही बुवा." त्यावर हसून ती म्हणाली, "अरे, इकडे खेळलास तर तिकडे कुणाला कळणार नाही."

मी म्हटलं, "तूच खेळ हवं तर."

ती नाणी टाकू लागली, पण सगळी गडप झाली. शेवटी मी तिला माझ्याकडची दिली. तीही गडप झाली. बाहेर पडता पडता नजरेत भरेल अशा ठिकाणी एक लाल रंगाची जपानी टोयोटा कार ठेवून त्या शेजारच्या मशिनवर लिहिलं होतं, 'पाच सेंट टाका आणि ही कार

मिळवा.' मी अंजूला म्हटलं, "बघ मिळवायचीय का ही कार? मिळाली तर अजय त्याची गाडी घेऊन येईल, आपण ही ड्राइव्ह करीत नेऊ." परत तिला मोह पडला. माझ्याजवळ शेवटचं पाच सेंटचं नाणं होतं. जवळची नाणी संपवायची, डॉलरची नोट मोडायची नाही, असं तिघांनी आधीच ठरवलेलं होतं. न जाणो पाच सेंटवर एवढी छान, भली मोठी कार मिळूनही जायची. अंजूने ते नाणं खेळलं आणि तेही वाया गेलं. आम्ही निराश होऊन बाहेर पडलो. खरं तर खेळायच्या आधी खुशीत, लोकांची मजा बघत फिरत होतो. पण काही कारण नसताना पैसेही घालवले आणि खट्टूपणा विकत घेतला.

मग हा कॅसिनो बघ, तो कॅसिनो बघ असं करीत हिंडू लागलो. स्लॉट मशिन्सच्या हॉलमधनं आत गेल्यावर जुगाराचे इतर प्रकारही चाललेले दिसायचे. इंग्लिश सिनेमात विशेषतः जेम्स बाँडच्या सिनेमात दाखवतात, तशी हिरव्या रंगाची टेबलं. त्यात मांडलेले रंगीत टोकनचे गठ्ठे, पत्त्यांचे डाव. जगातली श्रीमंत माणसं दिसतात तरी कशी ते पाहायला मिळालं. त्यांचे जिंकलेले, हरलेले, ईर्षेला पेटलेले चेहरेही बघायला मिळाले.

स्लॉट मशिन्सला तिकडे काहीजण 'वन आर्मड बॅन्डिट' असंच म्हणतात. एक हात असलेला लुटारू. तो लुटतो हे बहुधा सगळ्यांना माहीत असतंच. कॉम्प्युटरवर प्रोग्रॅम ठरवून दिलेला असतो. किती नाणी आत घेतली असता किती सोडायची हे ठरलेलं असतं. त्यामुळे शंभरातले नव्वद पंचाण्णव वेळा माणूस हरणार हे गृहित असूनही माणसाला वाटतं, त्या पाच टक्क्यात आपण कशावरून नसू? तुम्ही जिंकलात की मिळणारा मोबदला ते आवाज न करता तुमच्या पदरात पाडू शकले असते, पण तसं न करता ती नाणी, धातूच्या भांड्यात पाडून ठण् ठण् आवाज व्हायची व्यवस्था केली जाते. कुणाच्या मशीनवर अशी बरीच नाणी पडू लागली की सगळ्यांच्या माना तिकडे वळतात. तो आवाज सगळ्यांना खेळायला बोलावतच असतो. आणि तो वन आर्मड् रॉबर शेवटी आपली विकेट घेतोच.

रस्त्याने फिरताना एक चर्च दिसलं. त्या सगळ्या टोलेजंग इमारतींच्या घोळक्यात ते एकमजली टोकदार छपराचं लायटिंग न केल्यानं चांगलंच उठून दिसत होतं. पण ते चर्च नेहमीसारखं भारदस्त मात्र नव्हतं. ते फॅशनेबल होतं. अजयने सांगितलं, "या चर्चेसच्या जाहिराती असतात, आमच्याकडे लग्न लावा, अमुक इतक्या डॉलरमध्ये लग्न लावून देऊ..."

मी आश्चर्याने विचारलं, "पण इथं लोक फक्त जुगार खेळायला येतात ना, ते लग्न कशाला लावतील?"

"अनेक लोक मजा म्हणून इथं लग्न लावायला येतात. राज्याचे कायदे लग्नाच्या बाबतीतही खूप सोयीस्कर असल्याने अनेक जण भानगडीची लग्ने लावायला इथं येतात."

मला आश्चर्य वाटलं. आम्ही पुण्यात असलं गुपचूप लग्न लावायचं असलं की आळंदी गाठतो, किंवा कुणाची बहीण पळून गेली की तो भाऊ मित्रांना घेऊन पहिल्यांदा आळंदीतले वाडे धुंडाळू लागतो, तसंच दिसतंय हे.

कॅसिनोच्या दारात, रस्त्यांवर तंग किंवा अति आखूड कपडे घातलेल्या वेश्या ऊर्फ 'हूकर्स' वावरत होत्या. अजय म्हणाला, "इथं त्यांची वर्तमानपत्रंही असतात."

मी चकित होऊन विचारलं, "वेश्यांची वर्तमानपत्रं ?"

छोट्या वर्तुळातली नियतकालिकं मला माहीत होती. विचारवंतांमध्ये 'समाजप्रबोधन पत्रिका' किंवा 'तात्पर्य', 'मागोवा' असते, पण वेश्यांचं नियतकालिक म्हणजे फारच झालं. वाटेत एका ठिकाणी रस्त्याच्या फूटपाथवर काचेची चौकोनी पेटी खांबावर लावलेली होती. अजयने जाऊन त्यातनं वर्तमानपत्र काढून मला दिलं. म्हणाला, "हे इथं फुकट असतं."

मी पाहिलं तर त्यात वेश्यांचे उत्तान फोटो छापले होते. हिच्यासाठी अमुक नंबर फिरवा, अशा जाहिराती होत्या. त्यांचे डॉलरमध्ये रेटस् दिलेले होते. त्यांच्या अवयवांची मापं दिलेली होती. रेसच्या घोड्यांच्या 'कोल' पुस्तकात घोड्यांची पूर्वीची वंशावळ देतात, किंवा कुंडली देतात, तेवढंच फक्त द्यायचं राहिलं होतं.

(अमेरिकेतनं घरी आल्यावर माझ्या मुलींना मी बॅगा उघडून तिकडनं काय काय गमती जमती आणल्या ते दाखवत होतो. तेवढ्यात बॅगेच्या तळाशी ही वर्तमानपत्रं दिसली. ताबडतोब घाईघाईने ती लपवून नंतर रद्दीत घालून टाकली.)

उशिरा झोपल्यामुळे सकाळी उशिराच उठलो. आवरून ब्रेकफास्ट करायला बाहेर पडलो. अगदी भारतातल्या सारखं कडक ऊन पडलेलं होतं. कालचा रात्रीचा झगमगता रस्ता आता उन्हातही निस्तेज दिसत होता. कॅसिनोंच्या दारात ब्रेकफास्टच्या मोठमोठ्या पाट्या लागल्या होत्या. इथं ब्रेकफास्ट खूपच महाग असणार असं वाटलं होतं, पण पाहिलं तर दोन-चार डॉलरमध्ये फुल, अनलिमिटेड ब्रेकफास्ट. अजय म्हणाला, "हे कॅसिनोवाले ब्रेकफास्ट मुद्दाम सबसिडाइज करतात. इथं लोकांनी जुगारावर लक्ष केंद्रित करावं, इतर कशाचाही त्यांना त्रास पडू नये, ही त्यांची इच्छा असते."

आम्ही एका कॅसिनोत ब्रेकफास्टसाठी शिरलो. दोन डॉलर भरून टोकन घेतलं. दोन डॉलरमध्ये एरवी अमेरिकेत चहा आणि फारतर वेफर्स मिळतील. इथं काय मिळणार याची उत्सुकता होती. आम्ही रांगेत उभे राहिलो. गरम प्लेटस् घेतल्या. अन्नाचे विविध प्रकार भरलेल्या काचेच्या कपाटांच्या रांगाच्या रांगा होत्या. एका रांगेत फळांचे तुकडे, द्राक्षं, मनुका असं काय काय. दुसऱ्यात निरनिराळ्या तऱ्हेचे फ्लेक्स. कितीही घ्या. माणसं आधाशासारखी प्लेटस् भरून घेत होती. पण प्लेटच्या आकाराची मर्यादा होती. पुढे येणाऱ्या कपाटात आधीपेक्षा आवडते, आकर्षक पदार्थ दिसले की आधी भरलेल्या पदार्थांची अडचण व्हायची. मग आधीच्या फळांच्या फोडींवर क्रीम टाकलेलं, त्यावर ॲपल पाय अंथरला जायचा त्यावर आणखी काही. असं ते सगळं प्रकरण अनेक मजली होत चाललं होतं. तिथं भिंतीवर बोर्ड होता. 'आपल्याला पाहिजे तेवढेच पदार्थ घ्या, अन्न वाया घालवू नका. आपण खाल्ल्यावरही परत या विभागाकडे येऊ शकता.' पण समोरच्या पदार्थांच्या दुनियेत हरवलेली भिरभिरणारी नजर या पाटीकडे कशी जाणार ?

रांगेतनं घेऊन झाल्यावर टेबलांवर प्लेटस् ठेवून खायला बसलो. मी नाही नाही म्हणता गरजेपेक्षा बरंच जास्त आणलं होतं. माझ्या आसपासचे बहुतेक जण अमेरिकन किंवा युरोपियन लोक होते. कपड्यांवरून संपन्न वाटत होते. पण त्यांनीही गरीब देशांतून आलेल्या नागरिकांवर वरताण अशा रीतीने प्लेट्स् भरून आणल्या होत्या. शेवटी त्यातलं बरंचसं अन्न गार्बेजमध्ये टाकलं जात होतं.

नंतर दुसऱ्या मजल्यावरच्या चिल्ड्रेन सेक्शनमध्ये गेलो. तिथं लहान मुलांसाठी निरनिराळे खेळ, स्पर्धा यांचं संमेलनच भरलं होतं. अंजू म्हणाली, "मोठी माणसं जुगार खेळताना मुलांचा व्यत्यय येऊ नये म्हणून त्यांच्यासाठी ही सोय." त्या खेळांतही खेळण्यातल्या यांत्रिक अनेक घोड्यांच्या स्पर्धा होत्या. म्हणजे मुलांनाही त्यांच्या वयाजोगत्या जुगाराची तोंडओळख करून देण्याची व्यवस्था.

परतताना खालच्या मजल्यावर आलो. तिथे स्लॉट मशिनच्या दिव्यांची उघडझाप चालूच होती. नाण्यांचा खणखणाट अधूनमधून चालूच होता. रात्रभर दारू प्याल्यावर सकाळी मळमळून येतं तसं मला झालं.

आदल्या दिवशी ग्रँड कॅनियनची निर्मनुष्य शांतता, भव्यता पाहिलेली आणि दुसऱ्या दिवशी हा लास व्हेगसचा गदारोळ. हा हिसका फारच जाणवला.

अंजूने विचारलं, "आता काय करायचं ?"

मी म्हटलं, "ताबडतोब घरी जायचं."

o

★★★★★

# सँड्रा

सुमारे वीस वर्षांपूर्वी माझे स्नेही प्रा. वसंत देशपांडे ऊर्फ व्ही. डी. यांच्याकडे एक सँड्रा नावाची अमेरिकन मुलगी नेहमी भेटायची. नाजूक चेहऱ्याची, गोरी, उंच काळ्या, बारीक, धातूच्या काड्यांचा चष्मा घातलेली. ती मराठवाड्यातल्या कुठल्यातरी आर्थिक प्रश्नावर रिसर्च करीत होती आणि व्ही.डी. तिचे भारतातले रिसर्च गाईड होते. मी त्या वेळी साधना साप्ताहिकाचा 'सामान्य-जन विशेषांक' संपादित करीत होतो. मी सँड्राला म्हटलं, "तू अभ्यास करीत आहेस त्यावर लेख लिहून दे ना आमच्या अंकासाठी, व्ही. डी करतील भाषांतर मराठीत." तिचा तो लेख साधनेत प्रसिद्धही झाला. नंतर ती गेल्यावर अधूनमधून व्हीडींना तिची पत्रं यायची, त्यांतून फोटोही यायचे. तिनं लग्न केल्यावर फोटो पाठवल्यावर त्यात तिचा तरुण पण पूर्ण टक्कल पडलेला नवरा पाहून पोटात गोळाच आला. आपल्याकडल्या भाषेत म्हणायचं झालं तर, इतक्या नाजूक मुलीला किती चांगला मुलगा मिळू शकला असता ! पण दोघं फोटोत खूष होते, हसत होते ! तिने स्वतः विणून पाठवलेला स्वेटर व्हीडी. घालून बसले की आम्ही मैत्रिणीवरून चिडवायचोही. काही वर्षांनी व्हीडी. अमेरिकेला तिच्याकडे जाऊन आले. कॅलिफोर्नियातल्या जंगलामधे त्यांनी तंबू ठोकून मुक्काम केला, घोड्यावरून जंगलभर भटकले. त्याची आल्यावर वर्णनेही सांगितली.

मी जाताना सँड्राचा फोन नंबर, पत्ता घेऊन गेलो होतो. 'सान्दियागो' या दक्षिणेच्या, अगदी पूर्व टोकाला वसलेलं शहर, आयोवा हा उत्तर बाजूचा मध्य. अंतर बरंच असलं तरी माझ्या मधल्या टूरमध्ये मी लॉस एंजेलिसला जाणार होतो, तिथून थोडं दक्षिणेकडे गेलं की सानदियागो. मला खरी उत्सुकता होती ती मेक्सिकोत एखादा दिवस जाण्याची. व्हीडींना ती एक दिवस घेऊन गेली होती आणि व्हीडींनी सांगितलं होतं की, "जमलं तर जरूर जाऊन ये. अगदी वेगळाच अनुभव आहे." म्हणून वीस वर्षं मधे जाऊन ओळख पूर्ण बुजली होती, एव्हाना फक्त तिचा बारीक काडीचा चष्माच तेवढा आठवत असला तरी फोन करायचं ठरवलं. तिनं ओळखलं नाही, किंवा थंड प्रतिसाद दिला तर मग कॅन्सल करू असं मनात ठरवलं होतंच. एका रात्री फोन केला तर तिनं मला ओळखलंही आणि ग्रेट, ग्रेट असं म्हणत

आमंत्रणही दिलं. व्हीडींची चौकशी केली. मेक्सिकन मजुरांच्याविषयी वाचण्यात, बघण्यात रस आहे, असंही मी तिला सांगितलं.

लॉस एंजेलिसला अंजू कोष्टीकडे उतरलो होतो. ती म्हणाली, "सँड्रा राहते ते देल-मार हे गाव इथून कारने दोन-तीन तासांचं अंतर आहे. आपण कारनेच जाऊ." आम्ही संध्याकाळी पोहोचलो. सँड्रा ओळखू येईल का ही धाकधूक होती. एका शांत भागातल्या शांत रस्त्यावर एक प्रशस्त बंगला होता. दारावरची बेल दाबताच एका तरुण मुलीनं उघडलं. ती सँड्रासारखीच दिसत होती, पण वयाने तेरा-चौदा वर्षांची होती. तिच्या मागोमाग एक उंच, काटकुळी, आखूड, जवळपास पांढऱ्या पडलेल्या सोनेरी केसांची, प्रौढपणाकडे झुकलेली, मरून स्वेटर अंगात घातलेली बाई पुढे आली. तिच्यात एवढा बदल झालेला असला तरी मी ओळखलं, हीच सँड्रा. आता चष्मा नव्हता. अर्थात मी दुसरीकडे तिला पाहिलं असतं तर नक्कीच ओळखलं नसतं. निळ्या डिझाईनच्या, गुबगुबीत गालाच्या तिच्या मुलीची ओळख करून दिली– बॉनी. ही नवव्या इयत्तेत असते. सँड्रा म्हणाली, "बॉनी कविता करते, म्हणून तिला मी आपल्याकडे एक लेखक येणार आहे म्हटल्यावर ती उत्सुकतेने वाट पाहत आहे. ब्रायन हिचा धाकटा भाऊ. तो फूटबॉल खेळायला गेला आहे. येईलच आत्ता. त्याच्या मित्राची आई आज त्याला सोडणार आहे. आम्ही असे आळीपाळीने आमच्या मुलांच्या मित्रांना सोडतो. आज तिची पाळी आहे."

सँड्रा मला पूर्वीची फारशी आठवत नसल्याने एका नव्या बाईची ओळख होत असल्यासारखं चाललं होतं. ती खूप ॲक्टिव्ह वाटत होती. बोलकीही होती. आमचा चहा करता करता तिने दोनदा ब्रायनच्या शाळेत फोन केला. "तो ग्राऊंडवरून कधी निघाला, अजून कसा इथं पोहोचला नाही," इत्यादी फोनवर विचारत होती. तिचा नवरा टोरांटोला कॉन्फरन्सला गेला असल्याचं मला सांगितलं. तो कुठल्या क्षेत्रात रिसर्च करतोय, ती स्वतः सध्या काय काम करतेय... असं सारखं बडबडत होती. अमेरिकेत तुम्ही इन्श्युरन्सचे हप्ते भरत असल्याशिवाय तुम्हाला वैद्यकीय मदत उपलब्धच होऊ शकत नाही. असे हप्ते न भरू शकणारा मोठा गरीब वर्ग तिथं आहे. सँड्राने त्यांना वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी एक केंद्र काढले आहे. त्याची ती प्रमुख आहे, तिचं ऑफिस सान्दियागोला आहे. मी येणार म्हणून तिने दुसऱ्या दिवशी सुट्टी घेतलेली होती.

शेवटी काही वेळाने ब्रायन आला. असे म्हणण्यापेक्षा 'ब्रायनची स्वारी प्रवेश करती झाली' असं म्हणणं योग्य होईल. आठ-दहा वर्षांचा गोड चेहऱ्याचा पोरगा. डोळे तर फारच हसरे. पाठीवर दप्तर, फूटबॉलच्या बूट, हेल्मेट इ. सामानाचे कीट होते. थोड्याच वेळात बॉनी आणि ब्रायनची माझी दोस्ती झाली. बॉनी शांत, आणि स्वतःत रमणारी, तर ब्रायन अतिउत्साही, चळवळ्या. बॉनीला मी माझी पेन्सिलची चित्रं बघायला दिली. आत स्वयंपाकाच्या तयारीत असलेल्या सँड्राला तिने जाऊन दाखवली. तिकडनं मला अस्पष्ट आवाज आला की "मा, धिस इज अ पोएट्री." ब्रायनला मी ओरिगामीतली कागदाची

विमानं करून दिली. मग तो आणि मी घरभर ती उडवू लागलो. मग भिरभिरं केलं, बेडूक केला. शेपटी ओढली की पंख खालीवर करणारा पक्षी केला. प्रत्येक वस्तू तो आत एक्साईट होऊन सँड्राला दाखवून यायचा. बॉनीला मी चित्रं काढून देऊ लागलो. सँड्रा मधेच येऊन म्हणाली, "फोनजवळ त्यातलं एखादं चित्रं लाव. म्हणजे फोन करताना आपल्याला अनिलची आठवण होईल." मग त्यासाठी स्पेशल चित्र काढून लावलं. सँड्रा बॉनीला म्हणाली, "तुझी कवितांची वही दाखव ना त्याला." तिने जरा संकोचून वही आणून दिली, म्हणाली, "त्या खूप लहानपणच्या आहेत." जशी काही आता ती फार मोठीच मुलगी होती. त्यांतली एक छोटी कविता मला फार आवडली. मी तिला म्हटलं, "ही मला तुझ्या अक्षरात माझ्या डायरीत लिहून देतेस का ?" तिला त्याचं फारच अप्रूप वाटलं. तिने ती छान, तिरप्या अक्षरात लिहून दिली.

'There was a slim little bat
Who thought that she was much too fat
So she tried to get thin,
But was hungry within
And she said, "I'am just fat and that's that"
– Bonnie Foote 11/4/88

ब्रायनला मग मी दोऱ्याच्या ट्रिक्स करून दाखवल्या. तोंडात बोट घालून शँपेनची बाटली उघडताना येतो तसा 'टॉक्क' आवाज करून दाखवला. हाताची बोटं गुंतवून 'राजाराणी झोपली, दासी पाय चेपतेय... दारी कुत्रा भूः भूः करतोय' हे भाषांतरासहित करून दाखवलं. शेवटी तो मागून येऊन गळ्याभोवती हातांचा वेढा घालूनच बसला.

मग मी त्याला तसंच ओणवा होऊन उचललं, आणि गुडघ्यावर आणि पुढच्या हातांवर घोडा घोडा करीत हॉलभर चालू लागलो. ब्रायन खिदळू लागला. बॉनी तोंडावर हात ठेवून हसत, "नो ब्रायन, इट्स् नॉट गूड" असं म्हणाली. सँड्राला ब्रायनने हे पाहायला हाक मारली. ती स्तंभित होऊन पाहतच राहिली.

ती म्हणाली, "वसंत (व्ही.डी.) आला तेव्हा ब्रायन खूप लहान होता. त्याची आणि मुलांची चांगली गट्टी जमली होती. ब्रायन तर त्या वेळी खूपच लहान होता. वसंत सकाळी निवांत फिरायला जायचा." मला व्हीडींनी तिथल्या सकाळच्या फिरण्यातला सांगितलेला अनुभव आठवला. मी मैल दोन मैल फिरलो तरी एकही माणूस भेटायचा नाही. इतके सुंदर बंगले, हिरवळी, आखीव रस्ते, पण माणूस नसल्यानं फार विचित्र वाटायचं. एकदा तर एका गाडीतल्या माणसाने थांबून विचारलंही, "व्हॉट इज रॉंग ? यू वॉंट एनी हेल्प ?"

आमची जेवणं झाली आणि सँड्राने त्या दोघांना झोपायला पाठवलं. ब्रायनला सकाळीच शाळा असणार होती. आम्ही हॉलमधे खाली गालिचावर पाय पसरून बोलत होतो. अंजू दुसऱ्याच्या घरी गेल्यावर अगदी अबोल होते. गप्पा ऐकायला आणि विनोदावर

खळखळून हसायला मात्र तिला हवं असतं. सँड्राने माझ्यासाठी कात्रणांचा आणि काही मोठ्या लेखांच्या झेरॉक्स कॉपीजचा गठ्ठाच समोर आणून ठेवला. मी फोनवर मेक्सिकन मजुरांबाबत ओझरता उल्लेख केला होता. पण तो लक्षात ठेवून तिनं हे सगळं जमवून माझ्या हवाली केलं होतं. निवांतपणे वाचीन म्हणालो. व्हीडींचा विषय निघाला. त्यांना घशाचा कॅन्सर झाल्याचं व्हीडींच्या पत्रावरून तिला समजलेलंच होतं, त्यांच्याविषयी ती फार काळजीत होती. मी तिला अलीकडची हकीगत सांगितली, त्यांचा कॅन्सर रेडिओथेरपीला सेन्सेटिव्ह असल्यानं तो पूर्णपणे बरा झालेला आहे. त्यांनी हे दुखणे 'फिलॉसॉफिकली' घेतलं आहे. ती म्हणाली "त्यांना सांग की इकडे विश्रांतीला या बरेच दिवस."

अमेरिकेविषयी माझं काय मत झालंय ते तिनं विचारलं. तीही अमेरिकेतल्या उपभोगवादाच्या मुख्य प्रवाहाविषयी नाराज दिसली. मेक्सिकन मजुरांविषयी तिला बरीच माहिती होती. मी तिला म्हटलं, "तू त्यानंतर भारतात आलीच नाहीस, हे कसं ? तुला यावंसं वाटलं नाही की यायला जमलं नाही ?"

ती म्हणाली, "यायला जमलं नाही."

"मग आता ये आमच्याकडे. आपली ओळख आता रिन्यू झालीय. शिवाय बॉनी-ब्रायनशीही दोस्ती झालीय."

"ब्रायनसाठीच मला कुठं जाता येत नाही."

"का ?"

"त्याला एक असाध्य रोग आहे. एक प्रकारचा दमा म्हण किंवा अनुवंशिक हृदयाचा रोग म्हण. पण तो कधीकधी इतका स्पॅझममध्ये जातो की निळा पडतो. अनेकदा त्याला हॉस्पिटलमध्ये ठेवावं लागलंय. कधीही इमर्जन्सी येते म्हणून घरीही औषधं व इतर तयारी ठेवलीय. पण डॉक्टरांनी सांगितलंय की त्याला नेहमीच्या ॲक्टिविटीज करू द्यात. एवढंच काय खेळायलासुद्धा पाठवा; म्हणून मी त्याला फूटबॉलमध्येही पाठवलाय. कारण त्याच्या मनात आपल्याला काहीतरी झालंय असा कॉम्प्लेक्स निर्माण होऊनही चालणार नाही. पण सतत लक्ष ठेवावं लागतं."

मला काय बोलावं ते सुचेना. इतका हसरा, खेळणार मुलगा आणि काय हे ? तरीही मी म्हटलं, "पण आम्ही दोघंही डॉक्टर आहोत. आमच्याकडे रहा."

"त्याला अशा ॲटॅकमधनं वाचवायला स्पेशलाइज्ड हॉस्पिटलच लागतं. म्हणून आम्ही जरी त्याला कुठे आउटिंगला न्यायचं ठरवलं, तरी अशा हॉस्पिटलच्या जवळच्या अंतरावर नेतो."

ही चर्चा वाढवण्यात अर्थ नव्हता कारण मला दिसत होतं की, या विकाराच्या मुलांचं आयुष्य थोडं असतं. आणि ते सँड्राला माहीत असणारच. सँड्रा वयाच्या मानाने एकदम म्हातारी का दिसत होती, याचा उलगडा झाला.

सकाळी आवरून खाली आलो. सँड्रा ब्रायनला दूध-कॉर्नफ्लेक, ब्रेड-जॅम असा नाश्ता

करून देत होती. बाहेरचं अंगण काल रात्री पाहिलंच नव्हतं. हिरवळ, त्यात मोठमोठ्या संत्र्यांनी लगडलेली काही झाडं. मागे टेकडी, त्यावर दोन पाईनची मोठी झाडं. सँड्रा म्हणाली, "छान आहेत की नाहीत ती झाडं ? बॉनीच्या खोलीतून ती आणखी छान दिसतात. बॉनीने त्या झाडांवर कविता केली आहे. ती कविता तिच्या सगळ्या कवितांमध्ये मला खूप आवडते. म्हणून मी फोनसमोर लावून ठेवलीय बघ." काल मी लावलेल्या चित्राशेजारीच ती कविता लावलेली होती.

मी तिला ही कविता लिहून मागितली. बऱ्याच दिवसांनी भारतातल्या पत्त्यावर एक मोठ्ठं पाकीट आलं. त्यात ब्रायनची चित्रं, सँड्राने पाठवलेली सानदियागो टाइम्सची कात्रणं, याचबरोबर मोठ्या जाड कागदावर बॉनीने लिहून पाठवलेली ही कविता होती. सँड्राने लिहिलं होतं की 'बॉनीने तुला खास कॅलिग्रॅफीची ट्रीट पाठवली आहे.' आणि ते खरंच होतं. कवितेभोवती तिने स्वतःच्या मनाने नक्षीही काढलेली होती.

सँड्रा ब्रायनला पोहोचवायला शाळेत गेली. आम्हाला मेक्सिकोत जायचं असल्याने आम्ही भरपूर ब्रेकफास्ट करून घेत होतो. तेवढ्यात सँड्राला फोन आला आणि ती फोनवर म्हणाली, "ही इज हियर. आय विल जस्ट आस्क हिम" मला आश्चर्यच वाटलं, माझ्यासाठी इथं कुणाचा फोन असणार? सँड्रा म्हणाली, "ब्रायनच्या शाळेच्या बाईंचा फोन आहे. ब्रायनने त्यांना सांगितलंय की आमच्याकडे काय काय वस्तू करणारा मॅजिशियन अंकल आला आहे. तर तू एखादा तास त्यांच्या शाळेत मुलांना हे सगळं करून दाखवशील का, असं विचारताहेत."

मला गंमत वाटली. मी म्हणालो, "पण आपल्याला मेक्सिकोत जायला उशीर नाही का होणार ?"

"ते मी तुझ्यावर सोपवते. पण तू शाळेत गेलास तर ब्रायनची वर्गात कॉलर ताठ होईल."

ब्रायनचे हसरे डोळे आणि आजार आठवला, व म्हटले, "जाऊ या."

सँड्राच्या घरापासून पाच मिनिटांतच गाडीने ब्रायनच्या शाळेपाशी पोहोचलो. बैठी इमारत होती. दोन-तीन वर्ग एक केले होते. बाकं बाजूला काढून तीस-चाळीस मुलं खाली गालिचावर बसवली होती. सोनेरी केसाची गोरी मुलं, काळ्या केसांची, पुढनं थापटल्यासारख्या चेहऱ्याची चिनी व जपानी मुलं. . . तऱ्हतऱ्हेच्या चेहऱ्यांचं ते एक गोजिरवाणं संमेलनच भरलेलं होतं. भिंतींवर रंगीबेरंगी पोस्टर्स लावलेली. मला या मुलांसमोर आता काय करायचं हा प्रश्न पडला. पण ओरिगामी सुरू झाल्यावर पक्ष्याचे पंख हलवून दाखवल्यावर पोरांनी हेऽ ऽ ऽ करून टाळ्या वाजवल्या. बेडकाने प्रेक्षकांत उडी घेताच आधी घाबरून व नंतर स्वतःला तो मिळवण्यासाठी गिल्ला झाला. फळ्यावर हत्तीचं चित्र काढायला डोक्यापासून सुरुवात करून एकच रेघ फिरवत परत तिथपर्यंत येताच हत्ती तयार झाल्यावर त्यांचे डोळे विस्फारले गेले. मग त्यांच्या परिचयाच्या वस्तू काढल्या.

सायकल, मोटार, बस, रेल्वे. . . इत्यादी. मुलांच्या फरमाईशी सुरू झाल्या. ब्रायन मुलांमधे बसून भापत होता. मला त्याने हाताने दोऱ्याच्या खेळाची खूण केली. मी मनातल्या मनात कपाळावर हात मारला. ही काय अशी वर्गात करून दाखवायची गोष्ट आहे का? म्हणून एक ट्रीक करून दाखवली. त्याबरोबर मुलं म्हणाली, "आणखी आणखी" मी सँड्राला म्हटलं, "यांचा पुढचा तास असेल ना, आपण कधी संपवायचं आहे इथलं ?"

ती मुलांना म्हणाली, "आता जे करताहेत तो शेवटचा आयटेम असेल, तुमचा पुढचा क्लास सुरू होणार आहे ना ?"

काही मुलं गलका करीत ओरडली. त्याचा एकूण अर्थ असा की, तास काय रोजच होतात. अंकल फक्त आजच असणार आहेत. कडेच्या बाकांवर बसलेल्या शिक्षिकांपैकी एकीने सांगितलं, "चालू ठेवा." परत मुलं आनंदानं खिदळली.

मग पुढं हाताच्या बोटांभोवती दोऱ्याने करता येणारे काही आकार करून दाखवले. रेडइंडियन्स आणि एस्किमो लोकांमधे हाताच्या बोटांवर दोऱ्याचा वेढा धरून तऱ्हतऱ्हेचे आकार करतात, त्यावर गोष्टही सांगतात. सहा महिने रात्र असताना इग्लूमधे बसून कंटाळलेल्या मुलांना आजोबा करमणुकीसाठी असे 'स्ट्रींग गेम्स' करून खेळवतात. त्याचं एक पुस्तक तिथल्या प्रवासात मला मिळालं होतं, ते मी अवगत केल्याचा इथं उपयोग झाला. काही वेळानंतर मी म्हणालो, "आता बास ना ?"

त्यावर ब्रायनने तोंडात बोट घालून टॉक् करायची खूण केली. या अजब फरमायशीवर काय करावं समजेना. पण प्रवाहावर वाहत होतोच. तेही करून दाखवलं. सगळी मुलं ते करायचा प्रयत्न करू लागली. आणि शेवटी टाळ्या होऊन कार्यक्रम संपला.

मी तिच्याबरोबर मेक्सिकोत गेलो असताना तिथलं पितळी नाणं पाहून म्हटलं होतं, "असं नाणं एखादं मी नेईन आठवण म्हणून." पुढे ते विसरून गेलो. मी न्यूयॉर्कला गेल्यावर अमान मोमीन या कोल्हापुरी मित्राकडे गेलो होतो. (तो अमेरिकेत आल्या आल्या सँड्राकडे राहिलेला होता.) त्याच्याकडे पोहोचताच त्यानं एक माझ्या नावानं सँड्राकडून आलेला लखोटा दिला. त्यात मी त्यांच्याकडे विसरलेली काही चित्रं, भलंमोठं पत्र आणि मेक्सिकोचं पितळी नाणं होतं.

भारतात आलो तरी तिची पत्रं येतात. त्यांत मेक्सिकन मजुरांवरची कात्रणं आठवणीने पाठवते. ब्रायनचं गमतीदार चित्रही असतं. मधे व्ही. डी. वारले. सँड्राचं व्यथित पत्र आलं. त्यात तिनं लिहिलं होतं, त्यांच्या स्मृतीसाठी तुम्ही काही करायचं ठरवलं तर मला कळवा, मी त्यात असेन.

o

★★★★★

# मेक्सिको

अमेरिकेत आल्यापासून मनात होतं. आपण सानदिॲगो या दक्षिण टोकाला जाणार आहोत, मेक्सिकोत जायला मिळालं तर? नकाशात पाहिलं तर सानदियागोला अगदी लागून असलेलं मेक्सिकोतलं तिजुआना हे शहर होतं. स्पॅनिश भाषेत इंग्रजी 'जे'चा उच्चार 'ह' करतात त्यामुळे त्याचा खरा उच्चार तिहुआना किंवा तिवाना होता हे नंतर कळलं. एवढंच काय पण खुद्द मेक्सिकोचा उच्चारही 'मेहिको' असा आहे. सानदियागोला सँड्राला फोन केला तेव्हा एक्साईट होऊन किंचाळलीच, "ग्रेट... ग्रेट... वंडरफूल... कधी येतो आहेस." मी तारीख सांगितल्यावर म्हणालो, "मेक्सिकोत एखादा दिवस जाता येईल का?" ती म्हणाली "का नाही? मी अरेंज करते ते."

लॉसएन्जेलिसला अंजूकडे गेलो. आम्ही दोघं संध्याकाळी सँड्राकडे गेलो. सकाळी तिने मेक्सिकोतल्या कुणाला तरी फोन केला. म्हणाली, "तिथं माझ्या ओळखीची बाई सोशल सर्व्हिस सेंटर चालवते पण तिचंच ऑपरेशन झाल्याने ती रजेवर आहे. तर काय करायचं? मेक्सिकोत जायचं की इथंच सानदियागोमधलं काय काय पहायचं? म्युझियम, सीवर्ल्ड, झू...इथल्या या गोष्टी प्रसिद्ध आहेत."

मी म्हटलं, "आपण नुसतं मेक्सिकोत जाऊन जरी परत आलो, ते दृश्य नुसतं पाहायला मिळालं तरी चालेल."

ती म्हणाली, "ठीक आहे, आपण बॉर्डर क्रॉस करू. शहरातल्या मुख्य रस्त्यांवरून फेरफटका मारू आणि परत येऊ."

मेक्सिकन मजुरांच्यावर मी वाचत होतो म्हणून त्या देशाला पहायची इच्छा तर होतीच. पण त्याचबरोबर जगातल्या सर्वांत श्रीमंत देशाला लागून जवळपास सर्वांत गरीब देश असावा, या घटनेविषयी कुतुहलही होतं. ही सीमा ओलांडताना आपल्याला काय वाटेल, तो जर्क बसेल की होत गेलेले बदल हळूहळू असल्याने काही फरक जाणवणार नाही?

सँड्राला माझी मेक्सिकन मजुरांमधली उत्सुकता माहीत असल्याने ती गाडी मुद्दाम बाजूला शेती असलेल्या छोट्या रस्त्यांवरून घेत होती. अमेरिकेतली ती कॅलिफोर्नियातली

समृद्ध शेती. पण काही ठिकाणी गाडी उभी करून तिने मजुरांच्या वस्त्या दाखवल्या. त्या अशा ठिकाणी होत्या की वरून पाहणाऱ्याला त्या दिसूच नयेत. रस्त्याने मेक्सिकन चेहऱ्याची, साध्या चुरगळलेल्या कापडाच्या पँटशर्टमधली दोन तरुण मुलं चालली होती. आमची गाडी पाहून ती चमकली व बाजूच्या शेतात शिरून पळण्याच्या बेतात होती. पण आमची गाडी वेगात पुढे जाताना पाहून तशीच थांबली व पुढे चालू लागली.

प्रशस्त स्वच्छ हायवे, त्याभोवती हिरवळ. मेक्सिकन बॉर्डर जवळ येत चालली. सँड्रा म्हणाली, "आपण गाडी इकडेच पार्क करून बॉर्डर पायी क्रॉस करू."

मी म्हटलं, "का ?"

ती म्हणाली, "इकडून जाताना काहीच प्रश्न नाही. पण तिकडनं येताना मेक्सिकन ऑफिसरने काही खोडी काढली तर तो कार अडकवून ठेवू शकतो. आणि ते अधिकारी इतके करप्ट असतात की पैसे दिल्याशिवाय ते गाडी सोडणार नाहीत."

पार्किंग लॉटमध्ये जागा मिळवली आणि आम्ही तिघे पायी चालू लागलो. सँड्राने डॉलर देऊन मेक्सिकोचे चलन आधीच बदलून घेतले होते. शेजारच्या हायवेवरून आडवा जाणारा प्रचंड, पादचारी पूल होता. त्याखालून जरा चाललो आणि सँड्रा म्हणाली, "आता आपण मेक्सिकोत आहोत."

मी म्हटलं, "पण कस्टम तपासणी वगैरे ?"

ती म्हणाली, "इकडनं तिकडं जाताना तपासणीचा प्रश्नच नाही. प्रश्न तिकडनं इकडं येताना येतो." मनात म्हटलं, तेही खरंच. श्रीमंतांना दार आतून बंद करावी लागतात. झोपडीला दार नसलं तरी चालतं.

चार पावलं चालतोय तोच दोन-तीन माणसं आमच्याशी लगट करून "टॅक्सी पाहिजे का, कुठे जायचंय, मी याच्यापेक्षा स्वस्तात देतो" असं म्हणू लागली. समोर बऱ्याच जुन्या मोडकळीला आलेल्या टॅक्स्या होत्या. तिथं बरेच टॅक्सीवाले उभे होते. आलेल्या पाहुण्यांची ओढाताण करीत होते. सँड्रा गोरी अमेरिकन असल्याने तिच्या भोवती तर ते जास्तच घोंघावत होते. अमेरिकेतले टॅक्सीवाले आठवले. हात केला तरी माणूस पाहून थांबतात. फोन करून टॅक्सी बोलावली तर ती मिळणार, एरवी रस्त्यावर थांबून मिळण्याची शक्यता नाही. उतरल्या उतरल्या दहा ते वीस टक्के 'टीप'ची अपेक्षा करणार, न दिल्यास दार खाडकन आपटून तुच्छता व्यक्त करणार.

सँड्राने त्यांना सारले व आम्ही पुढे चालू लागलो. लघवीचा जोरदार वास आला. पाहिलं तर रस्त्याच्या कडेला भरपूर ओहोळ दिसले. कोपऱ्याकोपऱ्यावर कचरा पडलेला. कागदाचे बोळे इकडून तिकडे उडताना दिसत होते. कानाला तर जाणवण्याजोगा फरक होता. सगळीकडे गजबज गजबज आवाज येत होता. समोरच्या बसस्टॉपवर पोहोचलो. एक जुनी बस– आपल्याकडे सर्विसमोटरच्या जमान्यात दिसायची तशा मॉडेलची– उभी होती. त्यात शिरलो. अमेरिकेत ग्रे हाऊंडने प्रवास केलेला. बसेस अगदी कंफर्टेबल. कधीही पहा

जेमतेम एक तृतीयांश भरलेल्या. गाडीत सर्व सोयी. मागच्या बाजूला रेस्टरूम (टॉयलेट) सुद्धा असायची. या बसमध्ये मात्र आपल्या एस.टी. सारखी बाकं. त्यांतल्या काहींच्या सीट्स्, काहींच्या पाठी गायब झालेल्या. पायाशी सगळीकडे कचरा. गाडीच्या मागच्या भागातून तर लघवीचा वास मारत होता. एका बाकावर मी व अंजू बसलो. सँड्राने त्या सीट्सची अवस्था पाहून उभेच राहणे पसंत केले. आमच्या सीट्सना पाठी नसल्याने आम्ही अवघडूनच बसलो होतो. गाडीत चांगले कपडे घातलेली सुस्थितीतील मेक्सिकन कुटुंबेही होती. ती बहुधा अमेरिकेत स्थायिक होऊन सुट्टीसाठी मेक्सिकोत चालली असावीत. बाकी पब्लिक त्यांच्याकडे हेवा वाटणाऱ्या नजरेने पाहत होतं.

तितक्यात एक बारा-चौदा वर्षांचा मुलगा गोळ्या विकायला आला. मी थक्कच झालो. अमेरिकेत असं ट्रेन किंवा बसमधे काय काय विकणारी मुलं हा प्रकारच नाही– हे लक्षातच आलं नव्हतं. गोळ्या हव्यात ना, मग शॉपिंग सेंटरमधे जा व आणा असा तिथं प्रकार. तो मुलगा प्रत्येकाच्या मांडीवर– त्याची इच्छा असो वा नसो– गोळ्यांचं पाकीट ठेवत गेला आणि परत येताना परत उचलूनही घेत गेला. एक दोघांनी ते विकत घेतलंही. तो गेल्यावर एकजण गिटार घेऊन आत आला आणि अगदी आमच्यासमोर येऊन गिटार वाजवत, भसाड्या आवाजात स्पॅनिश गाणं म्हणायला सुरुवात केली. गाणं म्हणता म्हणता तो भीकही मागत होता.

एक गचका घेऊन बस सुरू झाली. हळूहळू शहर जवळ येत चाललं. अमेरिकेत सगळ्या सौम्य रंगाच्या इमारती. इकडे म्हणजे घरांना गुलाबी, लेमन यलो, निळा असले भडक रंग. 'रिव्होल्यूशन' चौकात उतरलो. बस पुढे निघून गेली. सगळीकडे माणसंच माणसं. जशी काय जमिनीतून वर आलेली. चौकाचौकांत बरेच घोळके नुसते उभे. मनात आलं, ही कामाशिवाय अशी उभी का राहिलीयेत ? तेवढ्यात परत मनात चमकून गेलं, अरे, तुझ्या देशातही अशी माणसं उभी असतात, बिनकामाची. काही कोपऱ्यांवर एक छकडा, त्याला पुढं गाढव जोडलेलं, त्यावर झेब्र्यासारखे पट्टे ओढलेले. चार-पाच माणसं भोवती जमली होती. मला याचा अर्थ कळेना. तेवढ्यात आम्हाला माणसं म्हणाली, "साहेब, फोटो काढून घ्यायचाय का ?" ती अजब पार्श्वभूमी पाहून आम्ही सटकलोच.

तिउवानाच्या डाऊनटाऊनमधे भटकत होतो. रस्त्यावर दारिद्र्य पण दुकानात श्रीमंती असा टिपिकल 'थर्ड वर्ल्ड सीन' होता. दुकानांच्या काचा मजल्याइतक्या उंच, आत किमती वस्तू, कपडे इत्यादी. कपड्यांतही पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी मेक्सिकन 'फोक' डिझाइन्स असलेल्या शाली, चादरी. सँड्राने आम्हाला खेळण्यांच्या व मेक्सिकन टिपिकल शोभेच्या भेटवस्तूंच्या दुकानांमधून नेलं. किमती भरमसाठ होत्या. परदेशी पर्यटकांना लुटण्यासाठीच दुकानदारांची एकूण चाल होती. पण स्पर्धाही खूप असल्याने आलेलं गिऱ्हाईक जर जाऊ लागलं तर किंमत वाटेल तेवढी पाडून सांगण्याचा निर्लज्जपणाही असायचा. या सगळ्यांचा उबग आला. आपल्याकडेही हे सगळं असंच असतं.

सँड्राला तिथलं चांगलं हॉटेल माहीत होतं. तिथं तिनं जेवायला नेलं. बसताना म्हणाली, "मी इथलं पाणी पीत नाही. सॉफ्ट ड्रिंक मागवते. पदार्थ गरम असल्याने त्यांत काही धोका नाही. तुम्ही काय करताय ?"

मी हसलो व म्हणालो, "मी आणि अंजू दोघंही भारतात वाढतोय. तिथल्या अमीबांना आम्ही जुमानत नाही. मेक्सिकन अमीबा काही वेगळे आहेत का ?"

सँड्रा गोरी अमेरिकन असल्याने सगळे तिच्यापुढे दबकून असायचे. वेटर्स 'यस मॅडम' करीत पुढं पुढं करायचे. त्यांच्या चेहऱ्यावरचे न्यूनगंड, कावेबाजपणा हे भाव बघून मला आपल्याकडल्या फाइव्ह स्टार हॉटेलातल्या वेटर्सची आठवण झाली. आज मी सँड्राबरोबर असल्याने गरीब देशात येणाऱ्या फॉरेनरची औट घटकेची भूमिका पार पाडीत होतो.

जेवण झाल्यावर रस्त्यांनी भटकलो. परत जाणाऱ्या बसमध्ये चढलो. शहराच्या चहूबाजूंनी टेकड्या आहेत. त्यांवर झोपडपट्ट्या पसरलेल्या होत्या. लाकडाच्या पट्ट्या पट्या मारलेली घरं. सँड्रा म्हणाली, "यांत पिण्याच्या पाण्याचे नळ नाहीत. संडास नाहीत, इलेक्ट्रिसिटी नाही, पक्के रस्तेही नाहीत."

मी म्हटलं, "मग तर ह्या भारतातल्या झोपड्पट्ट्यांपेक्षा वाईट अवस्थेत आहेत."

ती म्हणाली, "वाईट ? केऑस आहे केऑस !"

परत बॉर्डर क्रॉस करताना रस्त्यावरच्या पुलावरून जावं लागलं. प्रशस्त जागेत तीन-चार काऊंटर्स होती. प्रत्येकापुढे शे-दोनशे लोकांच्या रांगा होत्या. पासपोर्ट चेक करीत होते. बरोबरचं सामान उपसायला लावीत होते. मी अमेरिकन सरकारचा पाहुणा असल्याने विशेष स्वरूपाचा व्हिसा होता. त्याने ती अक्षरं वाचली आणि पासपोर्ट परत देऊन पुढे जाण्याची खूण केली. आम्ही तिघंही वेगवेगळ्या रांगांमध्ये गेलो होतो. कोण आधी सुटतोय अशी स्पर्धाही लावली होती. मीच आधी बाहेर आलो होतो.

चालत चालत गाडीकडे आलो.

आवाजाची दुनिया मागे पडली. शांततेचं राज्य सुरू झालं. कसलाही वास नसलेला टिपिकल अमेरिकेचा वास मला अगदी ओळखू आला. रस्ते अगदी कडेपर्यंत स्वच्छ आणि तेही एकटेदुकटे नव्हे तर सर्वत्रच. प्रत्येक रस्त्याच्या कडेने हिरवळी. मधनंमधनं झाडं. पण सगळं निर्मनुष्य. चंद्रावरच्या डोंगरांचे आणि विवरांचे निर्मनुष्य फोटो पाहिले तेव्हा सुन्न झालो होतो, तसं वाटलं. अपवाद फक्त हायवेवरून घोंघावत जाणाऱ्या गाड्यांचा.

सँड्रा म्हणाली, "इथली आर्ट गॅलरी बघायचीय का ? लूत्रेकचा मोठा शो चालू आहे." म्युझियमभोवती मोठ्ठी बाग होती. त्या हिरवळी, झाडं, इमारतींचा मेन्टेनन्स, सगळीकडली स्वच्छता पाहताना वाटलं, या सगळ्यासाठी पैसे लागतात.

संध्याकाळ झाली तसे आम्ही सँड्राच्या देलमार गावाकडे निघालो. हायवेने गाडी दौडू लागली. पुढे वेग कमी होऊ लागला. गाड्यांचे मागचे लाल दिवे रस्त्याने साठू लागले. सँड्रा म्हणाली, "ही ऑफिसं सुटण्याची वेळ. त्यात आमच्या गावाच्या अलीकडे दोन हायवे एकत्र

होतात. त्यामुळे ट्रॅफिक खूपच वाढतो. ऑफिसातनं येताना माझा हा रोजचा त्रास आहे. माझं घर इथून दहा मिनिटांवर आहे पण या जाममुळे कधी कधी तासतासही लागतो. घरी मुलं शाळेतून येऊन बसतात. मला ते इथून अगदी दिसत असतं. कधी कधी वाटतं ही कार इथंच कुठंतरी कडेला टाकून द्यावी आणि जावं पायीच घरी."

मनात आलं, 'हे सुखाचं अजीर्ण.'

★★★★★

# रेड इंडियन्स

अमेरिकेतल्या रेड इंडियन्सना तिथले लोक इंडियन्स म्हणतात. त्यामुळे मी कधी 'इंडियन' असल्याचं सांगताच ते जरा कुतूहलाने आणि चमत्कारिकपणे पाहू लागायचे. मग मी पुढेपुढे ओळख करून देताना 'आय ॲम फ्रॉम इंडिया' अशी ओळख करून देऊ लागलो. अमेरिकन सिनेमात रेड इंडियन्सचा निःपात करून गोऱ्या अमेरिकनांनी कसा विजय मिळवला, हे आधीपासूनच पाहत आलो होतोच. म्हणून अमेरिकेच्या दक्षिण सीमेवरच्या 'न्यू मेक्सिको' या राज्यात 'सांता-फे' या शहरात आमचा ग्रूप जाणार असे समजल्यावर जरा उत्सुकता वाढली. कारण या भागात अजून रेड इंडियन्स शिल्लक आहेत. शेकडो चौरस मैलाचे विभाग त्यांच्यासाठी राखून ठेवलेले आहेत. त्यांना इंडियन रिझर्वेशन्स म्हणतात. या रिझर्वेशन्स मधे दुसऱ्या कुणा अमेरिकन नागरिकांना जागा विकत घेता येत नाहीत. असं सगळं ऐकलं होतं.

सांता-फे हे उंचीवरचं, थंड हवेचं ठिकाण. इथं आल्यावर ते अमेरिकन टुरिस्टांनी इतकं गजबजलं होतं की, आमच्या ग्रूपमधला कोलंबियाचा, स्पॅनिश वळणाचं इंग्लिश बोलणारा सेल्सो नावाचा लेखक म्हणालाही, "आय डोंट सी एनी इंडियन्स हियर. ओन्ली इंडियन आय हॅव सीन सिन्स आय केम टु सांता-फे इज दॉक्तोर अवचत." इतर अमेरिकन शहरं बघत बघत आम्ही सांता-फेला आलो तेव्हा प्रथम दर्शनाने आम्ही चकितच झालो.

तिथं कुठे अनेक पदरी रस्ते नव्हते, कुठं क्रॉंक्रीट आणि काचा काचांच्या अनेकमजली इमारती नव्हत्या. तिथं होती मातकट गुलाबी रंगाची बैठी किंवा दुमजली, जास्तीत जास्त तिमजली घरं. या भागात पूर्वी इंडियन्स राहत, त्यांचा स्पॅनिश लोकांनी पराभव करून त्यांनी राज्य केलं. नंतर अमेरिकनांनी मेक्सिकोकडून हे जिंकून घेतलं. त्यामुळे मूळच्या इंडियन आणि नंतरच्या स्पॅनिश संस्कृतीच्या मिश्रणातून तिथल्या इमारतींचं 'अदोबी' नावाचं वेगळंच आर्किटेक्चर तयार झालेलं आहे. जे अमेरिकनांनी आता प्रिझर्व केलेलं आहे. सांता फेच्या डाऊन टाऊनमधे कुणालाही घर बांधताना अदोबी पद्धतीनेच बांधावं, असा नियमच केला आहे. या गुलाबी मातीच्या भिंती पोकळ असतात. हाताने वाजवून पाहिलं की डब् डब्

वाजतात. घरांच्या भिंतीना गोलाई असते. कुठे करकरीत कोपरे, कोन नसतात. काळपट रंग दिलेल्या लाकडांचा भरपूर वापर घरांमधे असतो. खिडक्यांच्या चौकटी लाकडी. मधली जाळी ही जाड जाड गोलाकार लाकडी ओंडक्यांची. आत छताला तुळया, कडीपाट.घराला अनेक जाड खांब. . . हे सगळं लाकडी. कुठे उतरतं छप्पर नाही. वरून गोलाई दिलेल्या भिंतींवर धाब्याचं छप्पर. भोवती आपल्याकडच्यासारखे अरुंद गल्लीबोळ. त्यामुळे नगर जिल्ह्यातल्या एखाद्या खेड्यात आल्यासारखं वाटलं. पण कुठल्याही घराचं दार उघडलं की अमेरिका सुरू. खाली गालिचे, काचांची दारं, गुबगुबीत सोफे, बाजूला गार्बेज कॅन्स, रेस्टरूम्स. एअरकंडिशनर्सच्या एअर फ्रेशनरचा टिपिकल वास. . . इत्यादी. अदोबी घरांचं नुसतं आवरण, आत फाइव्ह स्टार हॉटेल्स. टुरिस्टांनी गजबजलेली.

सांता-फे हे आर्ट गॅलरीज आणि फोक आर्ट म्युझियम्सचं गाव. एका म्युझियममधे जगातल्या लोककलांमधल्या वस्तू होत्या. (त्यांत भारतातल्या गणेश, कालिमाता इत्यादी मूर्ती, बाहुल्या, विणलेली कापडे इत्यादीही होते) एक म्युझियम रेड इंडियन संस्कृतीवरच होते. त्यांची शस्त्रे, कपडे, त्यांनी बनवलेल्या वस्तू होत्या. त्यांच्या मुखवट्यांवरून त्यांची संस्कृती किती प्रगल्भ होती हे समजले. आर्ट गॅलरीज म्हणजे इंडियन संस्कृतीतल्या वस्तूंची दुकाने, थोडक्यात गिफ्ट शॉप्स. इंडियन लोकांची काळी किंवा लाल चकचकीत पॉटरी फार प्रसिद्ध आहे. प्रचंड महाग किमतीची लेबलं लावून ती या आर्ट गॅलरीजमधे ठेवलेली असते.

एक दिवस भटकल्यावर आम्हाला इंडियन चेहरे दिसू लागले. गोल आकाराचे, सरळ टिपिकल नाकाचे, तांबूस-निमगोरे चेहरे. त्यांत काही चेहऱ्यांमध्ये मेक्सिकन चेहऱ्यांच्या वैशिष्ट्यांचंही मिश्रण झालेलं. तिथल्या चौकातल्या एका इमारतीच्या, रस्त्यालगतच्या लांबलचक व्हरांड्यात ते आपापल्या वस्तू विक्रीला घेऊन बसले होते. सिनेमात पाहिल्याप्रमाणे त्यांनी डोक्याला पिसं लावली नव्हती किंवा उघड्या अंगावर रंगीत पट्टे ओढलेले नव्हते. तर जीन पँट्स्, इतर अमेरिकनांपेक्षा जरा भडक रंगाचे शर्ट्स् – थोडक्यात आपल्याकडे शहरात नव्याने वसलेली भटक्या विमुक्त समाजातली तरुण मंडळी जशी दिसतात– तसे हे दिसत होते. केसांभोवती– टेनिसपटू बांधतात तशी रिबन बांधायचीही पुरुषांमध्ये फॅशन होती.

त्या भागातल्या साहित्याविषयी ओरलांडो रोमेरो नावाच्या कवी आणि हिस्ट्री लायब्ररीच्या डायरेक्टरचे आमच्यापुढे लेक्चर ठेवले होते. त्याने या भागात पूर्वी लिहिल्या गेलेल्या स्पॅनिश भाषेतील साहित्याचा आढावा घेतला. पण इंडियन्सचा कुठे उल्लेखही नव्हता. पाकिस्तानचा वाकस उठला व म्हणाला, "स्पॅनिश येण्यापूर्वीच्या काळातल्या साहित्याविषयी काय?" तो म्हणाला, "तसं काही इथं नव्हतंच. स्पॅनिश लोकांबरोबरच इथली संस्कृती सुरू झाली." मग काय, वाकसच्या हातात कोलीतच आलं. तो म्हणाला, "कशावरून? त्याआधीही इथं प्रगल्भ संस्कृती होतीच. हा तुमचा रेसिस्ट ॲप्रोच आहे. लिखित नसेल पण ओरल ट्रॅडिशनमधनं लिटरेचर निर्माण होतंच असतं." त्याला काही उत्तरच देता येईना, शेवटी म्हणाला, "माझा त्यावर काही अभ्यास नाही."

एके दिवशी आम्ही एक इंडियन रिझर्वेशनच पाहायला जाणार आहोत, असं समजल्यावर खूपच आनंद झाला. सांता-फे मधे नाही, पण निदान तीस-चाळीस मैल दूर असलेल्या डोंगराळ भागात तर इंडियन्स नक्कीच खऱ्या स्वरूपात पाहायला मिळतील असं वाटलं. सांता-फेचा परिसर ओलांडून आमची बस मोकळ्या मैदानातील रस्त्यावरून धावू लागली. अधूनमधून मातीचे उंच उंच डोंगर दिसू लागले. हवेमुळे त्यांची सर्व बाजूंनी धूप होत असल्याने त्यांच्यात शिल्प कोरल्यासारखे उभट आकार तयार झालेले होते. सगळ्या परिसरात खुरटी खुरटी झाडं वाढलेली होती. दूर दिसणाऱ्या उंच शिखरांवर मात्र बर्फ पडलेलं दिसतं होतं. त्यावर काळ्या रेषा ओढलेल्या इतक्या लांबूनही दिसत होत्या. हे स्कीईंगचे ट्रॅक्स. अमेरिकेतील इतर प्रांतांच्यापेक्षा इथं गरिबी वातावरण लक्षात येत होतं. कमी पदरी रस्ते, खूप अंतरावर दिसणारे पेट्रोलपंप, रस्त्याला कमी एक्सिट्स्, कमी पूल यांतून ते 'दारिद्र्य' व्यक्त होत होतं.

एका गावात गाडी वळली आणि मोकळ्या आवारातल्या एका बैठ्या घरासमोर आम्ही थांबलो. आतून एक मध्यम वयाचा माणूस गाडीपाशी आला आणि म्हणाला, "वेलकम टु इंटरनॅशनल रायटर्स. हे सँटा क्लारा नावाचं गाव आहे. इथं अमूक टोळीच्या इंडियन्सची वस्ती आहे. त्याचा शब्दशः अर्थ म्हणजे 'वाहतं पाणी' असा आहे. हा माझा मुलगा, हा तुम्हाला डोंगरावरच्या वस्तीवर घेऊन जाईल." तो मुलगा तरुण, सशक्त, गोल चेहऱ्याचा, सावळ्या रंगाचा गाईड होता. आमच्या गाडीत पुढे येऊन बसला. टोळीची माहिती दिल्यावर तो म्हणाला, "अजून क्लिफ ड्वेलिंग यायला वेळ आहे, तोपर्यंत माझ्या आजोबांनी सांगितलेली गोष्ट सांगतो." सगळे खूष झाले, म्हणाले, "सांगा, सांगा."

"कोल्ह्याला पिवळे डोळे कसे मिळाले माहीत आहे का ?" असं विचारून त्याची गोष्ट सांगितली. "पूर्वी कोल्ह्याला पिवळे डोळे नव्हते. पण पक्ष्यांना मात्र होते. कोल्हा एकदा संध्याकाळी फिरत फिरत चालला होता. पक्षी झाडावर बसून खेळ खेळत होते. हा लपून तो खेळ पाहू लागला. पक्षी एक डोळा काढून खाली फेकायचे. तो बॉलसारखा बाउन्स होऊन वर आला की त्या रिकाम्या खोबणीत परत कॅच करायचे. नंतर दुसरा डोळा असाच फेकून झेलायचे."

हे आम्हाला भलतेच भन्नाट वाटू लागले. आपण फँटसी, फँटसी म्हणतो, पण एवढी फँटसी ?

पुढे तो सांगू लागला, "थोड्या वेळानं कोल्हा पुढं आला व म्हणाला, 'मला तुमच्या खेळात घ्या.' पक्षी म्हणाले, 'तुला हा खेळ यायचा नाही.' कोल्हा म्हणाला, 'मी लपून तुमचा खेळ पाहिला आहे. खेळाचे नियम मला माहीत आहेत. तुम्ही फक्त कसं करायचं ते शिकवा.' शेवटी त्याने हट्ट धरला तेव्हा पक्ष्यांनी त्याला शिकवलं. कोल्हाही एक डोळा काढून खाली टाकू लागला आणि झेलू लागला. मग त्याला आणखीनच गंमत वाटू लागली. त्याला वाटलं, दोन्ही डोळे एकाच वेळी टाकून बघूया. म्हणून त्याने तसं केलं. पण ते झेलणार

कसे ? (कारण एक डोळा खाली टाकल्यावर दुसऱ्या डोळ्याच्या साह्याने तो झेलता येतो.) ते टणटण करीत जंगलात नाहीसे झाले. आंधळा होऊन तो रडू लागला. पक्ष्यांनी खूप शोधाशोध केली, पण संध्याकाळ होऊन गेल्यामुळे त्यांनाही दिसेनासं झालं होतं. मग ते त्या रडणाऱ्या कोल्ह्याला घेऊन त्यांच्या देवाकडे गेले. पक्षीदेवाला त्याची दया आली. त्याने पक्ष्यांचे दोन डोळे त्याला लावून दिले अशा रीतीने कोल्ह्याला पिवळे डोळे मिळाले."

गोष्ट संपल्यावर काही जण ओरडले, "ग्रँड पा, आणखी एक गोष्ट सांगा." तो हसला व म्हणाला, "ठीक आहे, सांगतो. आमच्यामधे कायोटी या प्राण्याच्या मूर्खपणाबद्दल अनेक गोष्टी प्रचलित आहेत. त्यांतली एक सांगतो. देवाने सृष्टी निर्माण केली तेव्हा प्रत्येक प्राण्याला काहीतरी निर्मितीचे काम दिले. एकाला सांगितले, तू नद्या निर्माण कर. कुणाला झाडं तर कुणाला डोंगर... अशी त्याने कामं वाटून दिली. पण या कायोटीला काहीच काम दिलं नाही. त्याला इतर प्राणी चिडवू लागले. 'आम्ही बघ, हे निर्माण केलं, ते निर्माण केलं, तू कुठं काय केलं ?' तो रडू लागला. देवाकडे गेला आणि म्हणाला, 'मला काहीतरी काम दे.' देवाने त्याला समजावून सांगितलं, 'अरे, तू छोटा आहेस ना, तू काही नाही केलं तरी चालेल.' पण त्याने हट्टच धरला. मग देवाने त्यालाही काम दिलं. त्याच्याकडे पिशवी देऊन सांगितलं की, 'या जगाचा शेवट जिथं आहे तिथं ही पिशवी नेऊन ठेव. फक्त एक अट की यातल्या वस्तू कुठं सांडता कामा नयेत.' कायोटी आनंदाने निघाला. भेटणाऱ्या सर्व प्राण्यांना फुशारकीने सांगू लागला की, 'बघा, देवाने मला सुद्धा काम दिलं, मला सुद्धा काम दिलं.' असं म्हणता म्हणता पुढं आलेल्या भिंतीवर आदळला आणि पिशवीतून रत्नं बाहेर सांडली. पण ती जमिनीवर न पडता तशीच उडून आकाशात गेली आणि त्यांचे तारे, नक्षत्रं, ग्रह झाले. कायोटी आकाशाकडे बघून रडू लागला, म्हणत होता की 'देवाने मला काम दिलं होतं. पण मी मात्र माझ्या मूर्खपणाने ते घालवलं.' अजूनही तो रात्री आकाशाकडे बघून हेच म्हणत रडत असतो. पण त्या मूर्खाला काय माहीत की या जगातली सर्वश्रेष्ठ निर्मिती त्याने केली आहे..."

गोष्ट संपल्या संपल्या आम्ही सगळे ओरडलो, "ग्रँड पा, आणखी एक गोष्ट..." तो वैतागून म्हणाला, "तुम्हाला काय तुमच्या आजोबांनी गोष्टी सांगितल्याच नाहीत की काय ?"

फ्रेंच लेखिका मारी म्हणाली, "आमच्याकडे आजी-आजोबा ही इन्स्टिट्यूशनच राहिलेली नाहीय."

"मग तुमच्या मुलांना गोष्टी कोण सांगतं ?"

"आमची मुलं टी.व्ही. पाहत बसतात आणि त्यातही स्पायडरमॅनसारखे तुमच्या अमेरिकेतनंच आलेले प्रोग्रॅम पाहत बसतात."

एव्हाना भोवतीचं दृश्य खूपच बदललं होतं. भोवती सगळीकडे खुरटी खुरटी झाडं होती. रस्ता वळणा वळणाने वर चालला होता. समोर, मघा लांबून पाहत होतो तसला डोंगर

आता अगदी जवळ आलेला दिसत होता. डोंगराच्या पायथ्याशी गाडी जाऊन थांबली. आम्ही उतरलो. समोर इन्फर्मेशन सेंटर होतं. जिथं 'पूये' म्हणजे डोंगरावरची वस्ती किती जुनी होती, वगैरे माहिती लावली होती. आम्ही पहिल्या काही पायऱ्या चढून नंतर कच्च्या रस्त्याने डोंगराच्या एका टप्प्यावर गेलो. तिथं मुरमाड मातीत गुहा कोरलेल्या होत्या. पांढरट-पिवळट मुरमाड दगडांच्या मोठमोठ्या शिळा इतस्ततः पडल्या होत्या. एका अशाच भिंतीसारख्या दगडावर आकृत्या कोरलेल्या होत्या. एका सापासारख्या दिसणाऱ्या आकृतीकडे बोट दाखवून म्हणाला, "हा आमचा ड्रॅगन-गॉड. किंवा सरपंट गॉड. आमच्या वाडवडिलांचा असा विश्वास होता की, माणसं उन्मत्त झाली की हा सरपंट गॉड जगातलं सगळं पाणी पिऊन टाकतो आणि मग सगळीकडे दुष्काळ पडतो. मग लोक या देवाकडे जातात. चुका कबूल करतात. चांगलं वागू असं आश्वासन देतात. मग दया येऊन हा सरपंट गॉड तोंडातून सगळं पाणी सोडून देतो. मग पृथ्वीवर सुबत्ता येते. तरी काही काळाने माणसं चुका करीतच राहतात आणि हे सगळं परत परत होत राहतं" मनात आलं की, हे आपल्या अवतार कल्पनेला जवळचं आहे.

आणखीही काही आकृत्या त्याने दाखवल्या. तो म्हणाला, "देवाने जग निर्माण करताना सर्पंट गॉडवर पाण्यातली सृष्टी निर्माण करायचं काम सोपवलं. अस्वलावर पृथ्वीवरची आणि गरुडावर हवेतली म्हणजे पक्षी, फुलपाखरं ही सृष्टी निर्माण करायचं काम सोपवलं. या तीन देवांमधे जेव्हा सुसंवाद असतो तेव्हा जग चांगलं चालतं. यांच्यात विसंवाद झाला की तोल बिघडतो. आमचे पूर्वज जे सांगत ते आजही कसं खरं निघतं ते पहा. ड्रॅगन हे चीन देशाचं चिन्ह आहे. अस्वल हे रशियाचं तर गरुड हे अमेरिकेचं. हे तीन देश एकमेकांशी नीट वागले तर जगात शांतता नांदेल. एकाने जरी ताल सोडला तर महायुद्ध सुरू व्हायला वेळ लागणार नाही." त्याने त्याच्या वाडवडलांची स्टोरी एकदम जागतिक शांततेपर्यंत आणून सोडल्याने मला गंमतच वाटली.

आणखीही वर गेलो आणि डोंगरमाथ्यावरचे पठारच लागले. पहिल्यांदा काय दिसले असेल तर फायबर ग्लासमध्ये मोल्ड केलेल्या दोन रेस्टरूम्स (मुताऱ्या)! त्या नैसर्गिक वातावरणात त्या इतक्या बेढब दिसत होत्या की बस्स. मैलोन्‌मैल निर्मनुष्य, उजाड प्रदेशात लघवी लागल्यावर या रेस्टरूम्समध्ये जाणारा माणूस मला वाटतं, अमेरिकनच असणार. फिलीपी लांबूनच त्या रेस्ट रूम्स दाखवीत ओरडून म्हणाला, "सी दोज ? इंडियन्स वेअर यूसिंग देम वन थाऊसंड इअर्स ॲगो !" सगळे हसू लागले.

पठारावर सर्वत्र घरांच्या अर्धवट भिंती दिसत होत्या. मातीच्या चौरस विटांनी बनवलेल्या, पण आता झिजून जवळपास एकजीव झालेल्या. गाईड सांगत होता, "या मोकळ्या जागी ते एकत्र जमत. डान्स करीत. इथं न्यायनिवाडा होत असे"...इत्यादी. एकाने विचारले, "ते डोक्याला पिसं लावलेले इंडियन्स कुठं राहतात?" तो हसला व म्हणाला, "फक्त अमेरिकन सिनेमात. प्रत्यक्षात आता ते तुमच्या-माझ्यासारखेच कपडे घालतात."

पलीकडे एक विहीर होती. ती लाकडी ओडक्यांनी झाकलेली होती. आत पाहिले तर ती वीस-पंचवीस फूट व कोरडी होती. गाईड सांगू लागला, "आमच्यात अशी समजूत आहे की जग निर्माण झालं तेव्हा पहिलं जग हे पाण्याचं होतं. सगळं जलमय होतं. नंतर दुसरं जग निर्माण झालं. ते चिखलाचं होतं. तिसरं जग अंधाराचं जग होतं आणि चवथं जग हे मक्याच्या कणसाच्या देवाचं होतं. म्हणून इथं जो वार्षिक कार्यक्रम व्हायचा तेव्हा आमची काही वडील मंडळी या विहिरीत उतरून राहायची. ती काही काळ पाण्यात, काही काळ चिखलात, काही काळ अंधारात काढायची, नंतर 'गॉड ऑफ कॉर्न' बनून म्हणजे डोक्याला मक्याची पानं, अंगाभोवती कणसं गुंडाळून या विहिरीतून बाहेर यायची. मग जल्लोष व्हायचा. लोक त्यांची पूजा करायचे. . ." मला हे ऐकताना रम्य वाटू लागलं. किती निसर्गाजवळचं, निसर्गमय जीवन. त्यांची नावंही काय काय होती, ते मघा या मुलानंच सांगितलं, 'लाल डोंगर', 'विजेचा गडगडाट'. . . इत्यादी.

सगळे वेगवेगळे होऊन भटकू लागले. मी चालता चालता त्या गाईडला विचारलं, "खरंच सांगणार का, या अमेरिकन लोकांविषयी तुमचं काय मत आहे ?"

तो काही सेकंद थबकलाच. म्हणाला, "वुई हॅव टु लिव्ह वुईथ देम" शेजारून चालणाऱ्या मित्राने विचारलं, "म्हणजे कसं ?"

मी त्याला थांबवीत म्हणालो, "मला वाटतं त्या एका वाक्यात सगळं आलेलं आहे." तरी गाईड पुढे म्हणाला, "हे भोवती दिसतात हे डोंगर म्हणजे रिझर्वेशन आहे. पण आता तेही या अमेरिकनांना पाहवत नाही. एकतर सगळं आमचंच होतं. जी काय थोडी रिझर्वेशन्स राहिलीत त्याचे या ना त्या कारणाने लचके तोडणं चालू आहे. कुठे ऑईल सापडेल म्हणून जमीन पाहिजे, कुठं अणुस्फोटाला जागा पाहिजे. . . तुम्हाला माहीत आहे, आमच्या लोकांना या देशाचं नागरिकत्व कधी मिळालं ? जवळपास एकोणीसशे पस्तीस सालात. त्या आधी अठराशे कितीतरी सालात इटालियन्स आले. त्यांना नागरिकत्व या देशाने दिलं. जगातनं कितीतरी देशातनं लोक आले. मागेल त्याला नागरिकत्व बहाल करीत होते. पण आम्ही इथले, हा देश आमचा, पण आम्हाला नागरिकत्व नव्हतं. उलट पहिल्या महायुद्धात आम्हाला सक्तीने लष्करात भरती करून लढाईत पाठवलं. आमचे बरेच पूर्वज, जे ज्या देशाचे नागरिकही नव्हते त्या देशासाठी ते मेलेत."

त्याची ही प्रतिक्रिया पाहून मी विषय बदलायचा म्हणून विचारलं, "हे जे तुमचे लोक मिल्ट्रीत जाऊन परत आले, त्याने तुमच्या समाजात काही बदल झाला का ? त्यांनी मोठं जग पाहिल्याने तुमच्या समाजात त्यांचा प्रभाव वाढला असेल ?"

"छे: छे: त्या लोकांना आमच्या पूर्वजांनी 'दे नो टू मच' असं म्हणून कुठल्याही निवाडा करण्यातून, निर्णय घेण्यातून बाजूलाच ठेवलं."

मी चकितच झालो. जास्त माहिती आहे म्हणून त्याला जास्त भाव देण्याऐवजी, त्या ज्ञानाने आपल्या रुळलेल्या समाजजीवनात घोटाळेच होतील, हे त्याच्या व्यवहारी पूर्वजांनी

किती अचूक ओळखलं होतं !

"आता तुमचे लोक काय करतात ?"

"इथल्याच समाजात मिळेल ते बिगारी काम. शिक्षण नाही. स्पॅनिश बोलणारे इथले मेक्सिकन्सही आम्हाला दूर लोटतात, गोऱ्या अमेरिकनांकडून तर अपेक्षाही नाहीत. वेलफेअरच्या योजना असतात, पण त्या नावाला. दवाखाने आहेत, पण डॉक्टर्स नाहीत. असतात ते मनापासून काम करीत नाहीत."

मला हे अमेरिकेत बोलणं चाललंय हे खरंच वाटेना. दुष्काळी जिल्ह्यातला एखादा खेडूत किंवा दलित शेतमजूर बोलतोय असंच वाटू लागलं.

पठारावरून दिसणारा परिसर मात्र फारच रम्य होता. हिरवी खुरटी झुडपं असली तरी त्याने सगळ्या परिसराला गच्च हिरवा रंग आलेला होता. मैलोन्मैल पसरलेल्या डोंगरांच्या रांगा. लांब दिसणाऱ्या सगळ्यात उंच शिखरावर बर्फ पडलेलं.

गाडी त्याच रस्त्याने खाली आली. येताना गाईडला गोष्टी सांग म्हणणाऱ्यांचा उत्साह ओसरलेला होता. गाडी हायवेला लागल्यावर सांटाक्लारा गाव आलं. एक वळण घेऊन एका वस्तीत गाडी येऊन थांबली. गाईड म्हणाला, "तुम्हाला आता एक इंडियन वस्ती दाखवतो."

बरीचशी साधी, थोडी मोडकळीला आलेली अदोबी पद्धतीची घरं होती. बरीच कुत्री भुंकत आली. गाईडने त्यांना चुचकारल्यावर ती शांत झाली. अशी सुटी, भुंकणारी कुत्री अमेरिकेत आल्यापासून प्रथमच पाहत होतो. अधूनमधून तुरळक झाडं होती. त्याखाली मोडकी घोडा-गाडी, सटर फटर सामान पडलेलं होतं. प्रत्येकाच्या घरामागे तीन-चार फूट उंचीच्या, महादेवाच्या पिंडीच्या आकाराचा आतून पोकळ असलेला ओव्हन होता. आत जाळ पेटवायचा आणि बाहेरून भाकऱ्या थापायच्या, असं गाईड इतरांना समजावून देत होता.

वस्तीत कुठं माणसं फिरताना, वावरताना दिसली नाहीत, म्हणून गाईडला विचारलं, "माणसं कुठं कामावर गेली आहेत का ?"

तो म्हणाला, "नाही, नाही. इथं कुणी राहत नाहीत. हा सगळा हॉलिवूड सेट आहे. टूरिस्ट लोकांना दाखवायला." शेपट्या हलवणाऱ्या चार-पाच कुत्र्यांकडे बोट दाखवून हसून म्हणाला, "हे फक्त इथं राहतात."

परत गाडीत बसून आम्ही गाईडच्या, सकाळी प्रथम आलो त्या घरी आलो. गाईडच्या भावाने हसून स्वागत केलं. "आय होप यू मस्ट हॅव एन्जॉइड युअर टूर, नाऊ युवर लंच इज रेडी" असं एखाद्या हॉटेल मॅनेजरच्या थाटात म्हटलं. त्या छोट्या घरात पुढं हॉल, आत रेस्ट रूम्स, एक सामानाची खोली अशा खोल्या होत्या. हॉलमधे तीन टेबलांवर जेवण मांडलेलं होतं. गाईडने आपल्या कुटुंबाची ओळख करून दिली. त्याच्या म्हाताऱ्या आजोबांची, आजीची ओळख करून दिल्यावर मला त्यांना पाहून आश्चर्यच वाटलं.

पँट, शर्ट घातलेले, कुठल्याही अल्पसंख्याक अमेरिकनांसारखं दिसणारे, व्यवस्थित भांगपट्टी केलेले आजोबा. ह्या गृहस्थांनी मघा गाईड सांगत होता त्या पुरातन इंडियन संस्कृतीचा ठेवा गोष्टींमार्फत या तरुण मुलापर्यंत आणून पोहोचवला हे खरंच वाटेना. गाईडचा भाऊ म्हणाला, "या तिन्ही टेबलांवर आमच्यापैकी एकेक जण तुमच्याबरोबर जेवायला बसेल. तुम्ही त्यांच्याशी बोलू शकता, माहिती घेऊ शकता" आमच्या टेबलावर आजी होती. ती, "येस ? व्हेअरार यू फ्रॉम ? गूड. व्हॉट डू यू डू देअर ? ओ, वंडरफूल..." असं अगदी अमेरिकन गुळगुळीत सभ्यतेने अगदी तसाच भिजलेला ओब्लायजिंग चेहरा करून बोलत होती.

जेवणही बरंचसं कॉस्मॉपॉलिटन होतं. मक्याचे मेक्सिकन पदार्थ होते, तसेच इटालियन सॅलड्स् होती, अमेरिकन नीरस सँडविचेसही होतीच. जेवल्यावर गाईडचा भाऊ म्हणाला, "आता माझी बायको तुम्हाला इथली सुप्रसिद्ध पॉटरी कशी करतात ते दाखवेल." त्याची बायको कुठलीही गोव्यातली ख्रिश्चन तरुण बाई दिसेल अशी होती. ती तयारच होती. टेबलावरचं साहित्य घेऊन ही माती त्यात मिसळायची, त्यात अमूक घालायचं, असं काय काय सांगत होती. कुणाला काही फारसं कळत नव्हतं. मी झोपाळलो होतो.

शेजारच्या स्लॅवेंकाने गाईडजवळ इथं कुठं चरस किंवा गांजा मिळेल का विचारलं होतं. तिच्याकडे पाहून भावांच्या कानगोष्टी चाललेल्या पाहून मी ओळखलं की तीही व्यवस्था करायच्या ते प्रयत्नात आहेत.

बाईचं डेमॉन्स्ट्रेशन झाल्यावर तिनं जाहीर केलं की, "बाजूच्या कपाटात, टेबलावर मांडून ठेवलेल्या पॉटरीतील वस्तू आपण विकत घेऊ शकता." आम्ही किमती पाहून थक्क झालो. शंभर डॉलर पुढच्याच. कुणीही त्याकडे फारसं लक्ष दिलं नाही. संध्याकाळ होऊ लागली होती. आम्ही परत बसमध्ये चढलो. मला त्या कुटुंबाचा आवर्जून निरोपही घ्यावासा वाटला नाही. ज्यांनी यांच्या पूर्वजांना निर्घृणपणे निपटून काढले, त्यांच्या पुढच्या पिढ्यांना हे इंडियन्स आपल्या गत-संस्कृतीच्या खुणा दाखवताहेत, गोष्टी सांगताहेत आणि त्यावर आपलं पोट भरताहेत, याहून काळाच्या ओघात घडलेली विचित्र उलटापालट कुठली असणार ?

हॉटेलवर परत आलो. सांता-फे विषयी अनेक पॅम्पलेट्स् बेडवर पडलेली होती. न्यू मेक्सिको या राज्याविषयी म्हटलं होतं, 'इथं फारसे कारखाने नाहीत. खनिजं नाहीत. या प्रांताचं मुख्य उत्पन्न म्हणजे टुरिझममधून येणारं आणि केंद्र सरकारकडून मिळणारी मदत.' मला धक्काच बसला. नुसतं त्या गाईडचं कुटुंबच नाही, तर तो सर्व प्रांतच टुरिझमवर जगत होता.

o

★★★★★

# भारतीय

अमेरिकेत रस्त्यानं फिरताना एखादा भारतीय माणूस दिसला की, खूप बरं वाटायचं. तिकडे उंच, सोनेरी केसांची, गोरी माणसं बहुसंख्य. त्याच प्रकारातले विविध तऱ्हेचे चेहरे दिसायचे. दुसरे म्हणजे ब्लॅक्स... कुरळे केस, काळा रंग, जाड ओठ.. वगैरे. भारतीय वंशाच्या माणसाचे केस काळे आणि सरळ. रंग काळा किंवा निमगोरा असला तरी आफ्रिकन वंशासारखी चेहऱ्याची ठेवण नाही. इथं भारतात तऱ्हेतऱ्हेची माणसं, चेहरे पाहतो, पण तिथं गेल्यावर या असंख्य तऱ्हांमधलं समान काय, ते जाणवलं. पण असा माणूस जवळ आला की काहीतरी बोलू असं म्हणतोय तोच तो आपल्याला टाळून निघून गेलेला असायचा. माझ्या सगळ्या मुक्कामात बहुसंख्य वेळा हेच घडलं. तिथल्या एका मराठी मित्राला याचं कारण विचारलं. तो म्हणाला, "बहुदा त्यांना भीती वाटत असणार, भारतीय आहे तेव्हा डॉलर बिलर मागायचा!" दुसरा एक मित्र सांगत होता, "इकडे मी आलो तेव्हा आधीचा ओळखीचा कुणी भेटला की त्याचा 'हा इकडं कशाला आला?' असा चेहरा व्हायचा."

तिकडे जाणं पूर्वी खूप दुर्मिळ होतं. आनंदीबाई जोशी डॉक्टर व्हायला गेल्या तो आणि आताचा काळ यात खूप फरक पडलाय. एवढंच काय, माझ्या लहानपणीही 'सकाळ'मधे 'अमूक अमूक व्यक्ती उच्च शिक्षणासाठी अमुक देशास रवाना' असं शीर्षक आणि त्याखाली जाणाऱ्याचं छोटं, आत्मसंतुष्ट मुंडकं छापलेलं असायचं. आता तर अशी मुंडकी छापायची म्हटली तर 'सकाळ'ची बारा पानंही पुरणार नाहीत.

तिकडं जाणारांचा उत्साह आणि रेटा मला मुंबईत अमेरिकन काऊन्सुलेटमधे व्हिसा काढायला गेलो तेव्हाच जाणवला. पहाटे चार-पाचपासून त्या फाटकापासून लाईन सुरू व्हायची. रस्त्यावर, फूटपाथवर ही भली शिकलेली, उत्तम कपड्यांतली माणसं, प्रथम उभी व नंतर सरळ रस्त्यावर बैठक ठोकून बसलेली. सकाळी आठ की नऊला जेव्हा ते फाटक उघडलं गेलं तेव्हा दारावरच्या शिपायाने सांगितलं, "हातातले कागद तेवढे चालतील, बाकी सामान बाहेर." बाहेर सामान ठेवायला जागा कुठं होती? लोकांनी अक्षरशः उत्तमोत्तम ब्रीफकेसेस, बॅगा, पर्सेसचा बेवारशी ढीग केला आणि गडबडीत आत घुसले. आत

इंग्लिशमधे सूचनाफलक होते, तसेच गुजराथीत. हिंदी किंवा मराठी नव्हते. याचं कारण लगेचच कळलं, अनाउन्समेंट झाली– पटेल, शहा आणि मेहता या आडनावाच्या लोकांनी खिडकी नं. ४ वर लाइन धरावी. जमलेल्या गर्दीतले तीन चतुर्थांश लोक तिकडे धावले. दिवसभर इंटरव्ह्यू झाल्यावर संध्याकाळी चार वाजता व्हिसा मिळण्याचा निकाल जाहीर होणार होता. एकेक नाव जाहीर व्हायचे. तो माणूस खिडकीकडे जायचा, पासपोर्ट बघत परत यायचा. व्हिसा मिळालाय की नाकारलाय हे त्याच्या चेहऱ्यावरून समजायचं. पटेल-शहा मंडळींपैकी काही जण तर व्हिसा मिळाल्यावर पासपोर्ट वर धरून ओरडत परत यायचे. त्यांचे मित्रमंडळी टाळ्या वाजवायचे, हारतुरे घालायचे, क्वचित कुस्ती जिंकल्यासारखे उचलायचे देखील.

अमेरिकेत आयोवा विद्यापीठाने दिलेल्या स्वागताच्या पार्टीत एक उंच, अमेरिकन माणूस माझ्याजवळ आला आणि म्हणाला, "भारतातून आलात का ?" मी हो म्हणताच तो म्हणाला, "सगळ्या जगात भारतातले लोक जास्त हुशार आहेत, असं माझं मत आहे."

मी आश्चर्याने विचारलं, "कशावरून तुमचं मत झालं ?"

तो म्हणाला, "मी फॉरेन सर्व्हिसमधे होतो. इमिग्रेशनसाठी तुम्ही लोक काय काय क्लृप्त्या लढवता, तेवढ्या जगात कुणी लढवत नाहीत. तुमच्या पटेल लोकांनी आम्हाला इमिग्रेशनचे अनेक नियम बदलायला लावले आहेत."

मला अगदी कुणीतरी उचलून आपटल्यासारखं वाटलं. तिकडं गेल्यावर कळलं की ही मंडळी तिकडे जाण्यासाठी काहीही करतात. इकडे अनेक वर्षं संसार केलेले लोक कागदोपत्री घटस्फोट घेऊन तिकडे जातात. तिथल्या अमेरिकन धंदेवाईक बाईशी लग्न करून ग्रीन कार्ड मिळवतात. परत घटस्फोट देतात, सुटीत इकडे येऊन मूळ बायकोशी लग्न लावून तिकडे नेतात. दिव्याने दिवा लावावा तसं माणसाने माणूस आणून तिकडे भरपूर प्रजा तयार झालेली आहे. कायद्याच्या पळवाटा शोधून देणारा एक सिंधी वकील त्यांच्यात खूप प्रसिद्ध आहे.

मी डेट्राईटला मैत्रिणीकडे गेलो असताना तिच्याबरोबर गुजराथी कुटुंबात गेलो. तीन-चार तरुण मुलं, आईबाप असं कुटुंब. अति नम्रतेने या मैत्रिणीशी वागत होते. परत आल्यावर तिनं सांगितलं, "मला एक मैत्रीण म्हणाली, 'एक गुजराथी गरजू बाई आहे. तिला काम पाहिजे' माझी मुलं लहान होती म्हणून मी तिला ठेवलं. तिला इंग्लिश काय, हिंदीही येत नव्हतं. गुजराथी मातृभाषा, पण वाचता येत नव्हतं. इथं कशी पोहोचली देव जाणे. माझ्याकडे राहिली. अगदी कष्टाळू. मग तिने बाहेर खोली घेतली. नवऱ्याला आणलं. मुलांना एकेक करून आणलं. अतिशय सभ्य व कष्टाळू मुलं आहेत. पण नवरा बघितलास ना, तो बसून खातो."

पटेल मंडळींची प्रसिद्धी मोटेल्स किंवा स्वस्त दराच्या हॉटेल्सबद्दल. सान्फ्रान्सिस्कोचा मित्र सांगत होता, "इथे या पटेल किंवा भारतीय मंडळींची हॉटेल्स आहेत. त्यांत इथल्या

इतर हॉटेलच्या मानाने इतकी घाण असते. संडास, बाथरूम्स स्वच्छ नसतात. बेडशीट्स रोज बदलत नसल्याने मळके असतात. त्याविषयी इथल्या पेपर्समध्ये फोटो, बातम्या छापून आल्या होत्या. इथल्या वेल्फेअरवर राहणाऱ्या गरीब लोकांना तेच परवडतं. म्हणून प्रेसमध्ये आरडाओरड जरी झाली तरी दुसरा पर्याय नाही म्हणून तेच चालूच राहतं." माझा गुजराथी डॉक्टर मित्र कॅलिफोर्नियात राहतो. तो म्हणाला, "आमचे हे पटेल लोक इथं येतात. आधीच्या पटेलच्या मोटेलवर मॅनेजर म्हणून राहतात. भांडवल जमवतात. एखादं मोटेल चालवायला घेतात. इतर अमेरिकन मोटेलवाल्यांपेक्षा यांचा खर्च बराच कमी. त्यातल्याच छोट्या खोलीत त्यांचं कुटुंब राहतं. बायको मोटेल झाडण्यापासून संडास साफ करण्यापर्यंत सगळी कामं करते. अमेरिकन मोटेल मालक हा सहसा गुन्ह्याच्या फंदात पडत नाही. पण या मंडळींना कशाचं वावडं नाही. यांच्या मोटेलमधे वेश्याही येऊ शकतात, ड्रग्जही मिळू शकतात. त्यातनं भानगडी होतात. काही पटेलांना शिक्षाही झाल्यात, पण त्याचेही त्यांना फारसे काही वाटत नाही."

या गुजराथी मंडळींमधे युगांडातून आलेल्या लोकांचा भरणा जास्त. आणि असे विधीनिषेधशून्य धंदे करणारेही ते अधिक. पण त्यामुळे एकूणच 'इंडियन' मंडळींविषयी तिथलं लोकमत प्रतिकूल असतं. 'न्यूजर्सी' राज्यात 'डॉट बस्टर्स' नावाच्या गँग निघाल्या होत्या. (डॉट म्हणजे कुंकू. ते भारतीयत्वाचे चिन्ह) भारतीय दुकानांवर हल्ले, त्यांची जाळपोळ, भारतीय माणसांवर हल्ले असे बरेच प्रकार तिथं घडल्यामुळे डॉटबर्स्टर्सकडे सर्वांचं लक्ष वेधलं गेलं होतं. त्याविषयी तिथल्या विद्यापीठातल्या समाजशास्त्रज्ञ बाईने अभ्यास करून लिहिलं होतं की, 'भारतातून अलीकडच्या काळात मजुरी करून जगणारा वर्ग मोठ्या प्रमाणात आला. त्याआधी असलेल्या पोर्टोरिकन्स व मेक्सिकन मजुरांचे काम कमी झाल्यानं त्यांच्या मनात असंतोष निर्माण होऊन ही प्रतिक्रिया उमटली.' कोणत्याही पहिल्या पिढीच्या स्थलांतरितांना यातून जावंच लागतं, अशी त्यांनी टीपही जोडली होती.

मराठी माणसं जी तिकडं गेलीत ती धंदेवाईकही नाहीत किंवा मजूरही नाहीत. बहुतेकजण मध्यम किंवा उच्च मध्यम वर्गातली डॉक्टर्स, इंजिनियर्स, आर्किटेक्ट्स्, प्रोफेसर्स, सायंटिस्ट्स् किंवा ऑफिसमधे काम करणारी नोकरदार मंडळी आहेत. परवाच एक समर्पक म्हण ऐकली. एका खेडुत माणसाला 'मुलांना तू का शिकवत नाहीस ?' असे विचारता तो म्हणाला, "क्या है आज की शिक्षा ? थोडा पढा-काम छोडा, जादा पढा-गाँव छोडा, बहुत जादा पढा-देश छोडा." असं बहुत जादा पढे हुए मंडळींचा भरणा मराठी लोकांमध्ये जास्त आहे. मी एका मित्राकडे गेलो असता त्याच्या इंजिनियरिंग कॉलेजच्या बॅचचं तिथं गॅदरिंग होतं. त्यांनी सांगितलं आमच्या शंभराच्या बॅचमधले जवळजवळ साठ जण इथे आहेत. बाकीच्या देशांमधे असतील ते वेगळेच.

आयोवा विद्यापीठात शिकत असलेले भारतीय विद्यार्थी भेटायचे. शाम व उमा आसोलेकर आणि संजय-कल्पना जोशी हेही तिथं पीएच.डी. किंवा तत्सम कोर्सचे विद्यार्थी. या चौघांचंही शिक्षण झाल्यावर परत यायचं ठरलं आहे. शाम म्हणाला, "पण मी पाहतो त्या

इथं आलेल्या भारतीय विद्यार्थ्यांपैकी नव्याण्णव टक्के मुलं परत जात नाहीत, काहीही करून इथं राहतात. आम्ही परत जायचं म्हणतो त्यावर ते म्हणतात, "रखा क्या है उधर?" काय बोलणार आपण? आम्ही आता वादच घालत नाही."

इथल्या बऱ्याच घरांमध्ये 'तिकडे' सेटल होण्याचं ध्येय लहानपणापासूनच बिंबवलं जातं. त्या घरातली मुलं दहावी-बारावीच्या सुमारास तिकडे कॉलेजप्रवेश, शिष्यवृत्त्या यासाठी अर्ज करू लागतात. एक मुलगा तिकडे पोहोचला की इकडे दोर टाकून एकेक भावाला तो उचलून घेतो. अशा रीतीने सगळेच त्या स्वर्गात पोहोचतात.

त्या अर्थाने ते खरोखरच स्वर्गात असतात. माझ्या डॉक्टर मित्रांची तिकडे स्वतःची भरपूर मोठी घरं आहेत. त्या घरात सोफासेट्स्, गालिचे, पडदे, शोकेसेस, क्रॉकरी, तळघरात बार, टेबलटेनिस टेबल, घरामागे मोठी लॉन, बियरचे घुटके घेत निवांत बसायला लाकडी प्लॅटफॉर्म ऊर्फ 'डेक'. काहींच्या बागेत स्विमिंग पूल, बाहेर बास्केटबॉलची कडी व बास्केट, मुलांच्या स्वतंत्र खोल्या, त्यांत खेळण्यांचा खच, टेबलावर कॉम्प्युटर, बाथरूमच्या बाहेर वॉशिंग मशीन, मुलांना स्वतंत्र टी.व्ही. अनेक तऱ्हेच्या खाद्यपदार्थांनी भरलेला फ्रीज, कुकिंग रेंज, मायक्रोवेव्ह..

माझ्या एका डॉक्टर मित्राचं तर स्वतःचं हेलिकॉप्टर आहे. (पण प्रॅक्टिसच्या अतिश्रमामुळे मानसिक तोल ढळून त्याने नुकतीच आत्महत्या केली.) आज हे वैभव इथल्या एखाद्या उद्योगपतीजवळ देखील नसेल, पण तिथल्या साध्या डॉक्टर किंवा इंजिनियरपाशी आहे. हे भारतात राहिले असते तर यातलं दहा टक्केसुद्धा यांना मिळालं नसतं. तिथं राहणाऱ्या बऱ्याच मराठी लोकांना वाटतं, हे वैभव आपल्या देशातल्या आपल्या नातेवाईक, मित्रमंडळींनी बघावं, त्याचं कौतुक करावं. 'तू वेळीच इकडे आलास आणि कसा शहाणा ठरलास' असं म्हणावं. पण इतक्या लांब येणारे अगदी थोडे. आणि जे ओळखी काढून येतात ते बळं चिकटणारे, म्हणून नकोसे.

तिकडे गेले, तिथली संस्कृती आत्मसात केली आणि तिथल्या प्रवाहात मिसळून गेले, असंही बहुतेकांचं होत नाही. वरकरणी अमेरिकन, पण आतून द्विधा मनःस्थिती, अशा भोवऱ्यात बहुतेक मराठी कुटुंबं असतात. मी गेल्यावर इकडल्या आठवणी निघायच्या आणि मित्र व्याकूळ व्हायचे. मी जाताना एक किलो चितळेंची आंबा बर्फी नेली होती. कस्टमच्या कचाट्यातून नेता येईल की नाही याची शाश्वती नव्हती, पण सुटली. बहिणीने तिच्या मैत्रिणींना, मित्रांना फोन करून 'भाऊ आलाय, चितळेंची बर्फी आणलीय,' असं सांगितलं. पंधरा, वीस, चाळीस मैलांवरून तिच्या मैत्रिणी ड्राइव्ह करीत आल्या. बहीण त्यांच्या पुढे बशीत बर्फीच्या तुकड्याचा सुरीने केलेला अर्धा तुकडा ठेवायची. तो खाता खाता तिकडच्या हळव्या गप्पा निघायच्या. मग, 'शनिपाराच्या तिथला भजीवाला असतो का हो अजून?' किंवा 'कोरडी भेळ आंबिलओढ्याच्या कोपऱ्यावरच्या भडभुंज्याकडे छान मिळायची, मिळते का तशी?' असे प्रश्न विचारायचे. अमेरिकेत मी मराठी मित्रांकडे

उतरायचो. ते इकडल्या पद्धतीचं जेवण करायचा आटोकाट प्रयत्न करायचे. जेवताना सांगायचे, "इथल्या इंडियन स्टोअरमध्ये सगळं मिळतं बरं का आपल सामान." प्रमुख शहरांमध्ये इंडियन स्टोअर असायचं. आयोवाच्या आसपास कुठेच असं स्टोअर नव्हतं. या भागातील मराठी कुटुंबं महिन्या-दोन महिन्यांनी कारने दोनेकशे मैलावरच्या शिकागोला जाऊन डिकी भरून 'आपलं' सामान आणायची, पण तरीही अमेरिकेतल्या तेलात, दह्यात, मिठात, साखरेत... प्रत्येक बाबतीत चवीत थोडा थोडा फरक असल्याने पदार्थ वेगळ्याच चवीवर जायचा. मी येताना इंग्लंडमधे तारा वनारस्यांकडे थांबलो. त्यांना मी हौसेने मला येत असलेला 'भिशीबेळी अन्ना' हा भाताचा प्रकार करून दाखवायला गेलो. चिंचेचा कोळ तिथं आयताच मिळतो. तो इतका कॉन्सेन्ट्रेटेड होता की दोन चमचे घातला आणि सगळा भात अतिआंबट आणि जवळपास काळा होऊन गेला. त्यांचा इंग्लिश नवरा बेन हा इतका सभ्य की त्याने शेवटपर्यंत खाल्ला.

१ त्यांना इकडच्या लोकांची आठवण होते, याचा फायदा घेऊन इकडची लेखक, कलावंत मंडळी त्यांच्या नोस्टालजियाच्या लाटेवर स्वार होऊन तिकडे फेऱ्या मारू लागली आहेत. कुणी कथाकथन करतं, कुणी कवितावाचन, कुणी भावगीत गायन तर कुणी नाट्यगीतांच्या मैफिली. मी वाघ्यामुरळी पुस्तक लिहिलं तेव्हा बहीण म्हणाली, "एक वाघ्या की गोंधळी इकडे कॅनडात पोहोचला होता. तो जागरण गोंधळ करायचे शंभर-दोनशे डॉलर्स घ्यायचा. तो विधी पाहायला आपले लोक जायचे. त्यांच्याकडून होस्ट पाच-पाच डॉलर्स फी घ्यायचे. चांगला गब्बर होऊन परत गेला. कारण इकडे आलेल्या लोकांच्या घरची इथं आल्यावर लग्नकार्यं, बारशी बरीच झाली होती. प्रत्येक शुभ कार्यानंतर जागरण गोंधळ झालेला नव्हता. तो बॅकलॉग लोकांनी उरकून घेतला."

सुरुवाती सुरुवातीला असं जाणाऱ्यांची संख्या कमी होती, तेव्हा अगत्याने तिथले लोक या लेखक, कलावंतांची ऊठबस करायचे. पण आता हे नित्याचंच झालं. तिथला मित्र सांगत होता, "अमके लेखक आले. म्हणाले, 'माझं कथाकथन ठेवा.' इथं कार्यक्रम ठेवायचा म्हणजे कुठं ? तर एखाद्याच्या बंगल्याच्या बेसमेंटमध्ये. तिथं पाच-पंचवीस, जास्तीत जास्त पन्नास माणसं बसणार. अशा कार्यक्रमाला फोनाफोनी करून पंचवीस-तीस माणसं आली तरी खूप झालं. कारण एकटा रविवारच मोकळा असतो. त्या दिवशी प्रत्येकालाच घरची कामं असतात. लेखकांना वाटतं भरपूर मानधन मिळावं. पण आलेला माणूस त्याची पोरं बेबीसीटरकडे तासाला दहा डॉलर भावाने ठेवून आलेला असतो. तीस-चाळीस मैलांवरनं पेट्रोल जाळीत आलेला असतो. तो किती तिकीट देऊ शकतो. जास्तीत जास्त पाच डॉलर. हा सगळा खर्च वजा जाता किती उरणार? एक कविवर्य आले होते, ते डोळ्यांनी माणसं मोजीत होते आणि मनातल्या मनात हिशोब करत होते. म्हणजे मी काय यातनं पैसे काढतोय का, ते बघत होते. कार्यक्रमानंतर लोकांना चक्क सांगायचे, "मी आता इथून अमक्या शहरात अमक्या तारखेला जातोय, तुमच्या तिथल्या मित्रांना कळवा की, या काव्यवाचनाला

आपण जा म्हणून." अलीकडे सारखेच कार्यक्रम होऊ लागल्याने लोक अगदी कंटाळून गेले आहेत.

दुसरा वर्ग म्हणजे निधी मागायला जाणारांचा. एकेक शहर बेचिराख करीत जशा मराठ्यांच्या फौजा भारतभर उधळत होत्या, तशा काही संघटना, संस्था, चळवळींचे लोक शहरं काबीज करीत मी तिथं असताना फिरत होते. इथं असताना ज्या कामाचं नावही ऐकलं नव्हतं तिथं त्यांचा भरपूर दबदबा निर्माण झालेला. आमच्या ओतूरची पुढारी मंडळी पुण्याला येऊन तिथल्या देवळाच्या जीर्णोद्धारासाठी किंवा शाळांचे वर्ग बांधण्यासाठी पैसे जमवायला येतात त्याची आठवण झाली. कामं चांगली असतात पण या पैशाचा सदुपयोग होणार की दुरुपयोग याची खात्री नसल्याने बहुतेक जण अनिच्छेने अशा मीटिंगला जमतात. मग पुढारी म्हणतात, "गावानं तुम्हाला मोठं केलं. तुम्ही गावासाठी काय करता?" या प्रश्नावर अर्थातच आम्ही डिफेन्सिव्हवर जातो.

तिथल्या मुक्कामात मला तिथले काही मराठी लोक विचारायचे, "तुम्ही कुठल्या संस्थेसाठी मदत गोळा करताय?" मला अगदी लाजल्यासारखं व्हायचं. 'मी सहज आलोय', असं सांगून पटायचं नाही.

या स्थलांतरितांना इकडं येऊन किती वर्षं झाली आहेत, त्याप्रमाणे यांच्या नोस्टाल्जियाची तीव्रता कमी-अधिक असायची. साठ सालच्या सुमारास तिकडे जाण्याचा ओघ सुरू झाला, मग व्हिएटनाम युद्धाच्या काळात मंदावला, मग परत जोमाने सुरू झाला. पहिल्या पिढीच्या स्थलांतरितांचे प्रश्न नेहमीच खूप बिकट असतात.

मी तिथं अशा एका इटालियन स्थलांतरित कुटुंबावरची शॉर्ट फिल्म पाहिली होती. एक माणूस इटलीतून न्यूयॉर्कला येतो. भाषा माहीत नसते. काम नाही, ओळखी नाहीत. कसाईखान्यात कामाला लागतो. कुटुंबातल्या एकेकाला आणतो. म्हातारीला इथं अजिबात सुख लाभत नाही. तिकडच्या आठवणीनं झुरत झुरत मरते. पण दुसरी पिढी तिथंच वाढते. भाषेचा प्रश्न राहत नाही आणि ते कुटुंब अमेरिकेन होते, असा थोडक्यात त्या फिल्मचा विषय होता. पण तरीही मला वाटतं युरोपातल्या कुटुंबांना अमेरिकेत मिसळून जाणं बरंच सोपं जात असणार. भारतीय माणसाची संस्कृती, धर्म, भाषा सगळंच तिथल्यापेक्षा खूपच वेगळं. पण मला नेहमी कोडं वाटायचं ते चिनी लोकांबद्दल. हे चिनी लोक आपल्यासारखेच अशियायी. ते कसे इथं राहून परत वेगळे राहिले? शहराशहरात त्यांची चायना टाऊन्स दिसतात. तिथं चिनी पद्धतीच्या वेशी, त्या भागातली हॉटेल्स, दुकानं यावरच्या पाट्याही त्या भाषेत. त्या भागात भटकायला गेलो तर वेगळ्याच देशात आलोय असं वाटायचं. कॅनडात टोरांटोमधे मी आर्ट गॅलरीत चित्रं बघत असता एकदम झांजा-ढोलाचा मोठ्ठा आवाज ऐकू आला. तिकडे एरवी इतकी शांतता की या आवाजाचा धक्काच बसावा. बाहेर येऊन पाहतो तो चिनी लोकांच्या प्रचंड आकाराच्या ड्रॅगनची मिरवणूक चाललेली. मी याविषयी अनेकांना विचारायचो, कुणी म्हणालं, "हे चिनी लोकच असे असतात. जगाच्या पाठीवर

कुठेही जा, ते बघता बघता निर्धास्तपणे आपलं चायना टाऊन निर्माण करतील." एक म्हणाला, "अमेरिकेत पॅसिफिक महासागरातून जपान, चीनकडून, खूप पूर्वीपासून लोक स्थलांतरित होत आहेत. आपल्यासारखे ते नवे नाहीत."

आपली मराठी कुटुंबं बहुतेक मध्यमवर्गीय असल्यामुळे ही द्विधा स्थिती जरा जास्त प्रमाणात असेल. त्यातून त्यांच्या भारतातल्या लहानपणाविषयी ते अधिकच हळवे होतात. तिथल्या अशा कुटुंबात जन्मलेली मुलं मला ठिकठिकाणी भेटली. ती म्हणायची, "आमचे पालक त्यांचं लहानपण आमच्यावर लादत असतात. आम्हाला त्यांच्याविषयी आदर आहे पण आम्हाला आमचं लहानपण जगू द्या की." बरेच जण सुट्टीत मुलांना इकडे घेऊन येतात. यांच्या नातेवाईकांच्या, मित्रांच्या या मुलांना ओळखी व्हाव्यात म्हणून त्यांना ठिकठिकाणी घेऊन जातात. बहुतेक मुलांना हे सगळं बोअर होत असतं. लहानपणी ते सहन करतात पण मोठं झाल्यावर ते स्पष्ट बोलू लागतात. 'सुट्टीत मी भारतात येणार नाही, माझा प्लॅन वेगळा आहे. तुम्हाला जायचं असल्यास अवश्य जाऊन या,' सांगतात. एक डॉक्टर मित्र सांगत होते, "माझं मराठवाड्यात गाव आहे. तिथं शेतावरच घर आहे. माझ्या मुलांना तिथं जायला मात्र आवडतं. ती म्हणतात, 'आम्ही येऊ ते एका अटीवर. मुंबईला किंवा पुण्याला न थांबता डायरेक्ट गावी जायचं."

मी आश्चर्यानं विचारलं, "पण पुण्या-मुंबईत त्यांना ॲडजस्ट व्हायला खेडेगावापेक्षा कमी वेळ लागत असेल." "त्यांना पुण्या-मुंबईतले आवाज नकोसे वाटतात. वातावरण फार गॉडी वाटतं. त्यापेक्षा खेड्यातल्या गैरसोयी त्यांना परवडतात."

एक मित्र सांगत होते, "सुट्टीवर मुलांना घेऊन गेलो, तर मुलांनी अर्धी सुट्टी सोडून आम्हाला परत यायला लावलं. त्यांचं तिकडे काही जमेचना. मग पुढच्या सुट्टीपासून प्रॉब्लेमच झाला. मुलांजवळ तिकडे कुणीतरी राहायला हवं म्हणून आम्हा दोघांना इकडे एकत्र येताच येत नाही. मुलांनी आम्हाला साफ सांगितलंय की आम्ही तिकडे येणार नाही." एकूणच या लोकांची इकडे येण्याची सुटी हा चमत्कारिक अनुभव असतो. या सुटीची ते अगदी वाट पहा पहा पाहतात. त्यासाठी रजा मिळावी म्हणून आधी मरमर काम करायचं. मग इकडल्या लोकांसाठी वस्तू खरेदीपर्व, मग पॅकिंगपर्व. प्रत्यक्ष इकडे आल्यावर ती सुटी पुरत नाही. नातेवाईक, मित्रांकडून होणारी आमंत्रणांची ओढाओढी, पोटावर अत्याचार, आणलेल्या भेटींवरून होणारे रुसवेफुगवे, तिकडे जाऊ इच्छिणाऱ्या मुलांच्या पालकांचे लाचार चिकटणे... इत्यादी. सासर, माहेर वेगवेगळ्या शहरात असल्यावर इकडे काही दिवस, तिकडे काही दिवस घालवायचे. महिनाभर सुट्टी असेल तर भाग्यवान. त्यापेक्षा कमीच रजा बहुधा मिळणार. मग सगळ्यात प्रेमाच्या माणसाशीच बोलायला निवांतपणा मिळालेला नसतो. जे काही बोलणं होतं ते स्टेशनवर पोचवायला गेल्यावर. एक माणूस खिडकीत आणि एक खाली अशा अवस्थेत जसं जुजबी बोलणं होत असतं तसं, म्हणजे 'नीट रहा, काळजी घे, इकडची काळजी करू नकोस...' या प्रकारचं. कित्येकदा घरातील

कटुताही या सुट्टीत बाहेर पडते. इथे राहणाऱ्याला काही सांगायला गेलं तर 'तू तिकडे गेलास, इकडं आम्हाला सगळं फेस करावं लागतं. तुला आमचे प्रश्न काय माहीत आहेत?' असं ऐकावं लागतं. असं काय काय डोक्यात घेऊन विमानात बसलं की मग अमेरिकेतल्या काळज्या ढगासारख्या डोक्याभोवती जमू लागतात.

तिथं राहणाऱ्या कुटुंबात तिकडे जन्मलेल्या मुलांचे वेगळेच प्रश्न आहेत, हे अलीकडे तिकडल्या लोकांना जाणवू लागलं आहे. तिथं दर दोन वर्षांनी मराठी लोकांचं संमेलन भरलं. त्यात अजिता काळेने पुढाकार घेऊन तिथल्या मुलांच्या प्रश्नावर त्यांनीच बोलावं असा एक कार्यक्रम ठेवला होता. त्यात बरीच मुलंमुली बोलली. बहुतेकांचा सूर असा, "पालक त्यांची संस्कृती, त्यांचं लहानपण आमच्यावर लादतात. आम्ही इथं जन्मलो. या समाजात वाढलो. आमची मतं वेगळी असणार. आमचे इथले मित्रमैत्रिणी तरुण वयात डेट्स् घ्यायला लागतात. आमचे पालक आमच्यावर विश्वास का ठेवत नाहीत? डेट म्हणजे अगदी थेट शरीरसंबंध... असं नसतं. एकमेकांना आवडत गेल्यावर एकेका पायरीने ते नातं पुढं जात असतं."

तिथं भेटलेल्या एका गृहस्थांनी त्यांच्या मंडळातर्फे बसवलेल्या त्यांच्या मुलांच्या नाटकाची कॅसेट दाखवली. नाटक होतं, संगीत शारदा. नऊवारी साड्या घातलेल्या मुली, तिकडल्या 'र'च्या वेगळ्या उच्चारात 'म्हातारा इतका न अवघे पाऊणशे वयमान' हे गाणं म्हणताना पाहिलं तेव्हा ते सगळंच केविलवाणं वाटलं. ही नाटकाची निवड कशी काय केली असेल यांनी? आज महाराष्ट्रातल्या पिढीतसुद्धा हा विषय जुना व अप्रस्तुत वाटेल असा आहे. त्यापेक्षा त्या मुलांना त्यांचे प्रश्न किंवा जीवन येईल असं नाटक किंवा प्रहसन स्वत: लिहून बसवायचे प्रोत्साहन मिळालं असतं, तर अधिक समरस होऊन उत्साहानं त्यांनी ते केलं नसतं का? अमेरिकेतलं वाईट आपल्या मुलांच्या नजरेस पडू नये म्हणून एक पालक सकाळी उठून वर्तमानपत्रातल्या बातम्या कापत असल्याचे ऐकले. हे सांगणारा मित्र म्हणाला, "त्यांच्या घरचा पेपर म्हणजे चाळणीच झालेली असते" यांनी बातम्या कापल्या तर मुलांना ते कळायचं राहतं का? जगातल्या सगळ्यात मुक्त देशात आपल्या घरापुरती सेन्सॉरशिप ठेवणाऱ्या त्या गृहस्थांचं कौतुक वाटलं. (हे सुरुवातीला मला खरंच वाटत नव्हतं. पण ते गृहस्थ त्या भागात त्या वृत्तीसाठी अनेकांना माहीत असल्यानं पुष्टी मिळाली.)

तिकडे जाणाऱ्या मंडळींच्या आईवडिलांचे इथले प्रश्नही आता दिसू लागले आहेत. सुरुवाती सुरुवातीला इकडे असलेल्या म्हाताऱ्या आईवडिलांना तिकडे कायमचे न्यायचा प्रयोग काहीजणांनी करून पाहिला. पण बहुतेकांचा अनुभव असा की त्यांना तिकडे करमत नाही. एकदा मुलगा-सून किंवा मुलगी-जावई सकाळी कामावर गेले की ते संध्याकाळी येईपर्यंत काय करायचं? सगळ्या सोयी, सगळी यंत्रं घरात. गालिचे, कोच, टी.व्ही. सगळं असूनही उपयोग नाही. मग काय नुसतं एकमेकांच्या तोंडाकडे पाहत बसायचं? बाहेर फिरायला जावं तर रस्त्यावर शुकशुकाट. तिकडच्या रेसिडेन्शिअल विभागात नुसते बंगले

कुठेही जा, ते बघता बघता निर्धास्तपणे आपलं चायना टाऊन निर्माण करतील." एक म्हणाला, "अमेरिकेत पॅसिफिक महासागरातून जपान, चीनकडून, खूप पूर्वीपासून लोक स्थलांतरित होत आहेत. आपल्यासारखे ते नवे नाहीत."

आपली मराठी कुटुंबं बहुतेक मध्यमवर्गीय असल्यामुळे ही द्विधा स्थिती जरा जास्त प्रमाणात असेल. त्यातून त्यांच्या भारतातल्या लहानपणाविषयी ते अधिकच हळवे होतात. तिथल्या अशा कुटुंबात जन्मलेली मुलं मला ठिकठिकाणी भेटली. ती म्हणायची, "आमचे पालक त्यांचं लहानपण आमच्यावर लादत असतात. आम्हाला त्यांच्याविषयी आदर आहे पण आम्हाला आमचं लहानपण जगू द्या की." बरेच जण सुट्टीत मुलांना इकडे घेऊन येतात. यांच्या नातेवाईकांच्या, मित्रांच्या या मुलांना ओळखी व्हाव्यात म्हणून त्यांना ठिकठिकाणी घेऊन जातात. बहुतेक मुलांना हे सगळं बोअर होत असतं. लहानपणी ते सहन करतात पण मोठं झाल्यावर ते स्पष्ट बोलू लागतात. 'सुट्टीत मी भारतात येणार नाही, माझा प्लॅन वेगळा आहे. तुम्हाला जायचं असल्यास अवश्य जाऊन या,' सांगतात. एक डॉक्टर मित्र सांगत होते, "माझं मराठवाड्यात गाव आहे. तिथं शेतावरच घर आहे. माझ्या मुलांना तिथं जायला मात्र आवडतं. ती म्हणतात, 'आम्ही येऊ ते एका अटीवर. मुंबईला किंवा पुण्याला न थांबता डायरेक्ट गावी जायचं."

मी आश्चर्यानं विचारलं, "पण पुण्या-मुंबईत त्यांना ॲडजस्ट व्हायला खेडेगावापेक्षा कमी वेळ लागत असेल." "त्यांना पुण्या-मुंबईतले आवाज नकोसे वाटतात. वातावरण फार गॉडी वाटतं. त्यापेक्षा खेड्यातल्या गैरसोयी त्यांना परवडतात."

एक मित्र सांगत होते, "सुट्टीवर मुलांना घेऊन गेलो, तर मुलांनी अर्धी सुट्टी सोडून आम्हाला परत यायला लावलं. त्यांचं तिकडे काही जमेचना. मग पुढच्या सुट्टीपासून प्रॉब्लेमच झाला. मुलांजवळ तिकडे कुणीतरी राहायला हवं म्हणून आम्हा दोघांना इकडे एकत्र येताच येत नाही. मुलांनी आम्हाला साफ सांगितलंय की आम्ही तिकडे येणार नाही." एकूणच या लोकांची इकडे येण्याची सुटी हा चमत्कारिक अनुभव असतो. या सुटीची ते अगदी वाट पहा पहा पाहतात. त्यासाठी रजा मिळावी म्हणून आधी मरमर काम करायचं. मग इकडल्या लोकांसाठी वस्तू खरेदीपर्व, मग पॅकिंगपर्व. प्रत्यक्ष इकडे आल्यावर ती सुटी पुरत नाही. नातेवाईक, मित्रांकडून होणारी आमंत्रणांची ओढाओढी, पोटावर अत्याचार, आणलेल्या भेटींवरून होणारे रुसवेफुगवे, तिकडे जाऊ इच्छिणाऱ्या मुलांच्या पालकांचे लाचार चिकटणे. . . इत्यादी. सासर, माहेर वेगवेगळ्या शहरात असल्यावर इकडे काही दिवस, तिकडे काही दिवस घालवायचे. महिनाभर सुट्टी असेल तर भाग्यवान. त्यापेक्षा कमीच रजा बहुधा मिळणार. मग सगळ्यात प्रेमाच्या माणसाशीच बोलायला निवांतपणा मिळालेला नसतो. जे काही बोलणं होतं ते स्टेशनवर पोचवायला गेल्यावर. एक माणूस खिडकीत आणि एक खाली अशा अवस्थेत जसं जुजबी बोलणं होत असतं तसं, म्हणजे 'नीट रहा, काळजी घे, इकडची काळजी करू नकोस. . .' या प्रकारचं. कित्येकदा घरातील

कटुताही या सुट्टीत बाहेर पडते. इथे राहणाऱ्याला काही सांगायला गेलं तर 'तू तिकडे गेलास, इकडं आम्हाला सगळं फेस करावं लागतं. तुला आमचे प्रश्न काय माहीत आहेत?' असं ऐकावं लागतं. असं काय काय डोक्यात घेऊन विमानात बसलं की मग अमेरिकेतल्या काळज्या ढगासारख्या डोक्याभोवती जमू लागतात.

तिथं राहणाऱ्या कुटुंबात तिकडे जन्मलेल्या मुलांचे वेगळेच प्रश्न आहेत, हे अलीकडे तिकडल्या लोकांना जाणवू लागलं आहे. तिथं दर दोन वर्षांनी मराठी लोकांचं संमेलन भरलं. त्यात अजिता काळेने पुढाकार घेऊन तिथल्या मुलांच्या प्रश्नावर त्यांनीच बोलावं असा एक कार्यक्रम ठेवला होता. त्यात बरीच मुलंमुली बोलली. बहुतेकांचा सूर असा, "पालक त्यांची संस्कृती, त्यांचं लहानपण आमच्यावर लादतात. आम्ही इथं जन्मलो. या समाजात वाढलो. आमची मतं वेगळी असणार. आमचे इथले मित्रमैत्रिणी तरुण वयात डेट्स् घ्यायला लागतात. आमचे पालक आमच्यावर विश्वास का ठेवत नाहीत? डेट म्हणजे अगदी थेट शरीरसंबंध... असं नसतं. एकमेकांना आवडत गेल्यावर एकेका पायरीने ते नातं पुढं जात असतं."

तिथं भेटलेल्या एका गृहस्थांनी त्यांच्या मंडळातर्फे बसवलेल्या त्यांच्या मुलांच्या नाटकाची कॅसेट दाखवली. नाटक होतं, संगीत शारदा. नऊवारी साड्या घातलेल्या मुली, तिकडल्या 'र'च्या वेगळ्या उच्चारात 'म्हातारा इतका न अवघे पाऊणशे वयमान' हे गाणं म्हणताना पाहिलं तेव्हा ते सगळंच केविलवाणं वाटलं. ही नाटकाची निवड कशी काय केली असेल यांनी? आज महाराष्ट्रातल्या पिढीतसुद्धा हा विषय जुना व अप्रस्तुत वाटेल असा आहे. त्यापेक्षा त्या मुलांना त्यांचे प्रश्न किंवा जीवन येईल असं नाटक किंवा प्रहसन स्वतः लिहून बसवायचे प्रोत्साहन मिळालं असतं, तर अधिक समरस होऊन उत्साहानं त्यांनी ते केलं नसतं का? अमेरिकेतलं वाईट आपल्या मुलांच्या नजरेस पडू नये म्हणून एक पालक सकाळी उठून वर्तमानपत्रातल्या बातम्या कापत असल्याचे ऐकले. हे सांगणारा मित्र म्हणाला, "त्यांच्या घरचा पेपर म्हणजे चाळणीच झालेली असते" यांनी बातम्या कापल्या तर मुलांना ते कळायचं राहतं का? जगातल्या सगळ्यात मुक्त देशात आपल्या घरापुरती सेन्सॉरशिप ठेवणाऱ्या त्या गृहस्थांचं कौतुक वाटलं. (हे सुरुवातीला मला खरंच वाटत नव्हतं. पण ते गृहस्थ त्या भागात त्या वृत्तीसाठी अनेकांना माहीत असल्यानं पुष्टी मिळाली.)

तिकडे जाणाऱ्या मंडळींच्या आईवडिलांचे इथले प्रश्नही आता दिसू लागले आहेत. सुरुवाती सुरुवातीला इकडे असलेल्या म्हाताऱ्या आईवडिलांना तिकडे कायमचे न्यायचा प्रयोग काहीजणांनी करून पाहिला. पण बहुतेकांचा अनुभव असा की त्यांना तिकडे करमत नाही. एकदा मुलगा-सून किंवा मुलगी-जावई सकाळी कामावर गेले की ते संध्याकाळी येईपर्यंत काय करायचं? सगळ्या सोयी, सगळी यंत्रं घरात. गालिचे, कोच, टी.व्ही. सगळं असूनही उपयोग नाही. मग काय नुसतं एकमेकांच्या तोंडाकडे पाहत बसायचं? बाहेर फिरायला जावं तर रस्त्यावर शुकशुकाट. तिकडच्या रेसिडेन्शिअल विभागात नुसते बंगले

आणि प्रशस्त रस्ते. सगळे निर्मनुष्य. तेव्हा अशा म्हाताऱ्या मंडळींना त्यांचा जन्म जिथं गेला, त्यांचे मित्र-नातेवाईक जिथं आहेत अशा भारतातल्या गावातच बरं वाटणार. म्हणून तोही प्रयोग चालला नाही. मग लांब राहून एकमेकांच्या काळज्या करणं दोघांच्याही नशिबी येतं. एरवी फारसं अडत नाही. पण आजारपण सुरू झालं की प्रश्न सुरू होतात. ज्यांचं कुटुंब मोठं त्यांच्या बाबतीत हा प्रश्न नाही. पण एकुलता एक मुलगा आणि तोच तिकडे. मुलगी तिच्या सासरी लांब कुठेतरी, अशी अवस्था असेल तर म्हातारपण कोण काढणार ? इथं वृद्धाश्रमही फारच कमी. डिसेंट, महागडे वृद्धाश्रम असते तरी ती फी तिकडच्या यांच्या मुलांनी भरली असती, पण सोयच नाही. माझे इथले डॉक्टर मित्र सांगत होते, "या डेक्कन जिमखाना भागात माझ्या मते काही शेकडो तरी असे वृद्ध असतील. खरोखर एखाद्या डॉक्टरने त्यांच्या घरोघर नियमितपणे जाऊन त्यांचा हेल्थ मेन्टेनन्स केला तर लोक आनंदाने पैसे देतील." पण तशीही सोय अजून झाल्याचं ऐकलं नाही. त्यामुळे तिकडच्या लोकांची खूपच कुचंबणा होत असणार. माझ्या मित्राचे वडील एकदा खूपच आजारी होते. त्याला तातडीने फोन केला गेला. तो असेल ते काम टाकून आलाही. वडील त्यातून बरे झाले. हा मित्र काही दिवस राहून निर्धास्तपणे तिकडे गेला आणि इकडे काही दिवसांतच वडील हार्ट अटॅक येऊन गेलेच. परत फोन केला. पण तो म्हणाला, "तुम्ही तिकडे त्यांचे यथासांग क्रियाकर्म करा, मी आता येऊ शकत नाही." मी अमेरिकेत गेलो तेव्हा त्याच्याकडे गेलो होतो. तो ते आठवून म्हणाला, "बाकी इकडे सगळं माझं चांगलं चाललं आहे. पण तो एकच प्रसंग असा होता की मला वाटलं, कशाला आपण इकडं आलो ? पैसे मिळाले, घर मिळालं, जॉब सॅटिस्फॅक्शनही आहे. पण जिथं जायला पाहिजे होतं तिथं जायचं स्वातंत्र्यच नाही, मग बाकीच्या गोष्टींचा काय उपयोग ?"

माझ्या बहिणीची मुलगी मीरा अतिशय हुशार, चुणचुणीत, सुरेख मुलगी. पण ती चार-पाच वर्षांची असताना तिला जन्मतःच हृद्रोग असल्याचं लक्षात आलं. ती काही वर्षांत जाणार, हे ठरूनच गेलं. माझी आई तिच्या आजारपणात तिकडे जाऊन चार महिने शुश्रूषा करून आली. परत बरी झाली आणि नंतर एका अटॅकमध्ये ती गेलीच. शरीर क्रिमेशनसाठी तिला न्यायच्या वेळी बहिणीने इकडे फोन केला. आई फोनवर बोलली. पण काय आणि किती बोलणार ? ज्या वेळी जवळ घेऊन पाठीवरून हात फिरवून सांत्वन करायचं, त्या वेळी ती पाठ कित्येक हजार मैल दूर होती आणि बोलण्याला काही मिनिटांची मर्यादा होती.

या सगळ्या ओढाताणीपेक्षाही स्थलांतरितांच्या पुढे उभा राहणारा मोठा प्रश्न असतो, आपण कोण, आपण कुठले ? एरवी आपण आपापल्या देशात राहतो तेव्हा ह्या प्रश्नाचं माणसाला महत्त्वच वाटत नाही. तुम्ही इथलेच असता. तुमचे वाडवडील इथलेच, तुमचं घरदार इथलं. तुमच्यासारख्या दिसणाऱ्या लोकांच्यात तुम्ही राहत असता. तिकडे राहणाऱ्या मराठी लेखिकेने आपल्या अनुभवात लिहिलं आहे, 'चला भारतात काही दिवस. आता निदान महिनाभर तरी माझ्याकडे कुणी वळून, एखादा प्राणी पाहावा तसे पाहणार नाही.'

आपली माणसं कितीही वर्षं राहिली, तिथं यशस्वी नोकऱ्या, धंदे केले, तिथले इंग्लिशचे उच्चार उचलले तरी आपण परकेच राहतो. अमेरिकेला 'मेल्टिंग पॉट' म्हणत असले तरी तिथल्या लोकांच्या नजरेत (आधी माझा मित्र भारतीयांविषयी म्हणाला तसं) 'हे कशाला इथं आलेत ?' असा प्रश्न दिसतोच. देशादेशांमध्ये स्थलांतरितांना मिळणाऱ्या वागणुकीत फरक असला तरी सुप्त विरोध राहतोच. माझे इथले मित्र लंडन पहायला गेले असता डोक्यावर मधेच केसाचा पट्टा राखलेले काही 'पंक्'स् त्यांच्या रेल्वेच्या डब्यात बसले. रात्रीची उशिराची ट्यूब रेल्वे. आमचे मित्र आपसात बोलत, त्याची वेडावून नक्कल ते पंक् करू लागले. शेवटी हे गप्प बसले, तरी यांचे वेडावून दाखवणे चालूच राहिले. हे मग पुढच्या स्टेशनात उतरले. तिथल्या लोकांच्या मनात आपल्याविषयी काय भावना आहेत हे सर्वसाधारण लोक व्यक्त करीत नाहीत, पण असे पंक किंवा केकेके सभासद ते उघडपणे बोलून दाखवतात. माझ्या मित्राची, पीएच. डी. करणारी मुलगी 'येल्' युनिव्हर्सिटी कँपसवर राहते. तिचा फ्लॅट कुणीतरी ती नसताना उघडून काहीही चोरी न करता वस्तूंची नासधूस करून, तिने कुणाकुणासाठी तयार केलेली ख्रिसमस प्रेझेंट्स् पायाने जमिनीवर चुरडून निघून गेलेलं होतं. युनिव्हर्सिटी कँपसवर आशियाई विद्यार्थ्यांविरुद्ध असंच प्रक्षुब्ध लोकमत आहे. काही काही कँपसवर (उदा. बर्कले) जवळपास पंचवीस ते तीस टक्के विद्यार्थी आशियाई आहेत. ते परदेशातून शिकण्यासाठीच आल्याने खूप अभ्यास करतात, त्यांचे पालक त्यांच्या फीचा खर्च करीत असल्याने, त्यांच्यावर अमेरिकन विद्यार्थ्यांसारखी 'कमवा व शिका' अशी आपत्ती नसते. त्यामुळे ही मुलं तिथल्या मुलांपेक्षा जास्त चटकन प्रगती करू शकतात, ते अर्थातच तिथल्या मुलांच्या डोळ्यांवर येतं.

हे जसं विद्यार्थ्यांचं तसं इतरांच्या बाबतीत आहे. वर्तमानपत्रात 'जागा भाड्याने देणे'ची जाहिरात वाचून माझ्या मित्राने पत्रव्यवहार केला. तिची वेळ ठरवून तो गेला असता त्याला पाहून मालकिणीला जरा धक्का बसल्याचं जाणवलंच. तिनं आजच जागा गेल्याचं सांगितलं. याचं नाव ख्रिश्चन असल्याने पत्रव्यवहारावरून तिला तो इंग्लिश वाटला असावा. थोडक्यात, इथं जे दलितांना अनुभव येतात त्याची चव इथल्या उच्चवर्णीयांना तिकडे चाखावी लागते. माझी इथली डॉक्टर मैत्रीण तिकडे एक पुढचा कोर्स करून आली होती. ती म्हणाली, "नाही रे बाबा, मी परत तिकडे जाणार. मी तिथल्या हॉस्पिटलमधे काम करायचे ना, तिथल्या गोऱ्या नर्सेस, अटेंड्ट्स् 'विश' सुद्धा करायचे नाहीत. मी केसपेपरवर लिहीन त्या ऑर्डर्स ते फॉलो करायचे. पण गोरा डॉक्टर आल्यावर ते जसे उभे राहायचे, फॉर्मल का होईना पण हवापाण्यावर बोलायचे, तसं माझ्या बाबतीत कधी नसायचं. मी तिथून चालले असले आणि या नर्सेस गप्पा मारीत बसलेल्या असल्या तर बघायच्यासुद्धा नाहीत."

मधे मुंबईत झालेल्या जागतिक मराठी परिषदेतल्या एका याच विषयावरच्या परिसंवादात इंग्लंडमध्ये स्थायिक झालेल्या डॉ. मीना प्रभू म्हणाल्या, "मी तिथं डॉक्टर म्हणून काम केलं आहे. माझी पात्रता व अनुभव पाहता एक नोकरी मला मिळाल्याचं मला

त्यांनी इंटरव्ह्यूनंतर प्रत्यक्ष सांगितलेही. पण प्रत्यक्ष ऑर्डर आली नाही. कारण त्याच जागेसाठी एका गोऱ्या बाईचा अर्ज नंतर आला आणि तिला ती जागा मिळाली. आम्हाला नोकरी टिकवून धरण्यासाठी किंवा प्रमोशन मिळवण्यासाठी गोऱ्या डॉक्टरपेक्षा अनेक पटींनी जास्त काम करावे लागते. हे करूनही आयत्या वेळी काय होईल ते सांगता येत नाही." त्यांनी पेशंटबाबतचा एक अनुभव सांगितला. "एक डिलीव्हरीची अडलेली केस आली. मला कॉल आल्यावर मी केस अटेंड करायला गेल्यावर, मला त्या माणसाने पाहिले आणि म्हणाला, 'तुम्ही दुसऱ्या डॉक्टरला बोलवा. मला या डॉक्टरकडून ट्रीटमेंट घ्यायचीच नाही.' हॉस्पिटल स्टाफमधल्या सगळ्यांनी त्याला समजावून सांगितलं, 'आणखी उशीर झाला तर तुझ्या मुलीचा जीव धोक्यात येईल.' तो म्हणाला, 'माझी मुलगी मेली तरी चालेल, पण काळ्या डॉक्टरने माझ्या मुलीला हात लावता कामा नये.' मी म्हटलं, 'मी केस हँडल करायला तयार आहे, पण तुम्ही नकार देताय, हे लिहून द्या, म्हणजे माझ्यावर जबाबदारी नको.' आश्चर्य म्हणजे त्याने तसं लिहून दिलं. मग स्टाफने दुसऱ्या डॉक्टरला कॉल पाठवला. त्या माणसाच्या दुर्दैवाने तो नवीन आलेला डॉक्टरही वेस्ट इंडिज ब्लॅक निघाला. पण त्याने या मुलीच्या वडिलांना न जुमानता सरळ केस आत घेतली आणि ऑपरेशन करून मोकळा झाला."

असे अनेक भलेबुरे अनुभव स्थलांतरितांना येत असतात. काहीजण मदत करतात, आधारही देतात. पण सर्वसाधारण लोकमत मात्र उलट्या प्रकारचं आहे. दिवसेंदिवस जगातल्या बहुतेक देशांमध्ये स्थलांतरितांविरुद्ध वातावरण अधिकाधिक बिघडत चाललं आहे. जेव्हा त्यांना पांढरपेशी माणसांची, डॉक्टरांची, तंत्रज्ञांची, मजुरांची गरज होती, तेव्हा तितका त्रास नव्हता. आता त्या त्या ठिकाणची गरज संपली, उलट बेकारी वाढू लागली. त्याबरोबर हा त्रासही वाढत चालला आहे.

भारतातून डॉक्टरांचीही मोठीच निर्यात तिकडे होते. मधे मधे या आयातीवर अमेरिकेनंच मोठी बंधनं घातली होती पण आता परत ती सैल झाली आहेत. कारण एड्स् रोग झालेल्या हॉस्पिटलमधे काम करायला तिथले कुणी डॉक्टर्स, पॅथॉलॉजिस्ट, टेक्निशियन्स तयार नाहीत. एकूणच सगळ्याचंच सूत्र असं आहे की तिकडले लोक जे काम करायला नाखूष असतात, तिथं इतरांना काम मिळतं. सुटीच्या दिवशी किंवा नाताळ, थँक्स गिव्हिंग, उन्हाळी सुट्टी या काळात तिथले लोक काम करीत नाहीत, तिथं 'लोकम' म्हणून काम करायला मिळतं. माझा सिनियर डॉक्टर मित्र सांगत होता, त्याचा एक वर्गमित्र डॉक्टर (बहुदा सर्जन) असूनही तिथं एका डिपार्टमेंट स्टोअरमधे ज्युवेलरी विभागात गिऱ्हाईकांचं– ह्या बहुदा छोट्या मुली असतात-- कान टोचण्याचं काम करतो ! क्वचित काहीजण तिथं खूप वरही जाऊ शकतात, नाव कमावतात. माझा वर्गमित्र दिलीप जेस्ते तिथं सायकियाट्रिस्ट असून रिसर्च मधे मोठं नाव कमावलं आहे. त्याच्या नावावर अनेक पेपर्स-पुस्तकं आहेत. एका ड्रग डिॲडिक्शन सेंटरमधे एका सायकियाट्रिस्टशी बोलत होतो. तो विशेष बोलत

नव्हता, 'ह्याच्याशी काय बोलायचंय ?' असा त्याच्या चेहऱ्यावर भाव होता. मी दिलीप जेस्ते माझा वर्गमित्र आहे सांगताच, तो रेललेल्या अवस्थेतून तटकन उठून ताठ बसला व म्हणाला, "त्यांचं पुस्तक मी टेक्स्टबुक म्हणून वापरलंय" आणि नंतर खूपच नीट बोलला. पण जेस्तेसारखे किती जण असतील ? अगदी अपवादात्मक हुशार लोकांना कुणीच थोपवू शकत नाही. पण त्यांना मिळते ती वागणूक तिकडं जाणाऱ्या इतर लोकांना येत नसते.

इकडे घरापासून तुटलेले आणि तिकडे हा त्रास, मग निदान भरपूर पैसे तरी मिळवूयात, अशा मनःस्थितीत साहजिकच सगळे असतात.

(माझे दोन-तीन मित्र अरबस्तानातल्या आखाती देशात काही वर्षं राहून आले. त्यांनी तर सांगितलं, 'आपण त्या देशात पाऊल टाकले की आपला पासपोर्ट ते ठेवून घेतात. गुलामगिरीची तिथूनच सुरुवात होते. पासपोर्ट नसला की तुमच्या मर्जीनंच तुम्ही तो देश सोडूच शकत नाही, सगळं त्यांच्यावर अवलंबून.' माझ्या मित्राचं कुटुंब इथं पुण्यात. तो बायकोला, मुलांना सुट्टीत तिकडे बोलावून घ्यायचा. पण तिकडे तिला बुरखा घ्यावा लागायचा. आपल्या घराच्या खिडकीत उभं राहायचं नाही. ही डॉक्टर. मग हे सुट्टीत जाईनासेच झाले. तो मित्र परवा कायमचा इथं आला. म्हणाला, "एकदा आपण आपला देश सोडला ना की मग कुठेही जा, आपलं स्थान हे दुय्यम नागरिकाचं. देशादेशातल्या परिस्थितीत फरक असेल, पण शेवटी तुम्ही खालचे." आखाती झरा आता आटला आहे. आपले केरळ किंवा किनारपट्टीचे अनेक लोक तिकडे जाऊन पैसा मिळवून आले. त्याने आपल्या देशाचा फायदा झाला म्हणतात. पण कशाला फायदा म्हणायचा हा प्रश्नच आहे. केरळमधे परवा उद्योगातला अधिकारी मित्र गेला होता. तिथल्या होस्टने त्याला जेवायला रात्री हॉटेलात नेलं. तिथं भडक लायटिंग, कॅबेरे चाललेला. होस्ट ओशाळवाणा होऊन म्हणाला, "तुम्हाला या तऱ्हेच्या हॉटेलात आवडणार नाही. पण या गल्फवाल्यांमुळे लोकांच्या टेस्ट बदलल्यात. आज या शहरात हे सगळं नसलेलं हॉटेलचं राहिलेलं नाही." अनेक कोकणी मुसलमान तिकडे जाऊन आले. त्यांची सिमेंट कॉंक्रीटची, भडक रंग दिलेली घरं तिकडल्या खेड्यांमधल्या कौलारू मातीच्या घरांमध्ये उठून दिसतात. पण पैसा आला आणि गेला. कुठलीही उत्पन्न देणारी स्थायी गुंतवणूक ते करू शकले नाहीत. यातून निघाला तो फक्त आताचा मानसिक हताशपणा.)

तिथं राहून कुठल्या राष्ट्रावर निष्ठा ठेवायची ? अमेरिकेवर की भारतावर ? उत्तर उघडच असतं की भारतावर. कारण अमेरिकेत हे आता आता गेले आणि तेही बहुधा पैसे मिळवायला. भारत आपल्या पूर्व परंपरागत, वाडवडिलांचा देश. पण हे उघड बोलता येत नाही. परवा 'वर्ल्ड धिस वीक' कार्यक्रमात इंग्लंडच्या टोरी पक्षाच्या खासदाराची मुलाखत दाखवली होती. 'इंग्लंडमधे स्थलांतरित झालेले ब्रिटीश नागरिक इंग्लंडमध्ये चाललेल्या क्रिकेट मॅचच्या वेळी इंग्लिश टीमला प्रोत्साहन देण्याऐवजी आपापल्या मूळ देशाच्या टीमला त्या देशांचे झेंडे हलवून प्रोत्साहन देतात आणि ती टीम जिंकल्यावर आनंदोत्सव

साजरा करतात. हे कसं?' असा प्रश्न त्याने उपस्थित केला होता आणि ती वस्तुस्थिती असल्याचं आपण टी.व्ही. वरच्या मॅचमधल्या दृश्यांवरून पाहतोच. मग आपले तिथले झेंडे हलवणारे लोक राष्ट्रद्रोही समजायचे का? भारतात राहून धार्मिक बाबतीत मक्का-मदिना किंवा रोम या धर्मक्षेत्रांवर निष्ठा ठेवणाऱ्यांच्या बाबतीत आपण सर्रास असे अनुदार उद्‌गार काढतो. मग अमेरिका, इंग्लंडमधे स्थायिक झालेल्यांच्या धार्मिक-सांस्कृतिक निष्ठा काशी-रामेश्वर किंवा भारतातल्या अन्य कोणत्याही ठिकाणी गुंतलेल्या असल्या, तर त्या विषयी आपण काय म्हणायचे? असे प्रश्न या स्थलांतराच्या प्रक्रियेतून निर्माण होतात. ज्याचं एक उत्तर असू शकणार नाही. जी उत्तरं असतील ती गुंतागुंतीची असणार. कारण या लोकांनी रुळलेली वाट सोडून देश सोडण्याची दुसरी दिशा धरली. असं करणं मुळात कितपत नैतिक, असा प्रश्न पूर्वी माझ्या मनात आलेला होता. ज्या समाजाने यांना वाढवलं, खर्च करून शिकवलं, त्याची नाळ तोडून माणसं पटकन दुसऱ्या देशाचे नागरिक बनतात कसे? या देशातली परिस्थिती सुधारण्याचं काम कोण करणार? पण नंतर वाटलं की, इथं राहिलेले डॉक्टर, इंजिनियर तरी काय सेवा करताहेत? त्यांतील बरेच जण तर स्वतः श्रीमंत होण्यासाठी काहीही करायला तयार असणारेच असतात. पण तरी काही लाख रुपये खर्चून तयार झालेला इंजिनियर हा श्रीमंत देशांच्या सेवेला जसाच्या तसा रवाना होतो, याला काय म्हणायचं? हे चूक नाही का? त्यावर माझी एक मैत्रीण म्हणाली, "त्याची त्या माणसाकडून त्याच्या शिक्षणावर झालेल्या खर्चाची भरपाई करून घेण्याची तरतूद करावी, पण तू तिकडे जाऊच नकोस असं सांगणं बरोबर होणार नाही."

मी म्हटलं, "पण आपले लोक तिकडे जातात, त्यामुळे तिकडच्या ब्लॅक्स किंवा खालच्या लोकांच्या वर सरकण्याच्या संधी कमी होतात. व्हाईट अमेरिकनांनी ब्लॅक्सना संधी देण्याऐवजी सतत अशा इतर स्थलांतरितांना प्रोत्साहन दिलेलं आहे, असं मत तिकडे अनेकांनी पाहणी करून मांडलेलं आहे."

त्यावर मैत्रीण म्हणाली, "त्याची त्या देशांनी जरूर काळजी घ्यावी. पण देश सोडून कुणी जाऊच नये, असं म्हणता येणार नाही. लोक जर आपल्या देशातच राहिले असते तर जगात चलनवलन, सांस्कृतिक देवाण-घेवाण झाली असती का? असं जाणं यात अनैतिक काही नाही."

नंतर एक अमेरिकन बाई भेटली. ती म्हणाली, "माणसाला इच्छेनुसार कुठंही जाता आलं पाहिजे. नाहीतर रुमानियासारखं होईल. बाहेर जायला अशी परवानगी नाकारणं, ही हुकूमशाहीच नाही का?"

पण नैतिक नसला तरी हा सामाजिक प्रश्न म्हणून राहतोच. गरीब देशांनी तिथल्या प्राथमिक शिक्षणावर, पिण्याच्या पाण्यासारख्या साध्या साध्या गरजांवरचे पैसे काढून उच्च शिक्षणाच्या संस्था चालवायच्या. त्यावरच्या खर्चाच्या मानाने शिक्षणाची फी अगदी नगण्य ठेवायची, (अमेरिकेत याच्या उलट आहे) आणि त्यांनी सरळ संपन्न देशांकडे चालू

लागायचं. ते असं म्हणतात की, 'आम्ही आमच्या घरच्यांना डॉलर्समधे पैसे पाठवतो, त्याने भारताला किती परकी चलनाचा फायदा होतो.' पण असं सगळं मोघम ठेवण्यापेक्षा त्यांनी इयत्ता पहिलीपासून शासनाने त्यांच्यावर केलेला खर्च या गरीब देशाला परत करावा, एक जागा अडवल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करावी आणि निर्धास्त मनाने तिकडे स्थायिक व्हावं. त्या त्या देशाच्या संस्कृतीत मनापासून भर घालावी, मिसळून जावं, म्हणजे हा सामाजिक प्रश्न तरी सुटू शकेल.

या पिढीपेक्षा पुढच्या पिढीचे प्रश्न आणखीनच वेगळे असणार आहेत. त्यांना इथल्या वातावरणाची, संस्कृतीची ओढ नसणार, हे गृहीतच आहे. मला इंग्लंडमध्ये असलेला तरुण मुलगा म्हणाला, "भारतात जायला मला आवडतं, पण ते सुटीला म्हणून. कायमसाठी कधीच नाही." मी विचार करू लागलो, आपण आपलं खेडं सोडलं आणि शहरात आलो. आपलीही हीच स्थिती आहे. ओतूरला अधूनमधून जाऊन आराम करायला बरं वाटेल, पण कायमचं ? कोण जाणे, आवडेल की नाही ते. तिथल्या मुलांना तिथल्या समाजाने मुख्य प्रवाहापासून दूर ठेवलं तर रुखरुख वाटत राहणार. तेव्हा, 'कुठेतरी 'आपला' देश आहे' ही जाणीव त्यांना फुंकर घालणारी वाटेल, इतका तरी आपल्या देशाचा त्यांना उपयोग होत राहील. माझ्या मित्राची अमेरिकेत स्थायिक झालेली बायको परवा आली होती. ती तिच्या संस्थेच्या कामानिमित्ताने जगभर बऱ्याचदा फिरत असते. इथे आली तरी एखादे दोन दिवस. ती म्हणाली, "इथं आलं आणि या घरात पाऊल टाकलं की मला रिलॅक्स वाटायला लागतं. इथं मी कुणालाही आन्सरेबल नाही. अमेरिकेत मी माझं घर केलं आहे, करियर केलं आहे, पण तिकडे असताना मी कुठल्यातरी प्रवासात असल्याचं सतत जाणवत असतं. हीच जागा अशी आहे की, इथं वाटतं, प्रवास थांबलाय." पुढच्या पिढीला तर अशा प्रत्यक्ष रिलॅक्सेशनचीही सोय नसणार. त्यांना एक आपली पाळंमुळं असलेलं, मानसिक आधार देणारं ठिकाण म्हणून या देशाची आठवण महत्त्वाची वाटेल.

सान्फ्रांसिस्कोला एक मेडिकल स्टुडंट भेटली होती. तिचे वडील मला इथल्या मेडिकल कॉलेजात शिकवायला होते. ती म्हणाली, "मी इकडंच वाढले, माझे आईवडील इकडेच, तिकडे आजी-आजोबा होते, ते आता गेले. मला तिकडे जायला आवडायचं, पण आता तिकडं जाणंच झालं नाही. मला प्रश्न पडतो की, मी माझी रुट्स् कुठे शोधायची ?" मी विचार करू लागलो, खरंच, प्रत्येक झाडाला जशी मुळं असतात तशी माणसालाही लागतात. तिथून त्याचं खरं पोषण होत असावं. पण पोषण तरी कसलं ? भारतात राहणाऱ्या अनेक जणांचा इथल्या समाजप्रवाहाशी फारसा संबंध नसतो, स्वतःपलीकडचं दिसतच नाही. समाजाविषयी आपलेपणा वाटत नाही, त्यांना या तऱ्हेच्या पोषणाची जरुरी तरी वाटत असेल का ? पण अमेरिकेत वाढलेल्या या मुलीला ती गरज खरोखर वाटतेय, असं दिसतंय. इथं अमेरिकेत आल्यापासून काही अमेरिकन माणसं अशी भेटली की ती लॅटिन अमेरिकन किंवा साऊथ आफ्रिकन मानवतावादी लढ्याला मदत करतात, अधूनमधून तिथं जाऊन

येतात. त्यांना त्यांची रुट्स् तिथं सापडली असावीत. या मुलीला रुट्स् शोधण्यासाठी भारतातच जायला पाहिजे असं तरी कुठं आहे? अमेरिकेतल्या समाजजीवनातल्या कुठल्याही अंगात मनस्वीपणे झोकून रुट्स् निर्माण करता येतील.

पण तिला काही उपदेश करण्याऐवजी मीच स्वतःकडे पाहू लागलो. आपली रुट्स् कुठली? माणसाचं लहानपण जिथं जातं ते त्याचं गाव, असं माझं बऱ्याच वर्षांपासूनचं मत कारण तिथं त्याच्या स्वभावाची घडण होते, ती पुढे आयुष्यभर कायम राहते. मग माझी पाळंमुळं ओतूरला आहेत म्हणावी, तर मी ओतूर सोडून पुण्याला आलो हा ओतूरशी द्रोह केला का? भारत सोडून अमेरिकेत स्थायिक होणाऱ्यांविषयी बोलायचा मला काय अधिकार? ओतूरचे लोक म्हणू शकतात, 'आमच्या गावची माणसं बाहेर जाऊन मोठी झाली, पण गावाला त्यांचा काय फायदा? ती गावाला विसरली.' मी ओतूरला जातो, राहतो. पण गावासाठी काही करायला गाव हे मला कार्यक्षेत्रच वाटत नाही. पण तरीही गावाविषयी जिव्हाळा वाटतो, हे खरंच आहे. माझ्यावर जे समाजाचं ऋण आहे, ते मी कुठंतरी फेडलं म्हणजे झालं. ते माझी पाळंमुळं जिथं रुजलेली आहेत, अशाच ठिकाणी फेडायला पाहिजे, असं काही नाही.

आज अमेरिकेत राहणाऱ्या मराठी व्यक्तींनी हा प्रश्न स्वतःला विचारला पाहिजे, इथं आपण कशाला आलो? इथं येऊन काय मिळवलं! आपण समाजाचं ऋण मानतो का? आणि मानत असल्यास ते कुठं का होईना, पण आपण ते फेडतो का?

ही प्रश्नपत्रिका मनात तयार होताना माझ्या मनात एक प्रश्न स्वतःसाठी तयार झाला होता, 'त्यांना हे विचारायचा तुला काय अधिकार?' तिथं मी निरुत्तर झालो होतो.

○

★★★★★

# स्थलांतरित

अमेरिकेची संपन्नता सगळ्या जगाला भुरळ घालत असली, तरी त्या संपन्नतेच्या तळाशी कित्येक लोकांनी जुलूम, शोषण, दारिद्र्य हे सहन केलेलं आहे. अमेरिकेतल्या ब्लॅक्सची गुलामगिरी किंवा रेड इंडियन्सचा निर्घृण निःपात या गोष्टी मला आधी माहीत होत्या. पण अलीकडच्या काळात मेक्सिकन मजुरांविषयी थोडं थोडं वाचलं तेव्हा त्यांच्याविषयी उत्सुकता निर्माण झाली. त्यात ह्यातले बरेचसे मजूर हंगामी आणि स्थलांतर करीत जाणारे आहेत, असं कळल्यावर त्यांना आणखीनच समजून घ्यावंसं वाटलं. कारण मी महाराष्ट्रातल्या ऊस तोडणी कामगारांची सध्या माहिती घेत आहे. दुष्काळी भागातल्या गावांमधून पावसाळ्यानंतर लाखो मजूर दरवर्षी बाहेर पडतात. साखर कारखान्यांच्या आसपास उघड्यावर राहून, हालअपेष्टा सहन करून ऊस तोडायचं काम करतात आणि उन्हाळ्यात परत गावी येतात. या स्थलांतराचे खूप दूरवर परिणाम त्यांच्या जगण्यावर, संस्कृतीवर झाले आहेत. त्यांची धड कुठलेच नाही, अशी अवस्था झाली आहे. मी हे एका अमेरिकन मित्राला सांगत होतो, त्यावर तो म्हणाला, "आमच्या देशातही मेक्सिकन मजुरांची परिस्थिती अशीच आहे. तुमचे हे मजूर निदान याच देशाचे नागरिक असल्याने कायदेशीर तरी प्रश्न काही उद्‌भवत नाही. पण मेक्सिकन मजुरांच्या बाबतीत ते परवान्याशिवाय येत असल्याने तोही जाच खूप असतो."

मी आयोवात गेल्या गेल्या मेक्सिकन लोकांविषयी विचारू लागलो. असं कळलं की त्या विद्यापीठात 'चिकॅनो मूव्हमेंट' ही विद्यार्थ्यांची संघटना आहे. त्यांना भेटलो. त्यांच्याबरोबर त्यांच्या पिकनिकला गेलो. हे लोक पाहून पाहून मेक्सिकन चेहऱ्यांची ठेवण लक्षात आली. बदामी आकाराचा, पुढून जरा सपाट असलेला, गोरा, निमगोरा चेहरा, बारीक डोळे, काळे, सरळ आपल्यासारखे केस, उंचीही आपल्या एवढीच. तो आपसात स्पॅनिश बोलायचे. अमेरिकेत त्यांना खूपच तुच्छ समजले जाते. अगदी कित्येकदा ब्लॅकपेक्षाही तुच्छ. आपल्याकडे महार, मातंग, चांभार हे अस्पृश्य ठरवलेले असले तरी त्याहूनही भंग्यांच्या पदरी विशेष तुच्छता येते तसं हे आहे. या वृत्तीवर ही चिकॅनो तरुण मंडळी फारच संतप्त

असायची. चिकॅनो म्हणजे मेक्सिकन वंशाचे, पण अमेरिकन नागरिक असलेले लोक. एक चिकॅनो तरुण म्हणाला, "कॅलिफोर्निया, नेवाडा, न्यू-मेक्सिको, ॲरिझोना, टेक्सास हे पूर्वी मेक्सिकोचे प्रांत होते. या अमेरिकनांनी ते बळाच्या जोरावर १८४६ च्या सुमारास हिसकावून घेतले. नंतर कॅलिफोर्नियात सोन्याच्या खाणीचा शोध लागल्यावर तिथल्या मूळच्या मेक्सिकन वंशाच्या शेतकऱ्यांवर, नागरिकांवर अत्याचार करून त्यांच्या गावांना आगी लावून त्यांना हुसकावून लावले. आणि आता ते म्हणतात की, 'तुम्ही उपरे, नंतर आलेले आहात.' नंतर या विषयावरच्या इतिहासाची काही पुस्तके वाचली त्यावरून तो म्हणत होता त्याहीपेक्षा सत्य आणखीनच विदारक होते.

या तरुणांच्या चळवळीतून अनेक तऱ्हेचं विद्रोही साहित्य लिहिलं गेलं आहे. एकत्र जमलेली अनेकजण गिटारच्या तालावर अशी विद्रोही गीतं म्हणत असतात. त्याला कारुण्याचीही धार असते. आपल्याकडच्या दलित साहित्याचीच आठवण झाली. पण ही प्रतिक्रिया त्यांच्यात आता आता निर्माण झालेल्या मध्यमवर्गीय मुलांची. आज अमेरिकेतल्या शेतांमधे काम करणाऱ्या लाखो मेक्सिकन मजुरांची स्थिती वेगळीच आहे. इंग्लिश येत नसल्यामुळे ते बोलतच नाहीत. बुटका, मिचमिच्या डोळ्यांचा, मुका, घाबरट मेक्सिकन अशी त्याची इतर लोकांमध्ये सर्वसाधारण प्रतिमा आहे. मी कॅलिफोर्नियातून आडरस्त्याने मोटारीतून जात असताना हा अनुभव यायचा. हे रस्त्याने चालत असले तर गाडी बघितल्या बघितल्या उंदरासारखे कुठंतरी गडप व्हायचे.

अमेरिकेच्या दक्षिणेला लागून मेक्सिको देश आहे. मधे हजारो मैलांची सीमा आहे. मेक्सिको अगदी आपल्यासारखा दरिद्री देश आहे. आपल्याकडे निदान लोकशाही तरी आहे. तिथल्या लोकशाहीला काही अर्थच नाही. एकच पक्ष वर्षानुवर्षं सत्तारूढ. दुसरा पक्ष स्थापन करायचा झाला, तर आपल्या सभासदांची यादी तिथल्या कायद्याप्रमाणे सरकारला कळवावी लागते. अशा यादीतल्या निवडक लोकांना सरळ खतम करून टाकलं जातं. त्यामुळे दुसरे पक्ष उभेच राहू शकत नाहीत. ग्रामीण भागात जमीनदारांनी पाळलेल्या 'पिस्तोलेरो' नावाने ओळखल्या जाणाऱ्या पिस्तुलधारी गुंडांचे राज्य. आपल्यापेक्षा भयानक भ्रष्टाचार. दक्षिण अमेरिकेतून उत्तर अमेरिकेकडे कोकेनचा पुरवठा करणारे मेक्सिको हे मोक्याचं ठिकाण. त्यामुळे ड्रग स्मगलरांचे अगदी राज्ययंत्रणेवरही वर्चस्व. दारिद्र्य, शोषण, भ्रष्टाचार आणि दहशत यानं गांजलेल्या लोकांना अमेरिका हे स्वप्न वाटणं साहजिकच आहे. 'El norte' (द नॉर्थ) हा तिथला अमेरिकेविषयी वापरला जाणारा परवलीचा शब्द आहे. जिथली भाषा येत नाही, अशा अनोळखी परमुलखात, बेकायदेशीररीत्या प्रवेश करून खडतर कष्ट करण्याची ज्यांची तयारी आहे, अशी माणसं 'एल् नॉर्ते' चा रस्ता पकडतात. मेक्सिकोत वाढती लोकसंख्या, रोगराई हा खूपच मोठा प्रश्न आहे. खेडूत शेतकरी-शेतमजुरांची वीस टक्के मुलं हे त्यांच्या वयाच्या पाचव्या वर्षाच्या आतच मरतात. दक्षिण मेक्सिको हा कायम मलेरियाग्रस्त असतो. जवळपास प्रत्येक मेक्सिकनाच्या पोटात

अनेक तऱ्हेचे जंत, कृमी वस्ती करून असतातच. त्यामुळे अगदी केवळ जगण्यासाठी ते अमेरिकेकडे येतात. सीमाभागात पकडल्या गेलेल्या मेक्सिकनांना अमेरिकेतल्या कोर्टात जेव्हा पाच महिन्यांची शिक्षा होते, तेव्हा ते 'हेऽऽ' म्हणून आनंदाने हात उंचावतात. कारण म्हणजे पाच महिने जिवंत राहण्याची हमी. 'विदाऊट डाक्यूमेंट्स' या पुस्तकात या लेखकाने त्यांच्या दोन जीवनाची छान तुलना केली आहे. 'मेक्सिकोत ते लाकडी फळकुटांवर किंवा काथ्याच्या हॅमॉकवर झोपतात. इथं तुरुंगात त्यांना झोपायला कॉट आणि गादी असते. तिकडं क्वचित मांस खायला मिळतं, तर इकडे रोज मांस मिळतं. तिकडे ते नदी-नाल्यात आंघोळ करतात, इकडे शॉवर असतो. अमेरिकेत त्यांना कसलाच कायदेशीर अधिकार नसतो. मतदान करता येत नाही, पण मेक्सिकोत मतदानाला काही अर्थच नाही. अमेरिकेत आपल्याला परत पाठवतील या भीतीने त्यांना मतस्वातंत्र्य व्यक्त करता येत नाही, तिकडे दहशतीमुळे ते नसतेच.' ह्या सगळ्याची गोळीबेरीज लोक करतात आणि त्यांच्यातली धडधाकट माणसं मिळेल त्या मार्गाने अमेरिकेत प्रवेश करायचा प्रयत्न करतात.

अमेरिकेच्या सीमेलगत तिऊआना, मेक्सिकाली अशी काही शहरं प्रसिद्ध आहेत. तिथं सीमापार करून देणारे दलाल बसलेलेच असतात. असा एखादा खेडूत दिसला की, ते आपल्याकडच्या यात्रेच्या ठिकाणी जसे पंडे-बडवे, यात्रेकरूला पकडतात तसे पकडून लुबाडतात. कारण याने घरातल्या वस्तू किंवा जमिनीचा तुकडा विकून पैसे उभे करून बरोबर घेतलेले असतात. त्याला सांगतात, बॉर्डरवर माझे कॉन्टॅक्ट आहेत. गाडीला इतकं भाडं, त्या माणसाचे इतके पैसे. . . असे सगळे आधीच काढून घेतात. अशा एजंटांना 'कायोटे' म्हणतात. हे कायोटे या लोकांना 'पोलेरोज' वर सोपवतात. पोलोस याचा स्पॅनिशमधला अर्थ कोंबड्या. पोलेरोज म्हणजे कोंबड्या हाकणारे. हे बहुधा मेक्सिकन-अमेरिकन असतात. कायदेशीरपणे ते स्वतः मेक्सिकोत ये-जा करू शकतात. काही पोलेरोज हा व्यवसाय प्रामाणिकपणे करतात. पण काही जण या लोकांना ट्रकमधे वाटेल तसे कोंबतात. वाटेत लुटतात. त्यांच्या स्त्रियांवर क्वचित बलात्कारही करतात. अमेरिकेत जाऊन जो कसंबसं काम मिळवतो त्याला नंतर तिथं जाऊन हे कायोटे 'तुझी माहिती पोलिसांना कळवतो' असं सांगून ब्लॅकमेलही करतात.

मी अमेरिकेत असताना या विषयावर बोलायचो, तेव्हा अनेकांनी 'एल नॉर्ते' हा सिनेमा बघायला सांगितला. त्यात ग्वाटेमालातली बहीण-भांवडं तिथल्या दहशतवादाला कंटाळून मेक्सिकोमार्गे अमेरिकेत यायचा प्रयत्न करतात. मेक्सिकोच्या बॉर्डरवर कायोटे त्यांच्याकडून पैसे घेतो आणि रात्री निर्जन भागातल्या, एका पूर्वी कधीतरी अस्तित्वात असलेल्या कोरड्या ड्रेनेज लाईनपाशी आणून सोडतो. गंजलेला मोठा पाईप असतो तो. 'यातून आत जा. बऱ्याच अंतरावर हा अमेरिकेच्या सीमेच्या आत गेल्यावर जमिनीतून बाहेर येतो, तिथून बाहेर पडा.' मग ही दोघं जेमतेम त्यात शिरतात, कसंबसं आत सरकत सरकत जातात. हवा नसल्याने गुदमरतात. तेवढ्यात चिवचिव आवाज जवळ येऊ लागतो. ते

जमिनीखालचे उंदीर असतात. हे शेकडो उंदीर यांच्यावर हल्ला करतात. कसंबसं त्यातून पुढे सरकतात आणि अमेरिकेत येतात. ग्वाटेमालाच्या जंगलात वाढलेला हा मुलगा इंग्लिश शिकतो. हॉटेलमधे वेटरचं काम मिळवतो. तिथं त्याचा मत्सर करणारा दुसरा वेटर (तोही मेक्सिकनच असतो !) पोलिसांना त्याची माहिती कळवतो. ती नोकरी सुटते. बहीण आजारी पडते. औषधाअभावी मरते. हे माहीत असूनही भाऊ तिथं जाऊ शकत नाही. शेवटी निराश होऊन तो मजुरांच्या लायनीत कुणी काम देतंय का याची वाट पाहत उभा राहतो आणि तिथं त्याची उमेदही संपते आणि सिनेमाही संपतो.

सीमा पार करण्यासाठी लोक काहीही दिव्य करतात. सान्फ्रान्सिस्कोची मैत्रीण सांगत होती, 'तिच्या सोसायटीत सफाई काम करणारी मेक्सिकन बाई ही कारच्या डिकीमधे बसून आली होती. उतरली तेव्हा ती अगदी गुदमरून गेली होती.' या बाबतीत पकडल्या गेलेल्या कार्स, ट्रक्समधे कसे कप्पे निर्माण करून त्यात माणसं भरून आणली जातात. याचे फोटो पाहून थक्क झालो. कारच्या खाली दोरीची झोळी लावून त्यातून मुलं आणली जात होती. एक छोटं मूल तर कारच्या पुढच्या बॉनेट खाली इंजिन आणि बॉनेटमधे जी थोडी जागा असते त्यात घालून आणलं होतं. त्या गरम इंजिनालगत ते मूल कसं आखडून बसलं असेल याची कल्पना करवेना. कॉन्क्रीट मिक्स करणारे मिक्सर ट्रक असतात. त्याच्या ड्रममधे माणसं कोंबून आणतात आणि बॉर्डरवर चेकपोस्टवरच्या माणसांना संशय येऊ नये, म्हणून ते ड्रम्स फिरतेही ठेवले जातात. आतल्या माणसांचं अशा वेळी काय होत असेल याची कल्पना न केलेलीच बरी. टेक्सासला लागून असलेली सीमा आहे ती ग्रँड नदीनेच तयार झाली आहे. बरेच लोक ती नदी पार करून येतात. म्हणून त्यांना 'वेट बॅक्स' (ज्यांच्या पाठी पाण्याने भिजल्या आहेत, असे) नावानेच ओळखले जाते. तारेचे कुंपण ओलांडून येणाऱ्यांना 'वायर जंपर्स' असा शब्द रूढ आहे. या सर्व प्रकारांमध्ये माणसाच्या जिवाला काही किंमत नसते. एवढं करून जे तिकडे पोहोचतात त्यांना बॉर्डर पोलिस पकडतात. खटले वगैरे भरत बसण्यापेक्षा ते ट्रकमधे टाकून मेक्सिकोच्या अंतर्भागात खूप अंतरापर्यंत नेऊन सोडून देतात. या शिवाशिवीचा खेळ सतत चाललेला असतो. यात बरीच माणसं हतबल होऊन 'एल नॉर्ते'चा नाद सोडून गरीब आणि दहशतवादी परिस्थितीला परत सामोरे जातात.

यांच्या येण्यात एवढे अडथळे असले, तरी अमेरिकेतल्या शेतकऱ्यांना मात्र ते हवे असतात. अमेरिकेतील विशेषतः कॅलिफोर्निया, दक्षिणेतले काही प्रांत, मिडवेस्ट, येथली शेती या मजुरांच्या जिवावरच चाललेली आहे. तिथे स्थानिक माणसांना कामावर ठेवायचे तर खूपच जास्त वेतन द्यावे लागते. त्यांच्या जवळपास एक चतुर्थांश पगारात ही माणसं मिळतात. शिवाय ह्यांच्या गरजा कमी. कितीही वेळ काम करायची तयारी. अमेरिकन मजुराला कायद्याप्रमाणे खूपच सोयी उपलब्ध करून द्याव्या लागतात. कामाच्या जागी पाणी, संडास, प्रथमोपचार इत्यादींची सोय असावी लागते. क्वार्टर्स द्यायच्या झाल्या तर

त्याही कायद्याप्रमाणे खूपच चांगल्या पुरवाव्या लागतात. ही बेकायदेशीरपणे आलेली मेक्सिकन माणसं मालकाच्या हुकमतीखाली असतात. काही तक्रार केली तर एकतर मालक कामाहून काढून टाकतो किंवा पोलिसला फोन करून त्यांच्या हवाली करतो.

मेक्सिकोतल्या दक्षिणेकडे असलेल्या ओहाका (Oxaca) प्रांतातल्या लोकांची स्थिती इतर मेक्सिकनांहूनही वाईट. कारण ते सीमेपासून खूप दूरच्या डोंगराळ भागात राहणारे, अधिक दरिद्री असतात. त्यांचे मूळ इंडियन (रेड इंडियन) असल्यानं त्यांना स्पॅनिशही येत नाही. बॉर्डरवरच्या कायोटेंकडून त्यांची, अनुभव नसल्याने जास्त नागवणूक होते. अमेरिकेत आल्यावर इतर मेक्सिकन मजूरही यांना जवळ करीत नाहीत, आधार देत नाहीत.

कॅलिफोर्नियात शहरी भाग सोडला तर बहुतेक भागात लांबच लांब पसरलेले द्राक्षाचे किंवा अन्य मळे दिसतात. त्यांत मधून मधून खोलगट नापीक भाग असला की, त्या खोंगळीमधे या ओहाकातल्या लोकांची वस्ती असते. वरून पाहिले तर इथं काही वस्ती आहे, असं समजणारही नाही. जवळ गेलं तर कार्डबोर्डचे सरळ केलेल्या टी.व्ही.च्या खोक्यासारखे पुठ्ठे पडलेले दिसतात. आणखी जवळ गेलं तर लक्षात येतं या खाली उतरत्या टेकाडात गुहा करून, त्या वरून दिसू नयेत म्हणून हे पुठ्ठे टाकलेले आहेत. आत अक्षरशः बिळात राहिल्यासारखी माणसं राहतात. जेमतेम बसता येईल अशीच उंची असते. साळिंदराची बिळं जशी आत खोल खोल एकेकांना जोडलेली असतात तशी यांची घरं असतात. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत त्यांना कामाशिवाय काही माहीत नसते. पैसे साठवायचे आणि घरी पाठवायचे. त्यातून तिथं जमीन विकत घेता यावी एवढंच ध्येय असतं. हे सुरळीत चाललेलं असतं तोपर्यंत ठीक, पण कुणी आजारी पडलं किंवा हातापायाला काम करताना जखमा झाल्या तर कुणी वाली नाही. मरण एवढी एकच सुटका. काम करणाऱ्या जनावरासारखा जीवनक्रम असतो. बरोबर कुटुंबं नसतं. काम संपलं की, त्यांचा विचार करीत नुसतं पडून राहायचं. मधे 'न्यूयॉर्कर'मधे फ्लोरिडात ऊस तोडणीचं काम करणाऱ्या वेस्ट इंडिज बेटातून आलेल्या मजुरांच्या जीवनावर दोन प्रदीर्घ लेख आलले होते. इतरत्र ऊस हा यंत्राने कापला जातो. पण फ्लोरिडातली माती नरम असल्यानं यंत्रामुळे ते मुळासकट उपसून येतात. त्याने पुढच्या वर्षी उसाचा खोडवा लावता येत नाही. म्हणून अजून तिथं ऊस तोडायला माणसंच लागतात. अशा हजारो कामगारांचे कँप्स तिथं उभारलेले आहेत. तिथं ऊस जाळण्याची पद्धत असल्याने सर्वत्र काळा धूर पसरलेला असतो. कँपमधे मजुरांना अगदी नगण्य सोयी पुरवलेल्या. एकटं राहून व्यसनं वाढली, एकमेकातला हिंसाचार वाढला. आधीच्या खेडूत माणसांची पूर्वीची संस्कृती पुसली जाऊन एक वेगळीच संस्कृती, तिचे वेगळेच संकेत तयार झालेत.

अमेरिकेत शेतीचं यांत्रिकीकरण होऊन त्यांना एवढे मजूर लागतात कशाला, असा प्रश्न मला आधी पडायचा. पण तिथं गेल्यावर कळलं की, काही कामं यंत्रं करूच शकत

नाहीत. फळ पिकलेलं आहे हे ओळखणं आणि ते अलगद तोडणं किंवा खाली पडलेली फळं उचलणं आणि त्यांची वर्गवारी करणं ही कामं यंत्राला जमत नाहीत. तिथं मानवी बुद्धी, नजर आणि हातच लागतात. म्हणून स्ट्रॉबेरी वेचणं, टोमॅटो, ॲपल्स तोडणं, चेरी जमा करणं अशी अनेक कामं माणसंच करतात. द्राक्षाच्या मशागतीसाठी तर मजूरच लागतात. ही कामं सीझनल असतात. मेक्सिकोतून येणारे किंवा अमेरिकेत बेकायदेशीर स्थायिक झालेले मजूर किंवा अन्य रोजगार मिळू न शकणारे ब्लॅक मजूर यांचे थवेच्या थवे सीझनमध्ये कामाला निघतात. ते कॅलिफोर्नियातून ओरेगॉनपर्यंत इकडे टेक्सासमधून मिडवेस्टमधील अगदी शिकागोपर्यंत तसेच पूर्व किनाऱ्यावरूनही उत्तरेकडे कामं करीत करीत जात राहतात. इथला टॉमेटोचा सीझन संपला की तिकडचा कपाशीचा सुरू झालेला असतो. पाच-सात दिवस एकेका मळ्यात काम असतं. असं करीत परत ते मूळ ठिकाणी येतात. अनेक मालकांपाशी कामं केल्याने कुणावरच यांची जबाबदारी नसते. त्या भागातल्या गावांमधल्या चौकात ही माणसं उभी राहतात. ज्याला मजूर हवेत असा शेतकरी त्याची 'पिक अप व्हॅन' घेऊन येतो. हे सगळे त्याच्याभोवती घोळका करून 'मी येतो, मी येतो, मी इतक्या पैशात येतो, याच्याहून कमी पैशात येतो,' असा गलका करतात. शेतकरी प्रसंगी या मजुरांचे दंड चाचपून त्यातले पाहिजे ते निवडतो आणि व्हॅनमधनं घेऊन जातो. आपल्याकडचे मजुर अड्डे आणि तिथले हे बाजार यात काहीच फरक नाही. या पद्धतीमधे कुणीच कुणाला बांधील नसतो. अमेरिकन मजूर, त्यांचं स्थलांतर, त्यांचे लेबर कॅम्प्स याच्या पार्श्वभूमीवर स्टाइनबेकची 'ग्रेप्स ऑफ राथ' ही कादंबरी प्रसिद्धच आहे. त्यात ओक्लाहामातून कामासाठी फरपटत जाणाऱ्या एका गोऱ्या कुटुंबाची वाताहत प्रभावीपणे दाखवली आहे. पण मेक्सिकन मजुरांची फरपट तर त्याहून अधिक वाईट आहे.

कष्ट, कमी पैसे, निकृष्ट राहणी हा त्रास सौम्य म्हणावा अशा एका वेगळ्याच आपत्तीत या मजुरांना तोंड द्यावं लागतं. अमेरिकेतल्या शेतीमधे अत्यंत घातक अशी रासायनिक खतं वापरण्यात येतात. आपलं फळ हे टिकाऊ, चकचकीत, दिखाऊ आणि आकर्षक दिसण्यासाठी त्या कंपन्यांमधे खूप स्पर्धा असते. त्यासाठी ते हार्मोन्स, रासायनिक खतं यांचा भरपूर, सर्रास वापर करतात. काही खतांची यंत्राने पावडर उडवावी लागते, तर काहींची द्रवस्वरूपात फवारणी करावी लागते. ते काम हे मजूरच करतात. डी.डी.टी. चा वापर आता बंद झाला, तरी त्यासाठी भरपूर शारीरिक किंमत मजुरांनी मोजली आहे. ते वापरताना ग्लोव्हज्, मास्क आदी संरक्षक आयुधे त्यांना पुरवली जात नाहीत. मजूरही अडाणी असल्याने त्यांना त्याचं महत्त्व कळत नाही. अननुभवी मजुरांना फवारणी करताना वाऱ्याची दिशा बदलल्याचं कळत नाही आणि ती पावडर किंवा फवारा डोळ्यांत उडून अनेकांना अंधत्व आले आहे. पण या रसायनांचा दुष्परिणाम दिसेतोवर या शेतातलं काम संपवून तो दुसरीकडेच गेलेला असतो. आधी हा माणूस बेकायदेशीर, भटका त्यामुळे या शारीरिक नुकसानीची जबाबदारी कुणावर टाकता येत नाही. आता हेलिकॉप्टरने खतांची फवारणी

करतात. खाली मजूर काम करीत असतानाच ही फवारणी चालू असते. यातली कित्येक द्रव्यं कॅन्सर निर्माण करणारी असल्याचं नंतर लक्षात आलं. यांच्यात कॅन्सरचं प्रमाण इतर समूहांपेक्षा कितीतरी पटीने अधिक आहे. गर्भारशी शेतमजूर स्त्रियांना हात-पाय नसलेली किंवा एकच डोळा असलेली मुलं होतात. (या सर्व गोष्टी अनेक वर्षांच्या पाहणीनंतर आणि शास्त्रीय संशोधनामुळे सिद्ध झाल्या आहेत) म्हणून हे काम करायला स्थानिक मजूर कुणी तयार नसतो.

हे पाहिल्यावर किंवा वाचल्यावर त्या अमेरिकन मित्राचं म्हणणं पटलं. इथल्या ऊस तोडणी कामगारांचे प्रश्न तीव्र जरूर आहेत, पण अमेरिकेसारख्या संपन्न देशातल्या स्थलांतरित मजुरांचे प्रश्न जेवढे भीषण आहेत तेवढे हे नाहीत. देशाच्या सीमा ओलांडून पोट भरायला जाणाऱ्यांचे प्रश्न कितीतरी वेगळे असतात. जगातल्या सर्वच संपन्न देशांमध्ये गरीब देशातले मजूर जगायला जात असतात. अमेरिकेतील रेल्वे ही चिनी मजुरांच्या श्रमांवर उभी राहिली आहे. प्रत्येक संपन्न देशांच्या पोटात अशा राबणारांची स्थलांतरितांची फौजच असल्याचं दिसेल. जर्मनीमध्ये तुर्कस्तानातून आलेले 'टर्क्स्' दिसतील. फ्रान्समध्ये अल्जिरिया किंवा उत्तर अफ्रिकेतून आलेले लोक, सगळ्याच युरोपातल्या संपन्न राष्ट्रात स्पेन, पोर्तुगाल, इटाली, ग्रीससारख्या तिथल्याच गरीब राष्ट्रांमधले स्थलांतरित राबत आहेत. जर्मनी युद्धानंतर राखेतून उभा राहिल्याबद्दल जर्मन लोकांचं कौतुक आपण करतो. पण तिथंली बांधकामं, अनेक पदरी रस्ते, जर्मन कामगार करायला तयार नसलेली अतिश्रमाची अतिधोकादायक कामं ही अशा स्थलांतरितांनी केली. त्यांची अशा कौतुक करणाऱ्या कुणाला आठवण नाही. स्वित्झर्लंडसारखा तटस्थ देश, ज्याविषयी आपल्याला नेहमी कौतुक वाटतं... तिथंली उद्योगप्रियता, तिथला घड्याळाचा व्यवसाय, कुटिरोद्योग वगैरे. तिथल्या जिनिव्हाजवळचा बोगदा खणायचं काम चालू होतं. ते अर्थात इतर कोणी करायला तयार नव्हतं. स्पेनमधनं आलेल्या पूर्वाश्रमीच्या शेतमजुरांनी ते केलं. तिथं सुरक्षिततेच्या कुठल्याही सोयी केलेल्या नव्हत्या. हवेची सोय नाही, लाईटची सोय नाही. तिथल्या स्फोटांनी अनेकजण बहिरे झाले. कुठल्या सेफ्टी प्रिकॉशन नसलेल्या अगदी डोक्याजवळून जाणाऱ्या कन्व्हेयर बेल्टमुळे अनेक जखमी झाले आणि काहीजण तर मृत्युमुखीही पडले. त्यांनी शेवटी अगतिक होऊन संप केला तर त्यांना स्वित्झर्लंडमधल्या कामगार संघटनांनीही, पाठिंबा तर राहोच पण विरोध केला. आज आपण पॅरिस शहराला जगातलं सुंदर शहर म्हणतो पण त्या शहराच्या परिघावरच अल्जिरिया, मोरोक्को, स्पेन, पोर्तुगाल इत्यादी देशांमधून आलेल्या स्थलांतरितांच्या 'Bedonvilles' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वस्त्या आहेत. त्यांत जवळपास पन्नास हजारांहून अधिक लोक राहतात. त्यांची घरं बांधकामाच्या जागी मिळणाऱ्या लाकडाच्या फेकून दिलेल्या फळ्या, जुने ड्रम्स फोडून सरळ केलेले पत्रे इत्यादी टाकाऊ वस्तूंमधनं त्यांनी तयार केली आहेत. तिथं पाण्याची सोय नसल्याने ते लांबून पाणी आणतात. आणि तिथंही इतकी गर्दी की हजारो स्थलांतरितांसाठी

पाण्याचा एक नळ असं प्रमाण पडतं. त्या वस्त्यांमध्ये कुठेही संडास नाहीत. लोक संडासला त्यांच्या घरांमागेच बसतात. त्या वस्तीजवळ गेले की लगेच वस्तीचा असा घाण वास येतो. (हेच पॅरिस 'यूडी कोलॉन' किंवा 'इव्हिनिंग इन पॅरिस' सेंट्ससाठी प्रसिद्ध आहे.)

परक्या देशामध्ये हे स्थलांतरित येतात, तिथली भाषा ओ की ठो कळत नसताना तिथं चिकटून राहतात, निकृष्ट वस्त्यांमध्ये राहतात, धोकादायक परिस्थितीत कामं करतात, स्थानिक माणसांपेक्षा अनेक पटीने काम करतात आणि तेही त्यांच्याहून कितीतरी कमी पैशात... हे असताना त्या देशातल्या लोकांकडून त्यांना अतिशय तुच्छ वागणूक मिळते. रॅग पिकर्स, उंटहाके, सापखाऊ अशा त्यांना पदव्या मिळतात. अल्जिरियन्सची प्रतिमा म्हणजे कनिष्ठ दर्जाचे, धूर्त व क्रूर अशी निर्माण केलेली आहे. फ्रान्समधल्या प्रतिगामी संघटनेने तर तिथल्या या आफ्रिकनांवर पेट्रोल, बॉम्ब्स, बंदुकांनिशी हल्लाही केलेला होता.

अमेरिकेतही मेक्सिकन लोकांविषयी अशीच तुच्छ प्रतिमा निर्माण केलेली आहे. मिचमिच्या डोळ्यांची माकडं म्हणून त्यांना चिडवतात. या लोकांमुळे आमची 'नॅशनल कॅरेक्टर' ही अमेरिकन राहत नाही, अशी ओरड ते करतात. तिथल्या के.के.के. रेसिस्ट संघटनेने अधिकृतपणे जाहीर केले की, 'या सीमा ओलांडून येणाऱ्या मेक्सिकन लोकांना आम्ही धडा दाखवणार आहोत. पोलिसांच्या कार्यात मदत म्हणून आम्ही अशा लोकांना बळाच्या जोरावर त्यांच्या देशात पिटाळून लावणार आहोत.' संपन्न देशांचे याबाबतीतले धोरण नेहमीच दुटप्पी असलेले दिसते. एकीकडे त्यांच्या औद्योगिक प्रगतीसाठी असे मजूर हवेही असतात. युरोपियन संपन्न देशांनी अशा गरीब देशात युद्धोत्तर काळात 'भरती केंद्रे' उघडली होती. अमेरिका युद्धावर गेल्यावर उद्योगधंद्यामधे मनुष्यबळाची पोकळी निर्माण झाल्यावर त्यांनी मेक्सिको सरकारबरोबर करार करून, मजुरांच्या आयातीचा 'ब्रेसेरो' प्रोग्रॅमही सुरू केला. पण गरज संपताच हे लोक नकोसे होतात. मग लोकांमधे टीका सुरू होते. मग त्यांच्यावर हल्ले सुरू होतात, म्हणून उद्योजकांकडून शोषण आणि प्रत्यक्ष समाजाकडून वांशिक पातळीवरचा छळ ही या स्थलांतरितांच्या वाट्याला आलेली एक कायमची वस्तुस्थिती आहे.

आता या अधिकृत आणि अनधिकृत मेक्सिकन शेतमजुरांना चांगला नेता लाभलाय. त्याचं नाव सीझर शॅवेझ. हा ॲरिझोना भागातल्या मेक्सिकन वंशाच्या शेतमजुराचा मुलगा. ह्याने स्थलांतर करीत हालअपेष्टा सोसत शेतमजूर म्हणून काही वर्षे काम केले. शेतमजुरांवरचे अन्याय सहन न होऊन त्याने संघटना बांधायला सुरुवात केली. अमेरिकेतल्या दक्षिण भागातले गोरे शेतकरी म्हणजे कडवे रेसिस्ट. पण त्यांच्याशी टक्कर दिली. अनेकदा त्याला ठार करण्याचे प्रयत्न झाले. हा स्वतःस म. गांधींचा शिष्य म्हणवतो. त्याने आतापर्यंतच्या सर्व चळवळी शांततेच्या मार्गाने चालवल्या. त्याने व सर्व शेतमजुरांनी रास्त मजुरी न देणाऱ्या शेतांच्या कडेने उभे राहून निदर्शने केली. त्यांच्या अंगावर मालकांनी बाळगलेल्या गुंडांनी गाड्या घातल्या. घाबरवण्यासाठी गोळीबारही केला. पण यांनी संयम

सोडला नाही. मालकवर्गाच्या सहृदयतेस पाझर फुटावा म्हणून त्याने दोनदा वीस वीस-बावीस बावीस दिवसांचे उपवास केले. त्यात त्याची तब्येत खूपच खचली. त्याने केवळ मेक्सिकनांची संघटना न करता सर्व शेतमजुरांची केली. त्यात फिलोपिनो, चायनीज व अमेरिकन ब्लॅक्स इ. वंशाचे लोक होते. त्याने गांधीजींसारखा असहकाराचा प्रयोगही केला. शेतमजुरांवर अन्याय करणाऱ्या कॅलिफोर्नियातल्या द्राक्षांवर बहिष्कार घालण्याचे देशभरातल्या नागरिकांना त्याने आवाहन केले आणि त्याला भरपूर प्रतिसादही मिळाला. अखेर द्राक्षमालकांना माघार घ्यावी लागली. त्याच्या चळवळीत मार्टिन ल्यूथर किंगची विधवा पत्नी, रॉबर्ट केनेडी इ. उदारमतवादी लोकही सामील झाले होते.

मी अमेरिकेत गेल्या गेल्या त्यांच्याशी संपर्क साधायचा प्रयत्न केला. पण तो साधू शकला नाही. शेतांवर जंतुनाशकांची फवारणी हेलिकॉप्टरने करतात. त्यामुळे शेतमजुरांना मोठ्या प्रमाणात कॅन्सर होतो, त्याविरुद्ध सीझर शॅवेझने चार-सहा महिन्यांपूर्वी असाच मोठा बहुधा २०-२२ दिवसांचा उपवास केला होता. तो उपवास संपला तरी त्यांची तब्येत इतकी खचली की ते कुणाला भेटूच शकत नव्हते.

अमेरिकेसारख्या देशात त्यांच्यामुळे शेतमजूर आता ताठ मानेने उभे राहू लागले आहेत आणि अशा माणसाचा गुरू भारतीय असावा, याचा मला फारच अभिमान वाटला.

○

★★★★★

# मेल्टिंग पॉट

"अमेरिका हे ग्रेट मेल्टिंग पॉट आहे. जो कोणी इथं येतो तो कष्ट करून, कर्तबगारी दाखवून वाटेल तेवढा श्रीमंत होऊ शकतो. अगदी अमेरिकेचा प्रेसिडेंटही होऊ शकतो..." असं आम्हाला वॉशिंग्टनमधील 'युसिआ'च्या ऑफिसमधल्या लेक्चर हॉलमधे एक बाई सांगत होती. अमेरिकेचा इतिहास तिने खूप रंगतदार पद्धतीनं सांगितला. त्यात अमेरिकनांच्या जगण्याच्या वृत्तीची, दोषांची भरपूर थट्टाही केली होती. पण सबंध भाषणात अमेरिकनांनी केलेल्या रेड इंडियन्सच्या संहाराचा आणि आफ्रिकेतून पकडून आणून गुलाम केलेल्या ब्लॅक्सचा उल्लेखही नव्हता. सर्वसामान्यपणे पुढच्या दौऱ्यात गोऱ्यांबरोबर बोलताना हाच अनुभव आला. त्यांना या विषयावर आपण होऊन बोलायला तर नकोच असायचं, पण आपण प्रश्न विचारले तरी उत्तरं बाजू सावरून घेण्याच्या पद्धतीची. 'ब्लॅक्स आता किती श्रीमंत झालेत... टी.व्ही. स्टार बिल कॉस्बी... हा मिलियन्स डॉलर्सच्या देणग्या देतो, त्यावरून किती श्रीमंत असेल ते पहा.' किंवा 'माइक टायसन (बॉक्सर) बिलियॉनर आहे, सर्वांत लोकप्रिय खेळाडू तो आहे. गोरे लोक गुण कुठंही असेल तर त्याचं कौतुक करतात. मायकेल जॅक्सनइतका लोकप्रिय गायक दुसरा कुणीही नाही. खेळामधे त्यांना भरपूर वाव आहे. अनेक गोल्ड मेडल मिळवणारा कार्ल लुईस...' वगैरे वगैरे. अशी सर्वसाधारण प्रतिक्रिया असायची. ते म्हणतात त्या बाबी खऱ्या असल्या तरी त्यावरून 'ब्लॅक्सची परिस्थिती आता खूप सुधारलीय' किंवा 'गोऱ्या लोकांच्या मनात ब्लॅक्सविषयी आता रेसिस्ट दृष्टिकोण नाही' हे त्यांचं म्हणणं कितपत खरं, असा मला प्रश्न पडे. मला असं ऐकल्यावर 'एक गाव एक पाणवठा' चळवळीच्या निमित्तानं फिरत असताना सरपंचांबरोबर होणारे नेहमीचे संवाद आठवले. ते भेटल्याभेटल्या, आमचं काम कळल्याबरोबर म्हणायचे, 'तसा काही भेदभाव आपल्याकडे नाही. पूर्वी होतं पण आता काही राहिलं नाही.' चावडीतल्या महाराला ओरडून विचारायचे, "काय रे राम्या, गावात काही भेदभाव आहे का, सांग साहेबांना." मग तोही हात जोडून म्हणे, "नाही. नाही. या साहेबांच्या आशीर्वादानं चांगलं चाललंय." आम्ही परस्पर दलित वस्तीत गेल्यावर हळूहळू समजायचं की, गावच्या

विहिरीवर पाणी भरता येत नाही, जमिनी बळकावल्यात, तरुण मुलांना कामधंदा कुणी देत नाही, इत्यादी.

तिथल्या एका पेपरमधे ज्यांचा बॉस ब्लॅक आहे, अशा गोऱ्यांच्या वृत्तीवर लेख आला होता. बहुतेक ब्लॅक्सनी तक्रार केली होती की, हे हाताखालचे गोरे नोकरीसाठी म्हणून करायचं तेवढं किमान काम करतात, पण त्यांनी गोऱ्या बॉसला जसा 'रिस्पेक्ट' दिला असता, 'विश' केलं असतं तसं ते आम्हाला करीत नाही. एका बँकेच्या ब्लॅक अध्यक्षाने सांगितलं, "मी काही कारणाने ऑफिसची कार न घेता बाहेर पडलो आणि रस्त्यावर टॅक्सी थांबवू लागलो, तर एकही टॅक्सी थांबेना. शेवटी ऑफिसला फोन करून गाडी मागवावी लागली." तो ऑफिसमधे बॉस असला तरी रस्त्यावर साधा ब्लॅक होता. ह्या टॅक्सीबाबत मलाही काही वेळा अनुभव आला. बहुधा 'यांच्याकडे काय पैसे असणार' अशा तुच्छतेने पाहत टॅक्सीवाले टॅक्सी रिकामी असूनही थांबवत नसत. एका ठिकाणाहून विमानतळावर जाताना मी फोन करून टॅक्सी बोलावली. घर नंबर, रस्ता सांगितला की पाच मिनिटात टॅक्सी तिथं येते. तसं मी सामान घेऊन खाली उभा राहिलो. मी भारतीय काळा माणूस आहे हे पाहताच तो वैतागला. पण तो परतही जाऊ शकत नव्हता. म्हणून त्यानं अनिच्छेनं डिकी उघडली. मला एकट्याला ती बॅग उचलून आत ठेवता येईना तेव्हा काहीतरी पुटपुटत त्याने उचलून आत फेकली. अमेरिकेत फिरताना चहा-कॉफीच्या स्टॉल्सवरही असे अनुभव यायचे. सोनेरी केसांची, रसरशीत चेहऱ्याची गोरी मुलगी मी जो पदार्थ मागेन तो द्यायची, पण समोर नजरही न टाकता. पण त्याच वेळी इतर गोऱ्या माणसांशी हसून विश करायची. एखादं-दुसरं वाक्य बोलायची. विमानतळ तर असं ठिकाणी की जिथं अठरापगड वंशाच्या माणसांची त्यांना सवय असायला हवी. विमानात फर्स्ट क्लासचा प्रवासी म्हणजे फारच मान. कारण तिकीट फारच महागडं असतं. इतरांपेक्षा प्रशस्त सीट्स्, इतर अधिक सुखसोयी. विमानाची गेटस् ओपन झाली की, आत जाणाऱ्या प्रवाशांची रांग लागायची. पण फर्स्ट क्लासचं तिकीट असेल तर तो सरळ आत जाऊ शकायचा. मी आत जाऊ लागताच मला हमखास अडवलं जायचं. पण तिकीट दाखवताच ते आश्चर्याने 'हा प्राणी इकडं कुठं' अशा नजरेनं बघायचे. तिकीट परत एकदा वर-खाली पाहून तपासायचे. आणि शेवटी आत जाण्याची खूण करायचे. हीच माणसं इतर गोऱ्या पहिल्या वर्गाच्या प्रवाशाला किती अदबीनं वागवतात हे मी तिथंच पाहात असायचो. मी पूर्ण शाकाहारी असल्याने विमानात मला शाकाहारी– अगदी अंडंही नसलेलं– जेवण हवं असायचं. मी स्वतः ज्या ज्या वेळी तिथल्या अंतर्गत प्रवासाचं तिकीट काढलं तेव्हा काढतानाच शाकाहारी असल्याचं नोंदायला सांगितलं. पण दरवेळी ती सूचना अमलात यायची नाही. कारण त्या बाया माझं बोलणं लक्षपूर्वक ऐकतच नसायच्या. माझ्यापुढं नेहमी मांसाहारी जेवणच यायचं. मग मी तक्रार करायचो. स्टुअर्ड खांदे उडवून म्हणायचा, "आम्हाला काही तशी सूचना नव्हती." मग त्यातलं शाकाहारी सँडविच किंवा बिस्कीट उचलून मी खायचो आणि भूक भागवायचो.

याउलट, माझी प्रोग्रॅम ऑफिसर रिनी (ही गोरी अमेरिकन होती) जेव्हा जेव्हा माझं तिकीट बुक करायची, त्या त्या प्रवासात शाकाहारी जेवण, वर माझ्या नावाचं कार्ड खोचून समोर यायचं.

ही माझ्याच बाबतीत वागणूक नाही, तर गोऱ्यांव्यतिरिक्त सर्वच लोकांना अमेरिकेत अनुभवायला मिळते. ब्लॅक्सना तर ही तुच्छता सगळ्यात अधिक वाट्याला येते, यात नवल नाही. अमेरिकेच्या उत्तर भागातल्या न्यूयॉर्क, बाल्टिमोर, डेट्रॉईट सारख्या शहरांचे मेयर्स किंवा व्हर्जिनियाचा गव्हर्नर हे ब्लॅक असूनही निवडून येऊ शकले असले, तरी सर्वसाधारण ब्लॅक्सची परिस्थिती त्यामुळे पालटली नाही. गवई सभापती झाले किंवा जगजीवनराम उपपंतप्रधान झाले तरी खेड्यातल्या पाणवठ्यावर दलितांना पाणी भरता येत नाही, तसंच तिथंही आहे. शहराच्या मुख्य वस्तीतले गोरे संपन्न होऊन उपनगराकडे सरकले व स्वतःच्या बंगल्यांमध्ये राहू लागले आणि मुख्य शहरात एकतर ऑफिसेस किंवा मोडकळीला आलेल्या चाळींमधून दाटीवाटीने राहिलेल्या ब्लॅक्सची लोकवस्ती उरल्याने काही शहरांचे ते मेयर होऊ शकले, एरवी झाले नसते.

'माल्कम एक्स' हा ब्लॅक्सचा जहाल नेता ब्लॅक्सना उद्देशून नेहमी सांगायचा, "आपल्यात खेळाडू आहेत, गायक आहेत याने हुरळून जाऊ नका. खेळ हा शेवटी एक 'पास्ट टाईम' आहे. समाजाचा जगण्याचा तो प्रमुख धंदा होऊ शकत नाही. आपण त्यांचे करमणूक करणारे म्हणून त्यांना हवे आहोत. राजकारण, अर्थकारणातले भागीदार म्हणून नव्हे. म्हणून आपल्या खेळ आणि कला यांना ते उत्तेजन देतात. या सापळ्यात आपण सापडू नका." माल्कम एक्सचा पुढे खून झाला. ब्लॅक्सची जहाल चळवळ फुटून निकामी झाली. आता मार्टिन ल्यूथर किंगचा शिष्य जेसी जॅक्सन हा जबाबदार पुढारी उरलाय. राष्ट्राध्यक्षपदाच्या उमेदवारीची दारं ठोठावतोय पण डेमॉक्रॅटिक पक्षातही त्याला बहुमत मिळू शकत नाही. आज काहीजण वरच्या पदांपर्यंत पोहोचले असते तरी सर्व ब्लॅक समाजाची प्रचंड वेगाने घसरण चालू आहे.

न्यूयॉर्क हे जगाचे आकर्षण असलेले शहर आहे. 'न्यूयॉर्कर' असल्याचा तिथल्या नागरिकांना अभिमान आहे. अमेरिका एकीकडे आणि न्यूयॉर्क शहर एकीकडे अशी अवस्था आहे. मी अमेरिकन नाही, मी न्यूयॉर्कर आहे, असं अभिमानाने जाहीरपणे सांगणारे लोक तिथं आहेत. कला, नाटकं, साहित्य यांच्या उपक्रमांनी ते गजबजलेलं असतं. 'Most Vibrant city' असं त्याचं वर्णन करतात. दोन मैल रुंद आणि पाच-सहा मैल लांब असं 'मॅनहॅटन' हे बेट म्हणजे न्यूयॉर्कचं डाउन टाऊन आहे. तिथं असलेल्या वॉल स्ट्रीटच्या शेअरबाजारावर जगातल्या आर्थिक उलथापालथी होतात. ए.बी.सी., एन.बी.सी. ह्या अमेरिकेचं लोकमत घडवणाऱ्या टी.व्ही. कंपन्या या छोट्या बेटावरच आहेत. टाइम,

न्यूजवीक, लाईफ ची ऑफिसं याच बेटावर आहेत.

या बेटावरच्या आडव्या-उभ्या रस्त्यांवर उंच दिसतात आकाशात गेलेल्या चकाकत्या इमारती. स्टेट एम्पायर, वर्ल्ड ट्रेड सेंटर, क्रिसलर टॉवरसारख्या इमारती तर जगातल्या उंच इमारती आहेत. ट्रंप टॉवरचा अंतर्भाग आरसे, तांब्यांचे पत्रे, कारंजी यांनी लखलखत ठेवला आहे. प्रचंड महागडी दुकानं आहेत. तिथे एका रस्त्यावर अमेरिकेतील अतिश्रीमंतांची घरं आहेत. त्यांत एलिझाबेथ टेलरचंही घर आहे. एकेका चित्राची किंमत मिलियन्स डॉलर्स अशी अनेक चित्रं तिथल्या एकेका म्युझियममधे आहेत.

या न्यूयॉर्कला दुसरीही बाजू आहे. या भारी कपड्यांच्या गर्दीत फाटके कपडे घातलेले ब्लॅक्सही फिरत असतात. मी गेलो तो सीझन डिसेंबरचा होता. बर्फ येऊ घातलं होतं. गरम कपड्यांशिवाय दिवसा वावरणं कठीण होतं. संध्याकाळनंतर बंद घरातच माणसाला ऊब मिळू शकत होती. अशा वेळी ही फाटक्या कपड्यातली हजारो माणसं अक्षरशः उघड्यावर रात्री घालवीत होती. यांचा रात्रीचा सहारा म्हणजे भुयारी रेल्वेची स्टेशनं. वरती न्यूयॉर्क लखलखत असलं तरी खालची ट्यूब रेल्वेस्टेशन्स ही अंधारी. जिकडेतिकडे अगदी आपल्याकडच्यासारखी घाण पडलेली होती. जुने लोखंडी गर्डर्स, खांब, जिकडेतिकडे लोखंडी गजांचे तुरुंगांसारखे दरवाजे... असं खचवणारं दृश्य. त्यात हे बेघर ब्लॅक्स जागा असेल तिथं बसून राहिलेले. त्या अर्धवट अंधारात काळ्या चेहऱ्यांवरचे मळकट, उदास डोळे पाहवत नसत. पॅनामच्या गगनचुंबी इमारतींखालचं सेंट्रल स्टेशन हे त्यातलं बरंच मोठं स्टेशन आणि म्हणून अशा बेघर लोकांनी अगदी खच्चून भरलेलं. अधूनमधून कुणीतरी ट्रंपेट वाजवत, गाणं म्हणत असायचं, जाणारे-येणारे लोक त्यांच्याभोवती कडं करून उभे राहत. क्वार्टर डॉलर किंवा त्याहून हलकी नाणी त्यांच्यापुढे टाकत असत. अमेरिकन 'ग्रे हाऊंड' किंवा तत्सम बस कंपन्यांचेही स्टॉप्स, स्टेशन्स ही अशीच ब्लॅक बेघरांनी भरलेली दिसली. ही रेल्वे किंवा बस स्टेशन्स या थंडीच्या दिवसांत तुडुंब भरूनही आणखीही लोक उरत. एका ठिकाणी पाहिले, टी.व्ही. च्या बॉक्सच्या आकाराच्या कार्डबोर्ड बॉक्समध्ये काहीजण झोपलेले होते.

'डे-टॉप' नावाच्या ड्रग डीॲडिक्शन सेंटरमधल्या बऱ्या झालेल्या डिक. सी. नावाच्या व्यसनी तरुणाबरोबर न्यूयॉर्कच्या रस्त्यांनी फिरलो. तो म्हणाला, "बहुतेक बेघर ब्लॅक्स हे ड्रग ॲडिक्टस् आहेत. आणि बहुतेक ड्रग ॲडिक्टस् हे एडस्चे पेशंट आहेत." नंतर मला दडपून टाकणारी आकडेवारीही समजली. न्यूयॉर्क शहरात अडीच लाख एडस्चे पेशंट, पाच लाख हेरॉईन ॲडिक्ट आणि साडेसात लाख कोकेन ॲडिक्ट आहेत. आम्ही रस्त्याने चाललो असता अनेक ब्लॅक्स आम्हाला अडवायचे आणि सुटे पैसे आहेत का विचारायचे. हा भीक मागण्याचाच प्रकार. बरोबर डिक् असल्याने तो बरोबर त्यांना वाटेला लावायचा. पण त्या आधी सानफ्रान्सिस्कोला गेलो होतो. तिथं असेच बेघरांचे थवेच्या थवे. म्युझियमच्या दिशेनं एका रस्त्यानं मी चाललो असता तो रस्ता कमी कमी गर्दीचा होऊ

लागला. कडेला बसलेले अनेकजण माझ्याकडे बघताहेत असे जाणवू लागलं. त्यांतले काही जवळ येऊ लागताच मी फिरलो आणि कॅमेऱ्याच्या मोठ्या दुकानात शिरलो म्हणून सुटलो. डिक्ने मला न्यूयॉर्कमधे भटकायच्या खूप टिप्स दिल्या. माझ्या खांद्यावर सतत पिशवी असे. त्यात कॅमेरा होता. तो म्हणाला,

"सतत पिशवीवर हात ठेव. हात नसला तर इथं मागून कुणीही येईल आणि पिशवी सरळ घेऊन जाईल. आजच सकाळी मी एका सिनेमा थिएटरसमोरून चाललो होतो. एक चायनीज बाई सिनेमाची तिकिटं काढून बाहेर पडत होती. हातातल्या पाकिटात ती तिकिटं ठेवत होती. तेवढ्यात कुणीतरी तिच्या हातातनं पाकीटच उडवलं. काय करणार ती ?"

मी ज्यांच्याकडे उतरलो होतो त्या मोहन वाकडे आदी मित्रांनी बजावलं होतं की, "दिवसभर भटक पाहिजे तेवढं पण संध्याकाळी पाच वाजले की असशील तिथून ट्रेनमधे बसून घरी यायचं." स्टेशनवर अंडरग्राऊंड रेल्वेची तिकिटाऐवजी कूपन्स, बिल्ले विकत मिळतात. कूपन विकणाऱ्या विंडो क्लार्कसमोरची काच अगदी खालच्या फळीपर्यंत पोहोचलेली, बाजूने गजांचा कडेकोट बंदोबस्त. मी मोहनला हे असं का विचारताच तो म्हणाला, "त्याच्यापाशी कॅश असते. बरं रात्री एकटाच ना तिथं. ही काच बुलेटप्रुफ आहे. काच आणि फळीच्या मधली सापटी लहान, कारण त्यातनं पिस्तुल जाऊ शकत नाही. तरी एकाने आतल्या क्लार्कला दम दिला की कॅश दे नाही, तर बाहेरनं सापटीतनं पेट्रोल टाकतो आणि देतो पेटवून.' मी स्वतः एकदा पाहिलंय की एकजण हातातल्या कांबीने ही काच फोडायचा प्रयत्न करीत होता. त्याला वेळ लागला तेवढ्यात आतल्या क्लार्कने फोन केला, पोलिस आले म्हणून तो क्लार्क बचावला. इथं दक्षता घेऊन राहिलं तर सहसा काही होत नाही. गाफील राहिलात तर लुटले गेलाच म्हणून समजा."

अमान मोमीन या मित्राबरोबर हार्लेम पाहायला गेलो. मॅनहॅटन या अतिश्रीमंत बेटाचा अर्धा उत्तर भाग हा ब्लॅक लोकवस्ती असलेला पूर्ण दरिद्री भाग आहे. आपल्याकडल्या नायगाव परळची आठवण झाली. हार्लेमविषयी आधीच्या लोकांनी भीती घातली होती. गाडीने फास्ट जाऊन फास्ट परत यायचं. तेही गाडीच्या काचा बंद करून. त्यातून दिसेल ते हार्लेम. पण मी व अमान ट्रेनने, पुढे चालत आणि येताना बसने आलो. बस स्टॉपवरही चांगले आठ-दहा मिनिटं उभे होतो. तिथलं अनाथ ब्लॅक लोकांना मदत करणारं एक सेंटर पाहून आलो. एक हसतमुख जपानी प्रौढ माणूस गेली बरीच वर्षं ते सेंटर चालवत आहे. रस्त्यावर ओट्याओट्यांनी लोक बसले होते, मुलं खेळत होती. तिथली गरिबीही आपल्या गरिबीपेक्षा बरीच बरी असावी. स्टेशनांमधल्या बेघरांपेक्षा हे लोक बऱ्या परिस्थितीत असावेत.

मी डिक्ला विचारलं, "अमेरिकेत काम नसणाऱ्याला वेलफेअरचे दरमहा पैसे मिळतात ना ? मग या बेघर लोकांना ते मिळत नाहीत का ?"

तो म्हणाला, "वेलफेअरचा चेक यायला त्यांना पोस्टाचा पत्ता तरी असायला पाहिजे

ना? मेलिंग ॲड्रेस नसल्यामुळे अनेक सरकारी सोयींना ते आपोआपच मुकतात. शिवाय रेगनच्या काळापासून वेलफेअर बजेट खूप कट झालंय. ड्रग ॲडिक्ट असला की तो मेथेडॉनची ट्रीटमेंट घेत असेल तरच वेलफेअर मिळतो. तुम्हाला तर माहीतच आहे, ॲडिक्टला अशा गोष्टींमधे सातत्य कधीच नसतं."

ज्या न्यूयॉर्कचा मेयर ब्लॅक आहे, तिथल्या लाखो ब्लॅक्सची ही परिस्थिती आहे. तरी अमेरिकेची उत्तरेतली राज्यं ही ब्लॅक्सच्या बाबतीत सुरुवातीपासून उदारमतवादी आहेत, दक्षिणेत तर आणखीच वेगळे प्रश्न. या प्रश्नावर सिव्हिल वॉर लढून ते हरल्याने नाइलाजाने ब्लॅक्सना स्वातंत्र्य त्यांना द्यावं लागलं पण त्याची ठसठस अजून तशीच कायम आहे.

अमेरिकेतले जे जे कौटुंबिक प्रश्न आहेत, त्यांतले ब्लॅक्समधे ते अधिक तीव्र आहेत, याचं कारण त्यांच्या इतिहासात आहे. ब्लॅक्सना सक्तीने बोटीत भरून अमेरिकेत आणलं गेलं आणि शेती व इतर कामांवर जुंपलं गेलं. त्या काळात त्यांच्यातल्या नवरा बायकोला पद्धतशीरपणे अलग केलं गेलं. नंतरही स्त्री-पुरुषांना वेगळ्या ठिकाणी कामाला जुंपण्याचं धोरण होतं. तो आपल्या कुटुंबात राहिला तर नाही म्हटलं तरी कामावरून घरी जाण्याची ओढ लागेल व त्यातून कामाकडे दुर्लक्ष होईल. कुटुंबात माणसं राहिली की त्यांच्यात नात्याचं जाळं निर्माण होऊन संघटना निर्माण होऊ शकेल, म्हणून कुठंही शक्यतो स्त्री-पुरुषांना एकत्र राहू दिलं गेलं नाही. गोऱ्या मालकांचे सर्रासपणे काळ्या स्त्रियांशी शरीरसबंध असत, त्यातून प्रजा निर्माण होई. ती काळ्या-गोऱ्या वंशाचं मिश्रण असलेले चेहरे व रंग घेऊन येई. त्यामुळे अमेरिकेत ब्लॅक्समधे या दृष्टीने बरीच विविधता दिसते. पण सगळ्यांना वागणूक मात्र मिळते ती एकच. अमेरिकन समाजाच्या ऐश्वर्याची पायाभरणी ही असल्या गोष्टींवर झाली आहे. मैत्रीचा हात पुढे करणाऱ्या, घाबरून गेलेल्या, स्तिमित झालेल्या रेड इंडियन्सना बायका-पोरांसहित सर्वांवर गोळ्या झाडून झोपवलं तो एक इतिहास आणि हा ब्लॅक्सचा दुसरा इतिहास. ब्लॅक्सना फटके मारण्याच्या प्रकारांबद्दल ऐकलं होतं, पण हा पद्धतशीरपणे कुटुंबव्यवस्था खच्ची करण्याचा इतिहास जेव्हा वाचला, तो जास्त भयानक वाटला. आपापल्या बायकापोरांवर हळुवारपणे प्रेम करणारा मानवसमूह, हातात सापडलेल्या दुबळ्या मानवसमूहाच्या बाबतीत किती क्रूर असू शकतो.

आपल्याही इतिहासाच्या पायाखाली भरपूर क्रौर्य दडपलं गेलेलं आहेच. खालच्या जातींचे आक्रोश आता आता ऐकून घेण्याच्या मनःस्थितीत आपण आलोत. पण तरीही फरक मनात येतोच. इथल्या दलितांना खालचं स्थान होतं, पण तरी त्या जातींचं आपापलं समूहजीवन, कौटुंबिक जीवन होतं. त्यांच्या आत्मसन्मानाच्या काही जागा होत्या. त्यांच्या विशिष्ट परंपरागत हक्कांबाबत वरिष्ठही त्यांना वचकून असायचे. त्यांच्या जातीअंतर्गत पंचायती होत्या. त्यांचे अंतर्गत बाबीतले निर्णय हे अखेरचे असत. इथं ब्लॅक्सच्या बाबतीत सगळाच अंधार. मी मराठवाड्यात दलित अत्याचाराच्या ठिकाणी गेलो तेव्हा स्थानिक पोलिस गावातल्या गुंड पुढाऱ्यांना सामील असलेले दिसायचे, मग आम्ही त्याच्या वरच्या,

आणखी वरच्या अधिकाऱ्यांकडे जायचो. आणि तपासाला नीट चालना देऊ शकायचो. पण इथं पोलिसखात्याची रचनाच वेगळी. त्या शहराचा मेयर हा शहरातील पोलिसखात्याचा प्रमुख असतो. त्यामुळे दक्षिणेतल्या प्रांतात पोलिस खात्यात वंशद्वेष्टे गोरे तर भरपूर आहेतच, पण गोऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून निवडून गेलेले मेयर्सही त्याच मताचे. त्यामुळे न्याय कुठे मागणार? आपल्या इथे राज्याची एकसंध पोलिसयंत्रणा असल्यामुळे वरच्या पातळीवरचे अधिकारी स्थानिक हितसंबंध नसलेले, विचारांनीही कदाचित पुरोगामी सापडू शकतात. तिथल्या न्यायदानातील ज्यूरी पद्धत अजून बऱ्याच ठिकाणी टिकून आहे. ज्युरींची निवड ही रेसिस्ट विचारांच्या पातळीवर होऊ शकते आणि त्यामुळेही ब्लॅक्स किंवा इतर अल्पसंख्यांकांना न्याय मिळत नाही. अशी तिथं आकडेवारी प्रसिद्ध झाली आहे की ब्लॅक्सनी बलात्कार केलेल्या खटल्यांमधे त्यांना जास्तीत जास्त शिक्षा झालेल्या आहेत आणि गोऱ्यांनी बलात्कार केलेल्या केसेसमधे जास्तीतजास्त गोरे निर्दोष सुटले व ज्यांना शिक्षा झाली त्यांनाही मामुली शिक्षा झालेल्या आहेत.

अमेरिकेच्या दक्षिण भागात आणि 'मिड वेस्ट' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मध्यभागात ब्लॅक्सची संख्या कमी आहे आणि त्यांना या द्वेषाचा त्रासही अधिक होतो. एखादा गोरा माणूस रस्त्यावर एकटा उभा असला तर काही बिघडत नाही, पण ब्लॅक उभा असला तर आसपासचे लोक फोन करून पोलिसांना कळवतात, 'कुणी डेंजरस माणूस इथं उभा आहे.' मग लगेच पोलिसांची गाडीही तिथं येऊन थांबते. पोलिस उतरून ब्लॅकला घेरतात. त्याला भिंतीकडे तोंड करून, हात वर करून उभं करतात. त्याचे खिसे तपासतात. अंगावर शस्त्र किंवा ड्रग आहे का तपासतात, तपासासाठी पोलिसस्टेशनवर नेतात. हे काही कारण नसताना! तो सज्जन माणूस असेल तर त्याला ते किती अपमानास्पद वाटत असेल. रस्त्यावर उभं राहण्यावरून मला वृंदा राव नावाच्या कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीत शिकणाऱ्या मुलीनं तिचा अनुभव सांगितला. ती रस्त्यावर मैत्रिणीच्या गाडीची वाट पाहत उभी होती. तेवढ्यात पोलिसांची गाडी येऊन थांबली, त्यांनी विचारलं, "बॉर्डर कधी क्रॉस केलीत?" ते तिला मेक्सिकन बाई समजले होते. वृंदा नुकतीच भारतातून आलेली असल्याने पासपोर्ट नसलेले मेक्सिकन लोक बॉर्डर क्रॉस करून येतात, ते तिला माहीत नव्हतं. तिला वाटलं, 'भारतातून कधी आलात' असं त्यांना विचारायचं आहे. ती म्हणाली, "दहा दिवसांपूर्वी." ते म्हणाले, "बसा गाडीत." "का? मी नाही बसणार." "मग तुम्हाला बेड्या घालाव्या लागतील." ती नाइलाजाने आत बसली. पोलिसस्टेशनवर तिथला मुख्य अधिकारी चांगला असल्याने त्याच्या ही वस्तुस्थिती लक्षात आली. मग तिला होती तिथं आणून सोडलं. सर्वसाधारण समाजाकडून मिळणाऱ्या वागणुकीविषयीही वृंदा सांगत होती, "तिथं लोक रांगेत उभं राहण्याला फार महत्त्व देतात. कुणी रांगेत मधेच शिरत नाही, धक्काबुक्की करीत नाही. पण मला कितीदा तरी असा अनुभव आला की भारतीय किंवा ब्लॅक्स रांगेत उभे असले की मागचे गोरे लोक बऱ्याचदा त्यांना न पाहिल्यासारखं करून, त्यांना डावलून सरळ

पुढे जातात. अशा लोकांच्या विरुद्ध आपण बोलूही शकत नाही."

'द क्लॅन' नावाच्या पॅटसी सीम्स या पत्रकर्तीने लिहिलेल्या 'कू क्लक्स क्लॅन'वरच्या पुस्तकात बऱ्याच गोऱ्या लोकांच्या मुलाखती आहेत. त्यावरून या प्रकारच्या लोकांचे मानस समजते. रॉबर्ट जोन्स म्हणाला, "मी या 'निगर्स'चा द्वेष करीत नाही. मी या 'निगर्स'बरोबर संबंध ठेवीत नाही. (एवढंच काय) मी सर्वसामान्य गोरी फालतू माणसं, ज्यू, कॅथॉलिक्स यांच्याबरोबरही संबंध ठेवीत नाही. मला वाटतं, 'निगर्स'ना अधिकार आहेत, पण ते स्वतंत्र अधिकार आहेत." केकेकेचा एक नाइट हॉक म्हणाला, "मला बायको आणि पाच मुलं आहेत. मी जसा वाढलो तसं मला माझ्या मुलांना वाढवायचं आहे. मला ज्या शाळेत निगर्सची मुलं होती त्या शाळेत शिकण्याची सक्ती केली नव्हती. मला त्यांच्याबरोबर खाण्याची सक्ती केली नव्हती. मला जे हक्क होते ते आजही माझ्या मुलांना का असू नयेत?" वुडल् नावाचा माणूस म्हणाला, "तुम्ही कधी घोड्यांना गायींमध्ये मिसळलेलं पाहिलं आहे का? तुमचा कुत्रा कधी डुकरांमध्ये मिसळत नाही. डुकरीणसुद्धा तिच्या पिलांचा कळप घेऊन फिरते, त्यांचं संरक्षण करते. तुम्हाला तुमच्या गोऱ्या मुलांचं संरक्षण करायला नको का? की तुम्ही ब्लॅक निगर्सच्या आहारी आपल्या मुलांना जाऊ देणार आहात?"

टेक्सासमधल्या ब्यू माऊंटजवळच्या व्हिडर या गावी ही लेखिका राहिली होती. हे गाव संपूर्ण गोऱ्या लोकांचं. तिथं काही वर्षांपूर्वी तर चक्क पाटीच लावली होती की, 'निगर्स लोकांनो, या गावात तुमच्यावर सूर्य मावळू देऊ नका.' 'आता पाटी नाही पण लोकांच्या मनातली भावना तशीच आहे. पॅट स्मिथर व डॅन या एका जोडप्याला विचारलेली प्रश्नोत्तरं तिनं दिलेली आहेत. त्यांना कुठं पबमधे, रेस्टॉरंटमधे, दुकानात ब्लॅक दिसला तर ते तिथं जातात. त्याला केकेकेचं कार्ड देतात व म्हणतात, "तू इथं नवा आहेस. तुला त्रास व्हावा असं आम्हाला वाटत नाही. तू हायवेला लाग आणि पुढच्या गावाला चालू लाग." तो गेला की नाही हे पाहण्यासाठी त्याच्या गाडीमागं गाडी ठेवून त्याला बाहेर काढून देतात. समजा, एखाद्या शाळेत ब्लॅक शिक्षक असेल, तर ही बायको शाळेत जाऊन मुलांसमोर त्याला बजावते. प्रिन्सिपॉलला ताकीद देते. तो शिक्षक गाव सोडून आपोआप चालता होतो. लेखिकेनं विचारलं, "एखादा ब्लॅक माणूस समजा दुकानात टूथपेस्ट घेत असेल तर त्यानं तुमचं काय नुकसान होतं?"

नवरा म्हणाला, "पण त्यांना इथं येऊन टूथपेस्ट घ्यायचं कारणच काय? त्यांच्या गावी काय दुकानं नाहीत का?"

बायको म्हणाली, "आज ते दुकानात टूथपेस्ट घेतात. उद्या ते हॉटेलात जेवतील. . . आम्ही ते कसं चालू देऊ?"

कायद्यानं तिथल्या हॉटेलात जाऊन कुणालाही खाता येतं. पण कुणी ब्लॅक तिथं येऊ नये म्हणून पाटी लावतात की 'या हॉटेलचा दहा टक्के फायदा 'कू क्लक्स क्लॅनला जातो.'

'क्लॅन' हे अमेरिकन मनातल्या वंशविद्वेषाचं गेली शंभराहून अधिक वर्षं प्रतीक झालेलं आहे. १८६५ साली टेनेसी राज्यातल्या पुलास्की गावातल्या सहा लोकांनी गंमत म्हणून ही संघटना काढली. ('कूक्लक्स' या ग्रीक शब्दाचा अर्थ वर्तुळ. एक मंडळ) तेव्हापासून ती अधूनमधून लुप्त होते, परत डोकं वर काढते. या संघटनेचे लोक एखाद्या रात्री जमतात. अंगात पांढरे पायघोळ झगे घालतात. डोक्यावर फक्त डोळ्यांसाठी दोन भोकं ठेवलेली, वर निमुळती टोपी चढवतात. लाकडाचा क्रॉस करून तो पेटवतात. असा क्रॉस जाळण्याचा समारंभ झाला की, आसपासच्या गावात ब्लॅक्स, ज्यू, कॅथॉलिक यांची घरं पेटवली जातात किंवा त्यांच्यापैकी कुणाला फासावर लटकावतात किंवा स्त्रियांवर बलात्कार करतात. या प्रकारची दहशत निर्माण झाली की, ब्लॅक्स एकतर गाव सोडून जातात किंवा अगदी दबून अस्पृश्यासारखं जीवन जगतात. सत्य घटनेवर आधारलेला 'मिसिसिपी बर्निंग' नावाचा सिनेमा पाहिला. (गेल्या वर्षी ऑस्करसाठी त्याचा विचार झालेला होता.) त्यात पाहिलं की तिथले पोलिसच या क्लॅनचे सभासद होते आणि त्यांनी सिव्हिल लिबर्टी चळवळीतल्या तिघांना सरळ ठार केलं. एफ.बी.आय.चे तपास अधिकारी वॉशिंग्टनहून तपासाला आल्यावर त्यांनी ब्लॅक्सच्या वस्त्या जाळणं, फासावर लटकावणं या प्रचारांचा उद्रेक घडवून आणला.

मिसिसिपी राज्यातल्या अनेक ब्लॅक वस्त्या, ब्लॅक शाळा आणि ब्लॅक चर्चेस जाळल्या गेल्या. मिसिसिपीला 'बर्निंग चर्चेस कॅपिटल ऑफ द वर्ल्ड' असंच नाव पडलं. या क्लॅनच्या बुरख्याखाली गोऱ्यांमधले अनेक प्रतिष्ठित, श्रीमंत लोक असलेले आढळले आहेत. अनेक माफिया टोळ्या आपले उद्योग या बुरख्याखाली करीत असतात. लाखो ज्यूंना गॅसचेंबरमधे घालून मारणाऱ्या आईकमनला क्लॅनच्या एका नेत्यानं जाहीरपणे 'देशभक्त ख्रिश्चन' असं मानाचं पद दिलं. 'ख्रिस्ताचा वध करणारे ज्यू' असा ते ज्यूंचा उल्लेख करतात. ख्रिस्त हा गोरा होता. त्यानं गोऱ्या लोकांसाठीच ख्रिश्चन धर्म स्थापन केला. कॅथॉलिकांवर त्यांचा राग. हे कॅथॉलिक रोमच्या पोपला मानतात. पोपला मानता ना? मग तुम्ही रोमला जा, इथं कशाला राहता? ब्लॅक्सवर आमचा राग नाही, पण त्यांनी आता त्यांच्या आफ्रिकेत चालते व्हावे. जातीयवादी कुठल्याही देशातले असोत, त्यांची भाषा कशी सारखी असते! ब्लॅक शब्द काढून दलित शब्द घाला किंवा ज्यू शब्द काढून मुसलमान शब्द घाला की, ते अगदी आपल्याकडचे भाषण वाटेल. दलितांनी मतदानाला बाहेर पडू नये, म्हणून दंडेली करण्यात येते, तशी तिथं अनेकदा ब्लॅक्सच्या बाबतीत झालेली आहे. ब्लॅक्सनी मतदार यादीत आपली नावं नोंदवावीत, म्हणून मोहीम काढायला गेलेल्या उत्तरभागातल्या अनेक गोऱ्या स्वयंसेवकांना पळवले. काहींना तर ठारही केले गेले. मतदानाच्या दिवशी डोक्यावर क्लॅनची बुरखेवजा टोपी घालून गाडीच्या खिडकीतून दोराचा फास बाहेर लटकावून ब्लॅक वस्तीच्या बाहेर क्लॅनचे लोक फिरत, त्यामुळे कुणाही ब्लॅकला बाहेर पडायची हिंमत होत नसे. उदारमतवादी डेमॉक्रॅट पक्षाच्या लोकांची ते 'बोल्शेविक्', 'लेनिनिस्ट' 'ज्यूंना विकले

गेलेले लोक' अशा शब्दातं संभावना करतात.

अमेरिकेत 'व्हिजेलांतीझम' अगदी वसाहतींच्या स्थापनेपासून खोलवर रुजलेली आहे. व्हिजिलन्स म्हणजे लक्ष ठेवणं यावरून हा शब्द आला आहे. जागरूक राहून लक्ष ठेवणाऱ्या अशा संघटना त्यापुढे जाऊन कायदा हातात घेऊन त्या गोष्टींचं पारिपत्यही करीत. इंग्लंडमधे 'प्युरिटन' या 'प्रोटेस्टंट'मधल्या शुद्धतेचा आग्रह धरणाऱ्या पंथाच्या लोकांचा इंग्लंडमधे छळ होऊ लागताच ते लोक अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावरच्या, 'न्यू इंग्लंड' म्हणून नंतर ओळखल्या जाणाऱ्या भागात स्थायिक झाले. आपल्या पंथाची शुद्धता सांभाळण्याची सामूहिक जबाबदारी सगळे मानत. एका मुलीच्या स्वप्नात आलं की एक स्त्री ही चेटकीण आहे. त्यानंतर लोकांनी त्या स्त्रीला दगड मारून, ठेचून ठार केलं. तेव्हापासून आपल्या समाजाची शुद्धता आपणच टिकवायची, त्यासाठी आपण कायदा हातात घ्यायचा, हे तत्त्व मुरलं गेलं आहे. पुढे 'पश्चिमेकडे जा, आपलं भवितव्य आपणच घडवा.' हे तिथल्या जीवनाचं प्रतिष्ठित मूल्य झालं. त्यामुळे जे जे रेड इंडियन आडवे आले, त्यांना गोळ्या घालणे, यात कुणाला गैर वाटत नव्हतं. ब्लॅक्स गुलाम म्हणून पदरी बाळगणे हा गुन्हा नव्हता. अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा करणाऱ्या थॉमस जेफर्सनच्या पदरीही ब्लॅक गुलाम होते. एखादा गुलाम पळून गेला तर त्याला पकडून आणायचं आणि स्वतःच त्याला फासावर चढवणं यात कुणाला गैर वाटतच नव्हतं. खासगी मालमत्ता हा तिथं स्वातंत्र्याइतकाच महत्त्वाचा मूलभूत हक्क मानला गेला आहे. फ्रेंच राज्यक्रांतीमधे 'लिबर्टी, इक्वालिटी अँड फ्रॅटर्निटी' ही त्रिसूत्री होती. कुणीतरी विनोदानं म्हटलंय, अमेरिकन क्रांतीमधे 'लिबर्टी, इक्वालिटी अँड प्रॉपर्टी' ही त्रिसूत्री आहे. या मालमत्तेवर आक्रमण करणाऱ्याला शासन करणं, हा तो स्वतःचा हक्क समजतो. कुठल्याही परवान्याशिवाय बंदूक, पिस्तूल बाळगता येतं, हे सुद्धा त्यातूनच आलं. शस्त्र बाळगायच्या हक्कासाठी इंग्लंडबरोबर ते भांडले व अमेरिकन क्रांतीत ही मागणी हा महत्त्वाचा भाग होता. मालमत्तेचं रक्षण करण्यासाठी गोळीबार केला तर काय चुकलं ? टेक्सासमधल्या गायी, घोड्यांच्या रँचेसमधे कुणी गायी पळवल्या किंवा जमिनीवर अतिक्रमण केलं तर शेरीफकडे जायच्या ऐवजी स्वतः पारिपत्य करणं हीच रूढ पद्धत होती. आजही एखाद्याच्या घरात किंवा आवारात चोर शिरला आणि त्याने त्या चोराला गोळी घातली तरी मनुष्यवध केलेली अशी माणसं सर्रास निर्दोष सुटतात. जज्ज त्यांना असं म्हणत नाही की, चोराकडे शस्त्र होतं का, त्याने पिस्तूल आधी उडवलं होतं का, इत्यादी.

न्यू इंग्लंड भागातल्या सुरुवातीच्या काळात घडलेल्या त्या स्त्रीला ठार करण्याच्या प्रसंगावरून तिथं त्याविरुद्ध लोकमत खूप ढवळलं गेलं. त्यांच्यात पुरोगामी विचार रुजला. पण पश्चिमेकडे बंदुकांच्या जोरावर वसाहती करायला गेलेले लोक शिकलेले नव्हते. त्यांचा

शिक्षणावर विश्वासही नव्हता. मॅसॅच्युएट्स् आणि त्या आसपासच्या भागात सुरुवातीला धार्मिक कॉलेजे निघाली. नंतर इतर ज्ञानशाखा सुरू झाल्या. पण पश्चिमेकडे किंवा दक्षिणेकडे सरकलेल्या लोकांच्या मनात या शिकलेल्या लोकांविषयी तुच्छताच होती. हे शहरी लोक आम्हाला काय शिकवताहेत, आमचं भवितव्य आम्ही आमच्या मनगटांनी घडवतोय, अशी त्यांची धारणा होती व ती वृत्ती मिडवेस्ट आणि दक्षिण भागात अजूनही गाभ्यात टिकून आहे. 'मॅनिफेस्ट द डेस्टिनी' या स्लोगनमुळे त्यांचं कार्यक्षेत्र आणखीही पसरत गेलं. दक्षिणेकडचे स्पॅनिश सत्तेखालचे देश मुक्त करणं, हे त्यांना कर्तव्य वाटू लागलं. इकडे अटलांटिक आणि तिकडे पॅसिफिक एवढ्या मोठ्या भागाचं भवितव्य आपल्याच हाती दैवाने सोपवलं आहे, ही भावना रुजलेली होती. त्यातून आजचं 'स्ट्राँग अमेरिका' आणि 'लीडर ऑफ द वर्ल्ड' हे शब्द तिकडे त्या समाजाच्या गाभ्याचे भाग झाले.

मी अमेरिकेत असताना अध्यक्षीय निवडणुकीचा प्रचार आणि प्रत्यक्ष निवडणूक पाहायला मिळाली. बुश-डुकासिस यांपैकी डुकासिस हा उदारमतवादी डेमॉक्रॅट म्हणून जवळचा वाटायचा. पण नंतर लक्षात आलं की तोही गोऱ्या बहुसंख्यांक लोकांना मानवेल अशा रीतीनं मोजून मापून भाषणं करायचा. डेमॉक्रॅटिक पक्षाच्याच जेसी जॅक्सन या सर्वांत लोकप्रिय ब्लॅक पुढाऱ्याला घेऊन तो कधी फिरला नाही. तिथल्या टी.व्ही. वरच्या दोन्ही उमेदवारांच्या दोन सविस्तर मुलाखती पाहिल्या. आपल्याकडे उदारमतवादी (लिबरल) हा शब्द सन्मानार्थ समजला जातो. तिथं बुश, डुकासिसला उद्देशून तो शब्द जवळपास शिवी दिल्यासारखा वापरत होता आणि डुकासिसही असं छातीठोकपणे म्हणत नव्हता की 'हो मी लिबरल आहे. माझी अमूक अमूक मूल्यांवर श्रद्धा आहे' तो गुळगुळीत बोलून वेळ मारून न्यायचा. बुश हा टिपिकल गोऱ्या अमेरिकनांची मते असलेला किंवा त्या मतांना फुंकर घालीत होता. रेगनप्रमाणे त्याचाही या सगळ्या 'वेल्फेअर' उपक्रमांवर विश्वास नव्हता. वेलफेअरवर खर्च म्हणजे आळशी लोकांना उत्तेजन. त्यापेक्षा अर्थव्यवस्था बळकट करा. उत्पादन वाढवू यात, त्यातनं हे प्रश्न आपोआप सुटणार आहेत, असं त्यांचं म्हणणं. वेलफेअरचा फायदा गरीब लोकांना म्हणजे त्यात बहुसंख्येने असलेल्या ब्लॅक्सना मिळतो, ही तिथली वस्तुस्थिती. रेगनने यावरच्या बजेटना कात्री लावल्यामुळेच न्यूयॉर्क, शिकागो, डेट्रॉईट सारख्या मोठ्या शहरांमधून बेघर ब्लॅक्सचे थवेच्या थवे निर्माण झाले आहेत. या धोरणामुळे गरीब गोरा वर्गही भरडला जातोच. वैद्यकीय सेवा आपल्याकडच्या सारखी तिथल्या गरिबांना मोफत उपलब्ध नाही.

तीच गोष्ट शिक्षणाबद्दलची. ते इतकं महागडं की गरिबांना शिकताच येऊ नये. आपल्याकडे आर्थिकदृष्ट्या मागासांचे, इतर बाबतीत अनुकूलता असेल तर फी अभावी शिक्षण अडत नाही. तो हवे तेवढे शिकू शकतो. तसं तिथं नाही. म्हणून तिथल्या

मध्यमवर्गाला या प्रश्नांची झळ लागत असूनही बुश हा 'स्ट्राँग अमेरिका' ही घोषणा देत गोऱ्यांमधल्या श्रेष्ठत्वाच्या भावना फुलवीत होता. आपण जगाचे नेते आहोत, आपल्या अर्थव्यवस्थेवर जगाची अर्थव्यवस्था अवलंबून आहे. रशियन नेतृत्वात जो बदल झाला आहे, तो आपल्या (रेगनच्या) या धोरणामुळे. जिमी कार्टरच्या काळात अमेरिका ही जगात हास्यास्पद झाली होती. . . असा प्रचाराचा सूर होता. 'WASP' हा शब्द तिथल्या राजकारणात प्रचलित आहे. 'व्हाइट अँग्लोसॅक्सन प्रोटेस्टंट्स्' म्हणजे युरोपातून आलेले गोरे प्रोटेस्टंट. हे इथं बहुसंख्याक आहेत. त्यांची जास्तीत जास्त मतं जो मिळवील, त्याला निवडणुकीत मोठा फायदा. डेमॉक्रॅट पक्षाचं धोरण लिबरल असल्याने ब्लॅक्स, मेक्सिकन व इतर अल्पसंख्याकांची मतं त्यांना मिळतात. तेव्हा ती मतं आणि 'वास्प'ची निम्मी मतं पडली तर त्यांचे उमेदवार निवडून येऊ शकतात. पण रेगनने त्यांचा हा फॉर्म्युला बदलला. डेमॉक्रॅटिक पक्षाचे परंपरागत गोरे मतदार त्यांनी या धोरणाने आकर्षित केले आणि बुश आता अधिक आक्रमक रीतीने बोलू लागला.

वरकरणी ती निवडणूक आपल्यापेक्षा फारच सौम्य आणि मिळमिळीत वाटली. कुठंही बॅनर्स किंवा आपल्याकडच्या सारखे मोठे कट्आऊट्स् नव्हते. रस्ते, भिंती रंगवलेल्या नव्हत्या. लाऊडस्पीकरचा आवाज नव्हता. एक फूट बाय दोन फूट आकाराची साध्या कागदावर उमेदवाराचं नाव छापलेली पोस्टर्स शेवटी शेवटी दिसली, पण तीही अशी कुठंही नाही, तर दुकानांच्या शोकेसमधे, नोटीस बोर्डावर, इत्यादी. (बूथ कॅप्चुअरिंगचे आपलं तंत्र तिथल्या माफियांना सुद्धा अवगत नसावं) निवडणुकीच्या सभाही जास्तीत जास्त शे-दोनशे लोकांच्या उपस्थितीत. टी.व्ही.वर या सभा बघायचो, तर मोठ्या हॉलमधे टेबला-टेबलांवर लोक जेवताहेत आणि एका बाजूला बुश किंवा डुकासिस भाषण करतोय. लोक खाता खाता ऐकत आहेत. ही शांतता अनुकरणीय वाटली, पण प्रचारामागचा जातीय श्रेष्ठत्वाला फुंकर घालण्याचा प्रकार पाहिल्यावर परत आपल्याकडच्या निवडणुकीसारखंच ते वाटू लागलं. वैद्यकीय व शैक्षणिक बाबतीत सामान्य लोकांची होणारी दुरवस्था यावर डुकासिसचा भर असल्याने मला वाटलं होतं, डुकासिस निवडून येईल. वातावरण, प्रेसची अनुकूलताही त्याच्या बाजूने होती. पण शेवटी शेवटी वातावरण बदललं.

हे बदलायला टी.व्ही. वरच्या बुशची एक जाहिरात कारणीभूत ठरली. डुकासिस हा मॅसॅच्युएट्स् या राज्याचा गव्हर्नर. त्याने तिथे 'फर्लो' प्रोग्रॅम राबवला आहे. अमेरिकेत तुरुंग अपुरे पडत आहेत. त्यामुळे जास्तीत जास्त लोकांना पॅरोलवर बाहेर ठेवायची ही योजना. ही फक्त डुकासिसच नव्हे, तर इतरही अनेक राज्यांत, तिथं रिपब्लिकन गव्हर्नर्स आहेत, अशा ठिकाणीही राबवली जाते. पण डुकासिसच्या राज्यात घडलेल्या घटनेचा या जाहिरातीत उपयोग करून घेतला होता. बलात्काराच्या आरोपावरून शिक्षा भोगणारा एक ब्लॅक या योजनेमुळे पॅरोलवर बाहेर आला आणि त्याने पॅरोलच्या काळात एका गोऱ्या स्त्रीवर बलात्कार केला. ही घटना टी.व्ही. वर फोकस केली होती. तुरुंगातले गजांचे स्वतःभोवती

फिरणारे दार दाखवले होते. एका बाजूंनी गुन्हेगार आत जाताहेत, तेच दुसऱ्या बाजूंनी बाहेर पडताहेत, असं दृश्य होतं. (आणि हे सगळे मुद्दामच ब्लॅक्स दाखवले होते) डुकासिस फाशीच्या शिक्षेच्या विरोधी तर बुश कट्टर समर्थक. त्यामुळे बघा, डुकासिस आला तर गुन्हेगारांना मोकळे रान मिळेल, हा एक संदेश आणि दुसरा म्हणजे ब्लॅक्स माजतील आणि ते गोऱ्या स्त्रियांवर बलात्कार करतील. हा दुसरा संदेश. या जाहिरातीचा विलक्षण प्रभाव पडला. दूध फुटून पाणी एकीकडे आणि चौथा एकीकडे अशी त्या समाजाची अवस्था झाली.

तिथल्या एका विचारवंतानं म्हटलं आहे की, 'क्लॅनचे प्रत्यक्ष सभासद थोडे आहेत, त्यांचे उपक्रम राबवणारे लोकही थोडे आहेत. पण सर्वसाधारण गोऱ्या अमेरिकन माणसाच्या मनात 'क्लॅन' अस्तित्वात आहे तोपर्यंत क्लॅन अमेरिकेतून समूळ नष्ट होणं अशक्य आहे.' इकडे आल्यावर टाइम, न्यूजवीक वाचतो. पूर्वीही चाळायचो. पण आता त्यामागचे ताणतणाव कळू शकतात. न्यूयॉर्कच्या क्वीन्स भागात घडलेली घटना होती. वर्तमानपत्रात 'कार विकणे आहे' ची जाहिरात पाहून एक ब्लॅक तरुण चौकशीसाठी मित्रांसोबत गेला. तो इटालियन गोऱ्यांची बहुसंख्या असलेला भाग होता. तीन-चार गोरी तरुण पोरं मोटर सायकलवर बसलेली होती. हा ब्लॅक तरुण चौकशीसाठी गेला, तर त्यांतल्या एकाने काही कारण नसताना पिस्तूल काढलं आणि गोळी घालून त्याला ठार केलं ! न्यूयॉर्कसारख्या उदारमतवादी परंपरा असलेल्या, अठरापगड वस्ती असलेल्या कॉस्मॉपॉलिटन शहरात ! त्या आधीची एक घटनाही मित्राने सांगितली. एका ब्लॅक तरुणाचा पाठलाग करीत गोरे निघाले आणि त्याला रेल्वे रूळावर अशा कोंडीत पकडले की तो ट्रॅक सोडूच शकत नव्हता आणि आलेल्या गाडीखाली तो चिरडला गेला.

आणि तरीही काहीजण माइक टायसन, बिल कॉस्बी, मायकेल जॅक्सन आणि कार्ल लुईसकडे बोट दाखवून आम्हाला सांगतात की, ब्लॅक्स आता सुधारले, एवढेच नाही तर ते डोक्यावर बसलेत.

मी आल्याला दोन-अडीच वर्षं होऊन गेली. मधल्या कालात बुशने आपलं बस्तान चांगलंच बसवलं. नंतरच्या काळात सुरू झालेल्या इराकविरुद्धच्या युद्धात तर बुश हा 'हीरो'च ठरला. बुश हा WASP चा आणि अमेरिकन गाभ्याचा खराखुरा प्रतिनिधी असल्याचं क्षणोक्षणी जाणवत होतं. पत्रकार परिषदेत तो म्हणाला, " Saddm Husain, your ass will be whipped" म्हणजे थोडक्यात, 'तुझ्या गांडीवर आम्ही फटके मारू.' हे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचं जाहीर वाक्य ! युद्धाच्या काळात त्याचं एक विधान होतं, 'या युद्धानंतर जगाची आम्ही नवी व्यवस्था लावणार आहोत.' आमची व्यवस्था लावणारा हा कोण ? पण हा अधिकार आता बळाच्या जोरावर अमेरिकेने आपल्या हातीच घेतलाय. त्याने अमेरिकेच्या काँग्रेसच्या वार्षिक संयुक्त सभेपुढे, इंग्लंडमधल्या गेल्या शतकातल्या वसाहतीचं समर्थन करणाऱ्या रुदयार्ड किपलिंगची वाक्यंच उद्‌धृत केली. किपलिंगचं

तत्त्वज्ञान 'व्हाइट मॅन्स बर्डन' म्हणून प्रसिद्ध आहे. उर्वरित जग हे अडाणी, मागासलेलं आहे. त्यांचा उद्धार करण्याची जबाबदारी नियतीने गोऱ्या माणसांवर सोपवली आहे, तेव्हा हे 'ओझं' आपण पेललं पाहिजे, हा त्या विचारसरणीचा गाभा. ब्रिटिशांच्या वसाहती झाल्या, त्या नष्ट झाल्या. वसाहतवादाचं युग संपलं. आता परत बुश तीच भाषा करीत आहे. जगाला तो परत एकोणिसाव्या शतकावर नेऊन बसवत आहे. आतापर्यंत रशियाचा शह होता, तोही आता नाही. त्यामुळे त्यांचा घोडा आता मोकाटच सुटला आहे.

अमेरिकतनं आलेला मित्र सांगत होता, "लोक रात्रंदिवस तिकडं टी.व्ही. पाहत बसले आहेत. इराकमधे सायरन वाजला तरी आमच्याकडे टी.व्ही. वर सी.एन.एन. मार्फत ते दृश्य दिसू लागतं. क्रिकेट किंवा फूटबॉल कॉमेंट्रीप्रमाणे चोवीस तास वॉर कॉमेंट्री चालू असते. सगळ्या अमेरिकेला युद्धज्वर चढला आहे. बुश पुढच्या वेळेला थंपिंग मेजॉरिटीने निवडून येणार आणि हे रिपब्लिकन आणखी दहा वर्षं तरी आमच्या उरावर बसणार."

या युद्धात मरणारे जास्तीत जास्त ब्लॅक्स आहेत, ही याची दुसरी बाजू. एकूण लोकसंख्येत बारा टक्के असलेले ब्लॅक्स सैन्यात चोवीस की सव्वीस टक्के आहेत. काही ब्लॅक पुढारी जाहीरपणे म्हणू लागलेत, 'तुम्ही तिथं वाळवंटात रक्त सांडणार, पण आल्यावर तुम्हाला काय मिळणार आहे? तर बेकारी आणि उपेक्षा.' रिपब्लिकनांचं राज्य म्हणजे कल्याणकारी योजनांना फाटा. तितकी बेघर, बेकार लोकांच्या संख्येत वाढ. त्याचा सगळ्यांत जास्त फटका ब्लॅक्सना.

आता तर लॉस एंजेलिस येथे किंग नावाच्या ब्लॅकला पोलिसांनी केलेल्या निर्घृण मारहाणीनंतर व त्या प्रकाराचा व्हिडिओ टेपवरचा पुरावा असूनही ते पोलिस निर्दोष सुटल्याबद्दल अमेरिकेत दंगल उसळली. सगळे ज्युरी गोरे होते. किंगचा अपराध काय तर वेगाने मोटार चालवण्याचा, की बहुतेकजण हा गुन्हा नेहमी करीतच असतात. त्या मारहाणीची टेप टी.व्ही. वर पाहिली तेव्हा हादरलोच. गाडीतून बाहेर काढून त्याला तुडवले. त्याचा लोळागोळा होऊन पडल्यावरही त्याला हातातल्या दंडुक्याने ज्या त्वेषाने पोलिस मारत होते, ते अमेरिकन मनातल्या सुप्त वंशद्वेषाचे, वांशिक अहंकाराचे प्रकट रूपच होते.

o

★★★★★

# चार शब्द

अमेरिकेहून आल्यावर वाटलं, बरं झालं आपण जाऊन आलो ते. वेगळा समाज, वेगळी परिस्थिती पाहायला मिळाली. वेगळा पाया, वेगळे संकेत असलेला समाज अस्तित्वात असू शकतो. हे आधी जाणवलं नव्हतं. वाटायचं, आपल्यासारखंच तिथं. फक्त जरा श्रीमंती थाटाचं. पण तसं ते नव्हतं. ते वेगळंच होतं आणि ते पाहणं फार आवश्यक होतं. कारण ते आपल्याकडे येऊ घातलंय आणि तेही अधिक विकृत स्वरूपात. उद्या आपल्याकडे काय प्रश्न असणार आहेत, याचा अंदाज आजची अमेरिका पाहून लावता येतो.

काही जणांचा असा सूर असतो. बघा, तिकडं अमेरिकेत स्वच्छंदीपणा, घटस्फोट, हिंसाचार. आपली संस्कृती किती चांगली. तसंही मला वाटत नाही. आपल्या संस्कृतीमधल्या काही विकृतींमधनं आजचे इथले प्रश्न निर्माण झालेत. हुंडाबळी, देवदासी इत्यादी प्रश्न अमेरिकनांना खरेही वाटत नाहीत, पण इथं ते आहेत. इथंही हिंसा आहे, पण ती वेगळ्या स्वरूपाची. एकटेपणा अमेरिकेत जाणवतो तसा इथं नसेल, पण इथल्या घटस्फोटित महिलेला, नवीन लग्न होऊन सासरी गेलेल्या सुनांना, मूल न होणाऱ्या विवाहितांना वेगळ्या तऱ्हेच्या एकटेपणाला तोंड द्यावं लागतंच. तिकडे कूक्लक्स क्लॅन आहे, इथंही त्यांचे भाईबंद आहेतच. म्हणून कुणी कुणाला नावं ठेवण्याचा, हसण्याचा प्रश्न नाही. प्रत्येक देशात तिथल्या परिस्थितीतनं, संस्कृतीतनं निर्माण झालेले प्रश्न आहेत. प्रत्येकात चांगलं-वाईट दोन्ही आहे. त्यांचं चलनवलन समजलं तर चांगल्याची निवड करता येईल. अमेरिकेतले प्रश्न समजावून घेण्याने भारतातल्या प्रश्नांकडे पाहायची वेगळी दृष्टी मिळू शकली, ही माझ्या दृष्टीने मोठीच घटना. आज गरीब देशातील कुठल्याही माणसास अमेरिका समजून घेतल्याशिवाय इलाजच नाही, इतके आपण त्यांच्याशी अनेक दृष्टीने बांधले गेलो, जखडले गेलेलो आहोत. अमेरिकन सरकार आता जगाची पुनर्मांडणी करण्याची भाषा करीत आहे, तेव्हा त्यात आपल्याला काय स्थान असणार, कोण जाणे. ते ठरवण्याची सूत्रं सगळी त्यांच्या हातात आहेत. अमेरिका श्रीमंत देश गणला जात असला तरी 'बडा घर पोकळ वासा' अशी परिस्थिती आहे. अमेरिकेचा अर्थव्यवहार अकरा जपानी बँकांच्या हातात आहे. त्यांनी मनात

आणलं तर हे सगळं प्रकरण ते कोलमडून टाकू शकतील.(जगातल्या वीस मोठ्या बँकांमध्ये जपानच्या सतरा आहेत, असं एका माहीतगाराने मला सांगितलं.) पण अमेरिकेच्या हातात इराक युद्धात वापरली गेलेली अत्याधुनिक शस्त्रास्त्रे, स्पेस टेक्नॉलॉजी इ. आहे. त्याचा उपयोग करून ते थोडक्यात म्हणजे दादागिरी करून आपल्याला हवे तसे घडवून आणत आहेत. आपल्या देशावरही त्यांनी आर्थिक नियंत्रणे आणायला सुरुवात केली आहे. क्यूबाची त्यांनी सर्व बाजूंनी कोंडी केलेली आहे. दक्षिण पूर्व आशियातल्या एका देशाने (मलेशिया किंवा फिलिपिन्स) सिगारेटविरुद्ध प्रचार करून, कायदे करून आपल्या देशात वातावरण तयार केले. त्यामुळे अमेरिकन सिगारेट कंपन्यांचा त्या देशातला खप खूपच कमी झाला. त्यावर त्या कंपन्यांनी अमेरिकन सरकारवर दडपण आणले. अमेरिकन सरकारने राजकीय दबाव आणून त्या देशातली सिगारेटबंदी उठवायला लावली. म्हणजे आपण आपल्या देशात आपल्या हिताची पावले टाकायलाही स्वतंत्र राहिलेलो नाही आहोत.

पण या सगळ्यावर उताराही अमेरिकेतच आहे. अमेरिकेत क्षीण असला तरी उदारमतवादी प्रवाह आहे. सिव्हिल लिबर्टीज या मानवतावादी चळवळीत अनेक वंशाचे लोक आहेत. रॉबर्ट केनेडी, मार्टिन ल्यूथर किंग, सीझर शॅवेझ, रॅमसी क्लार्क यासारखी माणसे या प्रवाहात होती व आहेत. अमेरिकन पत्रकारितेचं जग हे भांडवलदारांच्या हातात असलं तरी मुक्त पत्रकारितेची परंपराही बळकट आहे आणि या पत्रकारितेने निदान आणीबाणीच्या प्रसंगी मानवतावादी भूमिका घेतलेली आहे.

तेव्हा सगळंच काही संपलेलं नाही.

आयोवा प्रोग्रॅम निमित्ताने जगातल्या तऱ्हतऱ्हेच्या देशांतले लेखक भेटले आणि उरलेलं जगही त्यांच्यामार्फत अनुभवायला मिळालं. हुकूमशाही राजवटी म्हणजे काय असतं ते नुसत्या त्या लेखकांच्या चेहऱ्यांवरून दिसत होतं. लोकशाहीमुळे आपल्याकडे खूप मोकळं वातावरण आहे. पण कोणाला, तर माझ्यासारख्याला. तेच स्वातंत्र्य यू.पी. बिहारमधल्या जमीनदाराच्या टाचेखालच्या कुळांना असतं का? पोटासाठी दुसऱ्याच्या मैल्याची पाटी वाहणाऱ्या ग्रॅज्युएट भंगी तरुण पोराला असतं का? हे प्रश्न लगेच डोकं वर काढतात. हुकूमशाही तशीच, फक्त तऱ्हा वेगळ्या. संपन्न अमेरिकेच्या पोटात बेघर लोकांचं एक गरीब राष्ट्र अस्तित्वात आहे आणि भारतासारख्या दरिद्री देशातही श्रीमंत लोकांनी निर्माण केलेली जगातली चैनीची हर साधनं उपलब्ध असलेली संरक्षित बेटं अस्तित्वात आहेत. असं सगळं संमिश्र चित्र गोंधळवून टाकणारं **आहे. पण समजा**वून घेतलं तर चांगल्या-वाईटाची, योग्य-अयोग्याची निवड करता येणं शक्य आहे.

अमेरिकेत जाऊन आल्यामुळे एक गोष्ट ठसठशीतपणे जाणवते. आपण केवढ्या प्रचंड प्रमाणात त्यांचं अनुकरण करतो! त्यांच्याकडच्या वस्तू, त्यांच्याकडच्या पॅकिंगच्या तऱ्हा, प्रेझेंट देण्याच्या फॅशन्स, कार्ड पाठवून यांत्रिक शुभेच्छा देण्याचे उपचार, टी.व्ही. वर मुलाखती घेण्याच्या पद्धती कशातच आपलं असं राहिलं नाही. तिकडे निर्माण होणार आणि

इकडे आम्ही ते नावीन्य म्हणून स्वीकारणार. आमच्या जीवनातले प्रश्न आम्ही आमच्या पद्धतीने सोडवू शकत नाही. आमच्या जीवनातला आनंदही आम्ही उत्स्फूर्तपणे उपभोगत नाही, त्याचीही चाकोरी त्यांनीच निर्माण केलेली.

परवा एक तरुण (श्रीमंत थरातला असावा) उभा होता. त्याची जीनची पँट गुडघ्यावर फाटलेली होती. अमेरिकन पद्धतीचे अनेक रंगीत पॅचेस त्याच्या पँटवर लावलेले होते. माझ्या शेजारच्या गांधीवादी वृद्ध कार्यकर्त्या म्हणाल्या, "ही काय फॅशन आहे का ?" मी हो म्हणताच त्या म्हणाल्या, "आम्ही फाटकी साडी घातली किंवा आमच्या कपड्याला ठिगळं लावलेली असली तर लोक आमच्याकडे तुच्छतेने पाहतात, हसतात. आता हा मुलगा किती ऐटीत उभा आहे. याला कोणी हसते का नाही ?"

मी म्हटलं, "कारण ही फॅशन डायरेक्ट अमेरिकेतून आली आहे."

या प्रवासाकडे नजर टाकली, तर अनेक चेहरे आठवून जातात. किती थोड्या काळात किती जणांची उबदार मैत्री ! सारख्या वृत्तीची माणसं भेटली की संस्कृतीचं, भाषेचं अंतर किती सहजपणे नाहीसं होतं. ही ठिकठिकाणी असलेली उत्कटता हा मला केवढा तरी आधार वाटतो. या माणसांना जगाच्या राजकारणात काय किंमत आहे ते माहीत नाही, पण माझ्या मनाला उभारी द्यायचं काम त्यांनी नक्कीच केलं आहे.

o

प्रवास
645
26650
22/10/12